# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग-३**

**(सत्र ५ : पेपर ७)**

# आधुनिक शासन

**(Modern Government)**

**(सत्र ६ : पेपर १२)**

# आधुनिक राजकीय संकल्पना

**(Modern Political Concepts)**

(शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१६

बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-३ पेपर ७ व १२ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-683-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
मा. कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**रिक्त**
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**रिक्त**
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**रिक्त**
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**रिक्त**
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) डी. आर. मोरे**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ राज्यशास्त्र समन्वय समिती ■

अध्यक्ष - **डॉ. व्ही. एम. पाटील**
आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, रामानंदनगर, जि. सांगली

- **प्रा. (डॉ.) पी. आर. पवार**
  अधिविभागप्रमुख,
  राज्यशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. मेजर एम. आर. घनवट**
  मुधोजी कॉलेज, फलटण,
  जि. सातारा

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–५ : पेपर–७ : आधुनिक शासन**
**सत्र–६ : पेपर–१२ : आधुनिक राजकीय संकल्पना**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. आर. जी. मोंगले**<br>राजा शिवछत्रपती कला आणि वाणिज्य महाविद्यालय, महागांव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | १ | – |
| **प्रा. सौ. श्रद्धा विनोद कोठावळे**<br>सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड | २ | – |
| **डॉ. विजय जालिंदर देठे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर | ३ | – |
| **प्रा. डॉ. भगवान अजित**<br>दहिवडी कॉलेज, दहिवडी, जि. सातारा | ४ | – |
| **श्री. अनिल डी. पाटील**<br>सहाय्यक प्राध्यापक, ओंकार शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज | – | १ |
| **प्रा. डॉ. अरुण चव्हाण**<br>भोगावती महाविद्यालय, कुरुकली | – | २, ४ |
| **प्रा. व्ही. एस. भोसले**<br>डी. आर. माने महाविद्यालय, कागल, जि. कोल्हापूर | – | ३ |

**■ संपादक ■**

**डॉ. व्ही. एम. पाटील**
आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज,
रामानंदनगर, ता. पलूस, जि. सांगली

**डॉ. मेजर एम. आर. घनवट**
मुधोजी कॉलेज, फलटण,
जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक ७ सत्र पाच साठी 'आधुनिक शासन' आणि पेपर क्रमांक १२ सत्र सहा साठी 'आधुनिक राजकीय संकल्पना' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक ७ आधुनिक शासन यामध्ये एकात्म शासन आणि संघराज्यात्मक शासन, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ, निवडणूक आणि प्रतिनिधीत्व तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक १२ आधुनिक राजकीय संकल्पना यामध्ये स्त्रीवाद, बहुसांस्कृतिक वाद, पर्यावरणवाद नागरी समाज यांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. बी. शिंदे यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. (डॉ.) पी. आर. पवार, डॉ. भारती पाटील, नेहरू अभ्यास केंद्र समन्वयक, राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. वासंती रासम, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. भणगे रविंद्र, डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे, दूर शिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**डॉ. व्ही. एम. पाटील**
आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
रामानंदनगर, ता. पलूस, जि. सांगली

**डॉ. मेजर एम. आर. घनवट**
मुधोजी कॉलेज, फलटण,
जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–७** | |
| | **आधुनिक शासन** | |
| १. | एकात्म शासन आणि संघराज्यात्मक शासन | १ |
| २. | कायदेमंडळ | २५ |
| ३. | कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ | ४८ |
| ४. | निवडणूक आणि प्रतिनिधीत्व | ७८ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१२** | |
| | **आधुनिक राजकीय संकल्पना** | |
| १. | स्त्रीवाद | ९९ |
| २. | बहुसांस्कृतिक वाद | ११७ |
| ३. | पर्यावरणवाद | १२८ |
| ४. | नागरी समाज | १५३ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक-१

# एकात्म शासन आणि संघराज्यात्मक शासन
## (Unitary and Federal From of Government)

घटक संरचना

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.३.१ एकात्म शासन : व्याख्या, वैशिष्ट्ये, गुण-दोष

१.३.२ संघराज्यात्मक शासन : व्याख्या, वैशिष्ट्ये, गुण-दोष

१.४ सारांश

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- एकात्म शासन पध्दतीचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये आणि गुणदोष तपासणे.
- संघराज्यात्मक शासन पध्दतीचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये आणि गुणदोष तपासणे.

## १.२ प्रास्ताविक

शासन व्यवस्थेचे दोन प्रकार असतात. १) एकात्म शासन व्यवस्था व २) संघराज्यात्मक शासन व्यवस्था.

एकात्म शासन पध्दतीत केंद्र शासन सामर्थ्यशाली (प्रबळ) असते. केंद्र शासन हेच संपूर्ण देशासाठी कायदे बनवते आणि त्या कायद्यांची कार्यवाही (अंमलबजावणी) करीत असते. केंद्रशासनाच्या नियंत्रणाखाली अगर अधिपत्याखाली प्रादेशिक विभागीय सत्ता कार्यरत असते. याउलट संघराज्यात्मक शासन व्यवस्थेचे शासनाचे दोन सरकार असतात व त्यांच्या अधिकारांची वाटणी राज्यघटनेतील तरतुदीनुसार केली जाते. एकात्म शासन व्यवस्था आणि संघराज्यात्मक शासन व्यवस्था यांची रचना समजून घेण्याकरीता त्याच्या वैशिष्ट्यांचा विचार करावा लागेल.

## १.३ विषय विवेचन

### १.३.१ एकात्म शासन (Unitary Government)

शासन संस्थेचे अधिकार एकाच ठिकाणी केंद्रित असतील तर त्या शासन प्रकारास 'एकात्म शासन' असे म्हणतात. ज्या देशांचा प्रादेशिक आकार लहान असतो अशा देशांत एकात्म शासन आढळून येते. या शासन प्रकारात स्थानिक सरकारे अस्तित्वात असतात. ह्या स्थानिक सरकारांना केंद्रीय सरकारकडून काही अधिकार बहाल केले जातात. ते राज्यघटनेकडून दिले जात नसून केंद्र सरकारच्या कायद्याने तशी तरतूद करण्यात आलेली असते. म्हणून केंद्र सरकार स्थानिक सरकारचे अधिकार वाढवू शकते अगर कमी करू शकते. एकात्म शासन व्यवस्थेत अधिकाराचे केंद्रीकरण झालेले असते. त्यामुळे निर्णय प्रक्रिया जलद गतीने पूर्ण होते. यातून शासनाची कार्यक्षमता वाढीस लागते. एकात्म शासन प्रकार अनेक देशात प्रचलित असून त्याची प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत सोपी रचना असते. जो देश प्रादेशिकदृष्ट्या विस्तृत व विविधता असलेला असतो अशा देशात एकात्म शासन हा प्रकार निरुपयोगी ठरतो कारण प्रादेशिक प्रश्न सोडविणे अशक्य बनते म्हणून विशाल प्रदेशासाठी संघराज्यात्मक शासन पोषक आणि पूरक ठरते. एकात्म शासन व्यवस्था आज चीन, इटली, जपान, इंग्लंड, अफगाणिस्तान, इराण, तुर्कस्तान, डेन्मार्क, नॉर्वे, स्पेन, फ्रान्स इ. देशात अस्तित्त्वात आहे.

❒ **व्याख्या**

''ज्या राजकीय व्यवस्थेमध्ये देशाची संपूर्ण शासनविषयक सत्ता केंद्रीय अथवा मध्यवर्ती सरकारकडेच केंद्रीभूत झालेली असते तसेच कायदेशीरदृष्ट्या मध्यवर्ती सरकारच्या मतानुसार देशांचा राज्यकारभार चालविला जातो अशा शासन व्यवस्थेला एकात्म शासन असे म्हणतात.''

विविध विचारवंतांनी एकात्म शासनाच्या पुढीलप्रमाणे व्याख्या केल्या आहेत.

❖ **प्रा. गार्नर –**

''सर्व अधिकाराचे स्रोत केंद्रीय सत्तेकडे असतात आणि त्याची इच्छा ही सर्वोच्च असते.

प्रादेशिक अथवा घटक सरकारे असली तरीही त्यांना केंद्र सरकारच्या आदेशानुसार व त्याच्याच नियंत्रणाखाली आपली कार्ये पार पाडावी लागतात. विभागीय शासनाचे आस्तित्त्व केंद्र सरकारच्या इच्छेवरच अवलंबून असते, अशा शासन पध्दतीला एकात्म शासन असे म्हणतात.''

### ❀ प्रा. एफ. डब्ल्यु विलोबी –

''एकात्म शासन पध्दतीत सर्वप्रथम सरकारची संपूर्ण सत्ता एकाच मध्यवर्ती शासनाला बहाल केलेली असते व मध्यवर्ती सरकारला या सत्तेचे विभाजन प्रांत, जिल्हे इत्यादी विभागात कशा पध्दतीने करावयाचे याबाबतचे संपूर्ण स्वातंत्र्य असते.''

### ❀ सी. एफ. स्ट्राँग –

''एकाच केंद्रीय सरकारकडून संघटित झालेले राज्य एकात्म स्वरूपाचे असते. प्रांत, जिल्ह्ये अशा प्रशासकीय विभागांना कायदे करण्याचे अधिकार दिले असले तरी त्यामुळे केंद्रीय सरकारच्या सत्तेला बाधा निर्माण होत नाही.''

वरील व्याख्यांचा विचार करता एकात्म शासन व्यवस्थेचे स्वरूप लक्षात येते. यामध्ये एकच शासन व्यवस्था असून सर्व सत्ता केंद्रीभूत झालेली असते. जिल्हे, प्रांत असे विभाग प्रशासनाच्या सोयीसाठी निर्माण केलेले असतात. सारांश, ज्या देशात एकच शासन संस्था असते तिथे केंद्रीय सत्ता प्रबळ किंवा सर्वश्रेष्ठ असते. तसेच राज्यातील इतर सत्ता ह्या दुय्यम स्वरूपाच्या असतात.

## ❒ एकात्म शासन व्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये

एकात्म शासन व्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १. एकच कायदेमंडळ

केंद्रीय सरकारला कायदे निर्मितीचा अधिकार असून ते कायदे सर्व प्रशासकीय घटक आणि नागरिकांच्यावर बंधनकारक असतात. भारत, अमेरिका, फ्रान्स इत्यादी राष्ट्रांप्रमाणे केंद्र सरकार आणि घटक राज्याची सरकारे अशी वेगळी दुहेरी स्वरूपाची कायदे मंडळे अस्तित्वात नसतात. ग्रेट ब्रिटनमध्ये केंद्रीय कायदेमंडळाने म्हणजे पार्लमेंट (संसद) ने केलेला कायदा सर्वश्रेष्ठ असतो याला आव्हान देणारी दुसरी शक्ती तेथे नसते, त्यामुळे एकात्म शासन अधिक शक्तीशाली बनलेले असते.

### २. एकच कार्यकारी मंडळ

संपूर्ण देशाचा राज्यकारभार चालविण्यासाठी केंद्रस्थानी एकच कार्यकारी मंडळ असते. अमेरिका,

भारत ह्या देशासारखी दुहेरी शासन व्यवस्था नसते. ग्रेट ब्रिटनमध्ये एकात्म शासन व्यवस्था असून तेथे केवळ एकच मंत्रीमंडळ व एकच नोकरशाही असते.

### ३. एकेरी न्यायालय

एकात्म शासन व्यवस्थेमध्ये एकच सर्वोच्च न्यायालय असते आणि त्याच्या नियंत्रणाखाली इतर दुय्यम न्यायालये अस्तित्त्वात असतात. ब्रिटनमध्ये 'हाऊस ऑफ लॉर्डस्' हे सर्वोच्च न्यायालय आहे. त्याच्या नियंत्रणाखाली अपिलेट आणि दिवाणी न्यायालये कार्यरत असतात. अमेरिकेमध्ये केंद्र आणि घटकराज्यांसाठी दोन स्वतंत्र न्यायालये असतात, याचा अर्थ असा की, एकेरी न्यायमंडळ हे एकात्म शासन व्यवस्थेचे वैशिष्ट्य होय.

### ४. एकच राज्यघटना

एकात्म शासनव्यवस्था असलेल्या देशामध्ये एकच राज्यघटना असते. याउलट अमेरिका आणि स्वित्झर्लंडमध्ये घटकराज्यांना स्वत:ची स्वतंत्र राज्यघटना आहे, कारण तेथे संघराज्यात्मक शासन आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये एकात्म शासन पध्दती असल्यामुळे तेथे एकच राज्यघटना आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार फक्त पार्लमेंटला आहे. एकच राज्यघटना असल्याने संविधानाप्रति तेथील जनतेची निष्ठा फार ज्वलंत स्वरुपाची असते.

### ५. एकेरी नागरिकत्व

एकात्म शासन व्यवस्थेमध्ये एकेरी नागरिकत्व असते. एकेरी नागरिकत्वामुळे नागरिकांची निष्ठा केंद्रापुरतीच राहते. इंग्लंडमध्ये एकेरी नागरिकत्व आहे. एकेरी नागरिकत्व हे एकात्म व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. भारतात मात्र संघराज्य व्यवस्था असूनही एकेरी नागरिकत्व आहे.

### ६. अधिकारांचे विभाजन नाही

एकात्म शासन पध्दती स्विकारलेल्या देशात घटक राज्ये निर्माण केलेले नसतात. त्यामुळे एकात्म शासन असलेल्या देशात अधिकार विभागणीचा प्रश्नच असत नाही.

### ७. प्रादेशिक एकता

एकात्म शासन पध्दतीत एकाच ठिकाणी सत्तेचे केंद्रीकरण झालेले असते. त्यामुळे सर्व प्रशासकीय आणि राजकीय जबाबदारी एकाच ठिकाणी असल्याने सर्व प्रकारचे धोरणात्मक निर्णय त्वरित/जलद घेतले जातात. तसेच त्यांची कार्यवाही सुद्धा जलद गतीने केली जाते. इंग्लंडमध्ये एकच मध्यवर्ती/किंवा

केंद्रसरकार अस्तित्वात आहे. प्रशासनाच्या सोयीसाठी तेथे पेरीश, रुरल डिस्ट्रिक्ट, अर्बन डिस्ट्रिक्ट, कौंटी, बरोज आणि मेट्रोपॉलिटन कौन्सिल असे प्रादेशिक विभाग पाडले आहेत. हे सर्व प्रादेशिक विभाग केंद्र सरकारला बांधील राहून कार्यरत असतात. त्यामुळे त्यांच्यात प्रादेशिक एकात्मता निर्माण होते. एकात्म शासन व्यवस्थेच्या वरील वैशिष्ट्यावरून सारांश रूपाने असे म्हणता येईल की,

१. एकात्म राज्यात केंद्रीय सत्ता किंवा मध्यवर्ती सत्ता श्रेष्ठ व प्रभावी असते. प्रादेशिक सरकारांचे स्थान दुय्यम दर्जाचे असते.

२. राज्यघटनेनुसार शासनाचे सर्व अधिकार केंद्रीय सत्तेकडे असतात.

३. राज्यकारभाराच्या सोयीकरिता केंद्रसत्ता प्रादेशिक सरकारांकडे काही अधिकार सुपूर्द करते.

४. केंद्रसत्ता आपल्या इच्छेनुसार प्रादेशिक विभागांचे अधिकार कमी जास्त करू शकते.

५. मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकारे यांच्यात संघर्ष, वाद, तंटे निर्माण होत नाहीत.

६. प्रादेशिक सरकार केंद्रसत्तेला जबाबदार असते.

## ❐ एकात्म शासन व्यवस्थेचे गुण

एकात्म शासन व्यवस्थेत पुढील गुण आढळून येतात.

### १. शासन संस्थेला निर्णय घेणे सोयीचे

राज्याचे संरक्षण, परराष्ट्रीय धोरण या संदर्भात शासनसंस्थेला निर्णय घेणे सोयीचे होते. कारण, एकच शक्तिशाली सरकार यामुळे परराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होत नाही.

### २. राष्ट्रीय ऐक्य, एकात्मतेची निर्मिती

एकात्म शासन पध्दतीमुळे देशाचे ऐक्य, एकात्मता वाढीस लागते. प्रादेशिक, स्थानिक सरकारांना अधिकार दिलेले नसल्याने प्रादेशिक निष्ठा वाढीस लागत नाही. याउलट, राष्ट्राविषयी निष्ठा वाढीला लागते.

### ३. एकात्म शासन पध्दती कमी खर्चीक

एकात्म शासन पध्दती ही कमी खर्चाची असते. संघराज्यात्मक शासन पध्दतीप्रमाणे एकात्म

शासन पध्दतीत दुहेरी प्रकारची शासन यंत्रणा अस्तित्वात नसते. त्यामुळे दुहेरी शासन पध्दतीमुळे होणारा खर्च टाळला जातो.

### ४. लहान आकाराच्या राज्यांना उपयुक्त

छोट्या आकाराच्या राज्यांना एकात्म शासन व्यवस्था उपयुक्त ठरते. उदा. इटली, फ्रान्स, इंग्लंड इ. देशांचे आकारमान लहान असल्याने तेथे एकात्म शासन पध्दती यशस्वी ठरलेल्या आहेत.

### ५. राज्यकारभारात स्थैर्य

एकात्म शासन पध्दतीत राज्यकारभारास स्थीरता लाभते. निर्णय निश्चितपणे घेतले जातात. त्या निर्णयाची कार्यवाही योग्य प्रकारे होते, त्यामुळे राज्यकारभारात कार्यक्षमता वाढीस लागून सरकार कार्यक्षम बनते.

### ६. त्वरित निर्णय

एकात्म शासन व्यवस्थेत निर्णय जलद गतीने घेतले जातात. त्याची अंमलबजावणी त्वरित होते. कारण राज्यात एकच प्रभावी, प्रबळ, सरकार असल्याने निश्चित निर्णय घेणे शक्य होते. प्रादेशिक राज्यांचा कोणत्याही प्रकारचा विरोध होत नाही.

### ७. सहज व सोपी पध्दती

एकात्म शासन पध्दती ही साधी व सोपी असल्याने लोकांना सहजपणे समजू शकते. त्यामुळे लोकांचा एकात्म शासन पध्दतीवर दृढ विश्वास बसतो.

### ८. निर्णयात लवचिकता

एकात्म शासन व्यवस्थेत बदलत्या परिस्थितीनुसार कायदे निर्मिती करणे सुलभ होते. एकच शासनसत्ता असल्यामुळे निर्णय घेण्याच्या कार्यात लवचिकता निर्माण होऊ शकते.

### ९. संघर्षाचा अभाव

एकात्म शासन पध्दतीत मध्यवर्ती सत्ता प्रबळ असल्याने तसेच प्रांतिक सरकारांची सत्ता मध्यवर्ती सरकारकडून प्राप्त होत असल्यामुळे प्रांतीय सरकारमध्ये संघर्ष उद्‌भवत नाहीत.

## ❒ एकात्म शासन व्यवस्थेचे दोष (Demerits of Unitary Government)

एकात्म शासन पध्दतीत पुढील दोष आढळून येतात.

### १. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात

संकटकालीन परिस्थितीत अगर परकीय आक्रमण झाल्यास एकात्म शासन पध्दती ही धोक्याची ठरते, कारण देशातील केंद्रीय सरकार नष्ट झाल्यास देशांची सार्वभौम सत्ता धोक्यात येते.

### २. केंद्रीय सत्तेची हुकूमशाही

एकात्म शासन व्यवस्थेत सत्तेचे केंद्रीकरण झालेले असते, त्यामुळे मध्यवर्ती सत्ता अधिक शक्तिशाली बनते, त्यामुळे सत्तेचा दुरुपयोग होण्याचा धोका अधिक असतो. मध्यवर्ती सरकार हुकूमशाही प्रवृत्तीने वागते.

### ३. मध्यवर्ती सरकारवर कामाचा ताण

आधुनिक काळात राज्याची कार्ये दिवसेंदिवस वाढत चाललेली आहेत. त्यामुळे एकाच मध्यवर्ती सरकारला ती पार पाडणे अवघड बनलेले आहे. स्थानिक सरकारांना अधिकार नसल्याने मध्यवर्ती सरकारवर कामाचा ताण पडतो, त्यामुळे राज्यकारभारात शिथिलता आणि अकार्यक्षमता निर्माण होते.

### ४. आकाराने मोठ्या व लोकसंख्येने विस्तीर्ण असणाऱ्या देशांना उपयुक्त नाही

जे देश आकाराने व लोकसंख्येने मोठे असतात, अशा ठिकाणी एकात्म शासन पध्दती उपयुक्त ठरत नाही, कारण एवढ्या विस्तीर्ण व लोकसंख्या अधिक असलेल्या लोकांवर नियंत्रण ठेवणे त्यांचे प्रश्न सोडविणे अशक्य बनते. त्यांच्या सर्व समस्या सोडविणे अशक्य बनते.

### ५. स्थानिक नेतृत्त्वाला वाव नसतो

एकात्म शासन पध्दतीत स्थानिक नेतृत्त्वाला तसेच त्याच्या कलागुणांना संधी उपलब्ध होत नाही. एकात्म शासन पध्दतीत एकच मध्यवर्ती सरकार असल्याने सर्वांना राज्यकारभारात भाग घेण्याची संधी मिळत नाही. सत्तेचे केंद्रीकरण होते, स्थानिक नेतृत्त्व पुढे येवू शकत नाही.

### ६. स्थानिक प्रश्नांची दखल घेतली जात नाही

एकात्म शासन पध्दतीत मध्यवर्ती सरकार हे एकमेव सरकार असल्याने त्याच्याकडून स्थानिक प्रश्नांची समस्याची सोडवणूक होऊ शकत नाही. केंद्रीय शासनाला स्थानिक पातळीवरील गरजा आणि समस्यांचे आकलन होऊ शकत नाही.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ✻

❑ **प्रश्न १ : योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. ............... याच्या मते, एकाच मध्यवर्ती सत्तेकडून संघटित झालेले राज्य म्हणजे एकात्म राज्य होय.

*(अ) के. सी. व्हीअर* *(ब) डॉ. फायनर*

*(क) स्ट्रॉंग* *(ड) विलोग्बी.*

२. चीनमध्ये ............... शासन पध्दती अस्तित्वात आहे.

*(अ) संघराज्यात्मक (ब) एकात्म (क) लोकशाही (ड) अध्यक्षीय.*

३. एकात्म शासन पध्दतीत ............. शासन प्रबळ असून स्थानिक सरकारे दुय्यम दर्जाची असतात.

*(अ) केंद्र* *(ब) घटक*

*(क) अ व ब बरोबर* *(ड) यापेक्षा वेगळे.*

४. ................... शासन पध्दतीत त्वरित निर्णय घेतले जातात.

*(अ) लोकशाही (ब) संघराज्य (क) एकात्म (ड) संसदीय.*

५. इंग्लंड, फ्रान्स, चीन, इटली या देशात ................ शासन पध्दती आहे.

*(अ) संघराज्य (ब) एकात्म (क) अध्यक्षीय (ड) लोकशाही.*

६. ............... शासन पध्दतीमुळे राज्यकारभाराला स्थैर्य लाभते.

*(अ) एकात्म (ब) लोकशाही (क) संसदीय (ड) संघराज्यीय.*

७. ............... शासन पध्दतीत सत्तेचे केंद्रीकरण होत असल्याने मध्यवर्ती सत्ता अधिक शक्तीशाली बनते.

*(अ) संसदीय (ब) लोकशाही (क) संघराज्यीय (ड) एकात्म.*

८. ................ शासन पध्दती कमी खर्चीक असते.

*(अ) संघराज्यीय (ब) लोकशाही (क) एकात्म (ड) संसदीय.*

९. ................. या देशात हाऊस ऑफ लॉडर्स हे सर्वोच्च न्यायालय आहे.

*(अ) इंग्लंड (ब) चीन (क) अमेरिका (ड) फ्रान्स.*

१०. एकात्म शासन व्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ............... होय.

*(अ) एकेरी नागरिकत्व* *(ब) दुहेरी नागरिकत्व*

*(क) दुहेरी शासन यंत्रणा* *(ड) यापेक्षा वेगळे.*

❑ **प्रश्न २ : टिपा लिहा.**

१. एकात्म शासन पध्दतीची वैशिष्ट्ये

२. एकात्म शासन व्यवस्था.

३. एकात्म शासन व्यवस्थेचे गुण व दोष.

❑ **प्रश्न ३ : दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. एकात्म शासन पध्दती म्हणजे काय? एकात्म शासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. एकात्म शासन व्यवस्थेचे गुण व दोष स्पष्ट करा.

## १.३.२ संघराज्यात्मक शासन

Federation या इंग्रजी शब्दाचा मराठीत अर्थ संघराज्य होय. Federation या शब्दाची उत्पत्ती Fedous या लॅटिन शब्दापासून झालेली आहे. Fedous या शब्दाचा अर्थ कराराशी संबंधित असणारे राज्य होय. संघराज्यामध्ये विशिष्ट ध्येयाच्या पूर्ततेसाठी राज्ये करारबद्ध झालेली असतात. संघराज्य शासन पध्दती ही विशाल राज्यासाठी उपयुक्त मानली जाते. संघराज्य व्यवस्थेत केंद्रसरकार आणि घटक राज्य सरकारे यांच्यात सत्ताविभाजन केलेले असते. प्रत्येक देशातील संघराज्य व्यवस्थेत सारखेपणा आढळत नाही तर परिस्थितीपरत्वे भिन्नता दिसते. संघराज्यवादामध्ये एकाच देशाचे प्रादेशिक विशालतेमुळे केंद्रसरकार व घटकराज्य सरकारे यात अधिकारांची विभागणी केली जाते, त्यासाठी त्या देशाची राज्यघटना लिखित स्वरूपाची असते. राज्यघटना साधारणत: परिदृढ किंवा ताठर स्वरूपाची असते. न्यायव्यवस्था स्वतंत्र स्वरूपाची असते काही संघराज्यात दुहेरी नागरिकत्व तर काही संघराज्यात एकेरी नागरिकत्व आढळून येते. भारतामध्ये एकेरी नागरिकत्व स्वीकारलेले आहे तर अमेरिकेत दुहेरी नागरिकत्व स्विकारलेले आहे. जगात अमेरिका, भारत, कॅनडा, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात संघराज्य शासन व्यवस्था अस्तित्वात आहेत.

## ❑ संघराज्य निर्मितीचे मार्ग/पध्दती

संघराज्य निर्मितीच्या दोन पध्दती आहेत.

### १. केंद्राकर्षी पध्दती

केंद्राकर्षी पध्दतीमध्ये स्वायत्त राज्ये स्वत:च्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी एका मध्यवर्ती सत्तेशी करारबद्ध होतात, असे अनेक राज्ये एकत्रित येऊन त्याचे संघराज्य निर्माण होते. केंद्राकर्षी प्रवृत्तीमध्ये काही स्वायत्त राज्ये स्वत:च्या आर्थिक, संरक्षणात्मक आणि सामाजिक गरजाची पूर्ती करण्यास असमर्थ असतात. अशा गरजांची पूर्तता करण्याकरिता आपसात करार करून संघराज्य उदयास येते. स्वायत्त राज्ये केंद्राकडे आकर्षित होवून निर्माण होणाऱ्या संघराज्यास केंद्रकर्षी संघराज्य असे म्हणतात. उदा. अमेरिकेचे संघराज्य केंद्राकर्षी प्रवृत्तीमधून उदयास आलेले संघराज्य होय.

### २. केंद्रोत्सारी पध्दती

क्षेत्रफळाने विस्तीर्ण असलेल्या देशात प्रशासन आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने उपयुक्त काही ठराविक तत्त्वांच्या आधारावर छोट्या-छोट्या अशा घटक राज्यांची निर्मिती करून या घटकराज्यांना राज्यघटनेमार्फत काही अधिकार दिले जातात, पण महत्त्वाचे अधिकार केंद्र सरकारकडे केंद्रित झालेले असतात. स्थानिक लोकांच्या विकासाला संधी मिळावी, स्थानिक प्रश्न लवकर सुटावेत ह्या दृष्टीने केंद्र सरकार आणि घटकराज्ये ह्या दोहोंमध्ये अधिकार विभागणी करणे या दोहोंमध्ये अधिकारांचे विभाजन निश्चितपणे करून संघराज्य निर्माण करणे ह्या पध्दतीला केंद्रोत्सारी संघराज्य असे म्हणतात. उदा. कॅनडा, भारत.

भारतामध्ये एकात्म शासन की संघराज्यात्मक शासन पध्दती आहे. या संदर्भात अनेकवेळा वाद निर्माण झालेले आहेत. तरीसुद्धा भारतीय शासन पध्दतीत एकात्म शासन व्यवस्थेची आणि संघराज्यात्मक शासन व्यवस्थेची या दोन्ही शासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये आढळून येतात. म्हणून प्रसिद्ध राजकीय विचारवंत के.सी.व्हिअर यांनी भारतीय शासन व्यवस्थेचे वर्णन करताना म्हटले आहे की, भारतीय संघराज्य हे 'अर्धसंघराज्य' आहे.

एकाच सार्वभौम सत्तेखाली संविधानाने ठरवून दिलेल्या घटनात्मक मर्यादेत राहून केंद्र व घटक शासनाची निर्माण झालेली रचना याला संघराज्य म्हणतात. संघराज्यामध्ये एक मध्यवर्ती सत्ता (केंद्रीयसत्ता) व काही घटकराज्यांचा समावेश असतो. ही मध्यवर्ती सत्ता घटक राज्यांचे प्रतिनिधीक स्वरूप असते. या मध्यवर्ती सत्तेकडे घटक राज्यांच्या समान हितसंबंधाची खाती (विषय) सोपविलेले असतात. न सोपविलेल्या खात्यांबाबत घटक राज्यांना स्वायत्तता असते. संघराज्य हे संयोगीकरण आणि वियोगीकरण या दोन पध्दतीने तयार होते. सार्वभौम असलेली राज्ये स्वत:च्या सर्व गरजा पूर्ण करू शकत नसल्याने ते परस्परांच्यामध्ये करार करून मध्यवर्ती सत्ता स्थापन करतात. मध्यवर्ती सत्तेला काही अधिकार देतात

आणि इतर अधिकाराबाबत स्वायत्त असतात या पध्दतीला संयोगीकरण पध्दतीने निर्माण झालेले संघराज्य असे म्हणतात.

वियोगीकरण पध्दतीच्या संघराज्यात एखाद्या सलग मोठ्या देशांचे स्थानिक लोकांच्या विकासास पूर्णपणे वाव मिळविण्यासाठी केंद्र सरकारच्या हाती काही अधिकार राखून बाकीचे अधिकार त्या राष्ट्राचे प्रांत अथवा राज्ये असे विभाजन करून त्याच्याकडे सोपवितात व केंद्रसरकारला संघात्मक स्वरूप आणतात. संघराज्यात्मक शासन व्यवस्थेत केंद्र व घटकराज्य सरकारचे संबंध निश्चित करण्यासाठी परिदृढ अथवा ताठर राज्यघटनेची आवश्यकता असते. कारण परस्परांचे परस्परांवर आक्रमण होण्याची शक्यता असते. अशावेळी नागरिकांना घटनेविषयी आत्मीयता राहणार नाही. त्यामुळे संघराज्य नष्ट होऊ शकते. वियोगीकरण संघराज्याचे उदा. अमेरिका या देशांचे देता येईल.

संघराज्यात्मक शासन व्यवस्थेत केंद्रसरकार आणि घटकराज्याची सरकारे यांच्यात निश्चित अधिकाराची विभागणी लिखित व ताठर स्वरूपाच्या राज्यघटनेने झालेली असते. राज्यघटनेद्वारे क्रेंद्रसूची (संधीसूची) राज्यसूची आणि समवर्ती (सामाईक) सूची तयार केलेल्या असून केंद्र व राज्य सरकार या दोन्ही शासनाना दिलेल्या विषयाची नोंद समवर्ती किंवा सामाईक सूचीमध्ये आढळते. संघराज्यात्मक शासन व्यवस्थेत न्यायमंडळाचे श्रेष्ठत्व आढळते. घटक राज्याची सरकारे अथवा केंद्रशासनाशी संघर्ष झाल्यास त्याचा न्यायनिवाडा करणेसाठी, संविधानाचा अर्थ लावणेसाठी, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची आवश्यकता असते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अंतिम स्वरूपाचा असतो. तो निर्णय सर्वांच्यावर बंधनकारक असतो.

अमेरिकन राज्यघटनेने घटक राज्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य केले आहे. घटकराज्यांना राज्यघटनेने काही अधिकार देऊन त्याच सार्वभौमत्व मान्य केले आहे. अमेरिकन सिनेट या वरिष्ठ सभागृहात प्रत्येक घटक राज्यातून दोन प्रतिनिधी निवडून पाठविले जातात. येथे घटक राज्याची स्वायत्तता टिकविण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक राज्याची स्वतंत्र घटना आहे की, जी इतर घटकराज्यांच्या घटनेपेक्षा वेगळी वाटते. अमेरिकेच्या राज्यघटनेने मध्यवर्ती सत्तेला काही निश्चित अधिकार दिलेले असून इतर अधिकार घटकराज्यांकडे ठेवले. यातून राहण्याच्या प्रवृत्तीचा किंवा एकात्मक पध्दतीचा विरोध हे स्पष्ट होते. अमेरिकेत संघराज्यात ५१ घटक राज्ये अस्तित्वात आहेत. तत्पूर्वी प्रारंभी ती फक्त १३ राज्ये होती. अमेरिकेतील संघसरकार हे राज्यांच्या अंतर्गत क्षेत्रात कधीही हस्तक्षेप करीत नाही.

रुसोच्या विचाराचा प्रभाव आणि त्याचा सामाजिक कराराचा सिद्धांत त्यातील स्वातंत्र्यविषयक संकल्पना अमेरिकेच्या १७७६ च्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात स्वीकारल्या गेल्या. या आधारे अमेरिकेत जे संविधान निर्माण करण्यात आले त्याचा आधुनिक काळात सर्वश्रेष्ठ नमुना म्हणून अमेरिकेच्या संविधानाचा विचार केला जातो. अमेरिकेने १७७६ मध्ये स्वातंत्र्याची घोषणा केली. समतेच्या तत्त्वाला अमेरिकेतील जनतेने स्विकारले. सर्व समान आहेत या तत्त्वावर ते ठाम राहिले, यामधूनच अमेरिकेतील

सर्व राज्यांचे एक संघराज्य स्थापन करण्याचे निश्चित झाले. यामध्ये सामील होणाऱ्या राज्यांना समान अधिकार राहतील असे ठरविण्यात आले. जनतेच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी सत्ता विभाजनाचा माँटेस्क्यूने मांडलेल्या सिध्दांताचा स्वीकार अमेरिकन राज्यघटनेने केलेला आहे.

अमेरिकन संविधानात सत्तासमतोल आणि सत्तेचे नियंत्रण या तत्त्वाला प्राधान्य देण्यात आलेले आहे. शासन संस्थेचे तीन विभाग कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या प्रत्येक विभागाचे परस्परावर नियंत्रण प्रस्थापित करून ह्या तिन्ही विभागात समतोलपणा प्रस्थापित केलेला आहे. या मागील मुख्य उद्देश असा की, कोणीही हुकूमशाही प्रवृत्तीने वागू नये. याच उद्देशाने अमेरिकन काँग्रेसला कायदेशीर, राष्ट्राध्यक्षाला कार्यकारी विषयक अधिकार आणि न्यायपालिकेला न्यायविषयक अधिकार देण्यात आलेले आहेत. संविधान म्हणजे सर्वश्रेष्ठ कायदा असून संविधानाचे संरक्षण करण्यासाठी न्यायमंडळाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आला.

माँटेस्क्यूच्या सत्ताविभाजन सिद्धांतानुसार कायदेविषयक सत्ता अमेरिका काँग्रेसकडे कार्यकारी विषयक सत्ता राष्ट्राध्यक्षाकडे तर न्यायविषयक सत्ता सर्वोच्च न्यायालयाकडे घटनेनुसार देण्यात आलेली आहे. त्याचबरोबर अमेरिकेच्या राज्य घटनेद्वारे न्यायालयीन पुर्नविलोकनाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाकडे देवून घटना निर्मात्यांनी जनतेच्या मुलभूत हक्कांचे व राज्य घटनेच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली आहे. याशिवाय अमेरिकन संघराज्यात घटक राज्य सरकार आणि संघीय सरकार यांच्यात काही कारणास्तव संघर्ष उद्‌भवल्यास यावर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय द्यावा असेही ठरले आहे. म्हणून जेम्स बीकने म्हटले आहे की, ''अमेरिकेचे सर्वोच्च न्यायालय हे राज्यघटनेचे समतोल केंद्र आहे.''

## ❑ सारांश

केंद्र व राज्य सरकारमध्ये अमेरिकेच्या राज्य घटनेने केलेली सत्तेची विभागणी पाहता घटनेद्वारे राज्यांना श्रेष्ठत्व प्रदान केले आहे की, ज्यामुळे राज्ये प्रबळ बनू शकली आणि त्यातूनच गृहयुद्धास सुरुवात झाली.

### मॉरिस एम्स यांच्यामते

राष्ट्राच्या संघसरकारकडे काही सत्ता सोपविली याचा अर्थ राज्याने संघ शासनाला काही बाबतीत सवलत दिलेली असे समजू नये, कारण राज्याची सार्वभौम सत्ता अलग-अलग एकाच स्थानापासून मिळालेली आहे. तसेच घटनेने ज्या सत्ता संघ सरकारला स्पष्टपणे किंवा अप्रत्यक्षरित्या दिलेल्या नाहीत त्या सर्व सरकारजवळ आहेत. पण याचा अर्थ असा नव्हे की, घटनेद्वारे राज्यांना प्रथम स्थान दिलेले आहे.

### ❁ जेफरसन

यांनी या संदर्भात म्हटले आहे की, घटनेची इमारत याच पायावर उभी आहे की, ज्या सत्ता संघ सरकारला दिलेल्या नाहीत आणि ज्या सत्तेच्या उपायाबाबत राज्यावर बंधने नाहीत अशी सर्व सत्ता घटकराज्यांजवळ अथवा जनतेवजवळ सुरक्षित आहे. कॉंग्रेसच्या चारही बाजूला जी बंधनरुपी रेषा आहे, त्याबाहेर एक पाऊलही टाकणे म्हणजे अमर्यादित क्षेत्रावर सत्ता सांगणे होय.

## ❑ संघराज्य शासन पध्दतीच्या व्याख्या

''ज्या राज्यात मध्यवर्ती सत्ता आणि घटक राज्ये या दोहोंत अधिकार क्षेत्राची विभागणी लिखित, परिदृढ राज्य घटनेने झालेली असते. तसेच त्याच्यातील वाद, संघर्ष तंटे सोडविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची तरतूद केलेली असते, अशा राज्याला संघराज्यात्मक राज्य असे म्हणतात.

### ❁ फायनर

''संघराज्य व्यवस्था अशी पध्दती आहे की, ज्यात सत्ता आणि अधिकाराचा काही भाग स्थानीय क्षेत्रांपाशी राहतो आणि दुसरा भाग केंद्रीय सत्तेत निहित असतो. या केंद्रीय संस्थेची निर्मिती स्थानिय क्षेत्रांच्या समुहाद्वारा स्वेच्छापूर्वक केलेली असते.''

### ❁ प्रा. डायसी

''राज्याच्या हक्कांना बाधा न येता राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य ह्यांची समप्रमाणात प्राप्ती व्हावी म्हणून आधिक राज्यांनी निर्माण केलेले संघटन म्हणजे संघराज्य होय.''

### ❁ प्रा. गार्नर

''राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य ह्यांची समप्रमाणात प्राप्त करण्यासाठी अथवा दोनपेक्षा जास्त स्वायत्त राज्यांनी स्वत:ची वैशिष्ट्ये अगर वेगळेपण कायम राखून एक मध्यवर्ती सरकार निर्माण करणे आणि ह्या मध्यवर्ती सरकारला काही विशिष्ट अधिकार लिखित कराराद्वारे सोपविणे आणि करारात नसलेले इतर अधिकार आपल्याकडेच ठेवणे ह्या उद्देशाने केलेले संघटन म्हणजे संघराज्य होय.''

### ❁ के. सी. व्हिअर

के. सी. व्हिअर हे आपल्या Federal Government या ग्रंथात म्हणतात की, ''संघराज्य शासनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य शासन संस्थेतील सत्ताविभाजन हेच आहे. त्यामुळे केंद्र आणि घटक राज्ये यांच्यात सत्तेची पूर्णपणे आणि स्पष्टपणे विभागणी केलेली असते आणि प्रत्येक सरकार आपल्या अधिकारांचे बाबतीत स्वतंत्र असते यालाच संघराज्य असे म्हणतात.''

## ❑ सारांश

जेव्हा दोन किंवा दोनपेक्षा अधिक राज्ये परस्पर सहकार्याने एकसंघ निर्माण करून केंद्र आणि घटक राज्ये यांच्यात सत्तेचे विभाजन करतात. तेव्हा अशा शासन पध्दतीला संघराज्यात्मक शासन पध्दती असे म्हणतात.

## ❑ संघराज्य शासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये

संघराज्य पध्दतीचा प्रयोग जगात सर्वप्रथम अमेरिकेने केला. अमेरिकन संघराज्य हेच आदर्श संघराज्य मानले जाते. अमेरिकन संघराज्यांची जी वैशिष्ट्ये आहेत तीच थोड्याफार फरकाने आज संघराज्याची वैशिष्ट्ये म्हणून प्रतिपादित केली जातात. संघराज्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १. लिखित आणि सार्वभौम राज्यघटना

संघराज्यात्मक शासन व्यवस्था ज्या देशांनी स्वीकारलेली आहे, त्या देशांची राज्यघटना लिखित आणि ताठर/परिदृढ स्वरुपाची असते. अमेरिकन राज्यघटना ही जगातील पहिली लिखित राज्यघटना आहे. संघराज्याची घटना लिखित असण्याचे मुख्य कारण म्हणजे घटनेने संघसरकार आणि घटक राज्याची सरकारे या दोहोत सत्तेची विभागणी केलेली असते, यांची स्पष्ट नोंद लिखित स्वरुपात राज्यघटनेत केलेली असते. त्यामुळे भविष्य काळात त्याच्यात अधिकाराबाबत अथवा सत्तेबाबत संघर्ष किंवा वाद निर्माण झाला तर तो घटनेच्या माध्यमातून सोडविता येतो. संघराज्यात राज्यघटना सर्वोच्च असते. अमेरिकेतील राज्यघटना ही राज्यातील इतर कोणत्याही सत्तेपेक्षा सर्वोच्च आहे.

### २. परिदृढ किंवा ताठर स्वरुपाची राज्यघटना

संघराज्यात्मक शासन व्यवस्थेचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अपरिवर्तनीय किंवा ताठर राज्यघटना होय. राज्यघटनेतील संघराज्यासंबंधी, अधिकारांच्या वाटणीसंबंधी तरतुदींमध्ये सहजासहजी बदल करता येऊ नये व त्याद्वारे संघराज्याच्या चौकटीला धक्का बसू नये. यासाठी संघराज्यात ताठर राज्यघटनेची आवश्यकता असते. अमेरिकेची राज्यघटना ही परिदृढ स्वरुपाची आहे. अमेरिकेत घटनादुरुस्तीचा प्रस्ताव अमेरिकन कायदेमंडळ (काँग्रेस)च्या दोन्ही सभागृहात (प्रतिनिधी सभागृह व सिनेट) २/३ बहुमतांनी मंजूर झाला पाहिजे. तसेच या घटनादुरुस्ती प्रस्तावाला ३/४ घटक राज्यातील विधीमंडळाची मंजूरी घ्यावी लागते. संघराज्याच्या दृष्टीने ही पध्दती योग्य स्वरूपाची आहे.

## ३. घटना दुरुस्तीच्या प्रक्रियेत घटक राज्यांचा सहभाग

संघराज्य शासन व्यवस्थेत संघ निर्माण करणाऱ्या घटकांना उचित महत्त्व मिळावे म्हणून घटक राज्यांना घटना दुरुस्तीचा अधिकार देण्यात आला आहे. अमेरिकन संघराज्यात घटक राज्याची घटना दुरुस्तीला मान्यता असावी लागते. कोणतीही घटना दुरुस्ती जोपर्यंत घटक राज्यांना मान्य होत नाही, तोपर्यंत ती मंजूर झाली असे मानले जात नाही.

## ४. दुहेरी शासन व्यवस्था

संघराज्य शासन व्यवस्थेत दुहेरी स्वरुपाची शासन यंत्रणा अस्तित्वात असते. संघराज्य व्यवस्थेत घटनेनुसार अनेक राज्याचे मिळून एक संघराज्य निर्माण केलेले असते. अमेरिकन संघराज्याचे वैशिष्ट्य म्हणून दुहेरी शासन व्यवस्थेचा उल्लेख करावा लागतो. अमेरिकन संघराज्यात केंद्र सरकारचे आणि प्रत्येक घटक सरकारचे असे स्वतंत्र शासन आहे. अमेरिकन संघराज्यात केंद्रशासन आणि घटक राज्याचे शासन यात अधिकार विभागून दिलेले आहेत. काही अधिकार मध्यवर्ती शासनाला देवून बाकीचे सर्व अधिकार घटक राज्यांना देण्यात आलेले आहेत. आज अमेरिकेत ५० घटकराज्ये अस्तित्वात आहेत.

## ५. मध्यवर्ती सरकार आणि घटकराज्यांची सरकारे यांच्यात अधिकाराचे विभाजन

संघराज्यात्मक शासन पध्दतीत राज्यघटनेनुसार मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांची सरकारे यांच्यात सत्तेची किंवा अधिकाराची विभागणी केलेली असते ही विभागणी करताना घटक राज्यांची स्वायत्तता धोक्यात येणार नाही याची खबरदारी घेणे अपेक्षित असते. अमेरिकेत केंद्र सरकारचे अधिकार क्षेत्र ठरवून दिलेले आहे. अमेरिकन संघराज्यात शेषाधिकार हे घटक राज्यांना देण्यात येवून घटक राज्याची स्वायत्तता अबाधित राखली आहे.

## ६. स्वतंत्र सर्वोच्च न्यायालय व न्यायालयीन पुनर्विलोकन

संघराज्य शासन पध्दतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्वतंत्र सर्वोच्च न्यायालय हे होय. मध्यवर्ती सरकार आणि घटकराज्याची सरकारे यांच्यामधील संघर्ष, वाद या सर्वोच्च न्यायालयात सोडवला जातो. तसेच दोन अथवा अधिक घटक राज्यांच्या सरकारांमध्ये निर्माण होणारे संघर्ष न्यायालयात सोडविले जातात, त्याचप्रमाणे संघराज्य आणि घटक राज्य विधीमंडळाने केलेले कोणतेही कायदे घटनेच्या चौकटीत बसत नसतील ते घटनाबाह्य म्हणून घोषित करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायमंडळाला आहे, यालाच न्यायालयीन पुर्नविलोकन असे म्हणतात. हा अधिकार संघराज्यात सर्वोच्च न्यायालयाला दिलेला असतो.

## ७. घटक राज्यांची स्वतंत्र राज्यघटना

अमेरिका हे एक संघराज्य असून अमेरिकन राज्यघटनेने घटक राज्याचे स्वतंत्र अस्तित्वच मान्य केले आहे. घटक राज्यांना काही अधिकार देवून त्याचे सार्वभौमत्व मान्य केले आहे. त्याच बरोबर घटक राज्यांना समान प्रतिनिधीत्व देण्यात आलेले आहे. अमेरिकेच्या कॉंग्रेस या विधिमंडळाच्या सिनेट या वरिष्ठ सभागृहात प्रत्येक घटक राज्यातून दोन प्रतिनिधी निवडून पाठविले जातात. हे घटक राज्याच्या स्वायत्तेचे प्रतिक मानले जाते. प्रत्येक घटक राज्याची स्वतंत्र अशी घटना आहे. ती इतर घटक राज्याच्या घटनेपेक्षा वेगळी असते. केंद्रसरकारला काही निश्चित अधिकार देवून इतर अधिकार घटक राज्यांच्याकडे ठेवणे हे स्वतंत्र राहण्याच्या प्रवृत्तीचे लक्षण आहे. सध्या अमेरिकन संघराज्यात ५१ घटक राज्ये आहेत. प्रत्येक घटक राज्याची वेगळी राज्यघटना आहे.

## ८. दुहेरी नागरिकत्व

अमेरिकन संघराज्यामध्ये दुहेरी नागरिकत्वाची संकल्पना स्वीकारलेली आहे. अमेरिकेचा नागरिक हा एकाचवेळी संघराज्याचा आणि घटक राज्याचा या दोन्हीचा नागरिक असतो. अमेरिकन संघराज्य निर्माण होण्यापूर्वी संबंधित नागरिक हे आपल्या घटकराज्याचे प्रथम नागरिक होते. संघराज्याची निर्मिती झाल्यानंतर त्यांना घटक राज्याच्या नागरिकत्वाबरोबरच संघराज्याचे ही नागरिकत्व मिळाले हीच दुहेरी नागरिकत्वाची पध्दती आजही अमेरिकन संघराज्यात कायम आहे.

## ९. घटक राज्यांना समान दर्जा

घटक राज्यांना परस्परावरील विश्वास हा संघराज्याचा मुख्य आधार आहे. अमेरिकेच्या केंद्रीय कायदे मंडळाच्या प्रतिनिधीक सभागृहात प्रत्येक घटक राज्याला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले आहे. पण घटक राज्यांमध्ये समानतेची भावना निर्माण व्हावी ह्या उद्देशानेच घटक राज्यांचा विस्तार लोकसंख्या, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रगती इत्यादीचा विचार न करता अमेरिकेच्या सिनेट ह्या वरिष्ठ सभागृहात प्रत्येक घटक राज्यातून दोन प्रतिनिधी पाठविण्याचा समान अधिकार दिला आहे म्हणून घटक राज्यांना समान दर्जा हे संघराज्याचे एक खास वैशिष्ट्य आहे.

जागतिक राजकारणात संघराज्याचा प्रयोग सर्वप्रथम अमेरिकेत करण्यात आला. त्यानंतर त्याचे अनुकरण जगातील इतर देशांनी केले. वरील वैशिष्ट्यांचा विचार करता थोडक्यात असे म्हणता येईल की, संघराज्य शासन पध्दतीत पुढील बाबी ठळक रुपाने पाहावयास मिळतात.

१. एक मध्यवर्ती सत्ता आणि अनेक घटकराज्ये यांचे अस्तित्व.

२. मध्यवर्ती सत्ता व घटकराज्ये यांच्यामध्ये झालेली सत्तेची विभागणी.

३. सत्तेची विभागणी ही लिखित राज्यघटनेद्वारे स्पष्ट होते.

४. अमेरिकेत राज्यघटनेचे ताठर किंवा परिदृढ स्वरुप आपणास पहावयास मिळते.

५. सत्तेबाबत मध्यवर्ती सत्ता आणि घटकराज्ये यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाल्यास त्यात निर्णय देण्यासाठी स्वतंत्र सर्वोच्च न्यायालयाची तरतूद करण्यात आलेली आहे.

## ❒ संघराज्य शासन पध्दतीचे गुण

संघराज्य शासन व्यवस्थेचे गुण पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

### १. समाजाच्या सुरक्षिततेसाठी संघराज्यात्मक शासन पध्दती आवश्यक

देशाचे रक्षण करणे हे काम मध्यवर्ती सरकारचे असते. जर बाह्य आक्रमण झाले किंवा इतर राज्याशी युद्ध पुकारले तर युद्ध काळात केंद्रसरकारचे सर्वत्र नियंत्रण अधिक प्रभावी स्वरूपाचे असणे आवश्यक असते. अशाप्रसंगी समाजाच्या सुरक्षिततेची अत्यंत आवश्यकता असते. युद्ध काळात संघटित अधिकार आणि निश्चित नेतृत्व यांच्या आवश्यकतेमुळे राष्ट्राच्या संपूर्ण रचनेवर केंद्र सरकारचे नियंत्रण प्रस्थापित केलेले असते. संघराज्यात केंद्रसरकार प्रबळ असते. पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुद्धात अमेरिका व इतर संघराज्यात केंद्रसरकारच्या अधिकारात वाढ होत आहे. तो देशाच्या सुरक्षितेसाठी आवश्यक आहे.

### २. संघराज्यीय शासन व्यवस्थेत अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था विकसित

सद्यस्थितीत अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेचे केंद्रीकृत स्वरुप विकसित होत असल्याने सर्वत्र केंद्रीकरण होताना दिसते. व्यापारी संघ अगर महामंडळाची स्थापना व श्रमिक संघराज्य विस्ताराच्या दृष्टीने श्रम उत्पादन व वितरण हे सर्व केंद्रीय विषय झाले आहेत. केंद्र सरकार हे इतर घटकराज्यांच्यापेक्षा अधिक मोठी संपन्न अशी सत्ता असते. यासाठी या प्रकारच्या कार्याचे महत्त्व वाढण्याबरोबरच केंद्रसरकारद्वारे ही कार्ये पार पाडली जातात.

### ३. राज्यघटनेचे संरक्षण

संघराज्य व्यवस्थेत न्यायमंडळाला विशेष महत्त्व आहे. संघराज्याची राज्यघटना लिखित आणि ताठर स्वरुपाची असल्याने राज्यघटनेची व्याख्या आणि रक्षणाचे काम न्यायमंडळाद्वारे केले जाते. न्यायमंडळाने वेळोवेळी घटनेचा अर्थ स्पष्ट करताना मध्यवर्ती सरकारला बळकटी येईल असे निर्णय दिले. त्यामुळे केंद्रीय सरकारच्या अधिकारात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

### ४. सशर्त सहाय्यता अनुदान

संघराज्यात्मक शासन व्यवस्थेत घटकराज्यांच्याकडे शासन चालविण्यासाठी व आपल्या क्षेत्राची

प्रगती करण्यासाठी पुरेशी आर्थिक साधने नसतात. त्यामुळे केंद्र सरकारद्वारे राज्यसरकारांना सशर्त सहाय्यता अनुदान दिले जाते. ह्यामुळे केंद्राच्या अधिकारात वाढ होते. केंद्र सरकार या अनुदानावर सर्वसामान्य अटी लावते. राज्यसरकार केंद्रसरकारच्या आदेशांचे पालन करेल. आपले प्रशासन सुदृढ ठेवेल. राज्य कर्मचाऱ्यांची निवड निश्चिती नियमानुसार करेल. केंद्र शासनाला माहिती पाठवित राहील, या अटीवर अनुदान दिले जाते. त्यामुळे केंद्र सरकारच्या अधिकारात वाढ झालेली आहे.

### ५. राष्ट्रीयत्वाची भावना

अमेरिका, कॅनडा, स्वीस या संघ राज्यातील जनतेत समान राष्ट्रीयत्वाची भावना विकसित झालेल्या आहेत. त्यांचे हित पूर्णपणे राज्याच्या विकासात सामावलेले असून केवळ केंद्र सरकार त्यांच्या विकासात वृद्धी करु शकेल असा दृष्टिकोन तयार होत आहे. त्यामुळे आर्थिक सामाजिक आणि समस्यांच्या निराकरणासाठी केंद्रसरकारकडे अपेक्षेने पाहिले जाते.

## ❑ संघराज्य शासन व्यवस्थेतील दोष/उणीवा किंवा संघराज्यापुढील आव्हाने

संघराज्य शासन पध्दतीचे दोष पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

### १. अंतर्गत प्रशासनासंबंधी कमकुवतपणा

एकात्म शासन पध्दतीत आढळणारी एकता संघराज्य शासन पध्दतीत आढळत नाही. ज्या विषयाचा संबंध संघाच्या विभागाद्वारे केला जातो. त्या संदर्भात विभिन्न क्षेत्रात एकात्मता दिसून येत नाही, आणि त्यातून अंतर्गत प्रशासनासंबंधी कमकुवतपणा वाढीस लागतो.

### २. संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याची राज्यांची मानसिकता

संघराज्य व्यवस्थेत एखाद्या राज्याची फुटून वेगळी होण्याची भिती अगर संशय कायम राहण्याची शक्यता असते. वास्तविक सर्व राज्यांनी मिळून संघराज्य निर्माण केलेले असते. एक किंवा अधिक राज्ये संघातून बाहेर पडू नयेत अशा स्वरूपाची धारणा असते. या संदर्भात गिलख्रिस्ट म्हणतो की, ''एखाद्या राज्याला संघातून बाहेर पडणे हे संघराज्य व्यवस्थेत अधिक सोपे असते. संघामध्ये प्रत्येक राज्याचे स्वत:चे शासन आधीपासून असते.''

### ३. प्रगतीच्या विरुध्द

अनेकवेळा परिदृढ संविधान हे बदलत्या परिस्थितीच्या बाबतीत उदासीन असते. सामान्यत: अशा राज्यघटनेत दुरुस्तीसाठी घटक राज्याची संमत्ती आवश्यक असल्याने (३/४ घटक राज्याच्या विधीमंडळाची

संमती/आवश्यकता) ही घटक राज्ये संमती देतीलच असे नाही. त्यामुळे प्रगतीच्या दृष्टीने अडथळे निर्माण होवू शकतात. बदलत्या परिस्थितीमुळे घटनेद्वारे केलेल्या सत्ताविभाजनात परिवर्तनाची आवश्यकता असते हे परिवर्तन घडविणे सहजासहजी शक्य नसते.

## ४. संघराज्यात संघर्ष

संघराज्यात्मक शासन व्यवस्थेत संघटन होणे अधिक कठीण असते, कारण राज्यघटनेद्वारे केंद्र आणि घटक राज्ये (विभागीय शासन) यांच्यात सत्ता विभाजन केल्याने या दोहोत प्रादेशिक अधिकार क्षेत्राच्या संदर्भात सदैव कलह आणि संघर्ष निर्माण होण्याचा धोका निर्माण होतो.

## ५. वेळ आणि पैसा यांचा अपव्यय

संघराज्यात्मक शासन व्यवस्थेत दुहेरी शासन यंत्रणा असते. यामध्ये वेळ आणि पैशाचा अधिक प्रमाणात अपव्यय होतो. कारण एकाच कामाची पुनरावृत्ती त्यासाठी आर्थिक खर्च व वेळेचा अपव्यय होतो. संघशासनाच्या ऐवजी जर एकात्म शासन स्विकारून वेळ व पैशांची बचत होवू शकेल. डॉ.फायनर यांच्या मते, वित्तीय दृष्टिकोणातून ही व्यवस्था खर्चिक आहे. कारण यात प्रशासकीय यंत्रणा व प्रक्रियेचे अधिक दुहेरीपण असते.

## ६. उत्तरदायित्वाची अनिश्चितता

संघराज्यात्मक शासन व्यवस्थेत विभिन्न प्रशासकीय कामासाठी केंद्र शासन आणि घटक राज्यांची सरकारे ही परस्परांना उत्तरदायी ठरवतात. अशा परिस्थितीत उत्तरदायित्व नेमके कोणाचे हे निश्चित करणे कठीण असते.

## ७. राष्ट्रीय एकात्मतेला धोका

अनेकवेळा संघराज्यांतर्गत शासनाच्या विविध विभाग व घटक राज्यांचेवर केंद्र सरकारचे नियंत्रण पुरेसे व दृढ नसते आणि मग अशी वेळ येते की, कोणतीही घटक राज्ये मिळून संघराज्याच्या धोरणास प्रतिरोध करण्यास तयार होतील. उदा. अमेरिकेत ज्यावेळी संघशासनाने गुलामगिरी प्रथेचा शेवट करण्याचा निश्चय केला त्या-त्यावेळी या धोरणाशी असहमत असलेल्या अनेक दक्षिणी घटक राज्यांनी या धोरणास विरोध केला. प्रसिद्ध राजकीय विचारवंत गेटेलच्या मते, संघराज्य शासन व्यवस्थेत देशांमध्ये केंद्रसरकार प्रादेशिक किंवा राज्य सरकारमध्ये शत्रुत्वाचा धोका सतत असतो. अशा प्रकारची परिस्थिती नेहमीच राहते. त्यातून घटक केंद्राचे विरोधी उभे राहून सांप्रदायिकता वर तोंड करते व एकात्मता धोक्यात येते.

## ८. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात दुर्बलता

प्रत्येक संघराज्यात आंतरराष्ट्रीय संबंधाचे कार्य केंद्र सरकारद्वारे केले जाते. आंतरराष्ट्रीय संबंध सूत्रीकरण व्यवस्थितरित्या करण्यासाठी व्यापार, वाणिज्य, उद्योग व पर्यटन इत्यादी विभागात सहयोग आवश्यक असतो. घटक राज्यांच्यामध्ये अंतर्गत विरोध असल्याने केंद्र सरकारला एकत्रीकरण करण्यात अडचणी येतात. असे अंतर्गत भेदीकरणाचे धोरण परराष्ट्रीय धोरणास प्रभावित करू लागते, त्यावेळेस विदेशामध्ये राज्याची प्रतिष्ठा कमी होते.

आधुनिक काळात जगातील सर्वच संघराज्यात राज्यसरकारच्या तुलनेत केंद्र सरकारच्या अधिकारात वाढ होत आहे. अमेरिका, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी पुरातन संघराज्यांतर्गत आधुनिक काळात संघराज्याच्या अधिकारात केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढीस लागलेली आहे. युद्धजन्य स्थीतीत सर्वच क्षेत्रात केंद्रीकरण, न्यायमंडळाकडून उदारमतवादाची व्याख्या, सशर्त केंद्राचे घटक राज्यात अनुदान आणि संबंधित राष्ट्रवादी भावना ही कारणे यास कारणीभुत असल्याची दिसून येतात.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ❊

### ❑ प्रश्न १ : योग्य पर्याय निवडा.

१. ............... या देशाचे संघराज्य केंद्रोत्सारी प्रवृत्तीमधून निर्माण झालेले संघराज्य होय.

*(अ) अमेरिका* *(ब) भारत*
*(क) इंग्लंड* *(ड) पाकिस्तान.*

२. ............... या देशाचे संघराज्य केंद्राकर्षी प्रवृत्तीने निर्माण झालेले संघराज्य आहे.

*(अ) इंग्लंड* *(ब) भारत* *(क) चीन* *(ड) अमेरिका.*

३. अमेरिकन संघराज्यात सध्या ............. इतकी घटक राज्ये अस्तित्वात आहेत.

*(अ) २९* *(ब) १३* *(क) ५१* *(ड) ५०.*

४. अमेरिका हे ................ शासन पध्दतीचे उत्कृष्ठ उदाहरण मानले जाते.

*(अ) संघराज्य* *(ब) एकात्म*
*(क) हुकूमशाही* *(ड) साम्यवादी.*

५. अमेरिकेच्या कायदेमंडळास ............... असे म्हणतात.

*(अ) संसद* *(ब) ड्युमा*
*(क) काँग्रेस* *(ड) पार्लमेंट.*

६. अमेरिकेत घटनादुरुस्तीसाठी मध्यवर्ती कायदे मंडळाकडून घटनात्मक दुरुस्तीचे विधेयक मंजूर केल्यानंतर त्या विधेयकास ............. घटक राज्यांची मंजुरी घ्यावी लागते.

*(अ) २/३ (ब) ३/३ (क) १/२ (ड) ३/४.*

७. अमेरिकन संघराज्याची राज्यघटना ............... स्वरूपाची आहे.

*(अ) अलिखित व परिवर्तनीय (ब) लिखित व परिवर्तनीय*

*(क) अलिखित व ताठर (ड) लिखित आणि परिदृढ किंवा ताठर.*

८. ................ ची राज्यघटना ही जगातील पहिली लिखित राज्यघटना आहे.

*(अ) अमेरिका (ब) चीन (क) इंग्लंड (ड) फ्रान्स.*

९. जेव्हा दोन किंवा दोनपेक्षा अधिक राज्ये परस्पर सहकार्याने एकसंघ निर्माण करून केंद्र आणि घटक राज्ये यांच्यात सत्तेचे विभाजन करतात तेव्हा अशा शासन पध्दतीला .................. शासन पध्दती असे म्हणतात.

*(अ) एकात्म (ब) संघराज्य (क) संसदीय (ड) हुकूमशाही.*

१०. ............... राज्यात आजही दुहेरी नागरिकत्वाची पध्दती अस्तित्वात आहे.

*(अ) भारत (ब) अमेरिका (क) इंग्लंड (ड) चीन.*

११. अमेरिकेतील तेरा वसाहतीनी संरक्षण आणि आर्थिक विकास या दृष्टिकोणातून इ.स. ........... मध्ये एकत्र आली आणि त्यांनी मध्यवर्ती सत्ता निर्माण केली.

*(अ) १७८२ (ब) १७८४ (क) १७८६ (ड) १७८९.*

१२. अमेरिकेचे ‘‘सर्वोच्च न्यायालय हे राज्यघटनेचे समतोल केंद्र आहे’’ असे ................ या राजकीय विचारवंताने म्हटलेले आहे.

*(अ) फायनर (ब) के.सी.व्हिअर*

*(क) जेम्स बीक (ड) रुसो.*

## ❑ प्रश्न २ : टिपा लिहा.

१. संघराज्य शासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये.

२. संघराज्य शासन व्यवस्थेचे गुण व दोष.

❑ **प्रश्न ३ : दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. संघराज्याच्या व्याख्या व अर्थ सांगून संघराज्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. संघराज्य शासन पध्दतीचे गुण आणि दोष स्पष्ट करा.

## १.४ सारांश

एकात्म शासन व संघात्मक शासन या दोन्ही शासनाच्या अर्थ स्वरूप आणि गुणदोष यावरून पूर्ण ओळख झाली. प्रत्येक देशाने आपल्या राजकीय, पार्श्वभूमी, जनइच्छा, प्राप्त भौगोलिक सामाजिक आणि आर्थिक स्थीती यावर एकात्म, संघात्मक अथवा अर्धसंघात्मक शासनाचा स्विकार केलेला आहे. अमेरिकेसारख्या खंडप्राय देशोच संघात्मक शासन यशस्वी झाले. भारताला मात्र अर्धसंघात्मक शासन निर्माण करावे लागले, कारण सामाजिक, धार्मिक भिन्नतेमुळे फुटीरवादी प्रवृत्तीला प्रतिबंध घालण्यासाठी ते गरजेचे होते.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे ❊**

❑ १. = क.

२. = ब.

३. = अ.

४. = क.

५. = ब.

६. = अ.

७. = ड.

८. = क.

९. = अ.

१०. = अ.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे ✻

❑ **प्रश्न १ : योग्य पर्याय निवडा.**

१. = ब.

२. = ड.

३. = ड.

४. = अ.

५. = क.

६. = ड.

७. = ड.

८. = क.

९. = ब.

१०. = ब.

११. = ड.

१२. = क.

## १.६ सरावासाठी प्रश्न

१. एकात्म शासन संस्था अर्थ स्वरूप स्पष्ट करा.

२. एकात्म शासनाचे गुणदोष स्पष्ट करा.

३. अमेरिकन संघराज्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४. संघराज्याचे गुणदोष स्पष्ट करा.

## १.७ संदर्भ सूची


१. Verma S. P. : Modern Political Theory.

२. Kapur A. C. : Principles of Political Theory

३. भोगले शांताराम : आधुनिक राज्यशास्त्र.

४. राठी शु. दि. : राज्यशास्त्रामधील मुलभूत संकल्पना.

५. मुठाळराम : राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण.

६. गोखले आर. एम. : आधुनिक राज्यशास्त्र.

७. घांगरेकर चि. ग. : राज्यशास्त्रामधील मुलतत्त्वे.

८. प्रा. कुलकर्णी सुधाकर : भारतीय संविधान-शासन आणि राजकारण.

९. प्रा. लोटे रा. ज. : तुलनात्मक शासन आणि राजकारण.

१०. प्रा. पाटील बी. बी. : राजकीय सिद्धांत आणि भारतीय राजकीय व्यवस्था.

११. डॉ. देशमुख अलका,
डॉ. गोरे संजय : तुलनात्मक शासन आणि राजकारण.

१२. डॉ. देवरे टी. डी.,
डॉ. विसापुते एस. एम.,
डॉ. बिराजदार टी. एस. : भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण.

❋❋❋

**घटक–२**

# कायदेमंडळ
## (Legislature)

घटक संरचना


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

- २.२.१ कायदेमंडळ अर्थ
- २.२.२ कायदेमंडळाचे महत्त्व
- २.२.३ कायदेमंडळाचे प्रकार व रचना
- २.२.४ कायदेमंडळाचे अधिकार व कार्ये
- २.२.५ कायदेमंडळाचा ऱ्हास
- २.२.६ स्वयं–अध्ययन प्रश्न

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील बाबींचे आकलन होईल.

- ❐ कायदेमंडळ - अर्थ, महत्त्व समजून घेता येईल.

- ❒ कायदेमंडळ - रचना व प्रकार समजावून घेता येतील.
- ❒ कायदेमंडळ - अधिकार व कार्ये
- ❒ कायदेमंडळाचा ऱ्हास, ऱ्हासाची कारणे समजून येतील.

## २.१ प्रस्तावना

हा घटक अभ्यासण्यापूर्वी आपण एकात्म व संघात्मक शासनपद्धती अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, गुण-दोष या घटकाचा अभ्यास केला आहे.

सदर घटकामध्ये आपण कायदेमंडळ, अर्थ, महत्त्व, कायदेमंडळाचे प्रकार, एकगृही द्विगृही कायदेमंडळ, त्याचे गुण-दोष तसेच कायदेमंडळाचा ऱ्हास या बाबी समजून घेणार आहोत.

भूप्रदेश, लोकसंख्या, सरकार आणि सार्वभौमत्व हे राज्याचे आवश्यक घटक आहेत. शासन संस्था किंवा सरकार हा राज्याचा एक अत्यावश्यक व महत्त्वाचा घटक आहे. राज्याची इच्छा ही सरकारद्वारेच व्यक्त होत असते. गार्नरने म्हंटल्याप्रमाणे, ''सरकार अशी संघटना आहे की, ज्याद्वारे राज्य आपली इच्छा व्यक्त करते, आदेश देते. तसेच आपले कार्य करीत असते. थोडक्यात, राज्याच्या इच्छेला मूर्त स्वरूप देण्याचे कार्य सरकार करते. शासनसंस्थेच्या कार्याची विभागणी तीन शाखामध्ये करण्यात येते व प्रत्येकाकडे एक-एक कार्य सोपविलेले असते.

१) कायदेमंडळ, २) कार्यकारी मंडळ, ३) न्यायमंडळ.

यापैकी कायदेमंडळ हा शासनाचा सर्वात महत्त्वाचा विभाग होय. कारण ज्या आधारावर कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ कार्य करीत असते. तो आधार म्हणजे कायदेमंडळ होय. प्रस्तुत घटकात आपण कायदेमंडळ, अर्थ, प्रकार, गुण-दोष, महत्त्व, अधिकार व कार्ये समजावून घेवू.

## २.२ विषय विवेचन

## २.२.१ कायदेमंडळ अर्थ

### ❒ कायदेमंडळ (Legislature)

लोकशाही व्यवस्थेत कायदेमंडळास महत्त्वाचे स्थान असते. शासनसंस्थेची तीन प्रमुख अंगे असतात. कायदेमंडळास कायदे करावे लागतात तर कार्यकारी मंडळास त्याची अंमलबजावणी करावी लागते व कायद्याचा अर्थ लावून निर्णय देण्याचे काम न्यायमंडळास करावे लागते. वेदकाळातसुद्धा

लोकनियुक्त सभा व समिती याना महत्त्वाचे स्थान होते. म्हणून लोकांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार कायदे करणे व त्या कायद्यांची अंमलबजावणी योग्य रितीने होते किंवा नाही यावर देखरेख ठेवणे हे कायदेमंडळाचे काम आहे.

प्राचीन ग्रीक नगर राज्यापासून ते आजपर्यंतच्या प्रातिनिधीक शासनापर्यंत कायदेमंडळाचे महत्त्व निर्विवाद राहिले आहे. प्राचीन नगर राज्ये आकाराने लहान होती. त्यामुळे सर्व जनता एकत्र येऊन कायदे निर्मितीचे कार्य करीत असे. आधुनिक देशाचा अफाट भूप्रदेश, वाढती लोकसंख्या यामुळे प्रत्यक्ष लोकशाहीची जागा प्रातिनिधीक लोकशाहीने घेतली. जनता आपल्या प्रतिनिधीमार्फत कायदेनिर्मितीचे तसेच शासनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करीत असते.

कायदे मंडळास इतर विभागापेक्षा अधिक महत्त्व प्राप्त होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी कायदे निर्मितीचे कार्य करीत असते.

गार्नरच्या मते, ''विधिमंडळ किंवा कायदेमंडळ एका अर्थाने शासनाचा आधार आहे.'' याशिवाय कायदेमंडळाचे महत्त्व वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे कायदे मंडळ जनतेची प्रातिनिधीक संस्था या नात्याने प्रजेच्या हिताच्या रक्षणार्थ कायदे करीत असते.

## २.२.२ कायदेमंडळाचे महत्त्व

युरोपमध्ये प्रातिनिधीक लोकशाहीच्या विकासाबरोबर विधीमंडळाची कल्पना अस्तित्वात आली. त्याकाळी विधीमंडळ हे एकगृही होते. इंग्लंडमध्ये मात्र विशिष्ट परिस्थितीमुळे द्वितीय गृह अस्तित्वात येऊन द्विगृही विधीमंडळ (Bicameral Legislature) विकास झाला. उमराव व धर्मगुरू हे एकत्र बसून विचार करू लागले. तर सामान्य जनतेचे प्रतिनिधी दुसरीकडे एकत्र बसून विचार करू लागले. परिणामत: हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ लॉर्डस् अशा दोन गृहात विभागणी झाली. इंग्लंडमध्ये घटनात्मक शासनपद्धतीची स्थापना होऊन व्यक्ति स्वातंत्र्याचे रक्षण होऊ लागल्यामुळे अशा द्विगृही पद्धतीस महत्त्व प्राप्त झाले व इतर राष्ट्रांनी द्विगृही पध्दतीचा स्वीकार केलेला असून जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कनिष्ठ गृहाचे महत्त्व वाढलेले आहे. पण तरीही वरिष्ठ व कनिष्ठ अशी पूर्वीपासून चालत आलेली नावे तशीच कायम राहिली. आजच्या काळात कनिष्ठ सभागृहात महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले असून वरिष्ठ सभागृहाला दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. कित्येक देशात ते केवळ नामधारी असे झालेले आहे. परंतु ऐतिहासिक परंपरेनुसार त्या सभागृहाचे वरिष्ठ हे नाव कायम राहिले.

याला अपवाद अमेरिका आहे. अमेरिकेतील सिनेट हे जगातील सर्वात शक्तिशाली व प्रभावी गृह आहे. कारण सिनेट या गृहाला तेथील प्रतिनिधीगृहापेक्षा अधिक अधिकार आहेत. इंग्लंड, भारत या देशात वरिष्ठ गृहाना कनिष्ठ गृहापेक्षा कमी अधिकार आहेत. तर रशिया स्वित्झर्लंड या देशात वरिष्ठ गृहांना कनिष्ठ गृहाबरोबरच अधिकार व महत्त्व दिले आहे.

आधुनिक काळात प्रमुख राज्यानी द्विगृही पध्दतीचाच स्वीकार केला असून एकगृही पध्दती फारच थोड्या राज्यात दिसून येते. विधीमंडळ एकगृही असावे की द्विगृही असावे यासंबंधी विचारवंतात मतभेद आहेत. प्रो. लास्की, ॲबीसियस बेन्थॅम, सॅम्युअल ॲडम्स यांनी एकगृही पद्धतीचे समर्थन केले आहे. तर फ्रेंच राज्यशास्त्रज्ञ जेईसच्या मते, ''ज्या ठिकाणी द्विगृही पध्दती स्थापन करण्यात येते. तेथे विभाजन अपरिहार्य असते. परिणामत: जनतेची इच्छा निष्क्रीय बनते.'' तर अमेरिकन विचारवंत बेंजामिन फ्रँकलीन यानीही कायदेमंडळाचा आग्रह धरताना असे मत प्रकट केले की, द्विगृही कायदे मंडळाची स्थिती दोन्ही टोकास घोडे बांधलेल्या आणि ते दोन विरुध्द दिशांना ओढीत असलेल्या गाडीसारखे आहे.

प्रसिध्द ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल याने पहिल्यांदा शासनाच्या या तीन कार्याची आणि घटकांची स्पष्ट विभागणी केली होती. ॲरिस्टॉटलने कायदा बनविण्याच्या प्रक्रियेला अणि घटकाला डेलिबरेटीव्ह (Delibarative) कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या कार्याला आणि घटकाला मॅजिस्ट्रेटिव्ह (Magistrative) आणि कायद्याचा अर्थ लावण्याच्या कार्याला आणि घटकाला ज्युडिशियल म्हणून संबोधले होते. पुढे १६व्या शतकात बोदिन या विचारवंताने शासनाच्या या तीन घटकात स्पष्ट विभागणीची मागणी केली अशी मागणी करणारा तो पहिला आधुनिक विचारवंत आहे. १८ व्या शतकात माँटेस्क्यूने आपल्या 'दि स्पिरीट ऑफ दि लॉज' (The Spirit of the Laws) या ग्रंथात सत्ता विभागणीचा सिध्दांत मांडला. या सिध्दांतामध्ये खालील गोष्टी नमूद करण्यात आल्या.

१. प्रत्येक विभागाची भूमिका त्या संस्थेकडे सोपविण्यात आलेल्या कार्यापुरतीच मर्यादित राहील आणि हे विभाग परस्परांच्या कार्यात हस्तक्षेप करणार नाहीत.

२. एका व्यक्तीच्या किंवा घटकाच्या हाती सत्ता केंद्रित होऊन हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका असतो म्हणून तिन्ही भूमिका वेगवेगळ्या विभागाकडून पार पाडल्या जाव्यात.

३. कायदे बनविणे, कायद्याची अंमलबजावणी करणे, कायद्याचा अर्थ लावणे ही कामे वेगवेगळ्या विभागांकडून केली जावीत.

४. सत्ता विभागणीमुळे नियंत्रण आणि समतोलाचे उद्दिष्ट साधले जाईल.

सत्ता विभागणी अमेरिका, इंग्लंड व भारत या देशात खालीलप्रमाणे करण्यात आली.

### ❀ अमेरिका :-

अमेरिकेत पहिल्यांदा सत्ता विभागणीच्या तत्त्वाचा स्वीकार केला. राज्यघटनेतील पहिल्या तीन कलमामध्ये सत्ता विभागणीचे तत्त्व अंतर्भूत आहे. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा अमेरिकन काँग्रेसचा सदस्य

नसतो. त्याचप्रमाणे राष्ट्राध्यक्षाला काँग्रेस विसर्जीत करता येत नाही. अमेरिकेच्या न्यायपालिकेसंबंधातील नियम बदलण्याचा अधिकार अध्यक्षाला नाही. यावरून अमेरिकेत शासनाच्या तिन्ही घटकात अधिकार आणि कायद्याची स्पष्ट विभागणी झालेली आहे.

❁ **इंग्लंड :-**

इंग्लंडमध्ये कांही प्रमाणात हे तत्त्व अंमलात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. इंग्लंडची संसद कायदे बनविण्याचे कार्य करते. संसदेकडे प्रशासकीय भूमिका नाहीत. प्रशासनाचे कार्य कार्यकारी मंडळाकडे आहे. सत्ता विभाजन तत्त्व पूर्ण अर्थाने लागू होत नाही.

❁ **भारत :-**

भारतात हे तत्त्व कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाला लागू नाही. भारतीय राज्यघटनेने या तत्त्वाचा पूर्णपणे स्वीकार केला नाही. कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ हे वेगळे नाही. कार्यकारी मंडळ हे विधी मंडळातून निवडले जाते. राष्ट्रपती आणि मंत्रीमंडळ हे संसदेचे भाग आहेत. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत दोन्ही सभागृहे सहभागी होतात. राज्यघटनेतील अनेक तरतूदींच्या माध्यमातून राष्ट्रपती कायदेमंडळाला प्रभावीत करण्याचा प्रयत्न करतात. सत्ता विभागणीचे तत्त्व हे भारतात केवळ न्यायमंडळाच्या बाबतीत लागू पडते. कार्यकारी मंडळाच्या प्रभावापासून न्यायमंडळाला मुक्त ठेवण्यात आले आहे.

कायदेमंडळामध्ये जनतेच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत होतात. जनतेचा खरा आवाज हा कायदेमंडळामध्ये प्रकट होतो. कायदेमंडळातील प्रतिनिधी जनतेच्या अडीअडचणी समस्या सोडविण्यासाठी सभागृहामध्ये कायदे करून, चर्चा करून सोडविण्याचा प्रयत्न करतात. लोकशाहीमध्ये कायदे मंडळ हेच जनतेचे व्यासपीठ आहे. त्यामुळे कायदेमंडळाला महत्त्वाचे स्थान आहे.

## २.२.३ कायदेमंडळाचे प्रकार व रचना

वेगवेगळ्या देशामध्ये कायदेमंडळाची रचना व प्रकार भिन्न स्वरूपाचे आहेत. खालील मुद्याद्वारे कायदे मंडळाची रचना व प्रकार समजावून घेता येईल.

❁ **निवड :-**

युरोपमध्ये प्रातिनिधीक लोकशाहीच्या विकासाबरोबर विधीमंडळाची कल्पना पुढे आली. विधीमंडळ हे एकगृही की द्विगृही असावे हे त्या-त्या देशाच्या परिस्थितीवर अवलंबून असते. याबाबत

विचारवंतात मतभेद आहेत. प्रा. लास्की, ॲबिसियस बेल्थॅम, सॅम्युअल ॲडम्स यांनी एकगृही पद्धतीचे समर्थन केले आहे.

लोकशाही शासनप्रणालीमध्ये जनतेला आपला प्रतिनिधी निवडण्याचा व त्यांच्यामार्फत शासन करण्याचा अधिकार असल्यामुळे, प्रौढ मताधिकाराच्या अधिकारावर प्रथम किंवा कनिष्ठ गृहाच्या प्रतिनिधींची निवड करण्यात येते. कनिष्ठ गृह हे खऱ्या अथाने जनतेचे गृह असते. उदा. भारत, इंग्लंड, फ्रान्स, स्विस, रशिया या देशातील कनिष्ठ गृहांच्या सदस्यांची निवड प्रौढ मताधिकाराच्या आधारावर केली जाते.

याउलट द्वितीय गृहातील सदस्यांची निवड देशातील परिस्थितीनुसार वंशपरंपरागत, प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे किंवा अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे करण्यात येते, तर काही ठिकाणी द्वितीय गृहात राष्ट्रप्रमुखाद्वारे कांही सदस्यांची नेमणूक करण्याची प्रथा आहे. उदा. इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ लॉर्डस् या गृहात वंशपरंपरेने सदस्यांची नेमणूक होते, तरीही कांही सदस्यांची नेमणूक राजाकडून केली जाते. भारतात राज्यसभेच्या सदस्यांची निवड अप्रत्यक्षपणे विधीमंडळाचे सदस्य करतात. राष्ट्रपतीना १२ सदस्य नेमण्याचा अधिकार आहे. अमेरिकेत सिनेटच्या तसेच रशियातील कौन्सिल ऑफ नॅशनॅलिटीज या द्वितीय गृहातील सदस्यांची निवड जनता प्रौढ मतदानाच्या आधारावर प्रत्यक्षपणे करते. तर स्वीसमध्ये द्वितीय गृहाच्या सदस्यांची निवड प्रत्यक्ष आणि कांही राज्यात अप्रत्यक्षपणे करण्यात येते.

### ❁ सदस्यसंख्या :-

कनिष्ठ सभागृह हे जनतेचे प्रातिनिधीक गृह असल्यामुळे या गृहाची सदस्यसंख्या ही द्वितीय गृहापेक्षा अधिक ठेवण्यात येते. कोणत्याही परिस्थितीत प्रथम गृहाची सदस्य संख्या द्वितीय गृहापेक्षा जास्त असते असे दिसते. उदा. अमेरिकेत प्रतिनिधी गृहाची (कनिष्ठ व प्रथम गृहाची) संस्था ४३५, तर सिनेट (वरिष्ठ व द्वितीय सभागृह) ची संख्या १०० आहे.

### ❁ कार्यकाल –

दोन्ही गृहाच्या कार्यकालामध्येही फरक ठेवला जातो. प्रथम सभागृह किंवा कनिष्ठ गृह हे जनतेचे गृह म्हणून ओळखले जाते. त्यामुळे प्रथम गृहाचा कार्यकाल कमी ठेवण्यात येतो. कार्यकाल कमी असल्यामुळे जनतेला मतदानाद्वारे आपल्या प्रतिनिधींवर नियंत्रण ठेवता येते. याउलट द्वितीय गृह हे कायम राहील अशी व्यवस्था करण्यात येते. चंचल जनमतावर व प्रतिनिधी सभेवर नियंत्रण ठेवता येते. यानुसार इंग्लंड, भारत, अमेरिका, रशिया आणि फ्रान्स. या देशात कनिष्ठ सभागृहाचा कार्यकाल हा अनुक्रमे ५, ५, २, ४, ५ वर्षे ठेवण्यात आला आहे. तर द्वितीय गृहातील सदस्यांचा कार्यकाल हा फ्रान्स व भारत व अमेरिका या देशात सहा वर्षे आहे. रशियात मात्र तो चार वर्षाचा ठेवण्यात आला आहे.

## ❁ अधिकार :-

द्विगृही कायदेमंडळ पद्धतीत कनिष्ठ गृहाला अधिक सत्ता दिलेली असते. याला अपवाद म्हणजे अमेरिका व रशिया. अमेरिकेत सिनेट या द्वितीय सभागृहाला प्रतिनिधीगृहापेक्षा अधिक सत्ता व अधिकार आहेत. रशियात दोन्ही गृहांचे अधिकार समान आहेत. सिनेटशिवाय बहुतेक सर्व देशात द्वितीय गृहाला आर्थिक बाबतीत सल्ला मसलतीचे अधिकार देण्यात आले आहेत. इतर बाबतीतही कनिष्ठ गृहाला विशेष अधिकार प्रदान केलेले दिसून येतात. राज्याची सर्वोच्च सत्ता ही जनतेकडे असल्याने या सभागृहाकडे अधिक सत्ता असणे वास्तविकतेला तसेच सार्वभौमत्वाच्या सिध्दांताला धरूनच आहे व द्वितीय गृहाच्या अधिकारांबाबत जो फरक दिसतो. तो मुख्यत: त्या-त्या देशातील ऐतिहासिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे दिसून येतो.

## ❐ कायदेमंडळाचे प्रकार :-

कायदेमंडळाच्या सभागृहाच्या संख्येवरून साधारणपणे कायदेमंडळाचे खालील दोन प्रकार आहेत.

(१) एकगृही कायदेमंडळ (Unicameral Legislature).

(२) द्विगृही कायदेमंडळ (Bicameral Legislature).

**१. एकगृही कायदेमंडळ** (Unicameral Legislature) : ज्यावेळेस देशाच्या कायदेमंडळाचे एकच सभागृह असते, तेव्हा त्याला एकगृही कायदेमंडळ म्हणतात. उदा. ग्रीस.

**२. द्विगृही कायदेमंडळ** (Bicameral Legislature) : ज्यावेळेस देशाच्या कायदेमंडळाची दोन सभागृहे असतात, त्यावेळी त्यांना द्विगृही कायदेमंडळ म्हणतात. उदा. भारत, अमेरिका, इंग्लंड इत्यादी.

कायदेमंडळ एकगृही असावे की द्विगृही असावे. याबाबत मतभिन्नता असलेली दिसून येते. ज्यावेळी कायदेमंडळाची दोन सभागृह असतात आणि विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्याकरिता दोन्ही सभागृहाची मान्यता आवश्यक असते. त्यावेळी कायदेमंडळाला द्विगृही (Bicameral) असे म्हणतात. इंग्लंडमध्ये विशिष्ट परिस्थितीमुळे द्विगृही कायदेमंडळ स्थापन झाले तर इतर राष्ट्रांनी त्या पद्धतीचा स्वीकार केला व जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कनिष्ठ गृहाचे महत्त्व वाढत चाललेले आहे. तरीसुद्धा पूर्वीपासून चालत आलेली वरिष्ठ व कनिष्ठ ही नावे तशीच कायम राहिलेली आहेत. आजच्या परिस्थितीत कनिष्ठ सभागृहाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असून वरिष्ठ सभागृहाला दुय्यम स्थान प्राप्त होत चालले आहे. कित्येक देशात ते नामधारी आहे. मात्र अमेरिकेत सिनेट या वरिष्ठ गृहाला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाल्याचे दिसते. तात्विक दृष्टीने विचार केल्यास एकगृही विधीमंडळाची पद्धती उत्तम आहे. परंतु व्यवहारात द्विगृही पद्धती यशस्वी ठरली आहे.

## ❐ एकगृही कायदेमंडळाचे फायदे किंवा गुण (Unicameral Legislature)

युरोपमध्ये १८ व १९ व्या शतकात लोकशाहीच्या प्रसाराबरोबरच एकगृही कायदेमंडळाचा प्रसार घडून आला. २०व्या शतकात पूर्ण युरोपमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर एकगृही कायदेमंडळाचा प्रसार घडून आला. हेरॉल्ड लास्की, सॅम्युअल ॲडम्स्, बेंजामिन फ्रँकलीन यांनी या कल्पनेचे समर्थन केले. परंतु ज्या राष्ट्रांनी एकगृही कायदे मंडळ पद्धतीचा स्वीकार केला. त्यापैकी बऱ्याच राष्ट्रांनी पुढे एकगृही पध्दतीचा त्याग करून द्विगृही पध्दतीचा स्वीकार केला.

## ❐ एकगृही विधीमंडळाचे गुण (Merits of Unicameralism)

### १. सार्वभौमत्वाचे प्रतिक

या पध्दतीचा सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे या गृहातील सदस्य जनतेकडून प्रत्यक्षपणे निवडल्याने जनतेच्या इच्छेचे प्रतिबिंब सभागृहात व्यक्त होते. ॲबीसियसच्या मते, विधीनियम म्हणजे जनतेची इच्छा होय. यात एका वेळेस एका विषयावर जनतेच्या दोन इच्छा असू शकत नाहीत, हे गृहीत धरून एकगृहीच सभागृह असावे असा आग्रह धरला जातो.

### २. कायदेनिर्मितीबाबत एकरूपता

या पध्दतीमुळे कायद्याबाबत एकरुपता निर्माण होते. द्वितीय सभागृह हे विशेष वर्गाचे किंवा घटक राज्याचे प्रतिनिधीत्व करीत असल्यामुळे या गृहातील सदस्यांच्या भावना या प्रथम गृहातील सदस्यांपेक्षा वेगळ्या असतात. विधीनिर्मितीबाबत ते एकरूप होऊ शकत नाहीत.

### ३. कायद्याबाबत सुलभता

या पध्दतीमुळे कायदे निर्माण करणे सोपे होते. एकच गृह असल्याने सर्व सदस्य एके ठिकाणी बसून कायद्याबाबत विचार करून तात्काळ निर्णय घेतात. द्वितीय सभागृहाची मतभिन्नता टाळता येते.

### ४. खर्च कमी होतो

द्विगृही पद्धतीमुळे द्वितीय गृहातील सदस्यांच्या वेतनावर व भत्त्यावर नाहक खर्च होतो. इतर सभेमध्ये सभागृह प्रशासन इ. खर्च वाढतो. मात्र एकृगही पध्दतीत हा खर्च कमी होतो. म्हणून एकगृही पद्धत कमी खर्चिक उपयुक्त आहे.

### ५. पुनरावृत्ती टळते

द्विगृही पद्धतीत विधेयक दोन्ही गृहात चर्चेसाठी व मतासाठी ठेवले जाते. मात्र एकाच गृहामुळे कार्यासंबंधीची पुनरावृत्ती टाळता येते. त्यामुळे वेळेचा अपव्यय होत नाही.

## ६. निश्चित जबाबदारी

या पध्दतीतमुळे कायदेनिर्मितीबाबतची जबाबदारी निश्चित करता येते. द्विगृही विधीमंडळ असल्यास जबाबदारीचे विभाजन होऊन कोणत्याच गृहाला निश्चितपणे जबाबदार धरता येत नाही.

## ७. एकगृही कायदेमंडळ जुलमी नसते

प्रथम गृह हे खऱ्या अथाने जनतेचे गृह असल्याने या गृहाचे सदस्य जनतेला जबाबदार असतात. लोकशाही शासनप्रणालीत कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तिसमूह जुलमी बनू शकत नाही. कारण तसे केल्यास आपण पुन्हा निवडून येवू शकणार नाही हे सदस्यांना माहित असते. याशिवाय राष्ट्रप्रमुखास कांही विशेष हक्क देवून एकगृहाच्या हुकूमशाहीवर नियंत्रण ठेवता येते.

## ❐ एकगृही विधीमंडळाचे दोष (तोटे) (Demerits of Unicameral Legislature)

एकगृही कायदेमंडळ पद्धतीचे वरीलप्रमाणे काही फायदे असले तरी आज बहुतांश देशात द्विगृही पध्दतीचा स्वीकार करण्यात आला आहे. कारण एकगृही पध्दतीत खालील दोष दिसून येतात.

## १. प्रथमगृह हे संपूर्ण राष्ट्राचे प्रतिनिधीत्व करू शकत नाही (Single chamber does not represent the whole nation)

संपूर्ण राष्ट्राचे प्रतिनिधीत्व हे सभागृह करू शकत नाही. हा या सभागृहाचा सर्वात मोठा दोष दिसून येतो. कारण विविध जात, धर्म, व्यावसायिक गट, विशेष तज्ञ इत्यादी हितसंबंधांना प्रतिनिधीत्व मिळू शकत नाही.

## २. विधेयकावर सर्वांगीण चर्चा नाही

कायदेमंडळाचे एकच सभागृह असेल तर या सभागृहावर कामाचा ताण पडतो. पर्यायी सभागृहात विधेयकावर सर्व बाजूनी सर्वांगदृष्टीने चर्चा होऊ शकत नाही. विधेयकात अनेक दोष राहून जातात. जे देश, प्रशासन व समाजहितासाठी घातक असतात, त्यामुळे द्वितीय सभागृह आवश्यक वाटते.

## ३. संघराज्यासाठी अयोग्य

घटक राज्यांना त्यांच्या अधिकाराच्या संरक्षणाकरिता त्यांच्या प्रतिनिधींना विधिमंडळात प्रतिनिधीत्व देणे आवश्यक असते. पण एकगृही कायदेमंडळात हे शक्य नाही. म्हणून कांही टीकाकारांच्या मते, संघराज्यासाठी एकगृही कायदेमंडळ पध्दती निरुपयोगी आहे. एकगृह पद्धतीत ते जनतेचे गृह असल्याने राज्यांना विशेष प्रतिनिधीत्व देता येत नाही.

## ४. विद्वान व अनुभवी व्यक्तींचा अभाव

या सभागृहात विद्वान व अनुभवी व्यक्तींचा अभाव दिसून येतो. हुशार बुद्धिवान लोक निवडणुकीत सहभागी होत नाहीत. विशेष प्रतिनिधीत्व देण्याची सोय एकगृही पध्दतीत नाही, म्हणून द्वितीय सभागृह आवश्यक वाटते.

## ५. कायदेनिर्मितीत उणीवा

कामाचा ताण एकाच सभागृहावर पडत असल्यामुळे व कायदे निर्मिती अत्यावश्यक असल्यामुळे घाईगडबडीत विधेयके मंजूर केली जातात. परिणामत: विधेयकात अनेक दोष कायम राहतात.

## ६. जबाबदारीबाबत टाळाटाळ करण्याची वृत्ती

कायदेनिर्मितीबाबतची सत्ता एकाच गृहात केंद्रित झाल्यास ते एकांगी व जुलमी बनण्याची शक्यता असते. बहुमतात असलेला गट अल्पसंख्यांकावर अन्याय करण्याचा संभव असतो. परिणामत: बेजबाबदार वृत्ती वाढीस लागते.

## ७. हुकूमशाही प्रवृत्तीला प्रोत्साहन

एकगृही कायदेमंडळ एकाधिकारशाही किंवा हुकूमशाही प्रवृत्तींना प्रोत्साहन देणारे ठरते. कायदे बनविण्याची सत्ता एकाच सभागृहाच्या हातात केंद्रित होते. त्यामुळे सभागृहाचा मनमानी कारभार वाढतो.

## ८. कायद्यावर पुनर्विचार नाही

कायदेनिर्मितीबाबत दूरदृष्टीने विचार न होता घाईगडबडीने कायदे मंजूर होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे कायद्यावर पुनर्विचार करण्यास वाव नसतो. कोणताही कायदा दीर्घकालीन व समाजहिताचा असावा पण वेळ व सभागृह वृतीने हे आवश्यक वाटते.

## ९. अनावश्यक कायद्याची निर्मिती

एकगृही कायदेमंडळात सुधारणांच्या आणि विकासाच्या नावाखाली समाजविघातक असे कायदेही मंजूर केले जाऊ शकतात.

अशाप्रकारे एकगृही कायदेमंडळ पध्दतीत अनेक दोष निर्माण होत असल्यामुळे त्या दोषांचे निराकरण करण्यासाठी द्वितीय गृहाची आवश्यकता आहे, असे द्विगृहीपद्धतीचे समर्थक म्हणतात.

## ❐ द्वितीय सभागृह पध्दत–गुण (Arguments in favour of Bicameral Legislation)

कायदेमंडळ एकगृही असावे की द्विगृही याबाबत विचारवंतात मतभिन्नता आहे असे असले तरी द्विगृही कायदेमंडळाचे समर्थन काही विचारवंतानी खालील घटकाच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ❐ द्वितीय सभागृह पध्दत–गुण/फायदे

### १. जनहिताचे संरक्षण

हे सभागृह विधेयकावर सविस्तर चर्चा करून अल्पसंख्यांकाचे तसेच जनहिताचे रक्षण करते. जॉर्ज एक्टन यांच्यामते, ''द्वितीय गृह स्वातंत्र्य संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. हे गृह धोरणात संतुलन राखण्याचा प्रयत्न करते. तसेच प्रथम गृहातील दोष दूर करते.

### २. लोकोपयोगी कायद्याची निर्मिती

द्वितीय गृहामुळे लोकहितकारी कायद्याची निर्मिती होणे शक्य होते. साधारणत: प्रथम गृहात सर्वांगीण परिस्थितीचा विचार न करता जनतेला खूष करण्यासाठी कायदे बनविले जातात. जे भविष्यकाळासाठी उपयुक्त ठरत नाहीत. द्वितीय गृह असल्यास सर्वांगीण दृष्टीने विधेयकावर सारासार विचार करून त्यामधील सदस्य त्यात दुरुस्त्या सुचविते व योग्य कायदे निर्मितीचा प्रयत्न करते.

### ३. प्रथमगृहाच्या वेळ व कार्यात बचत

आधुनिक काळात कायदेमंडळाच्या कार्यात वाढ झाली आहे. म्हणून प्रथम गृहात प्रत्येक विधेयकावर सविस्तर चर्चा करणे अशक्य झाले आहे. अशावेळी गुंतागुंतीची विधेयके द्वितीय गृहात मांडता येतात. या गृहाने विधेयकावर सर्वांगीण विचार केल्यानंतर प्रथम गृहाकडे आल्यास प्रथम गृहाच्या वेळेत व कार्यात बचत होते.

### ४. विविध हितसंबंधी गटाना प्रतिनिधीत्व

प्रथम गृहात जनतेचे प्रतिनिधी असतात. विशेष वर्गाला निवडणुकीद्वारे आपले प्रतिनिधी पाठविता येत नाहीत. अशावेळी समाजातील शिक्षक, प्राध्यापक, व्यापारी संघ, कामगार यांना प्रतिनिधीत्व देण्यासाठी द्वितीय गृह आवश्यक व महत्त्वाचे आहे. त्यामुळे विविध वर्गाचे हित जोपासता येते.

### ५. विद्वान, हुशार, अनुभवी व्यक्तींना प्रतिनिधीत्व

इंग्लंड आणि अमेरिकेतील द्विगृह पद्धतीवरून असे दिसून येते की, देशातील अनुभवी बुद्धीमान

लोक प्रथम गृहापेक्षा द्वितीय गृहातच अधिक दिसतात. तेव्हा अशा साहित्य, कला, क्रीडा, वाङ्मय इ. क्षेत्रातील नावलौकिक प्राप्त व्यक्तींच्या ज्ञानाचा फायदा हा देशाला व्हावा यासाठी त्यांना द्वितीय गृहात स्थान देता येते. भारतात राष्ट्रपतींकडून १२ व्यक्तींची निवड याच क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश राज्यसभेत होतो.

## ६. संघराज्यासाठी उपयुक्त

संघराज्याचा उद्देश घटक राज्याचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट न करता एकता प्रस्थापित करण्याचा असतो. हा उद्देश द्वितीय गृहामुळे साध्य करता येतो. उदा. भारत, अमेरिका, रशिया. म्हणून संघराज्यासाठी द्वितीय गृह आवश्यक मानले जाते.

## ७. प्रथम सभागृहावर नियंत्रण

द्वितीय गृहामुळे प्रथम गृहाच्या हुकूमशाही वृत्तीवर नियंत्रण ठेवता येते. सभागृहातील प्रतिनिधी बहुमताचे जोरावर हवे तसे कायदे पारित करू शकत नाही. वरिष्ठ सभागृहाच्या नियंत्रणामुळे प्रथम सभागृहाची हुकूमशाही निष्प्रभ ठरते.

## ❑ द्विगृही कायदेमंडळाचे तोटे/दोष (Demerits of Second Chember)

## १. लोकशाहीतत्त्वाच्या विरुध्द

द्वितीय सभागृह लोकशाही तत्त्वाविरुध्द वाटते. कारण द्वितीय सभागृहात काही सदस्य नियुक्त असतात, त्यामुळे लोकशाहीनुसार सदस्य निवडून येणे आवश्यक आहे, त्यामुळे लोकशाही विरुध्द वाटते.

## २. संघर्षाला कारणीभूत

द्वितीय गृहाचा दोष म्हणजे या गृहामुळे प्रथम आणि द्वितीय गृह यांच्यात संघर्ष निर्माण होण्याचा धोका असतो. जेथे दोन गृहे असतात, तेथे विभाजन आणि विरोध होणे अनिवार्य असते.

## ३. वेळेचा अपव्यय

कायदेनिर्मितीचे कार्य जटील व विलंब लावणारे असते. प्रथम सभागृहाला कायदेनिर्मितीची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यास अधिक वेळ लागतो. हेच विधेयक पुन्हा द्वितीय गृहाकडे आल्यास पुन्हा त्याच क्रमाने सर्व प्रक्रिया राबवावी लागते. म्हणजेच प्रथम वाचन, द्वितीय वाचन, तृतीय वाचन इ. पुन्हा त्याच प्रकारच्या टीकेची आणि सुधारणांची पुनरावृत्ती होते. अशाप्रकारे वेळेचा अपव्यय होऊन कायदेनिर्मितीस उशीर लागतो. प्रा. लास्कींच्या मते, ''द्वितीय गृह म्हणजे कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेचा उपहास होय.''

## ४. अल्पसंख्यांकासाठी अनावश्यक

द्वितीय गृहाचे समर्थक अल्पसंख्यांकांच्या हितासाठी द्वितीय गृह आवश्यक आहे असे मांडतात. परंतु त्यात फारसे तथ्य नाही. कारण राज्यघटनेत अल्पसंख्यांकांच्या रक्षणासाठी विशिष्ट प्रकारची तरतूद करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करता येते. त्यासाठी द्विगृहाची आवश्यकता नाही.

## ५. द्वितीय सभागृह रचनेबाबत अडथळे

द्विगृहाची संघटना कशा प्रकारे असावी याबाबत अनेक मतभेद आहेत. प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे या गृहाच्या सदस्यांची निवड केल्यास हे गृह अनावश्यक ठरते. कारण प्रथम गृहाचे सदस्य जनतेने प्रत्यक्षपणे निवडलेले असतात. तसेच प्रातिनिधीकगृह म्हणून द्वितीयगृहसुद्धा प्रथम गृहाइतकेच अधिकार मागेल व त्यामुळे दोन्ही सभागृहात संघर्ष निर्माण होईल. अशावेळी प्रथम गृहावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार द्वितीय गृहाला देता येत नाही. त्यामुळे रचनेबाबत अडचणी निर्माण होतात.

## ६. संघराज्यासाठी अनावश्यक

घटकराज्य संरक्षणासाठी द्वितीय सभागृह हवे हे चूक. कारण संघराज्यात राज्यघटनेद्वारेच सत्तेचे विभाजन केलेले असते आणि सर्वोच्च न्यायालयाकडे घटनेच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविलेली असते. नि:पक्ष आणि स्वतंत्र न्यायपालिका घटक राज्याच्या हिताचे संरक्षण करीत असताना द्वितीय गृहाची आवश्यकता वाटत नाही.

## ७. विधेयक सुधारणा व पुनर्विचार यादृष्टीने अनावश्यक

प्रथम गृहाचा ताण कमी होतो व द्वितीय गृहात शांतपणे विधेयकावर विचार करून सुधारणा करता येतात. या प्रतिपादनात फारसे तथ्ये नाही असे टीकाकार म्हणतात. कारण प्रथम गृहात विधेयकावर साधारण चर्चा झाल्यानंतर विधेयक हे फक्त समितीकडे पाठविण्यात येते. या समितीत विधेयकावर सविस्तर विचार होत असतो. त्यानंतर पुन्हा सभागृहात विचार करण्यात येतो. विधेयकाला अशा विविध अवस्थामधून जावे लागत असल्याने प्रथम गृह घाईगर्दीने निर्णय घेते. या म्हणण्याला अर्थ नाही. द्वितीय गृह पुनर्विचार करण्याच्या नावाखाली विधेयकाला विलंब लावत असते. म्हणून पुनर्विचार व सुधारणा या दृष्टीने द्वितीय गृह अनावश्यक वाटते.

वरीलप्रमाणे द्वितीय सभागृहात गुणांबरोबर दोषही दिसून येतात. असे असले तरी प्रथम गृहाचा कामाचा ताण कमी करणे, मंजूर केलेल्या विधेयकावर पुनर्विचार, त्यातील दोष दूर करणे आणि विवेकी विधेयके निर्माण करणे यासाठी द्वितीय गृह आवश्यक आहे. आज बहुतेक सर्व प्रमुख आणि प्रगत देशांनी द्विगृही कायदेमंडळ पद्धतीचाच स्वीकार केलेला दिसून येतो.

❐ **प्रमुख राष्ट्रांमधील द्विगृही कायदेमंडळ खालीलप्रमाणे :-**

**प्रमुख राष्ट्रांमधील द्विगृही कायदेमंडळ**

| **देश** | **कनिष्ठ सभागृह** | **वरिष्ठ सभागृह** |
|---|---|---|
| भारत | लोकसभा | राज्यसभा |
| अमेरिका | हाऊस ऑफ रिप्रेझेंन्टेटीव्ह | सिनेट |
| इंग्लंड | हाऊस ऑफ कॉमन्स | हाऊस ऑफ लॉर्डस् |
| कॅनडा | हाऊस ऑफ कॉमन्स | सिनेट |
| ऑस्ट्रेलिया | हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटीव्ह | सिनेट |
| स्वित्झर्लंड | नॅशनलकौन्सिल | कौन्सिल ऑफ स्टेटस् |
| **संदर्भ :** डॉ. शैलेंद्र देवळाणकर, राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना. | | |

## २.२.४ कायदेमंडळाचे अधिकार व कार्ये

शासनाकडून प्रमुख तीन कार्य पार पाडली जातात. कायदेमंडळाला इतर शाखांपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त होण्याचे कारण म्हणजे राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी कायदेमंडळ कायदेनिर्मितीचे कार्य करीत असते. असे असले तरी सर्वच देशातील कायदेमंडळाचे महत्त्व अधिकार व कार्ये सारखीच नाहीत. त्या देशातील शासनव्यवस्था, जनतेमधील राजकीय जागृती तसेच राज्यघटनेने कायदे मंडळाला दिलेली सत्ता यावर अवलंबून असते. इंग्लंडमध्ये संसद सार्वभौम आहे. तर अमेरिकेत सत्ताविभाजनाच्या तत्त्वामुळे कायदेमंडळाला सार्वभौमत्वाचा दर्जा प्राप्त झाला नाही. तर भारतात संसद ही सर्वोच्च कायदे बनविणारी संस्था आहे. साधारणत: सर्वच देशांतील कायदेमंडळाना जनतेचे प्रतिनिधीगृह या नात्याने शासनविषयक, अर्थविषयक व अन्य कार्ये करावी लागतात, ती खालीलप्रमाणे :-

### १. कायदेविषयक कार्य

कायदेमंडळाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे कायद्यांची निर्मिती होय. या संदर्भात कायदेमंडळाला कायद्याचा मसुदा तयार करणे त्यावर विचार आणि चर्चा करणे, आवश्यकता वाटल्यास त्यात दुरुस्ती करणे आणि विधेयकास मान्यता देणे, इत्यादी कार्ये करावी लागतात. कायदेमंडळाकडून आलेल्या कायद्यातून लोकांची इच्छा व्यक्त होत असते. इंग्लंड आणि भारतामध्ये संसद ही सर्वोच्च कायदे बनविणारी संस्था आहे.

जनतेकडून निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून संपूर्ण देशाचे प्रतिबिंब कायदेमंडळात पडते.

विधेयकाच्या विविध पैलूवर प्रतिनिधी आपली मते मांडतात. त्यावर चर्चा, वादविवाद होतात. विधेयकाद्वारे जनतेच्या समस्या, मागण्या, प्रश्न यावर चर्चा होते. देशाचे परराष्ट्र धोरण, अंतर्गत धोरण, कायदा आणि सुव्यवस्था, विविध समस्या आणि आव्हाने यावर कायदेमंडळात चर्चा होऊन विधेयकाला मान्यता दिली जाते.

भारताच्या बाबतीत संसदेला विस्तृत कायदेविषयक अधिकार आहेत. संसद केंद्रसूची व समवर्ती सूचीतील शेषाधिकार इ. विषयासंबंधी कायदा करतेच, परंतु कांही अपवादात्मक परिस्थितीत राज्यसूचीतील विषयावरदेखील कायदा करू शकते.

## २. अर्थविषयक कार्य

राज्याच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य कायदे मंडळाला करावे लागते. या दृष्टीने दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे विविध कार्ये करण्यासाठी आर्थिक व्यवस्था करणे गरजेचे असते. आधुनिक काळात अर्थसंकल्प जरी कार्यकारी मंडळाद्वारे तयार करण्यात येत असला तरी करात वाढ करण्याचा, नवीन कर लावण्याचा व जुने कर रद्द करण्याचा अंतिम अधिकार कायदेमंडळाचा असतो. दरवर्षी कार्यकारी मंडळाकडून कायदेमंडळामध्ये अंदाजपत्रक मांडले जाते. यावेळी सरकारच्या धोरणावर टीका करण्यास आणि विशिष्ट खात्याच्या कारभाराबद्दल चर्चा करण्याची सभासदांना संधी मिळते. लोकांच्या आर्थिक गरजा मांडण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रकावरील चर्चा उपयुक्त ठरते. सरकारच्या खर्चाची तपासणी करण्याचा अधिकारही कायदेमंडळाला आहे. आर्थिक व्यवस्था, चलनव्यवस्था, कर्जव्यवहार, आर्थिक धोरण यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर मत प्रदर्शित करून सरकारला मार्गदर्शन करण्याचे कार्य कायदेमंडळाला करावे लागते.

## ३. धोरण निर्धारण

कायदेमंडळाचे तिसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे सरकारचे धोरण, निर्धारण व निश्चिती करणे होय. कायदेमंडळाने व्यापक स्वरूपात धोरण निर्धारण केल्यानंतर कार्यकारी मंडळ त्याला कार्यान्वित करत असते. उदा. भारताचे परराष्ट्रीय धोरण, औद्योगिक धोरण, कृषिविषयक धोरण ठरवीत असताना कायदेमंडळ त्याअनुषंगाने आवश्यक अशा कायद्यांची निर्मिती करीत असते.

याशिवाय शासन यंत्रणेवर नियंत्रण ठेवते. कायदेमंडळ मंत्र्यांना प्रश्न, उपप्रश्न विचारून, स्पष्टीकरण देण्याची सूचना करून नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते. एवढेच नव्हे तर मंत्रीमंडळावर अविश्वास दाखविणारा ठराव मान्य करून त्यांना अधिकारावरून दूर करण्याची सत्ता कायदेमंडळाला दिलेली असते.

याउलट अध्यक्षीय पध्दतीत अध्यक्षाने केलेले तह करार, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका या बाबतीत कायदेमंडळाच्या वरिष्ठ गृहाची मान्यता घेणे आवश्यक असते.

## ४. कार्यकारीविषयक कार्य

आधुनिक काळात कायदेमंडळाला कार्यकारी मंडळावरही नियंत्रण ठेवावे लागते. संसदीय शासन पध्दतीत कायदेमंडळाला कार्यकारी मंडळ जबाबदार असल्यामुळे कार्यकारी मंडळाला प्रश्न विचारून, कामाची तपासणी करण्यासाठी, कमिशन, समित्या नेमता येतात. शेवटी अविश्वास प्रस्ताव मांडून कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवते.

अध्यक्षीय पध्दतीत सिनेट हे कार्यकारीविषयक कार्य करीत असते. यात अध्यक्षांनी केलेल्या तहाना संमती देणे. तसेच शासनविषयक कार्याची तपासणी करणे इत्यादीचा समावेश होतो.

## ५. न्यायविषयक कार्य

कांही देशात कायदेमंडळाला न्यायविषयक कार्येही करावी लागतात. इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ लॉर्डस् या गृहाला सर्वोच्च न्यायालय म्हणून काम करावे लागते.

अमेरिकेच्या राज्यघटनेप्रमाणे सिनेटला अध्यक्षांविरुध्द केलेल्या आरोपाची चौकशी करून न्यायदान करण्याचा अधिकार आहे. भारताच्या राज्यघटनेनुसार कायदेमंडळाच्या दोन्ही गृहांना असा अधिकार दिलेला आहे. महाभियोगाद्वारे राष्ट्रपती अधिकारावरून काढून टाकण्याचा अधिकार कायदेमंडळाला आहे. अध्यक्षाने घटनाभंग केल्याचा आरोप कोणत्याही एका गृहाने केला म्हणजे दुसऱ्या गृहाला आरोपाची चौकशी करून आरोप शाबीत झाल्यास त्यांना अधिकारावरून दूर करता येते.

## ६. राज्यघटना दुरुस्तीचे कार्य

कायदेमंडळाचे आणखीन एक कार्य म्हणजे घटनादुरुस्तीचे होय. बदलत्या परिस्थितीत घटना दुरुस्ती करणे आवश्यक असते. इंग्लंडमध्ये कायदेमंडळ साधारण आणि घटनात्मक असे दोन्ही प्रकारची घटनादुरुस्ती सहज करू शकते. अमेरिका, भारत इ. देशात घटनादुरुस्तीचा अधिकार फक्त कायदेमंडळालाच देण्यात आला आहे. घटनात्मक बदल घडवून आणावयाचा असल्यास घटनेत दिलेल्या राज्यघटना दुरुस्तीद्वारेच बदल घडवून आणावा लागतो.

## ७. निर्वाचनासंबंधी कार्ये

काही देशात कायदेमंडळाला निर्वाचनविषयक कार्यही करावे लागते. उदा. भारतात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांची निवड कायदेमंडळाकडून होते. अमेरिकेतही निर्विवाद बहुमताने राष्ट्राध्यक्षाची निवड न झाल्यास कायदेमंडळ अधिक मते प्राप्त करणाऱ्या पहिल्या दोन सदस्यांतून राष्ट्राध्यक्षांची निवड करीत असते.

## ८. इतर कामे

कायदेमंडळ अप्रत्यक्षरित्या जनशिक्षणाचे कार्य करीत असते. कायदेमंडळात विरोधी पक्ष सरकारच्या धोरणावर जी टीका करतो. विरोधी पक्ष व सरकार यांच्यातील चर्चा वादविवाद होतात, त्यांना प्रसिद्धी माध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्यात येते. त्यामुळे जनतेला आपोआपच राजकीय घडामोडींचे शिक्षण मिळते.

याशिवाय महत्त्वाच्या प्रश्नांवर माहिती जमविणे, पुरावा गोळा करणे, परराष्ट्रीय धोरण, आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादीबाबत कार्यकारी मंडळाला मार्गदर्शन करणे, अशी अनेक प्रकारची कामे आज कायदेमंडळाकडून केली जात असल्याचे दिसून येते. कायदेमंडळाची जबाबदारी दिवसेंदिवस वाढताना दिसते.

अशा प्रकारे कायदेमंडळाला विविध कार्ये करावी लागत असल्यामुळे व तशा प्रकारची सत्ता कायदेमंडळाजवळ असल्यामुळे प्रत्येक देशाच्या घटनात्मक व्यवस्थेत कायदेमंडळाला स्थान प्राप्त झालेले दिसून येते.

## २.२.५ कायदेमंडळाचा ऱ्हास

शासनाच्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तीन शाखांपैकी कायदेमंडळ ही महत्त्वाची शाखा आहे. परंतु दिवसेंदिवस जगभर कायदे मंडळाच्या अधिकारांचा तसेच या शाखेचा ऱ्हास होत चालला आहे. वास्तविक पाहता जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे व जनतेच्या आशा-आकांक्षा प्रदर्शित करणारी ही महत्त्वाची शाखा आहे. कायदेमंडळाच्या ऱ्हासांची कांही महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

## १. कायदेमंडळाच्या अधिवेशन कामकाज पध्दत व वेळ आणि पैशाचा अपव्यय

कायदेमंडळाची अधिवेशने ठरावीक कालावधीमध्ये व ठराविक मुदतीमध्ये होत असतात. प्रत्येक देशामध्ये वार्षिक, सहामाही, त्रैमासिक मुदतीत अधिवेशन कालावधी निश्चित केलेला असतो. उदा. भारतामध्ये संसदेचे फेब्रुवारी ते मे महिन्याच्या दरम्यान आर्थिक अंदाजपत्रकासाठी बजेट सेशन, जुलै ते सप्टेंबर मध्ये पावसाळी तर नोव्हेंबर ते डिसेंबरमध्ये हिवाळी अधिवेशन असते. परंतु या अधिवेशन काळात कायदेमंडळाचे कामकाज नियोजनाप्रमाणे चालताना दिसत नाही. यामध्ये एखाद्या प्रश्नावरून विरोधक प्रचंड गोंधळ घालतात. कामकाजावर बहिष्कार टाकतात किंवा कामकाजात अनेक अडथळे आणतात. यामुळे कित्येकदा कायदे मंडळात कायदेनिर्मितीचे कामकाज होत नाही. केवळ वेळेचा व पैशाचा प्रचंड अपव्यय होतो. उदा. भारतामध्ये संसद सदस्यांच्या गोंधळामुळे सभापतींना अनेक वेळेस कामकाज तहकूब करावे लागत आहे. काही अभ्यासगटांच्या मते, १९८५ पर्यंत संसदेचे कामकाज १२५ दिवस होत असे. ते आज साधारणपणे ८० दिवसांवर आलेले आहे. अधिवेशन काळात कामकाज होत

नाही. मात्र प्रचंड प्रमाणात भत्ते, सुविधा इत्यादीवर पैसा खर्च होतो. यामुळे वेळेचा व पैशाचा अपव्यय होतो. तसेच कायदेमंडळाच्या कामकाज काळात सदस्यांना त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर प्रश्न विचारण्यासाठी व चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नाही. त्याचप्रमाणे सभागृहात अडथळा आणणाऱ्या, गैरवतर्णूक करणाऱ्या सदस्यावर कडक कारवाई केली जात नाही.

## २. कायदेमंडळामधील प्रभावहीन घटनात्मक आयुधांचा वापर :-

कार्यकारी मंडळाच्या नियंत्रणासाठी कायदेमंडळामध्ये विविध आयुधांचा वापर करता येतो. कायदेमंडळामध्ये प्रश्नोत्तरे, स्थगन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, कपातसूचना इ. द्वारे कार्यकारी मंडळावरनियंत्रण ठेवता येते. परंतु कायदेमंडळाच्या सदस्याकडून या आयुधांचा प्रभावहीन वापर होताना दिसतो. उदा. भारतामध्ये १९७७ पर्यंत प्रश्नोत्तराच्या तासाचा विरोधी पक्षाकडून प्रभावी वापर होत होता. परंतु नव्वदच्या दशकापासून या काळात किरकोळ बाबींवरून गोंधळ करून कामकाज बंद पाडले जाते. विरोधकांकडून सक्तीने कामकाज तहकूब करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र यासाठी सत्ताधारी पक्ष सुध्दा जबाबदार असतो. त्याचप्रमाणे नवीन येणाऱ्या सदस्यांना सभागृहाच्या कामकाजाबद्दलचे प्रशिक्षण व उजळणी देण्याची अशी सोय नाही. तसेच या सदस्यामध्ये कामकाजाबद्दल जाणून घेण्याची वृत्ती कमी असल्याचे दिसते.

## ३. प्रतिनिधीमध्ये झालेले बदल :-

कायदेमंडळामध्ये स्वच्छ चारित्र्य असणारे, अभ्यासू जनतेप्रति निष्ठा असणारे प्रतिनिधी असणे आवश्यक असते. लोकशाहीच्या शुध्दीकरणासाठी हा मूलभूत पाया आहे. परंतु आज गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे, पैशाच्या जोरावर निवडून येणारे, भ्रष्टाचाराचा कलंक असणारे प्रतिनिधी लक्षणीय प्रमाणात कायदेमंडळात निवडून येताना दिसतात. यामुळे कायदेमंडळाच्या कामकाजामध्ये त्यानां फारसा रस नसतो. याचा परिणाम कायदेमंडळाच्या कामकाजावर होतो. कामकाज पाहिजे त्या प्रमाणात उच्च दर्जाचे होत नाही. अभ्यासू, स्वच्छ चारित्र्य असणारे सदस्यांचे प्रमाण कमी होताना दिसते. यामुळे कायदेमंडळाचे महत्त्व कमी होताना दिसते.

याचबरोबर निवडणुकांमध्ये प्रचंड प्रमाणात पैशाचा वापर होत आहे. पैसेवाले उमेदवार मोठ्या प्रमाणात निवडून येताना दिसत आहेत. गुणवत्ता असणारे पण पैसा नसणारे उमेदवार क्वचितच निवडून येताना दिसत आहेत. यामुळे कायदेमंडळाची गुणवत्ता कमी होताना दिसत आहे.

## ४. आघाडी सरकारे :-

२०व्या शतकाच्या उत्तरार्धापासून जगभरात अनेक देशात कायदेमंडळामध्ये एका राजकीय पक्षाला

बहुमत मिळताना दिसत नाही. अनेक पक्ष एकत्र येऊन आघाडी करून सरकार बनविले जात आहे. यामध्ये सरकार जरी अस्तित्वात आले तरी प्रत्येक पक्षाची ध्येयधोरणे वेगवेगळी असतात, त्यामुळे सरकारअंतर्गत मतभेद याचे प्रतिबिंब अधिवेशन काळात कायदेमंडळात दिसून येते. विरोधक सरकारमधील कच्चे दुवे शोधून सरकारला अडचणीत आणतात अशा वेळेस अंतर्गत मतभेद असणारे सत्ताधारी पक्ष व सरकार योग्य पध्दतीने विरोधकांना उत्तरे देऊ शकत नाही. त्यामुळे कायदेमंडळात कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये विलंब होतो. किंबहुना अनेक कायदे अस्तित्वात येऊ शकत नाहीत. याचा परिणाम सरकारच्या प्रतिमेवर होतो. सरकार निर्णय घेऊ शकत नसल्याने ते जनतेमध्ये अप्रिय होऊ लागते. कायदेमंडळात कामकाज व्यवस्थित चालत नाही. याचा परिणाम कायदेमंडळाचे महत्त्व घसरणीवर होतो. उदा. भारतामध्ये १९८९ नंतर आघाडी सरकारे आली. यामध्ये प्रामुख्याने काँग्रेसप्रणित 'युनायटेड प्रोग्रेसीव्ह अलायन्स' (यु.पी.ए.) म्हणजेच संयुक्त पुरोगामी आगाडी, तर भाजपप्रणित 'नॅशनल डेमोक्रॅटिक अलायन्स' (एन.डी.ए.) म्हणजेच राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांचा समावेश होतो.

## ५. कार्यकारी मंडळाकडे नेतृत्व व वर्चस्व :-

अनेक देशामध्ये घटनात्मकदृष्ट्या कायदेमंडळाला अधिक अधिकार आहेत. कार्यकारी मंडळाचे भवितव्य कायदेमंडळाच्या विश्वासाहर्तेवर अवलंबून असते. मात्र दैनंदिन व्यवहारात पंतप्रधान किंवा अध्यक्ष व त्याचे मंत्रीमंडळ यांची सत्ता प्रभावी ठरते. कार्यकारी मंडळाचा प्रमुख पंतप्रधान किंवा अध्यक्ष यांच्याकडे देशाचे नेतृत्व असते. त्यामुळे आपोआपच कार्यकारी मंडळ प्रभावी होत आहे. उदा. भारतात व इंग्लंडमध्ये पंतप्रधान तर अमेरिकेत अध्यक्ष.

## ६. कायदेमंडळ व नोकरशाही प्रत्यक्ष संबंध नाही :-

देशामध्ये ध्येयधोरण राबविणारी यंत्रणा म्हणजे नोकरशाही होय. आधुनिक काळात नोकरशाहीचे महत्त्व वाढले आहे. अशा या नोकरशाहीवर कार्यकारी मंडळाचे नियंत्रण असते. यामुळे कार्यकारी मंडळाचे महत्त्व वाढले आहे. तर याउलट कायदेमंडळाचा नोकरशाहीशी थेट संबंध येत नसल्यामुळे कायदे मंडळाचे याबाबतीत महत्त्व कमी होत आहे.

## ७. प्रदत्त विधीनियमांची निर्मिती :-

कायदेमंडळाकडे असणाऱ्या वेळेच्या मर्यादा, कामकाजातील अडथळे, कायदेमंडळावरील प्रचंड ताण यामुळे प्रदत्त विधीनियमांची निर्मिती झाली आहे. प्रदत्त विधीनियम म्हणजे, जेव्हा कायदेनिर्मितीचा अधिकार कायदेमंडळाकडून कार्यकारी मंडळाला प्रदान केला जातो, तेव्हा त्यास प्रदत्त विधीनियम असे म्हणतात. कायदेमंडळ कायद्याची रुपरेषा ठरविते, तर कार्यकारी मंडळ त्यामधील तपशील, नियम,

उपनियम तयार करते. कायदेमंडळाकडून मिळालेल्या या प्रदत्त विधीनियम अधिकाराचा कार्यकारी मंडळ तसेच नोकरशाहीकडून बऱ्याचवेळा गैरवापर होताना दिसतो. नियम उपनियम करण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेक वेळेस कायद्याचा मूळ ढाच्याच बदलण्याची शक्यता असते. तसेच या अधिकारामुळे कार्यकारी मंडळाचे महत्त्व वाढले आहे.

## ८. न्यायमंडळाचे वाढते हस्तक्षेप / सक्रियता व न्यायालयीन पूनर्विलोकनाचा अधिकार :-

२०व्या शतकाच्या उत्तरार्धापासून तर २१व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये जगभरामधील न्यायालये मोट्या प्रमाणात प्रभावी भूमिका बजावताना दिसत आहेत. अनेक देशांच्या राज्यघटनांनी न्यायमंडळाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिलेला आहे. न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे, 'कायदे मंडळाने केलेला एखादा कायदा राज्यघटनेशी सुसंगत आहे की नाही ते पाहणे व जर सदरचा कायदा राज्यघटनेशी विसंगत असल्यास तो कायदा रद्दबातल करण्याचा न्यायमंडळाला अधिकार असणे होय.' या अधिकारामुळे अनेक वेळेस कायदेमंडळाने केलेले कायदे न्यायमंडळ रद्द करते. त्यामुळे कायदेमंडळाचे महत्त्व कमी होत आहे. न्यायालयीन सक्रियतेमुळेही कायदेमंडळाचे महत्त्व कमी होत आहे. उदा. भारत, अमेरिका इ. देशात न्यायमंडळाचे महत्त्व वाढले आहे.

## ९. पक्षीय राजकारण व पक्ष प्रतोदाचे महत्त्व :-

राजकीय पक्ष, पक्ष प्रतोदाच्या माध्यमातून आपल्या सदस्यांवर तसेच कायदेमंडळामधील आपल्या प्रतिनिधीवर नियंत्रण करीत असतात. एखाद्या राजकीय पक्षाला कायदेमंडळामध्ये पूर्ण बहुमत मिळाले की, तो पक्ष आपली सत्ता प्रस्थापित करतो. त्या पक्षाचा नेता कार्यकारी मंडळाचा म्हणजे देशाचा प्रमुख होतो. तो पक्ष प्रतोदाच्या माध्यमातून कायदेमंडळातील सदस्यांना नियंत्रीत करतो. काही वेळेस कायदे मंडळाच्या सदस्याचा एखाद्या विधेयकाबाबत विरोध असतो. परंतु तो सदस्य त्याबाबत विरोध दर्शवू शकत नाही. तसेच त्याबाबत टीका टिप्पणी करू शकत नाही. यामध्ये पक्षाचे व पक्षनेतृत्वाचे वर्चस्व कायदेमंडळावर दिसून येते. यामुळेही कायदेमंडळाचे महत्त्व कमी होत आहे.

एकंदरीत वरील विविध कारणामुळे कायदेमंडळाचे महत्त्व कमी होवून त्याचा ऱ्हास होत आहे. वास्तविक पाहता जनतेच्या या आशा, आकांक्षा जोपासणाऱ्या, जनतेचा आवाज असणाऱ्या या शासन अंगाचा किंवा शाखेचा ऱ्हास थांबवून कायदेमंडळाच्या अधिकाराची व कार्याची वृध्दी करण्यामध्येच लोकशाहीचे भवितव्य आहे. सदृढ व परिपक्व लोकशाहीसाठी कायदेमंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

## २.२.६ स्वयं-अध्ययन प्रश्न

❑ **वस्तुनिष्ठ प्रश्न.**

१. भारतामध्ये ........... व ............ ही दोन सभागृहे आहेत.

२. भारताच्या कायदेमंडळाला ............... म्हणतात.

३. अमेरिकेच्या कायदेमंडळाला ............... म्हणतात.

४. इंग्लंडच्या ............. सभागृहातील सदस्य वंशपरंपरेने निवडले जातात.

५. पंतप्रधान हा ............ प्रमुख आहे.

## २.३ सारांश

लोकशाही शासनप्रणालीत शासनाच्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तीन शाखांपैकी कायदेमंडळ ही सर्वात महत्त्वाची शाखा किंवा विभाग आहे. प्राचीन नगरराज्यांपासून ते आजपर्यंतच्या प्रातिनिधीक शासनापर्यंत कायदेमंडळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी कायदेमंडळ कार्य करीत असते. २०व्या शतकात राज्याने कल्याणकारी स्वरूप धारण केले. त्यामुळे राज्याची जबाबदारी वाढली. राज्याचे कार्यक्षेत्र वाढले. जनतेच्या इच्छा आकांक्षा गरजा वाढल्याने नवनवीन कायद्याची गरज भासू लागली. त्यामुळे साहजिकच कायदेमंडळाची जबाबदारी वाढली. कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहात तपशीलवार चर्चा होऊन जनमताचा आधार घेऊन कायद्याची निर्मिती होऊ लागली. आज कार्यकारी मंडळाचे महत्त्व कायदेमंडळापेक्षा वाढत असले तरी कायदेमंडळाशिवाय योग्य असे कायदे हे पारित होत नाहीत. त्यामुळे त्याचे महत्त्व हे दिवसेंदिवस वाढतच जाईल, यात शंका नाही.

## २.४ पारिभाषिक शब्द

१. **एकगृही** : एकच सभागृह.

२. **द्विगृही** : दोन सभागृहे.

३. **सत्ता विभाजन** : कार्यानुसार सत्तेची विभागणी.

४. **स्थायी सभागृह** : कायमस्वरूपी सभागृह / विसर्जीत न होणारे.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. भारतामध्ये **लोकसभा** व **राज्यसभा** ही दोन सभागृहे आहेत.

२. भारताच्या कायदेमंडळाला **संसद** म्हणतात.

३. अमेरिकेच्या कायदेमंडळाला **काँग्रेस** म्हणतात.

४. इंग्लंडच्या **हाऊस ऑफ लॉर्डस्** सभागृहातील सदस्य वंशपरंपरेने निवडले जातात.

५. पंतप्रधान हा **वास्तववादी** प्रमुख आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

❑ **प्रश्न १ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. एकगृही कायदेमंडळाची व्याख्या सांगून गुण-दोष स्पष्ट करा.

२. कायदेमंडळाचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

३. कायदेमंडळाच्या ऱ्हासाची कारणे स्पष्ट करा.

❑ **प्रश्न २ : टीपा लिहा.**

१. कायदेमंडळाची रचना.

२. कायदेमंडळाचे महत्त्व.

३. द्विगृही पद्धतीचे गुण-दोष.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **गोखले आर. एम.**, *'आधुनिक राज्यशास्त्र भाग-३'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७२.

२. **घारे पां. श्री.**, *'राज्यशास्त्र (सिद्धांत आणि राज्ययंत्रणा)'*, पुणे विद्यार्थी गृह, १९७२

३. **गर्दे दि. का., बाचल वि. मा.,** *'आधुनिक राजकीय विश्लेषण'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७५.

४. **भोगले शां. कृ.,** *'आधुनिक शासनसंस्था (तत्त्व आणि व्यवहार)'*, शारदा प्रकाशन, नांदेड, १९७५.

५. **देवळाणकर शैलेंद्र,** *'राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१३.

६. **प्रा. पाटील बी. बी.,** *'भारतीय शासन आणि राजकारण'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.

७. **मुळे प्र. ग.,** *'शासनसंस्थेची मूलतत्त्वे'*, विद्या प्रकाशन, नागपूर, १९६२.

घटक–३

# कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ

घटक संरचना

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ संसदीय कार्यकारी मंडळ

  ३.२.२ अध्यक्षीय कार्यकारी मंडळ

  ३.२.३ न्यायमंडळ

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ हे तीनही घटक लोकशाही व्यवस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. तीनही घटकांपैकी एक जरी घटक अस्तित्वात नसेल तर तेथे शासन व्यवस्था आहे असे म्हणता येणार नाही. एवढे महत्त्व या तीनही संस्थांना आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या दोन घटकांचा सविस्तर अभ्यास खालील उद्दिष्टांच्या आधारे करणार आहोत.

- कार्यकारी मंडळाचा अर्थ, स्वरूप व कार्यकारी मंडळाची कार्ये यांचा अभ्यास करणार आहोत.
- संसदीय कार्यकारी मंडळ व अध्यक्षीय कार्यकारी मंडळ यांचा अभ्यास.

- न्यायमंडळ अर्थ व व्याख्या यांचा अभ्यास.
- न्यायमंडळाचे प्रकार व न्यायमंडळाची कार्ये यांचा अभ्यास.
- न्यायमंडळाचे महत्त्व.

वरील वेगवेगळ्या उद्दिष्टांच्या आधारे प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करणार आहोत.

## ३.१ प्रस्तावना

प्राचीन काळी सभेचे विभाजन झालेले नव्हतं. सद्यकाळात सरकारच्या कार्यात वाढ झालेली आहे. तसेच जनतेच्या प्रति सरकारचे उत्तरदायित्त्व यामुळे कार्यानुसार शासनाच्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तीन शाखा निर्माण झाल्या. प्रस्तुत प्रकरणामध्ये कार्यकारी मंडळ या शाखेचा सविस्तर अभ्यास करणार आहोत. कायदेमंडळांनी केलेल्या कायद्याची कार्य पालनासंबंधी व अंमलबजावणीसंबंधी कार्यरत असणाऱ्या व्यवस्थेला कार्यकारी मंडळ असे म्हणतात. सर्वसाधारणपणे पाहिले असता असे दिसून येते की, राज्य ही एक अमूर्त संकल्पना आहे. राज्याचे स्वरूप ज्या संस्थेतर्फे प्रगट होते, त्या संस्थेला शासन संस्था असे म्हणतात.

## ३.२ विषय विवेचन

## ३.२.१ संसदीय कार्यकारी मंडळ

### अर्थ :-

राज्याच्या (देशांच्या) ज्या इच्छा कायदे अगर विधिनियम ज्या स्वरूपात प्रकट झाल्या असतील त्याची अंमलबजावणी करणे आणि राज्याचे ध्येय प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करणे हे कार्यकारी मंडळाला म्हणजेच शासनाच्या कार्यकारी विभागाला करावे लागते.

कार्यकारी मंडळ या शब्दाचा वापर दोन अर्थांनी केला जातो, तो पुढीलप्रमाणे :-

**१. व्यापक अर्थ :** राज्याच्या कार्यकारी मंडळात राज्यकारभारासंबंधी, तसेच प्रशासनासंबंधी असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. यामध्ये राज्याचा वास्तविक प्रमुख, मंत्रीमंडळ, प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी या सर्वांचा समावेश होतो.

**२. संकुचित अर्थ :** राज्याचा प्रमुख, त्याचे सल्लागार, मंत्री, निरनिराळ्या विभागाचे प्रमुख यांचा समावेश होतो. जे लोक किंवा अधिकारी राजकीय व्यवस्थेमध्ये धोरण निर्मिती व त्या धोरणाच्या

अंमलबजावणीसाठी जबाबदार असतात त्यांचा समावेश होतो. थोडक्यात, व्यापक अर्थी कार्यकारी मंडळात राज्यप्रमुख, मंत्रीमंडळ आणि शासनवर्ग ह्या सर्वांचा समावेश होतो. तर संकुचित दृष्टीने विचार केला असता राज्यप्रमुख आणि त्याचे मंत्रीमंडळ यांचाच कार्यकारी मंडळात समावेश केला जातो. यावरून असे म्हणता येईल की, कार्यकारी मंडळाचा विचार मर्यादित अर्थाने होतो.

## ❀ व्याख्या :-

### १. लॉ पालेम्बरो-

''धोरण निर्मिती कार्याशी संबंधित आणि निश्चित केलेल्या धोरणांच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असलेली संस्था म्हणजे कार्यकारी मंडळ होय.''

### २. रॉय मॅक्रिडिस-

''राजकीय समाजाच्या शासन कारभारासाठी औपचारिक उत्तरदायित्व पार पाडणारी संस्थागत व्यवस्था म्हणजे कार्यकारी मंडळ होय.''

थोडक्यात असे म्हणता येईल की, धोरण निर्मिती कार्याशी संबंधित आणि निर्धारित केलेल्या धोरणाच्या अंमलबजावणीला जबाबदार असणारी व्यवस्था किंवा संस्था म्हणजे कार्यकारी मंडळ होय. सर्वसाधारणपणे कार्यकारी मंडळाचा विचार मर्यादित अर्थाने केला जातो.

## ❒ कार्यकारी मंडळाचे स्वरूप

कार्यकारी मंडळाचे स्वरूप पाहताना जगातील विभिन्न राजकीय व्यवस्थांचा अभ्यास करावा लागतो. कार्यकारी मंडळ किंवा कार्यकारी पालिका याचे तीन प्रकार पडतात.

### १. नामधारी किंवा नाममात्र कार्यकारी प्रमुख आणि वास्तविक कार्यकारी प्रमुख :-

सामान्यपणे कार्यकारी मंडळाच्या प्रमुखाला जी सभा प्राप्त होते, त्यावरून नाममात्र प्रमुख किंवा वास्तविक प्रमुख असा प्रकार पडतो. संविधानात्मकदृष्ट्या हा राज्याचा/राष्ट्राचा सर्वोच्च प्रमुख असतो. त्याच्याच नावाने संपूर्ण देशाचा राज्यकारभार चालतो. प्रत्यक्षात त्याच्या अधिकाराचा वापर कायदे मंडळाला जबाबदार असणारे मंत्रिमंडळच करीत असते. म्हणजेच वास्तविक प्रमुख हा दर्जा मंत्रिमंडळालाच मिळत असतो. उदा. भारताच्या राष्ट्रपतींना अनेक अधिकार असले तरी ते पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या म्हणजेच कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानेच वापरत असतात. इंग्लंडच्या राज्यप्रमुखाला म्हणजे राजा/राणी यांनासुद्धा मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यकारभार करावा लागतो. याचाच अर्थ भारतात व इंग्लंडमध्ये वास्तविक सत्ता मंत्रिमंडळाच्याच हाती असते.

## २. एकसत्ताक व अनेकसत्ताक कार्यकारी मंडळे :–

अमेरिकन संघराज्यामध्ये कार्यकारी सत्ता अध्यक्षाच्या हातात केंद्रित झालेली असते. देशाच्या राज्यकारभाराच्या सोयीसाठी अध्यक्ष आपल्या विश्वासातील लोकांना खातेप्रमुख म्हणून निवडतो व तो खातेप्रमुख अध्यक्षाला जबाबदार राहून कार्य करीत असतो. त्यांना स्वतंत्र स्थान नसते. एकसत्ताक कार्यकारी मंडळामध्ये सर्वसत्ता एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रीत झालेली असते.

अनेकसत्ताक कार्यकारी मंडळामध्ये कार्यकारी सत्तेची वाटणी अनेक व्यक्ती किंवा व्यक्तीसमूहाच्या मध्ये झालेली असते. स्वित्झर्लंड या देशात अशी व्यवस्था चालू असल्याचे आपल्याला दिसते. पूर्वीच्या काळी अनेक व्यक्तीच्या हाती कार्यकारी सत्ता असलेली कार्यकारी मंडळ स्थापन झालेली होती.

## ३. संसदीय कार्यकारी मंडळ आणि अध्यक्षीय कार्यकारी मंडळ :–

जगामध्ये सर्वप्रथम संसदीय शासन पद्धतीची सुरुवात इंग्लंडमध्ये झाली. १९४७ नंतर भारतानेही संसदीय शासन पद्धतीचा स्विकार केलेला आहे. इंग्लंडमध्ये राजा/राणी आणि भारतात राष्ट्रपती जरी घटनात्मक प्रमुख असले तरी खरी वास्तविक सत्ता पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ म्हणजेच कार्यकारी.मंडळ वापरत असते. जोपर्यंत कायदेमंडळाचा विश्वास कार्यकारी मंडळावर असतो, तोपर्यंत मंत्रिमंडळ (कार्यकारी मंडळ) अधिकारावर राहते. कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला जबाबदार राहून कार्य करीत असते.

अध्यक्षीय शासन पद्धतीत अध्यक्ष हा सार्वत्रिक निवडणुकीने विशिष्ट कार्यकालाकरिता निवडून दिलेला असतो. अध्यक्ष हाच खरा वास्तविक प्रमुख असतो. देशाचा राज्यकारभार चालविण्यासाठी तो त्याला योग्य वाटेल त्याला व आपल्या जवळच्या व्यक्तीला खातेप्रमुख म्हणून नेमणूक करीत असतो. राष्ट्राध्यक्षाने खातेप्रमुख केलेल्या व्यक्ती त्याला जबाबदार असतात. त्यामुळे अध्यक्षीय शासन पध्दतीत कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला जबाबदार राहत नाही. कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ यांची अधिकार क्षेत्रे वेगवेगळी असतात.

## ४. स्वित्झर्लंडचे मंडलात्मक कार्यकारी मंडळ :–

संसदीय व अध्यक्षीय शासनपध्दतीचे गुणविशेष एकत्र आणण्याचा प्रयत्न स्वित्झर्लंडच्या मंडलात्मक कार्यकारी मंडळात केला आहे. जगातील कोणत्याही देशात अशी मंडलात्मक पद्धती अस्तित्वात नाही. या पध्दतीत अध्यक्षीय व संसदीय शासन व्यवस्थेचा सुंदर मिलाफ झाला आहे. स्वित्झर्लंडच्या संघराज्याचे कौन्सिल ज्या विशिष्ट कालावधीसाठी निवडलेले असते तोपर्यंत ते पदावर राहते. म्हणून ते अध्यक्षीय शासन पध्दतीशी साम्य आहे. तसेच मंडलात्मक कार्यकारी मंडळ, संसदीय शासन व्यवस्थेप्रमाणे कायदे मंडळाने निवडून दिलेले असते. पण ते बरखास्त करण्याचे अधिकार कायदेमंडळाला नसतात. या अर्थाने हे कार्यकारी मंडळ संसदीय शासन व्यवस्थेशी साम्य वाटते. स्वित्झर्लंडच्या कार्यकारी मंडळात

सात सदस्य असतात. त्यांची निवड चार वर्षांसाठी करण्यात येते. या सात सदस्यातूनच एकाची निवड सभापती म्हणून एक महिनासाठी होते. परंतु लागोपाठ दोन वेळा सभापती होता येत नाही. निवडलेला सभापती हाच संघराज्याचा अध्यक्ष या नात्याने कार्य करतो. तोच संघराज्याचा अध्यक्ष असतो. कार्यकारी मंडळातील सातही सदस्यांना सभापती होण्याची संधी मिळते. स्वित्झर्लडच्या कार्यकारी मंडळाची सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे सभापती म्हणजे अमेरिकेच्या अध्यक्षाप्रमाणे प्रमुख नसून त्याची सत्ता मंडळातील इतर सहा सदस्याप्रमाणेच असते.

प्रथमदर्शनी स्वित्झर्लंडचे कार्यकारी मंडळ संसदीय वाटते. कारण या मंडळातील सदस्य सामान्यत: विधिमंडळाचे सदस्य असतात. पण कार्यकारी मंडळावर निवड झाली की, कायदेमंडळाचा राजीनामा द्यावा लागतो. हे कार्यकारी मंडळ पक्षीय राजकारणापासून अलिप्त असते. स्वित्झर्लंडचे कार्यकारी मंडळ जगातील सर्वात स्थिर मंत्रिमंडळ म्हणून ओळखले जाते. तसेच कार्यकारी मंडळाला निवडण्याचे स्वातंत्र्य कायदेमंडळाला असले तरी बरखास्त करण्याचे स्वातंत्र्य नाही. शांतता व सुव्यवस्था राखणे आणि परराष्ट्रीय संबंध सांभाळणे, अंदाजपत्रक तयार करणे व शासक वर्गाची नेमणूक करणे, प्रशासक न्यायदानाचे कार्य काही प्रमाणात करणे इ. कार्ये या कार्यकारी मंडळाला करावी लागतात.

### ५. सोव्हिएट रशियाचे कार्यकारी मंडळ :–

रशियातील प्रशासनाला केंद्रबिंदू म्हणजे रशियन मंत्रिमंडळ होय. या मंत्रिमंडळाला रशियाचे सरकार असे म्हणतात. भारत व इंग्लंड या देशातील मंत्रिमंडळाप्रमाणे त्याचे स्वरूप थोडेफार साम्य आहे. सोव्हिएट रशियाचे कार्यकारी मंडळ या राष्ट्रांशी काही बाबतीत जुळणारे असले तरी त्याचे स्वरूप संसदीय व अध्यक्षीय शासन व्यवस्थेसारखे नाही. परंतु मंत्रिमंडळ सांघिक कायदेमंडळाला जबाबदार आहे. म्हणून जबाबदारीचे तत्त्व संविधानात अंतर्भुत करून संविधान निर्मात्यांनी संसदीय लोकशाहीचा आभास निर्माण केला आहे. मंत्र्याची निवड तत्त्वत: जरी सुप्रीम सोव्हिएट करीत असले तरी प्रत्यक्षात कम्युनिस्ट पक्षाच्या प्रिसिडियमने त्यांची निश्चिती केलेली असते. या देशाने स्विकारलेल्या विचारसरणीमुळे, नियोजित अर्थव्यवस्थेमुळे व हुकूमशाही शासनपध्दतीमुळे या राष्ट्रातील कार्यकारी मंडळाचे स्वरूप जगातील इतर कार्यकारी मंडळापेक्षा भिन्न आहे. या कार्यकारी मंडळाला सर्व विभागांच्या कार्याचे संकलन व संयोजन करणे, राष्ट्राची नियोजित व्यवस्था व अंदाजपत्रकाप्रमाणे कार्य करणे, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था सांभाळणे, परकीय संबंधावर देखरेख ठेवणे इत्यादी कार्ये करावी लागतात.

## ❐ कार्यकारी मंडळाची कार्ये व भूमिका

पूर्वीच्या काळी शांतता आणि संरक्षण एवढे क्षेत्र शासनाचे मर्यादित होते. नंतर जगातील अनेक देशांनी कल्याणकारी राज्याचा स्विकार केला तर सध्या जागतिकीकरणामुळे कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. शासन संस्थेच्या जबाबदाऱ्या आणि कार्यक्षेत्र यात सतत वाढ होत आहे.

परिणामी, कार्यकारी मंडळाच्या कामांची निश्चिती करता येत नाही. तरीही कार्यकारी मंडळाच्या कामांची विभागणी सर्वसाधारणपणे घटनात्मक कार्ये व राजकीय कार्ये अशी दोन विभागात केली जाते.

## (I) घटनात्मक कार्ये :-

आधुनिक काळामध्ये जगातील सर्व देशांनी संविधानाचा स्विकार केलेला आहे. त्यामुळे संविधानात नमूद केलेल्या किंवा लिखित केलेल्या कार्याचा समावेश घटनात्मक कार्ये म्हणून उल्लेख केला जातो. अशा प्रकारची कार्ये पुढीलप्रमाणे :-

### १. कायदेविषयक कार्य :-

जगातील बहुतेक सर्व राष्ट्रातील कार्यकारी विभागाला कायदेमंडळाच्या क्षेत्रात थोडीफार सत्ता दिलेली असते. सत्ता किती प्रमाणात कार्यकारी मंडळाला मिळू शकेल हे शासनसंस्थेच्या प्रकारावर अवलंबून आहे. संसदीय शासन पध्दतीमध्ये कायदेमडळ व कार्यकारी मंडळ यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध असतात. कारण कायदे मंडळामध्ये ज्या राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होते. त्या राजकीय पक्षाच्या नेत्याला पंतप्रधानपदी राष्ट्रप्रमुखाकडून नेमले जातो व तो पंतप्रधानपदी नेमणूक झाल्यानंतर आपले मंत्रिमंडळ मिर्नाण करतो. त्यामुळेच कायदे मंडळाचे अधिवेशन बोलवणे, स्थगित करणे, कायदेमंडळ बरखास्त करणे, नवीन निवडणूका घडवून आणणे इ. अधिकार कार्यकारी मंडळाला दिलेले असतात. सर्व महत्त्वाची विधेयके कार्यकारी मंडळाकडून मांडली जातात आणि ती मंजूर करून घेण्याची व्यवस्था कार्यकारी मंडळाकडून होते.

अध्यक्षीय शासन व्यवस्थेमध्ये सत्ता विभाजन तत्त्वाचा स्विकार केल्यामुळे कार्यकारी मंडळाला मोठ्या प्रमाणात कायदेविषयक कार्ये करावी लागत नाहीत. या पध्दतीत कायदेमंडळाचे अधिवेशन कधी सुरू होणार हे निश्चित केलेले असल्यामुळे कार्यकारी मंडळाला अधिवेशन भरवण्याचा अधिकार राहत नाही. अध्यक्षीय पद्धतीत कार्यकारी प्रमुखाला कायदेमंडळातच प्रत्यक्षरित्या विधेयके मांडता येत नाहीत. मात्र कायदेमंडळामार्फत कायदे करू द्यावे लागतात. अमेरिकन कार्यकारी प्रमुखाला नकाराधिकार वापरता येतो.

### २. आर्थिक अधिकार :-

आधुनिक काळामध्ये पैशाची गरज मोठ्या प्रमाणात भासू लागली. सामाजिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगती ही उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या दृष्टीने उत्पन्न मिळविणे व खर्च करणे ही कार्ये शासनाला करावी लागतात. अर्थविभागाकडे ही जबाबदारी सोपविलेली असते. त्यामुळे नियोजन करणे, आर्थिक योजनाचे संचालन करणे, देशाचे अंदाजपत्रक तयार करणे, कायदे मंडळाकडून अंदाजपत्रकास मान्यता घेणे व मंजूर झालेल्या अंदाजपत्रकाची अंमलबजावणी करणे ही महत्त्वाची कार्ये कार्यकारी मंडळाला करावी लागतात.

## ३. न्यायालयीन कार्ये :-

राष्ट्राच्या कार्यकारी प्रमुखाला न्यायालयीन क्षेत्रात काही अधिकार देणे आवश्यक असते. व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी व संविधानाच्या रक्षणासाठी न्यायमंडळ महत्त्वाचे असले तरीही मानवतेच्या दृष्टिकोनातून कार्यकारी प्रमुखाला काही न्यायालयीन अधिकार देणे आवश्यक आहे. न्यायाधिशांपुढे आलेल्या सबळ पुराव्यावरूनच न्यायाधिश कायद्यानुसार निकाल देत असतो. सर्वोच्च शासक या नात्याने अपराध्याची शिक्षा कमी करणे, न्यायाधिशाची नियुक्तीकरणे, सरकारी कर्मचारी व नागरिक यांच्यातील संघर्ष मिटविण्याचे कार्य करणे, राजकीय बंदी, क्रांतिकारी आंदोलनात काम करणाऱ्या व्यक्तीना क्षमादान करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळालाच असतो.

## ४. अंतर्गत राज्यकारभार :-

राष्ट्रांतर्गत राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी मंडळावर असते. शांतता व सुव्यवस्था ठेवणे आणि कायदेमंडळाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करणे ही कार्ये कार्यकारी मंडळाला करावी लागतात. राष्ट्रांतर्गत संपूर्ण प्रशासनावर नियंत्रण ठेवणे, प्रशासनाला आदेश देणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, प्रशासनाच्या विविध विभागामध्ये समन्वय साधणे, या सर्व कार्यासाठी कार्यकारी मंडळ मतदार (जनता) राजकीय पक्ष व कायदेमंडळ यांच्या प्रती जबाबदार असते. अमेरिकेत अध्यक्षाला वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्याचा अधिकार असला तरी अशा नेमणुकांना सिनेटची मान्यता घ्यावी लागते.

## ५. संरक्षण आणि युद्ध :-

सद्यस्थितीत परिस्थितीमध्ये विचारसरणीच्या संघर्षामुळे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. देशाची भौगोलिक एकता टिकवून परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे ही कामे मुख्यत: कार्यकारी प्रमुखाला आणि कार्यकारी मंडळाला करावी लागतात. संरक्षणाच्या दृष्टीने राष्ट्र सुसज्ज असणे आवश्यक असल्यामुळे सैन्य, शस्त्रे आणि युद्धसामग्री ह्या बाबतीत सतत कार्यकारी मंडळ जागरूक असणे आवश्यक असते. कार्यपालिकेचा अध्यक्ष हा राज्याचा सरसेनापती असतो. त्यामुळे वरिष्ठ सैन्याधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, प्रसंगी पदावरून दूर करणे इ. कार्ये करावी लागतात. युध्द काळात आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेवून अनेक नियंत्रणे आणि निर्बंध घालण्याची सत्ता कार्यकारी प्रमुखाला दिली जाते. संरक्षणाच्या दृष्टिकोणातून कार्यकारी मंडळ सतत आपली अधिकाराची क्षेत्र वाढवीत असतात.

## ६. परराष्ट्र धोरणाचे कार्य :-

आधुनिक काळामध्ये प्रत्येक राष्ट्राचे परावलंबित्व वाढत चालले आहे. आपल्या देशाचे इतर देशाशी व्यापारी, सांस्कृतिक व आर्थिक संबंध प्रस्थापित करण्याचे कार्य कार्यकारी मंडळाला करावे

लागते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या देशाचे परराष्ट्र धारेण आखणे व त्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य कार्यकारी मंडळाला करावे लागते.

## (II) कार्यकारी मंडळाची राजकीय कार्ये :-

कार्यकारी मंडळाला ज्या प्रकारे संविधानात्मक कार्ये करावी लागतात त्याचप्रमाणे त्याला राजकीय कार्येही पुढीलप्रमाणे करावी लागतात.

### १. नेतृत्त्वाचे कार्य :-

राजकीय पक्ष, दबाव गट, सामाजिक संस्था यामुळे कार्यकारी मंडळाच्या नेतृत्त्वाला खूप महत्त्व प्राप्त झालेले आहे. कार्यकारी मंडळाला संघटित करणे, कामकाजाविषयी निर्णय घेणे, घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करणे, घेतलेल्या निर्णयास लोकमताचा व प्रतिनिधीचा पाठिंबा प्राप्त करून घेणे, नियोजनाची व्यवस्थित अंमलबजावणी करणे इ. राजकीय कार्ये कार्यकारी मंडळातील नेतृत्वाला करावी लागतात.

### २. जबाबदारी व उत्तरदायित्वाचे कार्य :-

कार्यकारी मंडळ घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी नोकरवर्गाद्वारे करते. या निर्णयाची अंमलबजावणीसाठी शासकीय नोकरदार वर्ग जनतेला आणि कायदेमंडळाला जबाबदार नसतो व उत्तरदायित्व ही स्विकारत नसतो. त्यासाठी नोकरशाहीमध्ये कार्यपालिकाच जनतेला आणि कायदेमंडळाला जबाबदार असते. जगातील कोणत्याही देशातील कार्यकारी मंडळाचे अस्तित्व निर्णयावरच आधारित असते. कार्यकारी मंडळ आपल्या कार्यासाठी कायदेमंडळालाच जबाबदार राहून कार्य करते. आधुनिक काळामध्ये प्रत्येक कार्यासाठी कार्यकारी मंडळाला जबाबदार धरले जाते.

### ३. प्रतिनिधीत्वाचे व एकात्मीकरणाचे कार्य :-

जनता आणि शासन यांच्यामध्ये प्रभावी व समझोत्याचे संबंध निर्माण करण्याचे कार्य कार्यकारी मंडळाला करावे लागते. राजकीय व्यवस्थेमध्ये असलेले विभक्त संस्थातंर्गत व्यवस्थामध्ये संयोजन आणि एकात्मीकरण करणे. अशा अनेक पध्दतीने कार्यकारी मंडळ हे राजकीय व्यवस्थेला एकात्म करण्याचे व सामाजिक हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करण्याचे कार्य करते.

### ४. वैचारिक मंथन व विचार निर्णयाचे कार्य :-

कार्यकारी मंडळाला निर्णय घेण्यापूर्वी विचारविनिमय करावा लागतो. त्यासाठी विविध विषयाची माहिती गोळा करणे, सूचनांचे संचालन करणे इत्यादी कार्ये वैचारिकपूर्वक करावी लागतात. त्यासाठी कार्यकारी मंडळ विविध खात्यावर व विभागावर नियंत्रण ठेवून त्यांना आदेश व मार्गदर्शन करीत असते.

### (III) इतर कार्ये :-

आधुनिक काळात कार्यकारी मंडळाचे कार्यक्षेत्र आणि महत्त्व वाढत चालले असल्यामुळे वरील कार्यांबरोबरच इतर अनेक कार्ये कार्यकारी मंडळाला करावी लागतात. समाजाची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी आणि जागतिकीकरणामध्ये नियोजनबद्ध आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी दिवसेंदिवस कार्यकारी मंडळाला नवनवीन जबाबदाऱ्या स्विकाराव्या लागत आहेत. जगातील कोणत्याही देशामध्ये कोणतीही शासन व्यवस्था असो, अकस्मितपणे संकटे उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा संकटांचा यशस्वीपणे मुकाबला करण्यासाठी संविधानानुसार कार्यकारी मंडळाला संकटकालीन अधिकार दिलेले असतात.

## * स्वयं-अध्ययन प्रश्न-१ *

❑ **रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. कार्यकारी मंडळाच्या प्रमुखाला जी सत्ता प्राप्त होते, त्यावरून ............ व ............. असे कार्यकारी प्रमुखाचे प्रकार पडतात.

२. ............... संघराज्यामध्ये कार्यकारी सत्ता अध्यक्षाच्या हातात केंद्रीत झालेली आहे.

३. जगामध्ये सर्वप्रथम संसदीय शासन पद्धतीची सुरुवात ............. देशात सुरू झाली.

४. स्वित्झर्लंडच्या 'मंडलात्मक कार्यकारी मंडळात' ............. व ............ शासनपध्दतीचा गुणविशेष एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे.

५. रशियन मंत्रिमंडळाला रशियाचे ........... म्हणतात.

६. संविधानात तरतूद केलेल्या किंवा लिखित केलेल्या कार्याचा समावेश ................. कार्ये म्हणून उल्लेख केला जातो.

७. जनता आणि शासन यांच्यामध्ये प्रभावी व समझोत्याचे संबंध निर्माण करण्याचे कार्य ............... ला करावे लागते.

## ❑ कार्यकारी मंडळाचे प्रकार

(अ) संसदीय कार्यकारी मंडळ.

(ब) अध्यक्षीय कार्यकारी मंडळ.

विविध व्यवस्थांमध्ये प्रत्यक्ष कार्यरत असणारा घटक म्हणजे कार्यकारी मंडळ होय. या कार्यकारी मंडळाचे अनेक प्रकार पडतात, परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये संसदीय कार्यकारी मंडळ आणि अध्यक्षीय कार्यकारी मंडळ यांचा सविस्तर अभ्यास पुढीलप्रमाणे :-

## (अ) संसदीय शासन पद्धती/व्यवस्था :-

ज्या शासनव्यवस्थेमध्ये कार्यकारी मंडळ कायदे मंडळाला जबाबदार धरून राज्यकारभार करते किंवा चालवते त्यास संसदीय शासन पध्दती असे म्हणतात. या शासन पद्धतीत मंत्रिमंडळ हे वास्तविक कार्यकारी मंडळ असते. संसदीय कार्यकारी पालिकेची निर्मिती कायदे मंडळाकडून होत असली तरी पण तिचा कालावधी कायदेमंडळाच्या मर्जीवर असतो. या पध्दतीला जबाबदार शासन पद्धती असेही म्हणतात. लोकशाही शासन पद्धतीत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्या परस्परसंबंधातून संसदीय शासन पद्धतीचा उदय झाला. संसदीय शासन पद्धतीचा उदय हा इंग्लंड या देशात झाला. म्हणून इंग्लंडला संसदीय शासन पद्धतीची जननी असे म्हणतात. तसेच इंग्लंडची संसदीय शासन पद्धती ही जगातील सर्वात जुनी पद्धती आहे.

संसदीय शासन पद्धतीत सत्ताधीश हा वास्तविक व नामधारी किंवा नाममात्र असतो. इंग्लंडमध्ये राजा हा नामधारी सत्ता प्रमुख असतो. भारत व इटली या देशात राष्ट्रपती किंवा अध्यक्ष हा नामधारी प्रमुख असतो. संसदीय शासनपद्धतीत सत्तेची सर्व सूत्रे कायदेमंडळाला जबाबदार असलेल्या पंतप्रधान व मंत्रिमंडळाकडे असते. भारत, फ्रान्स व इटली या देशामध्ये मंत्रिमंडळाला घटनात्मक स्थान आहे. भारत व इटली या देशामध्ये राष्ट्रपती हा निर्वाचित असतो. मात्र त्याची सत्ता नाममात्र असते. भारतात संविधानामध्ये सर्व सत्ता राष्ट्रपतीच्या हाती असली तरी तिचा वापर पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ करीत असते. भारतातील मंत्रिमंडळ संसदेला (कायदे मंडळाला) जबाबदार राहून कार्य करते. संसदीय शासन पद्धतीत सत्ता विभागणीच्या तत्त्वानुसार कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांचे कार्य परस्परावलंबी असल्यामुळे या दोन्हीमध्ये सुसंवाद असतो. मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्री हा कायदेमंडळाचा सदस्य असतो. मंत्रिमंडळ हे कायदे मंडळाला जबाबदार असते.

### ❐ संसदीय शासन पद्धतीची वैशिष्ट्ये :-

### १. घटनात्मक स्थान परंतु नामधारी प्रमुख :-

संसदीय शासन पद्धतीमध्ये घटनात्मक सत्ता प्रमुख हा इंग्लंडमध्ये राजा किंवा राणी असते तर भारतात राष्ट्रपती हा असतो. परंतु खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात सत्ता ही पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ वास्तविकपणे पहात असते. त्यामुळे संसदीय शासन पध्दतीत घटनात्मक प्रमुख व वास्तविक प्रमुख अशी

विभागणी पहावयास मिळते. राजा व राष्ट्रपती हे पंतप्रधान व मंत्रिमंडळ यांच्या सल्ल्याप्रमाणे कार्य करीत असतात.

### २. सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व :-

संसदीय शासनपध्दतीमध्ये सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वाला खूप महत्त्व आहे. इंग्लंड व भारत या राष्ट्रांच्या संसदेचे ठळक वैशिष्ट्ये म्हणून सामुदायिक जबाबदारीचे तत्त्वाला खूप महत्त्व असते. भारतात मंत्रिमंडळ हे कायदे मंडळाला त्याच्या सर्व कायदेशीर व कार्यकारी कृत्यांसाठी जबाबदार असते. ही जबाबदारी सांघिक स्वरूपाची असते. कायदेमंडळाच्या विश्वासाच्या आधारावर मंत्रिमंडळ अस्तित्वात येते व कार्यरत राहते.

### ३. कायदेमंडळाचा सदस्य :-

मंत्रिमंडळ म्हणजे कायदेमंडळाची एक समिती असते. मंत्रिमंडळातील प्रत्येक खात्याचा मंत्री संसदेच्या दोन्हीपैकी एका सभागृहाचा सदस्य असतो. जर नियुक्त केलेला एखादा मंत्री संसदेचा सदस्य नसेल तर त्याला सहा महिन्याच्या पूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहापैकी कोणत्याही एका सभागृहाचे सदस्यत्व प्राप्त करावे लागते. अन्यथा मंत्रीपद रद्द होते.

### ४. पंतप्रधानाचे नेतृत्त्व श्रेष्ठ :-

संसदीय शासन पध्दतीत पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा प्रमुख नेता असून तो त्याच्या राजकीय पक्षाचा ही नेता असतो. पंतप्रधान हा जनतेचा खरा नेता असतो. मंत्रिमंडळाच्या बैठका घेवून मंत्र्यांना सूचना व मार्गदर्शन करून नियंत्रण ठेवणे हे पंतप्रधानाचे प्रमुख कार्य असते. यामुळेच पंतप्रधानाचे नेतृत्व संसदीय शासन पद्धतीत श्रेष्ठ मानले जाते.

### ५. संसद सार्वभौम :-

संसदीय शासन पध्दतीत संसद सार्वभौम असते. कारण कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा अधिकार आहे. भारत व इंग्लंड या देशांमध्ये संसदीय शासन पद्धती असून संसद ही सार्वभौम असते. संसदेने केलेल्या कायद्याविरोधात कोणत्याही व्यक्तीला व संस्थेला सर्वोच्च न्यायालयात जाता येत नाही.

### ६. विरोधी पक्ष :-

लोकशाही व्यवस्था लोकांच्या सहमतीतून आणि विरोधी पक्षाच्या टिकेतून चालत असते. संसदीय शासन व्यवस्थेमध्ये बहुमत असलेला राजकीय पक्ष सत्ताधारी बनतो तर पराभूत राजकीय पक्ष प्रभावीपणे सत्ताधारी राजकीय पक्षावर नियंत्रण ठेवतो. याचाच अर्थ सत्तारूढ पक्षावर अंकुश ठेवण्याचे कार्य विरोधी

पक्ष करीत असतो. परंतु सक्षम असे नियंत्रण ठेवण्यासाठी शक्तीशाली विरोधी पक्ष असणे गरजेचे असते. अलीकडच्या काळामध्ये इंग्लंड व भारत या देशामध्ये आघाडी सरकारे स्थापन झालेली पहावयास मिळते.

### ७. कनिष्ठ सभागृहाचे विसर्जन :-

संसदीय शासनव्यवस्थेमध्ये मंत्रिमंडळ कनिष्ठ सभागृहाला जबाबदार असते असे असले तरी काही वेळा कायदेमंडळ (पार्लमेंट) व कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) यांच्यामध्ये संघर्षाचे प्रसंग ओढवतात. या संघर्षामुळे कनिष्ठ सभागृह बरखास्त करून तेथे नव्याने निवडणूका घेतल्या जातात. भारतात पंतप्रधान राष्ट्रपतीला विनंती करून तर इंग्लंडमध्ये पंतप्रधान राजाला विनंती करून कनिष्ठ सभागृह विसर्जित करण्यात येते.

## ❒ संसदीय शासन पद्धतीचे गुण व दोष :-

### ❁ गुण :-

### १. सुसंवाद :-

संसदीय शासन पद्धतीत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण होत असतो. कार्यकारी मंडळाचे तोंड पूर्वेस तर कायदेमंडळाचे तोंड पश्चिमेस होत नाही. कारण मंत्रिमंडळ हे संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्यामधून निवडलेले असते. तसेच कनिष्ठ सभागृहाचा जोपर्यंत मंत्रिमंडळावर विश्वास असतो तोपर्यंतच मंत्रिमंडळ व पंतप्रधान (कार्यकारी मंडळ) सत्तेवर राहते. जर कनिष्ठ सभागृहाने अविश्वास व्यक्त केला तर मंत्रिमंडळ व पंतप्रधान पायउतार होतात. या कारणामुळे कार्यकारी मंडळ व संसद यांच्यामध्ये सुसंवाद नेहमीच असतो.

### २. लोकशाहीचा सर्वोत्कृष्ठ अविष्कार :-

कायदेमंडळाचे सातत्याने व परिणामकारकपणे कार्यकारी मंडळावर नियंत्रण असते. त्यामुळे जनतेच्या सार्वभौमत्वाचे तत्त्व प्रत्यक्षात संसदीय शासन पध्दतीत आणले जाते. म्हणून लोकशाहीचा सर्वोत्कृष्ट अविष्कार संसदीय शासन पद्धतीत प्रत्ययाला येतो. कनिष्ठ सभागृहातील सदस्य हे प्रत्यक्ष जनतेतून निवडून येतात, त्यामुळे या सदस्यांनी आपल्या कर्तव्यात किंवा कार्यात चुकारपणा व बेजबाबदारपणा केला असता पुन्हा निवडून येण्याची शक्यता फारच कमी असते. विरोधी पक्षाच्या अस्तित्वामुळे हे कार्य पार पाडले जाते. विरोधी पक्षाच्या विरोधामुळे सत्ताधारी पक्षाला आपल्या कार्यातील चुकांची दुरुस्ती करता येते.

### ३. राजकीय शिक्षण :-

लोकांच्या राजकीय शिक्षणाच्या उद्देशाने संसदीय शासन पद्धती महत्त्वाची भूमिका बजावते. कारण सत्ताप्राप्तीबरोबरच मिळवलेली सत्ता टिकवण्यासाठी जनतेची नेहमीच अनुकूलता आवश्यक असते. लोकमत विरोधात गेल्यास बहुमत असून देखील एखाद्या मंत्र्याला किंवा संपूर्ण मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. उदा. १९६२ साली चीनच्या आक्रमणानंतर संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांना भारतीय जनतेच्या टिकेमुळे आपले मंत्रिपद गमवावे लागले.

### ४. परिवर्तनशीलता :-

परिवर्तनशीलता या तत्त्वामुळे परिस्थितीनुसार नेतृत्वात व राजकीय पक्षाच्या सत्तेत बदल घडून आणता येतो. हा बदल किंवा परिवर्तन हे लोकशाहीच्या मार्गाने निवडणूकीच्या माध्यमातून करता येते. परिवर्तन हा लोकशाहीचा गाभा आहे. उदा. २०१४ साली भारतीय जनतेने ६५ वर्षे सत्ता उपभोगलेल्या काँग्रेस पक्षाला नाकारून त्याऐवजी भाजपाच्या आघाडीला बहुमताने निवडून दिले. तर दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी आवश्यकता भासल्यामुळे इंग्लंडचे नेतृत्व चेम्बरलेन ऐवजी विस्टन चर्चिलकडे आले. याचाच अर्थ राजकीय पक्ष व नेतृत्व लोकमताचा आदर करतात. यामुळेच संसदीय शासन पद्धतीचा राज्यकारभार हा लोकाभिमुख व परिवर्तनशीलपणे चालत असतो.

### ५. संकट काळात व आणीबाणीच्या कालखंडात उपयुक्त :-

संकटकाळात किंवा आणीबाणीच्या काळात राष्ट्राची संपूर्ण सत्ता राजा किंवा राष्ट्रपतीच्या नेतृत्वाखाली पंतप्रधानाकडे एकवटलेली असते किंवा केंद्रित झालेली असते. जर पंतप्रधान हा कार्यक्षम व कर्तबगार असेल तर देशाच्या संरक्षणाचे निर्णय चांगल्या पद्धतीने घेता येतात. उदा. १९६५ साली पाकिस्तानच्या आक्रमणावेळी भारताचे नेतृत्व सक्षम नेतृत्व असणाऱ्या लालबहादूरशास्त्री यांच्याकडे होते. त्यामुळेच भारत या युद्धात विजयी झाला.

## दोष :-

### १. सत्ताविभागणीच्या तत्त्वाला हरताळ :-

कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांची सुत्रे मंत्रिमंडळाकडे असणे म्हणजे माँटेस्क्यूने म्हटल्याप्रमाणे अत्याचारी व जुलमी राजवटीला आमंत्रण देण्यासारखे आहे. याचाच अर्थ सत्ताविभागणीच्या तत्त्वाला हरताळ होय. कार्यकारी मंडळाचा बहुतांश वेळ हा कायदेमंडळाला उत्तरे देण्यात, कायदे तयार करण्यात खर्ची पडतो. त्यामुळे मुख्य कार्य बाजूला राहून कायदेमंडळ परराष्ट्र धोरणासारख्या विषयात हस्तक्षेप करीत असते. परिणामी, दोन्ही मंडळाची कार्यक्षमता कमी होते. मंत्रिमंडळाकडे कायदे करण्याचे व

कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य असल्यामुळे मंत्रिमंडळ व पंतप्रधान हुकूमशाही वृत्तीने वागतात. हे लोकशाहीच्या विकासासाठी घातक आहे.

### २. शासनव्यवस्था अस्थिर बनते :-

संसदीय शासन व्यवस्थेमध्ये मंत्रिमंडळाची सत्ता किंवा कार्य हे कायदे मंडळाच्या अनुकूलतेवर अवलंबून असते. म्हणजेच मंत्रिमंडळाचा कार्यकाल हा कायदेमंडळाच्या विश्वासावर अवलंबून असतो. परिणामी, शासनव्यवस्था अस्थिर बनते. बहुमत कायम राहील याची शाश्वती मंत्रिमंडळाला नसते, त्यामुळे मंत्रिमंडळ दूरगामी योजना हाती घेवू शकत नाही. परिणामी, तात्पुरत्या उपाययोजना आखून आपली खुर्ची बळकट करण्याकडे मंत्रिमंडळाचा कल असतो. उदा. अनेक पक्षपद्धती असणाऱ्या देशामध्ये हा दोष आढळून येतो.

### ३. दूषित दृष्टिकोणातून विरोधी पक्षाचे कार्य :-

संसदीय शासन पध्दतीमध्ये सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष अस्तित्त्वात असतात. विरोधी पक्ष हा सत्ताधारी पक्षाच्या लोकोपयोगी योजनांना व कल्याणकारी कार्याना विरोध करतो. कारण त्या आपल्या नाहीत. त्यामुळे प्रत्येक प्रश्नाचा विचार हा दूषित दृष्टिकोणातून होतो. विरोधी पक्षाच्या या हेतूमुळे राष्ट्राचे नुकसान होऊन विकासास खिळ बसते.

### ४. नवशिक्या व बिगरअनुभवी व्यक्तीच्या हाती सत्ता :-

पंतप्रधान मंत्रिमंडळातील सहकार्याची निवड करताना अनुभवी व खात्याचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तीची निवड करतो. परंतु पंतप्रधान आपली खुर्ची बळकट करण्यासाठी मंत्र्याच्या अनुभवापेक्षा व पात्रतेपेक्षा त्याचे पक्षसंघटनेतील स्थान व अशा व्यक्तीला मंत्रिमंडळ न घेतल्यास संभाव्य परिणामास सामारे जावे लागते. याच विचाराने मंत्रिमंडळाची निर्मिती होय. मंत्र्यांना कायदेमंडळातील कार्यामुळे, राजकीय उलाढालीमुळे स्वत:च्या खात्याकडे लक्ष देण्यास फारसा वेळ मिळणे कठीण असते, त्यामुळे अधिकारी वर्गांच्या हातचे बाहुले बनण्याची वेळ अनेक मंत्र्यावर येते.

### ५. संकट काळात निर्णय त्वरित घेता येत नाही :-

संकट कळात व युद्ध काळात त्वरित निर्णय घ्यावे लागतात. संसदीय शासन पद्धतीत निर्णय घेण्यास व कायदे करण्यास बराच काळ लागतो. कारण चर्चा करणे, विचारविनिमय होऊन निर्णय घेण्यासाठी खूप कालावधी लागतो. उदा. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये त्वरित निर्णय घेता आले नाहीत. खऱ्या अर्थाने कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ यांच्यामध्ये सुसंवाद साधून निर्णय घेतले जातात. सद्यकालीन परिस्थितीमध्ये आघाडी सरकारे अस्तित्वात असल्यामुळे अनेक

राजकीय पक्षामध्ये सत्तेसाठी एकजिनसीपणा व सहकार्याची भावना संपुष्टात आली. परिणामी निर्णय घेताना विलंब होतो.

वरील वेगवेगळ्या प्रकारे संसदीय शासन पध्दतीत गुण–दोष असलेले पहावयास मिळतात. इंग्लंड व भारत या देशामध्ये संसदीय शासन पध्दती अधिक स्थिर व भक्कम झालेली दिसते. भारताच्या व इंग्लंडच्या संसदीय शासन पद्धतीत काही बाबतीत फरक असलेला दिसतो. संसदीय शासन पद्धतीत काही बाबतीत फरक असलेला दिसतो. इंग्लंडच्या नागरिकांनी मतदानाचा अधिकार भारतातील नागरिकांपेक्षा उत्तम प्रकारे वापरलेला दिसतो. भारतात निवडणुकीच्यावेळी मोठ्या प्रमाणात पैशाचा वारेमाप खर्च केला जातो. साम, दाम, दंड आणि धार्मिक भेद अशा गैरमार्गाचा वापर करून निवडणूका जिंकल्या जातात. भारतातील निवडणूक आयोगाने अनेक प्रकारच्या सुधारणा करून व उपाययोजना आखून वरील दोष दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यामुळे भविष्य काळात भारतातील निवडणूका अधिक पारदर्शी होऊन संसदीय शासन पद्धती स्थिर व भक्कम होईल अशी अपेक्षा. वरील प्रकारचे दोष हे अनेक पक्षांची संमिश्र मंत्रिमंडळे असलेल्या देशात होऊ शकतात. परंतु एकाच पक्षाचे बहुमत असेल तर वरील गुण हे संसदीय शासन पद्धती असलेल्या मंत्रिमंडळात दिसून येतात.

## ३.२.२ अध्यक्षीय कार्यकारी मंडळ

ज्या शासन पद्धतीत कार्यकारी मंडळ कायदे मंडळाला जबाबदार राहत नाही, तर ते स्वतंत्रपणे राज्यकारभार करते, त्याला अध्यक्षीय शासन पद्धती असे म्हणतात. अध्यक्ष किंवा कार्यकारी प्रमुख हा निश्चित काळासाठी निवडला जातो. या व्यवस्थेमध्ये माँटेस्क्यूचा सत्ता विभाजनाचा सिद्धांत स्विकारलेला असतो. कार्यकारी प्रमुख हा कायदेमंडळाला जबाबदार नसतो. उदा. अमेरिकन अध्यक्ष व अध्यक्षीय शासन पद्धती, कार्यकारी मंडळ आपले धोरण आणि त्याची अंमलबजावणी याबाबत स्वतंत्रपणे कार्य करू शकतो. अध्यक्ष निश्चित कालावधीसाठी अधिकारपदावर राहून स्वत:च्या धोरणाप्रमाणे राज्यकारभार करू शकतो. त्यासाठी तो निरनिराळ्या खात्यांचे मंत्री नेमतो अथवा प्रसंगी मंत्र्याला पदावरून काढून टाकतो. अध्यक्ष हा मंत्र्याची नेमणूक करताना आपल्या विश्वासातील किंवा पक्षातील कार्यकर्त्याला नेमतो. मंत्री हा अध्यक्षाला जबाबदार असतो. तो कायदे मंडळाला जबाबदार नसतो, तसेच ते कायदे मंडळाचे सदस्य नसतात. मंत्र्यांना कायदे मंडळात हजर राहण्याचा अथवा भाषण करण्याचा अधिकार नसतो. कायदे मंडळात बहुमत असलेल्या पक्षातील अध्यक्ष आणि त्याचे मंत्री असणे आवश्यक नसते. बऱ्याचवेळा अध्यक्ष एक पक्षाचा व कायदे मंडळात बहुमत दुसऱ्या पक्षाचे असते. अध्यक्षीय शासन पद्धतीत कायदे मंडळ व अध्यक्ष यांच्या धोरणात विरोधाभास असू शकतो. अध्यक्षीय पध्दतीत मंत्र्यांना विधेयके कायदे मंडळासमोर मांडण्याची आवश्यकता नसते. या पद्धतीत कायदे मंडळातील सदस्यच विधेयके कायदे मंडळापुढे मांडतात व मंजूर करून घेतात. अध्यक्ष किंवा त्यांच्या मंत्र्यास विशिष्ट विधयके मंजूर करून

घ्यावयाचे असेल तर कायदे मंडळाच्या सदस्यामार्फत मांडावे लागते. अध्यक्षाचे एखादे धोरण कायदे मंडळाने अमान्य केले तरी त्याला आपल्या पदाचा राजीनामा घ्यावा लागत नाही. अध्यक्षीय शासन पद्धतीत मंत्री हे कायदे मंडळाचे सदस्य नसूनसुद्धा आपल्या खात्याचे शासनप्रमुख असतात. कार्यकारी मंडळ कायदे मंडळापासून स्वतंत्र असते. अध्यक्षांची निवडणूकीची पध्दत, मुदत आणि विशिष्ट अधिकार संविधानात नमूद केलेले असतात.

## ❐ अध्यक्षीय शासन पद्धतीची वैशिष्ट्ये –

### १. राष्ट्राध्यक्ष हाच घटनात्मक व वास्तववादी प्रमुख :–

अध्यक्षीय शासन पद्धतीमध्ये राष्ट्राध्यक्ष हा वास्तववादी सत्ता प्रमुख घटनात्मक (संविधानात्मक) प्रमुख असतो. अधिकाराची सर्वसूत्रे त्याच्या हाती असल्यामुळे तो विशिष्ट कार्यासंबंधी तत्काळ निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करू शकतो. अध्यक्षाचा कायदेमंडळाशी काहीही संबंध नसतो व आपल्या कार्याच्या बाबतीत जनतेला जबाबदार असतो. कायदेमंडळाला जबाबदार नसतो.

### २. आणीबाणीच्या किंवा युध्दाच्या परिस्थितीत उपयुक्त :–

अध्यक्षीय शासन पद्धतीत अध्यक्षपद किंवा कार्यकारी मंडळ आणीबाणीच्या किंवा युद्धाच्या परिस्थितीत उपयुक्त ठरते. कारण संकटकाळी त्वरित निर्णय घेवून त्यांची अंमलबजावणी पद्धतशीरपणे होणे आवश्यक असते. अध्यक्षाकडेच सर्व अंतिम अधिकार असल्यामुळे धोरण आखून ताबडतोब निर्णय घेऊ शकतो. अशा धोरणांना व निर्णयांना कायदेमंडळाची मान्यता घ्यावी लागत नाही.

### ३. निश्चित कार्यकाल :–

अध्यक्षीय शासन पद्धतीमध्ये कार्यकारी प्रमुखाचा कार्यकाल हा निश्चित असतो. त्यामुळे अध्यक्षाना कार्यक्षमता, जलद गती व एकसूत्रीपणाने कार्य करता येते. त्यासाठी कायदे मंडळातील बहुमताची गरज भासत नसते. अध्यक्षाच्या अधिकाराची एक विशिष्ट मुदत नियोजित केलेली असते. त्यामुळे त्या मुदतीत अध्यक्ष आपल्या योजना पार पाडून राज्यकारभारात विशिष्ट प्रथा निर्माण करू शकतो. कायदे मंडळातील बहुमताची गरज नसल्यामुळे योजना अर्धवट सोडण्याची भिती नसते. उदा. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष.

### ४. सत्ताविभाजनाच्या तत्त्वाचा स्विकार :–

अध्यक्षीय शासन पद्धतीत सत्ताविभाजनाचे तत्त्व स्विकारलेले असते. त्यामुळे शासनाचे तिन्ही विभाग–कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ स्वतंत्रपणे कार्य करीत असतात.

वरील तिन्ही विभाग स्वतंत्रपणे कार्य करीत असले तरी या विभागाकडून सत्तेचा गैरवापर होऊ नये म्हणून नियंत्रण व समतोल हे तत्त्व स्विकारले आहे. कायदे मंडळाने व अध्यक्षाने घटनाविरोधी कार्य किंवा कायदा केल्यास कायद्याची वैधता तपासण्याचे कार्य न्यायमंडळ करीत असते. थोडक्यात तिन्ही विभाग परस्परांच्या कार्यावर नियंत्रण ठेवून सत्तेत समतोल साधण्याचा प्रयत्न करतात.

### ५. कार्यकारी प्रमुख जनतेला जबाबदार असतो :–

अध्यक्षीय शासन पद्धतीत कार्यकारी प्रमुख हा राष्ट्राध्यक्ष असतो. तो कायदे मंडळाला आपल्या कार्यासंबंधी जबाबदार नसतो. तर तो जनतेला जबाबदार असतो. अध्यक्ष हा अप्रत्यक्षपणे जनतेतून निवडून आलेला असतो. उदा. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष.

### ६. राष्ट्राध्यक्ष हा सामर्थ्यशाली व प्रभावी नेता असतो :–

अध्यक्षीय शासन पद्धतीत राष्ट्राध्यक्षाला निश्चित कालावधी असतो. तो कायदेमंडळाला जबाबदार नसतो. त्यामुळे तो आपले कार्य प्रभावीपणे पार पाडतो. या कारणामुळे अध्यक्ष हा सामर्थ्यशाली असतो. पक्षनेतृत्व व राष्ट्राचा नेता यामुळे अध्यक्षाकडे प्रभावी सत्ता प्राप्त होते. कधी–कधी तो हुकूमशहा बनण्याचा धोका असतो. उदा. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष.

## ❑ अध्यक्षीय शासन पद्धतीचे गुणदोष :–

### ❁ गुण :–

### १. सत्तासंतुलन :–

अध्यक्षीय शासन पद्धतीत सत्ता विभाजनाचे तत्त्व स्विकारल्यामुळे कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ व न्याय मंडळ हे तिन्ही विभाग स्वतंत्र कार्य करीत असतात. त्यामुळे एकमेकांच्या कार्यात हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. कारण या तिनही विभागाच्या कार्याची विभागणी संविधानानुसार झालेली असते. तसेच वरील तीनही विभागापैकी कोणताही एक विभाग शक्तीशाली होऊ नये. म्हणून नियंत्रण व सत्तासंतुलन पध्दतीचा स्विकार केलेला असतो. उदा. अमेरिकन अध्यक्षीय पद्धत.

### २. प्रभावी, कार्यक्षम व स्थिर शासन :–

अध्यक्षीय शासन पद्धतीमध्ये कार्यकारी प्रमुख हा राष्ट्राध्यक्ष असतो. राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल निश्चित केल्यामुळे कार्यकाल संपेपर्यंत तो आपल्या पदावर राहतो किंवा काढून टाकता येत नाही. त्यामुळे त्याने आखलेल्या योजना व ध्येयधोरणे त्याला आपल्या कालावधीमध्ये पूर्ण करता येतात. कार्य

करण्यासाठी त्याला कायदे मंडळावर विसंबून राहावे लागत नाही. परिणामी, स्थिर, प्रभावी व कार्यक्षम शासन बनवण्यास अध्यक्षाला अडचणी येत नाहीत. आपल्या कार्यासाठी तो कायदे मंडळाला जबाबदार न राहता जनतेला जबाबदार राहतो.

### ३. आणीबाणीच्या किंवा संकटकालात त्वरित निर्णय घेता येतात :-

अध्यक्षीय शासन पद्धतीत राष्ट्राध्यक्ष स्वतंत्रपणे निर्णय घेऊन पटकन कृती करू शकतो. आणीबाणीच्या व संकटाच्यावेळी अध्यक्ष त्वरित निर्णय घेऊन कृती करतो. उदा. पहिल्या महायुद्धाच्यावेळी अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी व दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी रूझवेल्ट यांनी त्वरित व महत्त्वपूर्ण निर्णय घेतले होते. परंतु संसदीय शासन पद्धतीत असे निर्णय त्वरित घेता येत नाहीत.

### ४. अध्यक्षीय पद्धती बहुपक्ष पद्धतीमध्ये उपयुक्त ठरते :-

अध्यक्षीय शासन पध्दतीत बहुपक्षपध्दतीचा कोणताही वाईट परिणाम होत नाही. कारण राष्ट्राध्यक्ष हा जनतेतून अप्रत्यक्षपणे निश्चित काळासाठी निवडून गेलेला असतो. त्यामुळे बहुपक्षपध्दती मधील कोणत्याही राजकीय पक्षाच्या अस्तित्वाचा परिणाम होत नाही. कारण अस्थिर शासनाचा प्रश्नच उद्भवत नाही. संसदीय शासन व्यवस्थेमध्ये यांचा विपरित परिणाम होतो. कारण मिश्र पक्षाचे सरकार अस्थिर बनते.

### ५. शासनात व प्रशासनात कार्यक्षम आणि पात्र व्यक्तीची नियुक्ती :-

अध्यक्षीय शासन पध्दतीमध्ये अध्यक्ष आपल्या इच्छेप्रमाणे शासनात आपल्या जवळची हुशार व पात्र व्यक्तीची मंत्री म्हणून निवड करतो. विरोधी पक्षातील नेत्यालाही तो आपल्या कार्यकारी मंडळात मंत्री करू शकतो. तसेच प्रशासनातही पात्र व हुशार व्यक्तीची अधिकारी म्हणून निवड करू शकतो. कारण शासनावर व प्रशासनावर अध्यक्षाचे संपूर्ण नियंत्रण असते. उदा. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष त्याच्या मनाप्रमाणे पात्र व कार्यक्षम व्यक्तीची सचिव व मंत्री म्हणून निवड करू शकतो.

### दोष :-

### १. कार्यकारी प्रमुख व कायदेमंडळ यामध्ये सुसंवाद नाही :-

राष्ट्राध्यक्ष एक राजकीय पक्षाचा (कार्यकारी प्रमुख) व कायदेमंडळात बहुमत दुसऱ्या राजकीय पक्षाचे असेल तर त्यांच्यातील संघर्ष निर्माण होतो. काही संघर्षामध्ये राष्ट्राध्यक्ष व्हेटो पावरचा वापर करून कायदेमंडळाला विरोध करतो. त्यामुळे कार्यकारी प्रमुख व कायदेमंडळ यांच्यामध्ये सुसंवाद साधला जात नाही. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी हा संघर्ष वाईट आहे.

## २. हुकूमशाही प्रवृत्ती :-

अध्यक्षीय शासन पद्धतीत अध्यक्षाचा कार्यकाल हा निश्चित असल्यामुळे त्याला कार्य करीत असताना कोणाचीही भिती नसते. तो आपल्या मनाप्रमाणे कार्य व निर्णय घेऊ शकतो. या तरतुदीमुळे राष्ट्राध्यक्ष हुकूमशाही वृत्तीने वागण्याची शक्यता असते किंवा नाकारता येत नाही. अध्यक्षाने घेतलेल्या निर्णयाला कायदेमंडळाची पूर्वसहमती नसते. उदा. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष.

## ३. राष्ट्राध्यक्ष सर्वश्रेष्ठ किंवा प्रभावशाली :-

अध्यक्षीय शासन पद्धतीत राष्ट्राध्यक्ष हा सर्वश्रेष्ठ व प्रभावशाली असतो. मंत्रिमंडळ हे राष्ट्राध्यक्षाने निर्माण केलेले असते. कायदेमंडळाला तो जबाबदार नसतो. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष हा सर्वोच्च प्रमुख बनतो. इतर घटकांना दुय्यम दर्जा असतो.

## ४. लहान राष्ट्रांना अध्यक्षीय शासन पध्दती उपयुक्त नसते :-

अध्यक्षीय शासन पध्दती मोठ्या राष्ट्रांना उपयुक्त ठरते. कारण लहान राष्ट्रांनी ही शासन पध्दती स्विकारली असता राष्ट्राध्यक्ष हा हुकूमशहा प्रमाणे वागू शकतो. कायदे मंडळाचे मत विचारात न घेता राष्ट्राध्यक्ष निर्णय घेतो. अशा प्रसंगी जनमताला डावलले जाते. त्यामुळे अध्यक्षीय शासन पध्दती मोठ्या राष्ट्रामध्ये उपयुक्त ठरते. अमेरिकेत अध्यक्षीय पध्दत उपयुक्त आहे तर पाकिस्तानमध्ये ही पध्दती निरूपयोगी बनली आहे.

## ५. सत्ता विभाजन काटेकोरपणे पाळले जात नाही :-

कायदे निर्मिती व त्याची अंमलबजावणी आणि न्यायमंडळ यांच्यामध्ये सुसंवाद साधला जात नाही. याचे कारण कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ व न्यायमंडळ एकमेकांना सहकार्याची भूमिका घेत नाहीत. परंतु विरोध मात्र एकमेकांना करताना दिसतात. परिणामी, राष्ट्राच्या विकासाला चालना मिळत नाही. याच कारणास्तव अमेरिकेत 'नियंत्रण व संतुलन' या पध्दतीचा अवलंब केला आहे. एकदा अध्यक्षाला निवडून दिला म्हणजे त्याची मुदत संपेपर्यंत राष्ट्राला त्याच्या कारभाराशिवाय दुसरा मार्गच उरत नाही.

अमेरिकेचा अपवाद वगळल्यास इतर राष्ट्रात अध्यक्षीय शासन पध्दती यशस्वी झालेली दिसत नाही, कारण या पध्दतीचे रूपांतर छुप्या व उघड हुकूमशाहीत झालेले दिसते. उदा. पाकिस्तान. तुलनेने संसदीय शासन पध्दती इंग्लंडखेरीज इतर राष्ट्रात जास्त यशस्वी झालेली आहे. उदा. भारत.

## ✲ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ✲

❑ **खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. संसदीय शासन पध्दतीची दोन वैशिष्ट्ये सांगा?

२. संसदीय शासन पध्दतीचे दोन गुण सांगा?

३. संसदीय शासन पध्दतीची दोन दोष सांगा?

४. अध्यक्षीय शासन पध्दतीची दोन वैशिष्ट्ये सांगा?

५. अध्यक्षीय शासन पध्दतीचे दोन गुण सांगा?

६. अध्यक्षीय शासन पध्दतीची दोन दोष सांगा?

## ३.२.३ न्यायमंडळ

पूर्वीच्या काळी राजा कायदा करीत त्याची अंमलबजावणी व न्यायदानाचे कार्यही तोच करित असे. काळाच्या ओघामध्ये राजेशाही व्यवस्था बंद होऊन त्याच्या ठिकाणी आधुनिक शासन संस्था निर्माण झाल्या. ज्याला आपण लोकशाही शासन व्यवस्था असे म्हणतो. ॲरिस्टॉटलच्या काळापासून शासन व्यवस्थेमध्ये आधारभूत घटक किंवा अंग म्हणून न्यायपालिकेचा उल्लेख करण्यात आला. शासन संस्थेच्या कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या घटकाशिवाय लोकशाही शासन संस्था चालवणे अशक्य आहे. त्यामुळेच न्यायमंडळाचे राजकीय व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. नि:पक्षी, नि:स्वार्थी आणि स्वतंत्र न्यायदान करण्यासाठी प्राचीन काळापासून आजअखेर न्यायव्यवस्थेला खूपच महत्त्वाचे स्थान आहे.

❑ **व्याख्या :-**

**१. हॅरॉल लास्की :-**

''कायद्याचा स्पष्ट अर्थ लावणारी व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला कायद्यानुसार दंड करणारी संस्थागत व्यवस्था म्हणजे न्यायालय होय.''

**२. पीटर मार्क :-**

''समाजातील प्रस्थापित कायद्यापासून निर्माण होणाऱ्या सर्वच प्रकारच्या विवादांचे समाधानकारक

उत्तर देणारी किंवा त्यासंबंधी समाधानकारक असा निर्णय देणारी संस्थागत यंत्रणा म्हणजे न्यायालय होय.''

लोकशाही शासन व्यवस्थेत कायद्याला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. व्यक्तीच्या व्यक्ती विकासासाठी व्यक्तीला विविध प्रकारची स्वातंत्र्ये दिली जातात. व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण करणे हे न्याय मंडळाचे कार्य आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्याची संविधानात तरतूद केलेली आहे. त्यामुळे संविधानाचे व संविधानातील तरतुदीचे रक्षण करणे हे न्यायमंडळाचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. यासाठीच न्यायमंडळाची निर्मिती झालेली अहे.

## ❒ न्यायमंडळाचे प्रकार :-

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये न्यायमंडळे स्वतंत्र असतात. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा प्रभाव संपूर्ण राज्यव्यवस्थेवर पडतो, असे असले तरी न्यायमंडळाचे दोन प्रकार असलेले पहावयास मिळतात.

### १. एकेरी न्यायव्यवस्था :-

एकेरी न्यायव्यवस्था म्हणजे 'सर्वोच्च न्यायमंडळाच्या जागी सुप्रिम कोर्ट व त्याच्या नियंत्रणाखाली घटकराज्यातील उच्च न्यायालये आणि उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली घटकराज्यातील दुय्यम न्यायालये अशी न्यायमंडळाची एकेरी रचना केलेली असते.' या रचनेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय हे इतर न्यायालयासाठी अंतिम असतात. उदा. इंग्लंड, भारत या देशामध्ये एकेरी न्यायव्यवस्था अस्तित्वात आहे. इंग्लंडची न्यायव्यवस्था ही जगात आदर्श न्यायव्यवस्था मानली जाते. स्वतंत्र व नि:पक्षपाती न्यायसंस्था म्हणून ब्रिटिश न्यायमंडळ हे जगातील इतर न्यायसंस्थांना मार्गदर्शक ठरलेले आहे. मनोऱ्यासारखी न्याय व्यवस्था असते.

### २. दुहेरी न्यायव्यवस्था :-

दुहेरी न्यायव्यवस्था म्हणजे 'संघराज्याच्या ठिकाणी संघराज्य न्यायालय आणि घटक राज्याच्या ठिकाणी घटकराज्य न्यायालय' अशी न्यायदान व्यवस्था दोन प्रकारची असते. संघराज्याच्या संविधानानुसार संघराज्याचे न्यायालय तयार झालेले असते. तर घटकराज्याच्या संविधानानुसार घटक राज्यातील न्यायालय तयार झालेले असते.' उदा. अमेरिकन संघराज्याला दुहेरी न्यायव्यवस्था स्विकारलेले आहे.

वरील दोन प्रकारची न्यायमंडळे असलेली आपणास पहावयास मिळतात. परंतु एकरी न्यायव्यवस्था असलेली न्यायमंडळे जगामध्ये सर्वात जास्त असलेली दिसतात. अमेरिकेमध्ये दोन स्वतंत्र न्यायव्यवस्था असताना दिसतात. एक म्हणजे संघराज्याचे न्यायालय व दुसरे घटक राज्यांची न्यायालये. एकात्म शासन

संस्थेमध्ये अशा दुहेरी न्यायव्यवस्थेत मान्यता मिळत नाही. परंतु संघराज्य पद्धतीमध्ये अशा दुहेरी न्यायव्यवस्थेस मान्यता मिळते. अर्थात या बाबी ज्या-त्या सरकारवर अवलंबून असतात. भारतात एकेरी न्यायव्यवस्था स्विकारलेली आहे. अमेरिकन संविधान निर्मात्यांना या दोन स्वतंत्र न्याय व्यवस्था असाव्यात असे वाटले असावे.

## ❑ न्यायमंडळाची कार्ये व भूमिका :-

राजकीय प्रणालीचे स्वरूप, संविधानाची प्रवृत्ती, राजकीय सत्तेची संरचनात्मकता, न्यायपालिकेचे.संघटन, न्यायपालिकेची शक्ती व अधिकार या घटकांवरती न्यायमंडळाची कार्ये अवलंबून असतात. आधुनिक काळात न्यायमंडळाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले असल्यामुळे त्याच्या कार्यात ही प्रचंड वाढ झालेली असल्यामुळे त्याला पुढील वेगवेगळ्या प्रकारची कार्ये व भूमिका पार पाडाव्या लागतात.

### १. न्यायालयीन समीक्षा आणि संविधानातील तरतुदींचा अर्थ व व्याख्या करणे :-

न्यायमंडळ कायद्याची समीक्षा करत असते. कायद्याची समीक्षा करणे त्याचा अर्थ लावणे हे महत्त्वाचे कार्य न्यायमंडळाला करावे लागते. तसेच संविधानातील तरतुदींचा अर्थ व व्याख्या करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य न्यायमंडळाला करावे लागते. पण न्यायमंडळाच्या अधिकार क्षेत्रात असे स्पष्टपणे नमूद केले असेल तरच वरील प्रकारचे कार्य न्यायमंडळाला करावे लागते अन्यथा नाही.

### २. कायद्याचे राज्य निर्माण करणे :-

न्यायालयांनी संविधानातील तरतुदीनुसार किंवा कायदे मंडळाने केलेल्या कायद्याशी एकनिष्ठ राहून अन्याय, अत्याचार व दडपशाही राज्यकारभाराला पायबंद घातला पाहिजे तरच कायद्याचे राज्य निर्माण होईल आणि जनतेचे स्वातंत्र्य टिकून राहिल.

### ३. राजकीय व्यवस्था मजबूत करणे :-

राजकीय व्यवस्थेमध्ये अनेक संघर्ष, मतभेद व दबावाचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे संस्थांना व व्यक्तीला त्याचे अधिकार मिळणे कठीण होते. अशा कठीण व संघर्षाच्या काळात न्यायमंडळ निर्णय देऊन व्यक्ती व संस्था यांच्या अधिकाराचे संरक्षण करते आणि राजकीय व्यवस्था बळकट व मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील असते.

### ४. व्यक्तीच्या हक्कांचे व अधिकारांचे रक्षण करणे :-

आधुनिक काळामध्ये राज्याच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे

व्यक्तीच्या हक्कांवर व अधिकारांवर मोठ्या प्रमाणात गंडातर येत आहे. कोणत्याही राजकीय व्यवस्थेची यशस्विता ही त्या व्यवस्थेमध्ये व्यक्तीला न्याय केव्हा व कसा मिळतो, यावर अवलंबून असते. या अनुषंगाने व्यक्तीचे अधिकार जर सुरक्षित राहत असतील तर व्यक्तीला राजकीय प्रक्रियेत सहभागी होता येते. संविधानाने व्यक्तीला दिलेल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे कार्य न्यायमंडळ करीत असते. व्यक्तीच्या अधिकारावर, व्यक्तीकडून, संस्थेकडून व शासनाकडून आक्रमण होणार नाही किंवा होत असले तर न्यायमंडळ व्यक्तीचे संरक्षण करते.

### ५. लोकशाहीचे संवर्धन व प्रगती :-

व्यक्ती विकास आणि लोकशाहीची प्रगती होण्याकरिता कार्यक्षम, नि:पक्षपाती अणि स्वतंत्र अशा न्यायमंडळाची आवश्यकता असते. ही भूमिका व कार्य न्यायमंडळ करीत असते. न्यायमंडळाच्या या भूमिकेमुळेच लोकशाहीचे संवर्धन व प्रगती होते.

### ६. अंमलबजावणीचे कार्य :-

कायदेमंडळाकडून कायदे केले जातात आणि कार्यकारी मंडळाकडून त्याची अंमलबजावणी होत असते. पण कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते किंवा नाही हे पाहणे आणि त्यासंबंधी वाद/ संघर्ष निर्माण झाल्यास त्या बाबतीत निर्णय देणे ही कार्ये न्यायमंडळ करीत असते.

### ७. पुनर्निर्णय देणे :-

एखाद्या खटल्याच्या बाबतीत कालांतराने काही पुरावे उपलब्ध झाले तर त्याचा पुन्हा विचार करून प्रथम दिलेल्या निर्णयावर पुनर्निणय न्यायमंडळ घेऊ शकते.

### ८. सल्ला किंवा मार्गदर्शन करणे :-

एखाद्या बाबीसंबंधी कार्यपालिकेने किंवा राष्ट्रप्रमुखाने सल्ला मागितल्यास न्यायमंडळाला सल्ला किंवा मार्गदर्शन करावे लागते.

### ९. इतर कार्ये :-

संपत्तीचे विश्वस्त नेमणे, मृत व्यक्तीचा उत्तराधिकारी नेमणे, अल्पवयीन कामगारांचे संरक्षण म्हणून कार्य करणे इ. कार्ये न्यायमंडळाला पार पाडावी लागतात.

वरील वेगळ्या प्रकारची कार्ये न्यायमंडळ करीत असते. परंतु संघराज्य पध्दतीचा स्विकार केलेल्या देशातील न्यायमंडळात आणखी एक कार्य करावे लागते. संघराज्यात सत्तेची विभागणी संविधानाने केलेली

असते. त्यामुळे संघराज्य आणि घटकराज्ये किंवा दोन घटकराज्ये यांच्यात घटनेच्या अर्थासबंधी मतभेद निर्माण झाल्यास न्यायमंडळ संघर्ष सोडवण्याचे कार्य करते. तसेच बदलत्या परिस्थितीनुसार कायद्याचा अर्थ लावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य न्यायमंडळ करते.

## ❒ न्यायमंडळाचे महत्त्व

जगातील प्रत्येक राष्ट्रासाठी एक स्वतंत्र नि:पक्षी न्यायमंडळ आवश्यक आहे. शासनाच्या तीन घटकांपैकी न्यायमंडळ हा महत्त्वाचा घटक आहे. कारण सुशासन निर्माण करून नागरिकांची उन्नती करणे हे प्रत्येक सभ्य राष्ट्राचे कर्तव्य आहे. त्यासाठीच शासनसंस्था निरनिराळे कायदे करते. पण निर्माण केलेल्या कायद्याचे प्रत्येकजण पालन करतोच असे नाही. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीची चौकशी करून नि:पक्षी न्याय देणे व गुन्हेगाराला शिक्षा देणे अत्यावश्यक आहे. पूर्वीच्या काळी राजाच कायदा करीत, न्यायदानाचे कार्य व अंमलबजावणीचे कार्यही राजाच करीत असे. परंतु हळुहळू राजेशाही व्यवस्था नष्ट होऊन लोकशाही निर्माण होऊन तिच्या यशस्वीतेसाठी स्वतंत्र अशा न्यायमंडळाची स्थापना करण्यात आली. कायदे मंडळाकडून कायदे केले जातात आणि कार्यकारी मंडळाकडून त्यांची अंमलबजावणी होत असते. परंतु कायद्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते की नाही हे पाहणे आणि त्यासंबंधी वाद निर्माण झाल्यास योग्य निर्णय देणे ही कार्ये न्यायमंडळ करीत असते. कायदेमंडळाने कायदे करण्याच्यावेळी जी परिस्थिती असते ती कायमची नसते परिस्थितीत सारखे बदल होत असतात. बदललेल्या परिस्थितीत ते कायदे जसेच्या तसे लागू पडण्यासारखे नसतात. अशावेळी नितीतत्त्वे, सामाजिक परिस्थिती, व्यवहार ज्ञान इत्यादीसंदर्भात त्याच कायद्यातून वेगळा अर्थ काढून न्यायदान केले जाते. तसेच आणखी एका मार्गाने न्यायालयाकडून अप्रत्यक्षरित्या स्पष्टीकरणाच्याद्वारे कायद्याची निर्मिती न्यायमंडळाकडून होत असते. संघराज्य पध्दतीचा स्विकार केलेल्या देशांतील न्यायमंडळाला महत्त्वाचे कार्य करावे लागते. संघराज्यात सत्तेची विभागणी संविधानातील तरतुदीनुसार झालेली आहे किंवा नाही यासाठी न्यायमंडळाचे महत्त्व खूप आहे.

व्यक्तीस्वातंत्र्य आणि व्यक्तीविकास साध्य होण्यासाठी न्यायमंडळाचे स्वातंत्र्य आवश्यक आहे. कायदे मंडळाने कायदे कितीही उत्कृष्ट केले असले तरी त्या कायद्याचा अर्थ लावून निर्णय देणाऱ्या व्यक्तीच्या अंगात बुद्धीमत्ता, निर्भयता असल्याशिवाय व्यक्तीला न्याय मिळणे शक्य नसते. केवळ लोकशाही शासनपध्दतीमध्येच न्यायालयाचे महत्त्व असते असे नाही. तर कोणत्याही शासन पध्दतीत न्यायालयांना महत्त्वाचे स्थान असणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही देशाच्या किंवा व्यवस्थेच्या शासन कारभाराचे मूल्यमापन करण्याचे साधन म्हणजे न्यायालय होय. ज्या देशात स्वतंत्र, नि:पक्ष आणि सन्मानाचे स्थान न्यायपालिकेला मिळते, तेथील शासन कारभार चांगलाच असतो. संविधानातील कायद्यानुसार न्याय मिळत असल्यास व्यक्तीला मानसिक शांती मिळते व राजकीय व्यवस्थेविषयी

आत्मियता, अभिमान वाढतो. सामाजिक आर्थिक क्षेत्रामध्ये समानता प्रस्थापित करणे, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला कायद्यानुसार शिक्षा देणे, अत्याचार थांबवणे, व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण करणे, संविधानाचे संरक्षण करून संविधानाचा अर्थ स्पष्ट करणे यासारखी कार्ये न्यायमंडळाला करावी लागतात. त्यामुळे लोकशाही शासन व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

संविधानातील आक्रमण रोखणे, मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे, शासनाला स्थैर्य प्राप्त करून देणे, संविधानात योग्य बदल करणे, संविधानाला श्रेष्ठत्व मिळवून देणे, विविध संरचनामध्ये समन्वय साधणे, संविधानातील तरतुदीनुसार अल्पसंख्यांकाचे संरक्षण करणे, संघराज्य शासन पध्दतीला स्थैर्य प्राप्त करून देणे, कायदे मंडळाकडून योग्य व सुसंगत अशा कायद्यांची निर्मिती करून घेणे इ. महत्त्वपूर्ण कार्ये न्यायमंडळ करीत असते, त्यामुळे दिवसेंदिवस न्यायमंडळाचे महत्त्व वाढत चालले आहे. न्यायपालिका हे शासनाचे अंग दुहेरी भूमिका पार पाडते. एका बाजूने संविधानाचे संरक्षण करते तर दुसऱ्या बाजूने नागरिकांच्या हक्कांचे स्वातंत्र्ये अबाधित राहतील याची दक्षता न्यायमंडळ घेते, त्यामुळे आधुनिक काळात न्यायालयाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. न्यायमंडळामुळे देशाची राजकीय संस्कृती, राष्ट्रीय ऐतिहासिक परंपरा आणि सामाजिक राजकीय परिस्थिती यांचे जतन व संवर्धन करण्याचे कार्य पार पाडले जाते. या दृष्टीकोणातून ही न्यायमंडळाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ❊

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. ............. च्या काळापासून शासन व्यवस्थेमध्ये आधारभूत अंग म्हणून न्यायपालिकेचा उल्लेख राजकीय व्यवस्थेमध्ये केला जातो.

२. ................ व ................ चे संरक्षण करणे न्यायपालिकेचे कार्य आहे.

३. ................ व ................ या देशात एकेरी न्यायव्यवस्था आहे.

४. ................ या देशात दुहेरी न्यायव्यवस्था आहे.

५. संघराज्य आणि घटकराज्ये किंवा दोन घटकराज्ये यांच्यात संघर्ष निर्माण झाल्यास ............ संघर्ष सोडवते.

६. संविधानातील तरतुदीनुसार व्यक्तीला न्याय मिळत नसेल ............. व्यक्तीला न्याय मिळवून देणे.

## ३.३ सारांश

धोरण निर्मिती कार्याशी संबंधीत आणि निश्चित केलेल्या धोरणांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी मंडळाला महत्त्वपूर्ण स्थान निर्माण झालेले आहे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तीनही घटकांपैकी एक घटकाची कमतरता असेल तर तेथे लोकशाही व्यवस्था आहे असे म्हणता येणार नाही. आधुनिक काळामध्ये कायदे मंडळाच्या कार्यात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. कायदेमंडळ फक्त कायदे करण्याचे कार्य करते, परंतु त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी कार्यकारी मंडळाला करावी लागते. कार्यकारी मंडळाच्या कार्यावर संबंधित राष्ट्राचे यशापयश अवलंबून असते. कार्यकारी मंडळ जेवढे कार्यक्षम तेवढा त्या राष्ट्राचा विकास होत असतो. कार्यकारी मंडळाच्या व्यापक अर्थाने व संकुचित अर्थाने अभ्यास प्रामुख्याने केला जातो. कार्यकारी मंडळाच्या स्वरूपावरून कार्यकारी मंडळाच्या कार्याची व्याप्ती समजून येते. कार्यकारी मंडळाची कार्ये व भूमिका ह्या आधुनिक काळात महत्त्वपूर्ण ठरत आहेत. कारण कार्यकारी मंडळाच्या कार्यात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. कार्यकारी मंडळामध्ये चांगल्या नेतृत्त्वाची नितांत गरज व आवश्यकता असते. जगामध्ये प्रामुख्याने संसदीय कार्यकारी मंडळ व अध्यक्षीय कार्यकारी मंडळ असे प्रामुख्याने प्रकार पहावयास मिळतात. संसदीय कार्यकारी मंडळामध्ये प्रामुख्याने इंग्लंडच्या कार्यकारी मंडळाचा अभ्यास करावा लागतो. यामध्ये राजा, पंतप्रधान, मंत्रिमंडळ यांचा प्रामुख्याने समावेश होतो. अध्यक्षीय कार्यकारी मंडळाचा अभ्यास करावयाचे म्हटले तर त्यामध्ये अमेरिकन कार्यकारी मंडळाचा अभ्यास करावा लागतो, कारण अमेरिकेने अध्यक्षीय शासन पध्दतीचा स्विकार केला आहे. यामध्ये प्रामुख्याने अमेरिकन राष्ट्राध्यक्ष व त्याचे कार्यकारी मंडळ यांचा समावेश होतो. संसदीय शासन पध्दतीमध्ये कार्यकारी मंडळाला म्हणजेच मंत्रिमंडळाला खूप महत्त्व आहे. त्याच्या तुलनेत अध्यक्षीय शासन पध्दतीत मंत्रिमंडळाला गौण स्थान असलेले पहावयास मिळते.

लोकशाहीमध्ये कायदे मंडळ व कार्यकारी मंडळाला जसे महत्त्व आहे तसेच न्यायमंडळाला ही महत्त्व आहे, कारण शासनाचा तिसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणून न्यायमंडळाकडे पाहिले जाते किंवा ओळखले जाते. कायदेमंडळाची भूमिका आधुनिक काळामध्ये वाढलेली असल्याकारणास्तव त्यांच्या कार्यातही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे घाईगडबडीने व ताबडतोब घेतलेले निर्णय यांची अंमलबजावणी कार्यकारी मंडळ करीत असते. परंतु हे सर्व बरोबर किंवा संविधानाशी सुसंगत आहेत की नाही हे तपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य न्यायमंडळ करीत असते. पूर्वीच्या काळी राजाच कायदा करायचा व त्या कायद्याची अंमलबजावणी ही तोच करायचा आणि न्यायदानही तोच करीत असे, परंतु आधुनिक काळामध्ये लोकशाहीच्या प्रसाराबरोबरच न्यायव्यवस्थाही स्वतंत्र व नि:पक्षपाती असलेली पहावयास मिळते. त्यामुळे प्राचीन काळापासून न्यायव्यवस्थेला खूपच महत्त्व प्राप्त झालेले पहावयास मिळते. लोकशाहीमध्ये कायद्याला खूप महत्त्व प्राप्त होते. संविधानानुसार कायदे निर्माण होत असतात. त्यामुळे

कायद्याचा स्पष्ट अर्थ लावणारी व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला कायद्यानुसार दंड करणारी एकमेव संस्था ही न्यायमंडळ होय. न्यायमंडळ व्यक्तीचे स्वातंत्र्य किंवा मूलभूत अधिकार यांचे रक्षण करीत असते. जगामध्ये एकेरी न्यायव्यवस्था व दुहेरी न्यायव्यवस्था असे दोन प्रकार पहावयास मिळतात. संविधानातील तरतुदीचा अर्थ लावणे, कायद्याचे राज्य निर्माण करणे आणि व्यवस्था मजबूत करणे, व्यक्तीच्या हक्काचे व अधिकाराचे संरक्षण करणे, लोकशाहीचे संवर्धन करणे, इत्यादी महत्त्वाची कार्ये न्याय व्यवस्थेला करावी लागतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बदलत्या काळानुसार संविधानातील तरतुदीचा अर्थ लावणे व त्यानुसार कायदेनिर्मितीसाठी योगदान देणे ही महत्त्वाची कार्ये न्यायमंडळाची आहेत.

## ३.४ पारिभाषिक शब्द

- **पार्लमेंट** : ब्रिटनच्या/इंग्लंडच्या दोन्ही सभागृहांना मिळून पार्लमेंटची निर्मिती.
- **निर्वाचित** : निवडून आलेला.
- **निर्वाचन मंडळ** : अमेरिकन अध्यक्षाची निवड करणारे मतदार.
- **नामधारी** : कमी सत्ता असलेला/नावाने सत्ता दुसरी संस्था वापरते.
- **वास्तववादी** : प्रत्यक्षात शासकीय सत्ता ताब्यात असणे.
- **एकसत्ताक** : सत्ता एकाठिकाणी केंद्रित होणे.
- **अनेकसत्ताक** : सत्तेची विभागणी अनेक ठिकाणी होणे.
- **अध्यक्षीय शासन** : सर्व सत्ता अध्यक्षाच्या हाती असते.
- **संसदीय शासन** : सर्वसत्ता संसदेच्या हाती असते किंवा श्रेष्ठ असते.
- **उत्तरदायित्व** : केलेल्या कार्याची जबाबदारी स्विकारणे.

## ३.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ※ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ※

१. नामधारी आणि वास्तविक.

२. अमेरिकन.

३. इंग्लंड.

४. संसदीय व अध्यक्षीय.

५. सरकार.

६. घटनात्मक.

७. कार्यकारी मंडळाला.

## ※ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ※

१. सामुदायिक जबाबदारी व संसदेचे सार्वभौमत्त्व.

२. सुसंवाद व परिवर्तनशीलता.

३. सत्ताविभाजन तत्त्वाला हरताळ व शासन व्यवस्था अस्थिर बनतो.

४. निश्चित कार्यकाल व आणीबाणीच्या काळात उपयुक्त.

५. सत्तासंतुलन व संकट काळात त्वरित निर्णय.

६. अध्यक्षीय शासन पध्दतीत सुसंवाद नसतो व अध्यक्षाची हुकूमशाही प्रवृत्ती निर्माण होते.

## ※ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ※

१. ॲरिस्टॉटल.

२. संविधानाचे व व्यक्तीस्वातंत्र्याचे.

३. इंग्लंड व भारत.

४. अमेरिका.

५. न्यायमंडळ.

६. न्यायमंडळ.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

- **टिपा लिहा.**

 १. कार्यकारी मंडळाचा अर्थ.

 २. कार्यकारी मंडळाचे स्वरूप.

 ३. कार्यकारी मंडळाची कार्ये व अधिकार.

 ४. अध्ययक्षीय कार्यकारी मंडळाचे गुण व दोष.

 ५. न्यायमंडळाचे महत्त्व.

- **दीर्घोत्तरी प्रश्न.**

 १. कार्यकारी मंडळाचा अर्थ व स्वरूप सांगून कार्ये स्पष्ट करा.

 २. संसदीय शासनपध्दतीमधील कार्यकारी मंडळ चर्चा करा.

 ३. अध्यक्षीय शासन पद्धतीमधील कार्यकारी मंडळ चर्चा करा.

 ४. न्यायमंडळ म्हणजे काय? ते सांगून न्यायमंडळाचे प्रकार सांगा.

 ५. न्यायमंडळाची कार्ये व महत्त्व स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. Johari J. C. *"Contemporary Political Thoery"*, Sterling Publishers, Delhi, 1995.

२. Gokhale B. K., *"Political Science"*, Himalaya Publishing House, New Delhi, 1964.

३. Varma S. P., *"Modern Political Theory"*, Vikash Publication House, New Delhi, 1994.

४. गोखले आर. एम., *'आधुनिक राज्यशास्त्र भाग-३'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७२.

५. डॉ. वासंती रासम, डॉ. विजय देठे, 'तुलनात्मक शासन आणि राजकारण', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, फेब्रु. २०१४.

६. भोगले शां. कृ., *'आधुनिक राज्यशास्त्र'*, किताब महल, अलहाबाद, १९८१.

७. घांगरेकर चिं. ग. *'राज्यशास्त्रामधील मुलतत्त्वे'*, मंगेश प्रकाशन, नागपूर.

८. मुठाळ राम, 'राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण', अंशुल प्रकाशन, नागपूर, १९९७.

९. गर्दे दि. का., बाचल वि.मा., *'आधुनिक राजकीय विश्लेषण'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५.

❀ ❀ ❀

घटक–४

# निवडणूक आणि प्रतिनिधीत्व

घटक संरचना

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

४.३.१ प्रौढ मताधिकार किंवा सार्वत्रिक प्रौढ मताधिकार

४.३.२ स्त्रियांचा मताधिकार

४.३.३ प्रतिनिधीत्त्व

४.३.४ विभक्त मतदारसंघ किंवा समूहावर आधारित मतदारसंघ

४.३.५ संयुक्त मतदार संघ

४.३.६ प्रमाणशिर प्रतिनिधीत्व

४.३.७ भौगोलिक प्रतिनिधीत्त्व

४.४. स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या अध्ययन घटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील गोष्टींचे ज्ञान होईल.

१. निवडणूक म्हणजे काय? प्रौढ मताधिकार म्हणजे काय? हे समजून घेणे.

२. स्त्रियांना मतदानाचा अधिकार म्हणजे काय? मतदानाच्या पद्धती संदर्भात ज्ञानप्राप्ती होईल.

३. वरील सर्व कल्पना समाजावून सांगता येतील.

४. प्रतिनिधीत्व म्हणजे काय? मतदार संघाचे प्रकार काय असतात हे समजेल.

## ४.२ प्रस्तावना (Introduction)

आधुनिक काळातील शासकीय यंत्रणेत लोकांचे सार्वभौमत्त्व निवडणुकीच्या माध्यमातून व्यक्त होते. निवडणुकीच्या माध्यमातून शासनावरती नियंत्रण ठेवण्याचे कार्य मताधिकारातून होते.

ज्या शासकीय व्यवस्थेत लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असतो ती प्रत्यक्ष लोकशाही आधुनिक काळांमधील मोठ्या राज्यांमध्ये राबविणे शक्य नाही व त्यामुळे प्रतिनिधीक शासन व्यवस्थेचा विकास झाला. नागरिक ठराविक काळाकरिता त्यांचे प्रतिनिधी निवडणुकीच्या माध्यमातून प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये निवडतात.

निवडणूकांचे संचलन भयमुक्त, नि:पक्षपाती व न्याय्य वातावरणात होणे हे लोकशाहीमध्ये महत्त्वाचे आहे. सार्वजनिक निवडणुका कार्यक्षमतेने व काटेकोरपणे पार पडल्या नाहीत तर संपूर्ण लोकशाही संकटात सापडते व शासकीय यंत्रणा निष्प्रभ होते. (पोलॉक)

नागरिकांनी सार्वजनिक जीवन-व्यवहारांमध्ये सहभागी होणे व त्यांना राज्यव्यवस्थेबद्दल आत्मीयता वाटणे, या गोष्टी निवडणुकीमुळे शक्य होतात. निवडणुकीच्या माध्यमातून शांततामय मार्गाने व घटनात्मक मार्गाने सत्तांतर होवू शकते.

प्रत्येक लोकशाही राज्याला एक राज्यघटना असते. राज्यघटना हा त्या देशाचा सर्वोच्च कायदा असून राज्यघटना कायदेमंडळ (Legislative), कार्यकारी मंडळ (Executive) व न्यायमंडळ (Judiciary) यांचे रचना, अधिकार व कार्य स्पष्ट करते. कायदेमंडळामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ सभागृह येतात.

कार्यकारी मंडळामध्ये राष्ट्रपती व उपराष्ट्रपती तर न्यायमंडळामध्ये सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये येतात. संघराज्य शासनामध्ये राज्याचे कायदेमंडळ राज्यपाल, मुख्यमंत्री मंत्रीमंडळ व न्यायमंडळ (उच्च न्यायालय) यांचा समावेश होतो.

प्रत्येक राज्यांत कायदेमडळ व कार्यकारी मंडळाकरिता निवडणुका होतात व लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये शासनाचा कार्यभार चालवितात. कायदेमंडळ कायदे बनविण्याचे काम करते. कार्यकारी मंडळ कायद्याची अंमलबजावणी करते व न्याय मंडळ कायद्याचा अर्थ लावण्याचे कार्य करते.

प्रतिनिधींनी लोकांच्या इच्छेनुसार कार्य करायचे असते व तसे त्यांनी न केल्यास निवडणुकीच्या माध्यमातून त्यांना पराभव स्विकारावा लागतो. प्रतिनिधींना निवडण्याचे काम मतदानाच्या हक्कांमधून नागरिक करत असतात. मतदानाच्या माध्यमातून नागरिक शासनावर नियंत्रण ठेवतात. ठराविक वय पूर्ण केलेल्या (सर्वसाधारणपणे १८ वर्षे पूर्ण झालेल्या) सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळणे याला सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा अधिकार म्हणतात.

बरेच विचारवंत सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या अधिकारांवर टिका करतात. त्यांच्या मते, मतदानाचा अधिकार फक्त सक्षम नागरिकांना देण्यात यावा कारण सक्षम नसलेले नागरिक सक्षम प्रतिनिधी निवडून देवू शकत नाहीत. त्यामुळेच काही विचारवंत शिक्षित लोकांनाच मतदानाचा अधिकार द्यावा या मताचे आहेत. काही विचारवंत संपत्तीच्या आधारावर मतदानाचा अधिकार नागरिकांना द्यावा या मताचे आहेत तर काही विचारवंत स्त्रियांना मतदानाचा अधिकार देवू नये या विचाराचे आहेत. या वैचारिक मतभेदामुळे स्वित्झर्लंडसारख्या देशांत १९७० सालापर्यंत स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला नव्हता. निरनिराळ्या राजकीय विचारवंताच्या कल्पनेच्या आधारे मतदानाचे खालील प्रकार पडतात.

१. प्रौढ मताधिकार किंवा सार्वत्रिक प्रौढ मताधिकार.

२. शिक्षित मताधिकार.

३. संपत्तीच्या आधारावर मताधिकार.

४. स्त्री मताधिकार.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

### ४.३.१ प्रौढ मताधिकार किंवा सार्वत्रिक प्रौढ मताधिकार (Universal Adult Franchise)

लोकशाहीमधील महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कोणाला मतदानाचा अधिकार द्यायचा व कोणाला तो अधिकार द्यायचा नाही.

यामध्ये दोन मुख्य मते आढळतात. एक प्रवाह असे म्हणतो की, सर्व लोकांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा व तो देत असताना धर्म, जात, लिंग, रंग किंवा शिक्षण या आधारावर भेदभाव करण्यात येवू नये.

दुसरा मतप्रवाह असे म्हणतो की, मतदानाचा अधिकार ठराविक व्यक्तींनाच शिक्षण, संपत्ती या सारख्या निकषाच्या आधारे देण्यात यावा.

सार्वत्रिक प्रौढ मतदान म्हणजे सर्व प्रौढ लोकांना मतदानाचा अधिकार देणे. ज्या स्त्री व पुरुषांनी ठराविक वय पूर्ण केलेले आहे, त्या स्त्री व पुरुषांना मतदानाचा अधिकार देणे. म्हणजे सार्वत्रिक प्रौढ मताधिकार होय. मतदानाचा अधिकार देताना शिक्षण, संपत्ती इत्यादी बाबी विचारात घेतल्या जात नाहीत. अल्पवयीन मुलांना व मुलींना मतदानाचा अधिकार देण्यात येत नाही. प्रौढ मतदार ही लोकशाहीची घोषणा आहे. काही लोकशाहीमध्ये या अधिकारामुळे जवळजवळ ७०% च्या वर लोकांना हा अधिकार प्राप्त झालेला आहे.

## ❑ प्रौढ मताधिकाराचे फायदे :-

१. समानतेच्या तत्त्वावर आधारित सर्व लोकांना विकासाची संधी देणे हे प्रत्येक राज्याचे कर्तव्य आहे. प्रौढ मताधिकार या संकल्पनेमुळे प्रत्येक प्रौढ नागरिकाला शासकीय यंत्रणेत आपला सहभाग नोंदविता येतो. प्रौढ मताधिकार या संकल्पनेमुळे समानतेच्या तत्वाचे संरक्षण होते.

२. राजकीय शिक्षण या अधिकारामुळे लोकांचे राजकीय शिक्षण होते. निवडणुकीच्या काळात सर्व राजकीय पक्ष आपले जाहीरनामे प्रसिध्द करतात. तसेच आपली ध्येय-धोरणे जाहीर करतात. राजकीय नेते आपल्या जाहीर भाषणातून व निवेदनाद्वारे लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण करतात. निवडणुकीतील प्रचार व प्रसार या माध्यमातून लोकांचे राजकीय शिक्षण होते.

३. सामाजिक हक्काच्या जाणीवेकरिता राजकीय हक्क महत्त्वाचे.

४. शासकीय कामकाजात लोकांना रस निर्माण होतो.

५. सत्तेमध्ये घटनात्मक मार्गाने परिवर्तन : प्रौढ मतदानाच्या अधिकारांमुळे निवडणुकीच्या माध्यमातून शांततामय व घटनात्मक मार्गाने सत्तापरिवर्तन होते व त्यामुळे हिंसात्मक क्रांतीची शक्यता मावळते.

६. अल्पसंख्यांक लोकांना सुध्दा शासकीय यंत्रणेमध्ये प्रतिनिधीत्व मिळते.

७. **आत्मसन्मान वाढतो :** प्रत्येक प्रौढ व्यक्तीला शासकीय यंत्रणेमध्ये सहभाग घेता येतो व त्यामुळे त्यांचा आत्मसन्मान वाढतो.

### ❐ प्रौढ मताधिकाराचे तोटे :-

मिल, सर हेन्री मेन, सिडविक इत्यादी विचारवंतानी प्रौढ मताधिकारांवर टिका केलेली आहे. त्याचे काही तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सामान्य माणूस हा भाव-भावनांचा गुलाम असून तो धर्म, जात, भाषा वगैरे भावनांच्या आहारी जावून राष्ट्रीय महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो.

२. या अधिकारामुळे भ्रष्टाचार बोकाळतो, निवडणूकीत पैशाचा वारेमाप वापर होतो.

३. सामान्य माणूस हा प्रगतशील विचारांच्या विरुध्द असतो.

४. राष्ट्रीय महत्त्वाचे प्रश्न सामान्य व्यक्तीच्या आकलनाच्या पलीकडचे असतात व त्यामुळे राष्ट्राचे नुकसान होवू शकते.

५. मतदान हा हक्क नसून ते एक पवित्र कर्तव्य आहे, या संकल्पनेला मूठमाती मिळू शकते.

६. अज्ञानी व मूर्ख माणसांना मतदानाचा हक्क देणे म्हणजे राष्ट्रीय नुकसान आहे.

### ❐ सारांश :-

वरील टीका अमान्य करून आज अनेक लोकशाही देशांत प्रौढ नागरिकांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला आहे. भारतामध्ये देखील भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ (१) अन्वये प्रौढ मतदानाचा अधिकार देण्यात आलेला आहे.

## ४.३.२ स्त्रियांना मतदानाचा अधिकार

### ❐ स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा याबद्दलची कारणे :-

१. लिंगभेदाच्या माध्यमातून समानतेच्या तत्त्वाचे उल्लंघन करणे बरोबर/योग्य नाही, कारण लोकशाही व्यवस्थेत स्त्री-पुरुष समानता हे ब्रीदवाक्य आहे.

२. स्त्रिया देखील देशाच्या नागरिक असतात. त्यामुळे राजकीय प्रक्रियेत त्यांनीही सहभागी होणे अपेक्षित असते.

३. स्त्रिया या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या असल्यामुळे त्यांना या हक्काची जास्त गरज आहे.

४. सामाजिक हक्कांबरोबरच राजकीय हक्क देणे लोकशाहीकरिता महत्त्वाचे आहे.

५. स्त्रियांच्या सहभागामुळे सार्वजनिक आयुष्यात सुधारणा होतील.

## ४.३.३ प्रतिनिधीत्त्व (Representation)

(अ) प्रत्यक्ष मतदान पध्दती.

(ब) अप्रत्यक्ष मतदान पध्दती.

(क) एकत्रित मतदान.

(ड) मर्यादित मतदान पध्दती (Limited Vote System)

## ❑ प्रतिनिधीत्व म्हणजे काय?

(अ) विभक्त मतदारसंघ व संयुक्त मतदारसंघ.

(ब) प्रमाणशीर प्रतिनिधीत्व.

(क) भौगोलिक प्रतिनिधीत्व.

### (अ) प्रत्यक्ष मतदान पद्धत (Direct Voting System)

१. मतदानाची ही सर्वात सोपी पध्दत आहे. मतदार प्रत्यक्ष मतदान केंद्राच्या ठिकाणी जावून त्याच्या पसंतीच्या उमेदवाराला मत देतो.

२. निवडून आलेला उमेदवार ज्या पदाकरिता मतदान झाले ते पद धारण करतो.

३. आधुनिक लोकशाहीमध्ये ही पध्दत सर्वात लोकप्रीय आहे.

४. भारत, अमेरिका व इंग्लंडमध्ये कनिष्ठ सभागृहाच्या प्रतिनिधींची निवड या पध्दतीने होते.

### (ब) अप्रत्यक्ष मतदान पध्दत (Indirect Voting System)

१. लोकांनी निवडून दिलेल्या कायदेमंडळातील प्रतिनधींच्याकडून जेव्हा प्रतिनिधी निवडले जातात तेव्हा त्या पध्दतीला अप्रत्यक्ष मतदान पध्दत म्हणतात.

२. अप्रत्यक्ष मतदान पध्दतीत मतदार निर्वाचक गण (Electoral College) निवडतात व निर्वाचक गणांमध्ये निवडून आलेले उमेदवार हे मतदार म्हणून निवडणुकीत मतदान करतात.

३. भारतामध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यसभा या निवडणुकीमध्ये ही पध्दत वापरली जाते.

४. अमेरिकेच्या राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीची निवडणुकीकरिता हीच पद्धत वापरली जाते.

❒ **अप्रत्यक्ष मतदानाचे फायदे :-**

१. ज्या ठिकाणी मतदार राजकीयदृष्ट्या साक्षर नसतो व जे देश अविकसित किंवा विकसनशील आहेत, त्या देशांमध्ये ही पध्दत परिणामकारक आहे.

२. या पद्धतीमध्ये राजकीय पक्षांचा प्रभाव कमी असतो.

३. निर्वाचक गण (Electoral College) हा राजकीयदृष्ट्या साक्षर असू शकतो.

❒ **अप्रत्यक्ष मतदानाचे तोटे :-**

१. मतदार व प्रतिनिधी यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबंध येत नाही.

२. मतदारांचा सहभाग या पध्दतीमध्ये कमी होतो.

३. लोकशाहीच्या मूळ तत्त्वाच्याविरुध्द पध्दत.

४. शासकीय पक्ष लोकांच्या राजकीय साक्षरतेकडे दुर्लक्ष करतात.

५. या पध्दतीमध्ये भ्रष्टाचार होऊ शकतो.

६. राजकीय पक्षांमधील तीव्र स्पर्धेमुळे राजकीय पक्षांचा प्रभाव या पद्धतीमध्ये पडू शकतो. उदा. अमेरिकेमध्ये पक्षपध्दतीमुळे जरी राष्ट्रपतीची व उपराष्ट्रपतीची निवडणूक अप्रत्यक्ष असली तरी ती प्रत्यक्ष होते, कारण मतदाराला निर्वाचन गणातील प्रतिनिधी निवडताना आपण कोणत्या राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीच्या उमेदवाराला मतदान करतो ते माहित होते.

## (क) एकत्रित मतदान पध्दत

१. जेव्हा मतदारसंघातून एकच प्रतिनिधी निवडायचा असतो तेव्हा मतदाराला एकच मत देण्याचा अधिकार असतो. परंतु काही निवडणुकींमध्ये मतदाराला एकापेक्षा जास्त उमेदवार त्या

मतदारसंघातून निवडायचे असतात अशावेळी जेवढे उमेदवार निवडायचे असतात, तेवढी मते देण्याचा अधिकार त्या मतदाराला असतो व असे मतदान करताना मतदाराने त्याच्या पसंतीप्रमाणे उमेदवारांना १, २, ३ असे क्रमांक द्यावयाचे असतात.

२. या मतदान पध्दतीमध्ये मतदार आपल्या मतांचे विभाजन करू शकतो.

३. मतदार आपली सर्व मते एकाच उमेदवाराला देवू शकतो किंवा ती विभागून देवू शकतो.

४. या मतदान पध्दतीमुळे अल्पसंख्यांक लोकाना प्रतिनिधीत्व मिळू शकते व त्यांच्या हिताचे संरक्षण होवू शकते.

### (ड) मर्यादित मतदान पध्दत

१. अल्पसंख्यांक लोकांच्या हिताचे संरक्षण करण्याची ही अजून एक पध्दत आहे, जेव्हा मतदार संघातून एकापेक्षा जास्त उमेदवार निवडून द्यावयाचे असतात, तेव्हा ही पध्दत वापरता येते.

२. या पध्दतीमध्ये जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे असतात, त्यापेक्षा एक मत कमी टाकण्याचा अधिकार मतदाराला असतो. उदा. पाच उमेदवार निवडून द्यावयाचे असतील तर मतदाराला चारच मते देण्याचा अधिकार असतो.

३. यामध्ये मतदाराला एका उमेदवाराला एकच मत द्यायचा अधिकार असतो.

## ४.३.४ विभक्त मतदारसंघ किंवा समूहावर आधारित मतदार संघ

१. भारतीय समाजामध्ये भेदभाव निर्माण करण्याकरिता ब्रिटिशांनी धर्मावर आधारित मतदान पध्दत अंमलात आणली.

२. १९०९ च्या मोर्ले-मिंटो कायद्यान्वये त्यांनी मुस्लीम मतदारसंघ निर्माण केले. ज्या ठिकाणी मुस्लीम समाज बहुसंख्य होता.

३. या पध्दतीमध्ये निवडणुकीत उमेदवार म्हणून मुस्लीम प्रतिनिधींनी उमेदवारी अर्ज भरावयाचा होता व त्यांना मतदान फक्त मुस्लीम मतदारांनीच करावयाचे होते. या निवडणुकीमध्ये हिंदू, शीख इत्यादी मतदारांनी मतदान करावयाचे नव्हते.

४. याच तत्त्वानुसार ब्रिटिशांनी १९१८ साली शिख लोकांना वेगळा मतदारसंघ दिला.

### ४.३.५ संयुक्त मतदार संघ

१. १९३२ च्या रॅम्से मॅकडोनाल्ड ॲवार्डमुळे भारतामध्ये अनुसूचित जाती व जमातींना विभक्त मतदारसंघ मिळाले.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांनी ब्रिटिशांची तोडा व फोडा ही राजनिती लक्षात घेवून पुणे करार केला.

३. १९३२ च्या या पुणे करारामुळे भारतामध्ये संयुक्त मतदारसंघ अस्तित्वात आले.

४. स्वतंत्र भारतामधील विधीमंडळामध्ये २०% जागा अनुसूचित जाती व जमाती यांच्याकरिता राखीव ठेवण्याचे पुणे करारांत मान्य करण्यात आले.

५. भारतीय राज्यघटना कलम ३३० व ३३२ अन्वये अनुसूचित जाती व जमाती यांना विधीमंडळात राखीव मतदारसंघ देण्यात आले.

६. या पध्दतीमध्ये उमेदवार हा राखीव गटामधील असतो, परंतु त्याला मतदान मात्र सर्वांनीच करावयाचे असते.

७. वरील कलमान्वये लोकसभेमध्ये अनुसूचित जाती व जमातीला ७० जागा मिळाल्या व राज्यसभेत ५० जागा मिळाल्या.

८. राज्य विधीमंडळामध्येही अनुसूचित जाती व जमातींना २०% जागा राखीव म्हणून मिळाल्या.

९. लोकसभेच्या तसेच राज्य निधीमंडळाच्या भौगोलिक मतदारसंघात ठराविक मतदारसंघ राखीव म्हणून जाहीर केले जातात.

१०. या राखीव मतदारसंघातून फक्त राखीव उमेदरावांनीच अर्ज भरून निवडणूक लढवायची असते.

### ४.३.६ प्रमाणशिर प्रतिनिधीत्व

१. आधुनिक लोकशाहीमध्ये सर्वात मोठा प्रश्न म्हणजे अल्पसंख्यांक समूहाला राज्याच्या प्रशासनांमध्ये प्रतिनिधीत्व कसे द्यावयाचे हा आहे.

२. प्रत्येक लोकशाहीमध्ये अल्पसंख्यांक समूह हे असतातच. उदा. भारतामध्ये अनुसूचित जाती व जमाती, अँग्लो-इंडियन इत्यादी.

३. अल्पसंख्यांकांच्या सामाजिक, सांस्कृतिक व भौतिक विकासाकरिता त्यांना कायदेमंडळात प्रतिनिधीत्व देणे ही काळाची गरज आहे.

४. जॉन स्टुअर्ट मिलच्या म्हणण्यानुसार– ''प्रत्येक अल्पसंख्यांक समूहाला त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर राज्याच्या विविध अंगामध्ये प्रतिनिधीत्व देणे ही लोकशाहीचे लक्षण आहे.''

५. प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पध्दतीद्वारे अल्पसंख्यांक समूहाला राज्याच्या कायदेमंडळात प्रतिनिधीत्व दिले जाते.

६. १९ व्या शतकांत थॉमस हेर या इंग्लिश विचारवंताने प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पध्दत खालीलप्रमाणे मांडली.

(अ) मतदारसंघ हे मोठे असावेत.

(ब) प्रत्येक मतदारसंघातून किमान तीन प्रतिनिधी निवडले जावेत.

(क) प्रत्येक मतदाराला जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत तेवढी मते देण्याचा अधिकार असला पाहिजे.

(ड) प्रत्येक उमेदवाराने निवडून येण्याकरिता ठराविक कोटा (Quota) मिळविणे अत्यावश्यक आहे.

(इ) जेवढे मतदान झाले आहे त्यांना जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत, त्यांनी भागून निवडून येण्याकरिता आवश्यक असलेला कोटा (Quota) ठरविण्यात यावा.

७. बदलत्या राजकीय काळानुसार योग्य ते बदल थॉमस हेरच्या पध्दतीमध्ये करण्यात आलेले आहेत.

८. आधुनिक शासन व्यवस्थेत प्रमाणशिर प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे देण्यात आलेले आहे.

(अ) एकल संक्रमणीय पध्दत (Single transferable Vote System)

(इ) यादी पध्दत (List System)

## (अ) क्रमदेय प्रमाणशिर पध्दत

१. पाच उमेदवार निवडून द्यावयाचे असतील तर मतदाराला पाच मते देण्याचा अधिकार असतो.

२. सामान्यत: मतदाराला आपल्या पसंतीच्याप्रमाणे उमेदवारांना क्रमदेय पध्दतीने (१, २, ३, ४, ५) असे मतदान करता येते.

३. या पध्दतीमध्ये निवडून येण्यासाठी उमेदवाराला विशिष्ट मतसंख्येचा कोटा (Quota) मिळविणे आवश्यक असते.

४. या मतदान पध्दतीला एकल संक्रमणीय मतदान पध्दती (Single transferable Vote) असे म्हणतात.

५. उमेदवाराचा कोटा (Quota) काढण्याकरिता खालील पध्दती वापरली जाते.

(अ) $\frac{\text{एकूण वैध मतांची संख्या}}{\text{निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या.}} = \text{कोटा}$

(ब) $\frac{\text{एकूण वैध (पडलेल्या) मतांची संख्या} + १}{\text{निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या} + १} + १ = \text{कोटा.}$

६. निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यापूर्वी एकदा कोटा (Quota) निश्चित झाला की मतमोजणी खालीलप्रमाणे करतात.

(अ) ज्या उमेदवाराला एक नंबरच्या पसंतीची मते निश्चित केलेल्या वाट्याऐवढी (Quota) किंवा त्यापेक्षा जास्त मिळाली आहेत, त्या उमेदवाराला विजयी घोषित केले जाते.

(ब) विजयी उमेदवाराला मिळालेली दोन नंबरची मते ज्या उमेदवाराला विजयी उमेदवारापेक्षा कमी मते मिळालेली आहेत, त्या उमेदवारांच्या एक नंबरच्या मतांमध्ये ती मते मिळविली जातात व जो उमेदवार कोटा (Quota) पूर्ण करतो, त्याला विजयी म्हणून घोषित केले जाते.

(क) विजयी उमेदवारांची तीन नंबरची मते ज्या उमेदवाराला मिळालेली आहेत, त्या उमेदवारांच्या मतांमध्ये ती मते मिळविली जातात व जो उमेदवार कोटा (Quota) पूर्ण करतो त्या उमेदवाराला विजयी घोषित केले जाते.

(ड) जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत, तेवढे उमेदवार निवडून येईपर्यंत विजयी उमेदवारांच्या मतपत्रिकेवर असलेली पुढील क्रमांकांची मते निवडून न आलेल्या उमेदवारांच्या मतमोजणीत मिळविली जातात व जो उमेदवार वाटा पूर्ण करतो त्याला विजयी घोषित केले जाते.

(इ) एवढे करूनही जर उमेदवार निवडून यायचे शिल्लक असतील (उदा. ५ उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत व तीनच उमेदवार विजयी झाले आहेत) तर ज्या उमेदवारांना एक नंबरची सर्वात कमी मते पडली आहेत त्यांच्या मतपत्रिकेवरील मते इतर उमेदवारांच्या मतदान मोजणीमध्ये मिळविली जातात व जो उमेदवार कोटा (Quota) प्राप्त करतो त्याला विजयी घोषित केले जाते.

(ई) जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत तेवढे उमेदवार विजयी होईपर्यंत मतमोजणी वरील क्रमदेय पध्दतीने चालू राहते.

### ❐ क्रमदेय पध्दतीचे फायदे :-

१. कोणतेही मत वाया जात नाही, कारण विजयी उमेदवारांच्या मतपत्रिकेवरील २, ३, ४ इ. क्रमांकाची मते पुढील उमेदवारांना कोटा पूर्ण करेपर्यंत मिळत जातात.

२. या पध्दतीद्वारे मतदारांना राजकीय शिक्षण मिळते.

३. या पध्दतीद्वारे अल्पसंख्यांकांना प्रतिनिधीत्व मिळते.

४. मतदाराला आपली मते एक नंबर, दोन नंबर, तीन नंबर अशा क्रमदेय पध्दतीने देण्याचे स्वातंत्र्य मिळते.

५. प्रत्येक मतदार उमेदवारांच्या कर्तृत्वानुसार त्यांना आपल्या पसंतीचा क्रम देवू शकतो व त्यामुळे पक्षीय राजकारणाला आळा बसू शकतो.

### ❐ क्रमदेय पध्दतीचे तोटे :-

१. एकाच मतदारसंघातून अनेक उमेदवार निवडायचे असल्यामुळे व मतदारसंघ मोठा असल्यामुळे उमेदवार व मतदार यांच्यामध्ये संबंध निर्माण होत नाहीत.

२. निवडणुकीचा खर्च वाढतो.

३. मतमोजणी ही एक क्लीष्ट प्रक्रिया होते.

४. अल्पसंख्यांक लोकांच्या एकीला चुकीचे वळण लागून लोकशाहीला अडथळा निर्माण होवू शकतो.

## (ब) यादी पध्दत (List System)

१. या पध्दतीमध्ये मतदारसंघातून जेवढे उमेदवार निवडावयाचे आहेत, त्या उमेदवारांची एक सूची प्रत्येक राजकीय पक्ष जाहीर करतो.

२. मतदाराला राजकीय पक्षाच्या यादीला आपली सगळी मते द्यावी लागतात.

३. मतदार आपल्या मतांचे विभाजन करू शकत नाही.

४. जर मतदाराला पाच मते देण्याचा अधिकार असेल तर त्याला सर्वच्या सर्व मते एकाच पक्षाच्या यादीमधील उमेदवारांना द्यावी लागतात.

५. मतदार आपल्या मतांचे विभाजन करून ती दोन किंवा तीन राजकीय पक्षांच्या यादीला देवू शकत नाही.

६. विजयी उमेदवाराचा कोटा (Quota) व मतदान मोजणी क्रमदेय प्रमाणशिर पध्दतीप्रमाणे केली जाते.

७. ही पध्दत स्वित्झर्लंड, स्विडन इत्यादी देशांनी स्विकारली आहे.

## ४.३.७ भौगोलिक प्रतिनिधीत्त्व (Geographical Representation)

१. आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये बहुतेक देशांच्यामध्ये भौगोलिक प्रतिनिधीत्व मान्य करण्यात आलेले आहे.

२. मतदार त्यांच्या भौगोलिक क्षेत्रांमधील उमेदवार निवडून देतात.

३. या पध्दतीमध्ये उमेदवाराचा पेशा कोणता हे विचारात घेतले जात नाही व त्यामुळे काही विचारवंत या पध्दतीवर टिका करतात.

४. टिकाकारांच्या मतानुसार संपूर्ण समाज हा विविध पेशामध्ये/व्यवसायामध्ये विभागला गेला आहे व या पध्दतीमुळे सर्व व्यवसायाच्या लोकांना शासनामध्ये प्रतिनिधीत्व मिळू शकत नाही.

५. समाजामध्ये डॉक्टर्स, इंजिनिअर्स, शिक्षक, भांडवलदार, कामगार इ. अनेक व्यवसाय असून हे व्यवसाय करणाऱ्या मतदारांमधील उमेदवाराला या पध्दतीमध्ये प्रतिनिधीत्व मिळू शकत नाही.

६. टिकाकारांच्या मते, हे विविध व्यवसाय करणाऱ्या मतदारांमधील उमेदवारांना प्रतिनिधीत्व मिळणे गरजेचे आहे.

७. फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये (Miradeau) मिराब्यू व सियेस् (Sieyes) यांनी व्यावसायिक प्रतिनिधीत्वाला पाठिंबा दिला.

८. तसेच व्यावसायिक संघ, कम्युनिस्ट, लेखक जी.डी.एच.कोल, सिडने वेब, ग्रॅहम वालास आणि ड्युगईट यांनीही व्यवसायावर आधारित उमेदवार या संकल्पनेला पाठिंबा दिला होता.

९. पहिल्या महायुध्दानंतर रशिया, इटली, जर्मनीसारख्या देशांनी या पध्दतीचा उपयोग केला, परंतु त्यामध्ये उपयुक्तता दिसून आली नाही व त्यामुळे ती पध्दत रद्द करण्यात आली.

१०. या पध्दतीमुळे वर्ग संघर्षाची भावना वाढीला लागून राष्ट्रीय एकता व एकात्मतेला धोका होवू शकतो.

११. भौगोलिक प्रतिनिधीत्व पध्दतीमध्ये जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत तेवढ्या भौगोलिक मतदारसंघात संपूर्ण राज्याचे विभाजन करण्यात येते व त्या-त्या मतदारसंघातून विजयी झालेला उमेदवार प्रतिनिधी म्हणून राज्यशासनांमध्ये काम करतो.

## ❒ भौगोलिक प्रतिनिधीत्वाचे फायदे :-

१. स्थानिक प्रश्नांचा अभ्यास असलेले उमदेवार निवडून दिले जातात.

२. सर्वाधिक मते प्राप्त करणारा उमेदवार विजयी होतो.

३. सोपी व सुलभ पध्दत.

४. मतदारांना उमेदवाराबद्दल माहिती असते.

५. उमेदवाराकरिता कमी खर्चिक.

## ❒ भौगोलिक प्रतिनिधीत्वाचे तोटे :-

१. स्थानिक प्रश्नांच्याकडे उमेदवार जास्त लक्ष देतात व त्यामुळे राष्ट्रीय प्रश्नांकडे दुर्लक्ष होवू शकते.

२. मतदारांना निवड ठराविक भौगोलिक मतदार संघातून करावी लागते.

३. सत्ताधारी पक्ष आपल्याला हवी तशी मतदारसंघाची पुनर्रचना (ऋर्शीीूरपवशीळपस) करू शकतो.

४. आधुनिक काळांमधील वातावरणाला अयोग्य पध्दत.

५. उमेदवार कमी मताधिक्यानेदेखील विजयी होवू शकतो.

६. स्थानिक उमेदवारांना कमी खर्च असल्यामुळे उमेदवारांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता असते.

## ४.४. स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न (Check your progress)

❑ **प्रश्न १ : योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. लोकशाही यशस्वी होण्याकरिता खालीलपैकी कोणती गोष्ट अनावश्यक आहे?

*(अ) प्रौढ मतदान* *(ब) खुल्या वातावरणात निवडणुका*

*(क) सक्षम विरुध्द पक्ष* *(ड) अल्पसंख्यांकाचे शासन.*

२. लोकशाही कोणत्या तत्त्वावर अवलंबून आहे?

*(अ) बहुमत असलेल्या पक्षाचे शासन* *(ब) अल्पमत असलेल्या पक्षाचे शासन*

*(क) अल्पसंख्यांक लोकांचे शासन* *(ड) अनियंत्रित स्वातंत्र्य.*

३. निवडणूक प्रक्रिया म्हणजे ............... .

*(अ) ज्या प्रक्रियेद्वारे निवडणूका घेतल्या जातात.*

*(ब) ज्या प्रक्रियेद्वारे नोकरशाही निवडली जाते.*

*(क) ज्या प्रक्रियेद्वारे न्यायधिशांची नेमणूक केली जाते.*

*(ढ) ज्या प्रक्रियेद्वारे राजकीय पक्ष काम करतात.*

४. प्रत्यक्ष निवडणूक म्हणजे .............. .

*(अ) जेव्हा प्रतिनिधी नेमले जातात.*

*(ब) जेव्हा प्रतिनिधी निवडले जातात.*

*(क) जेव्हा प्रतिनिधी नोकरशाही निवडते.*

*(ड) जेव्हा प्रतिनिधी श्रीमंत लोक निवडतात.*

५. प्रत्यक्ष निवडणुकीमध्ये कोणता उमेदवार विजयी घोषित केला जातो?

*(अ) ज्या उमेदवाराला सर्वात जास्त मते पडतात.*

*(ब) ज्या उमेदवाराला सर्वात कमी मते पडतात.*

*(क) ज्या उमेदावाराला ३३% मते मिळतात.*

*(ड) ज्या उमेदवाराला ठराविक वाट्याची मते मिळतात.*

६. प्रौढ सार्वत्रिक मताधिकार हे कोणत्या शासनाचे लक्षण आहे?

*(अ) हुकूमशाही* *(ब) राजेशीही*

*(क) लोकशाही* *(ड) यापैकी कोणतेच नाही.*

७. भारतामध्ये खालीलपैकी कोणाची निवड प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे होते.

*(अ) राष्ट्रपती* *(ब) उपराष्ट्रपती*

*(क) राज्यपाल* *(ड) लोकसभेचे प्रतिनिधी.*

८. अप्रत्यक्ष निवडणूक म्हणजे ............. .

*(अ) जेव्हा प्रतिनिधी लोकांकडून निवडले जातात.*

*(ब) जेव्हा प्रतिनिधी नोकरशाहीकडून नेमले जातात.*

*(क) जेव्हा निवडून आलेले प्रतिनिधी मतदानात भाग घेतात.*

*(ड) जेव्हा स्त्रिया उमदेवार निवडतात.*

९. इंग्लंडमध्ये स्त्री मतदानाच्या हक्काचा पुरस्कार कोणी केला?

*(अ) जे. एस. मिल* *(ब) हॉब्ज* *(क) लॉक* *(ड) रूसो.*

१०. इंग्लंडमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार कधी मिळाला?

*(अ) १९२८* *(ब) १९३५* *(क) १८२८* *(ड) १९५०.*

११. कायदेमंडळाकरिता सर्वच प्रतिनिधी निवडले जातात, त्या निवडणुकीला ............. .

*(अ) सार्वत्रिक निवडणूक* *(ब) पोट निवडणूक*

*(क) फेर निवडणूक* *(ड) यापैकी कोणतेच नाही.*

१२. भारतामध्ये कोणते वय पूर्ण केल्यावर मतदानाचा अधिकार प्राप्त होतो?

*(अ) १८* *(ब) २१* *(क) २०* *(ड) १६.*

१३. खालीलपैकी कोणते मत स्त्री मतदान हक्काच्या बाजूने आहे?

*(अ) या हक्कामुळे समानता प्रस्थापित होते.*

*(ब) या हक्कामुळे स्त्रियांच्या नाजुकतेवर गदा येते.*

*(क) स्त्रिया शारीरिक दुर्बल आहेत.*

*(ड) स्त्रियांचे वर्चस्व प्रस्थापित होईल.*

१४. आधुनिक स्त्रिया कोणते हक्क मानतात.

*(अ) समानतेचा हक्क* *(ब) थोडेफार हक्क*

*(क) जास्त हक्क* *(ड) कोणतेच हक्क नको.*

१५. विभक्त मतदार संघ म्हणजे .................... .

*(अ) ठराविक धर्मावर अथवा समूहावर आधारित मतदार संघ.*

*(ब) राखीव मतदारसंघ* *(क) अराखीव मतदारसंघ*

*(ड) भौगोलिक मतदारसंघ.*

१६. संयुक्त मतदारसंघ म्हणजे ............... .

*(अ) धर्मावर किंवा समूहावर आधारित मतदार संघ.*

*(ब) राखीव मतदार संघ.*

*(क) अराखीव मतदार संघ*

*(ड) भौगोलिक मतदार संघ.*

१७. स्त्रियांना मतदानाचा हक्क म्हणजे ............. .

*(अ) प्रौढ स्त्रियांना मतदानाचा हक्क.*

*(ब) विवाहित स्त्रियांना मतदानाचा हक्क.*

*(क) शिकलेल्या स्त्रियांना मतदानाचा हक्क.*

*(ड) निरक्षर स्त्रियांना मतदानाचा हक्क.*

१८. क्रमदेय प्रमाणशिर पद्धतीमध्ये कोटा (Quota) कसा ठरवितात.

*(अ)* $\frac{\text{पडलेले मतदान}}{\text{उमेदवारांची संख्या}}$

*(ब)* $\frac{\text{पडलेले मतदान} + १}{\text{उमेदवारांची संख्या} + १}$

*(क)* $\frac{\text{पडलेले मतदान}}{\text{मतदार}}$

*(ड)* $\frac{\text{मतदान}}{\text{उमेदवार}}$

१९. क्रमदेय प्रमाणशिर पध्दतीमध्ये कमीतकमी किती उमेदवार लागतात.

*(अ) कमीत कमी दोन*

*(ब) कमीतकमी तीन व जास्तीत जास्त पंधरा*

*(क) कमीतकमी चार व जास्तीत जास्त वीस*

*(ड) यापैकी कोणतेच नाही.*

२०. मर्यादित मतदान म्हणजे ............. .

*(अ) मतदार आपली सर्व मते एकाच उमेदवाराला देतो.*

*(ब) मतदार आपली मते विभागून देतो.*

*(क) मतदाराला जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे त्या एकूण मतामध्ये एक मत कमी द्यायला लागते.*

*(ड) यापैकी कोणतेच नाही.*

२१. भौगोलिक मतदारसंघ म्हणजे ............ .

*(अ) जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत तेवढ्या भौगोलिक मतदारसंघाची रचना राज्यामध्ये निर्माण करणे.*

*(ब) कार्यावर आधारित मतदारसंघ निर्माण करणे.*

*(क) शिक्षणावर आधारित मतदारसंघ निर्माण करणे.*

*(ड) यापैकी एकही नाही.*

२२. Cumulative मतदानाचा हक्क म्हणजे ...............

*(अ) मतदार आपली सर्व मते एकाच उमेदवाराला एकत्रित देवू शकतो.*

*(ब) मतदार आपली सर्व मते एका उमेदवाराला देवू शकत नाही.*

*(क) मतदाराला एकच मत असते.*

*(ड) यापैकी कोणतेच नाही.*

२३. List पध्दतीमध्ये ................ .

*(अ) राजकीय पक्षांनी जाहीर केलेल्या यादीमधील सर्व उमेदवारांना मतदान करणे.*

*(ब) मतदान विभागून करणे.*

*(क) मतदान विभागणी अनेक पक्षाच्या यादीत करणे.*

*(ड) वरीलपैकी कोणतेच नाही.*

२४. क्रमदेय पध्दत कोणी शोधून काढली?

*(अ) कार्ल मार्क्स* *(ब) थॉमस् हारे*

*(क) हॉब्ज* *(ड) लॉक.*

२५. भारताच्या राष्ट्रपतीची निवडणूक कशी होते?

*(अ) प्रत्यक्ष लोकांकडून*

*(ब) खासदारांच्याकडून*

*(क) लोकसभा व राज्यसभा यामध्ये निवडून आलेले खासदार व राज्यांमधील आमदार.*

*(ड) लोकसभेचे खासदार.*

## ४.४ सारांश

लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणूका आणि लोकप्रतिनिधीत्व या दोन्ही गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. निवडणूका घेणे, पार पाडणे यासाठी घटनात्मक विभागाची निर्मिती केली जाते. प्रतिनिधीत्वाच्या संदर्भात सर्व जनतेचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग होण्यासाठी काही पध्दतींचा वापर केला जातो. प्रतिनिधी निवडून देण्यासाठी मतदानाचा हक्क जनतेला देणे गरजेचे असते, पण ऐतिहासिक पार्श्वभूमी, रुढी, प्रथा, परंपरा, सामाजिक विषमता यामुळे काही ठिकाणी सर्वांना मतदानाचा हक्क प्राप्त होत नव्हता, तर काही ठिकाणी राजकीय खेळीसाठी समाजातील घटकांना परस्परांचेपासून अलिप्त ठेवले जाते आणि राजकीय उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो, मात्र आज २१व्या शतकातील वाटचालीत सर्वांना प्रतिनिधीत्व व मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेतलेच पाहिजे, त्याशिवाय सर्वसमावेशक व यशस्वी लोकशाही अस्तित्वात येणार नाही.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. (ड) अल्पसंख्यांकाचे शासन.

२. (अ) बहुमत असलेल्या पक्षाचे शासन.

३. (अ) ज्या प्रक्रियेद्वारे निवडणूका घेतल्या जातात.

४. (ब) जेव्हा प्रतिनिधी निवडले जातात.

५. (अ) ज्या उमेदवाराला सर्वात जास्त मते पडतात.

६. (क) लोकशाही.

७. (ड) लोकसभेचे प्रतिनिधी.

८. (क) जेव्हा निवडून आलेले प्रतिनिधी मतदानात भाग घेतात.

९. (अ) जे. एस. मिल.

१०. (अ) १९२८.

११. (अ) सार्वत्रिक निवडणूक.

१२. (अ) १८

१३. (अ) या हक्कामुळे समानता प्रस्थापित होते.

१४. (अ) समानतेचा हक्क.

१५. (अ) ठराविक धर्मावर अथवा समूहावर आधारित मतदार संघ.

१६. (ब) राखीव मतदार संघ.

१७. (अ) प्रौढ स्त्रियांना मतदानाचा हक्क.

१८. (ब) पडलेले मतदान+१ ह्व उमेदवारांची संख्या+१.

१९. (ब) कमीतकमी तीन व जास्तीत जास्त पंधरा.

२०. (क) मतदाराला जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे त्या एकूण मतामध्ये एक मत कमी द्यायला लागते.

२१. (अ) जेवढे उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत तेवढ्या भौगोलिक मतदारसंघाची रचना राज्यामध्ये निर्माण करणे.

२२. (अ) मतदार आपली सर्व मते एकाच उमेदवाराला एकत्रित देवू शकतो.

२३. (अ) राजकीय पक्षांनी जाहीर केलेल्या यादीमधील सर्व उमेदवारांना मतदान करणे.

२४. (ब) थॉमस् हारे.

२५. (क)लोकसभा व राज्यसभा यामध्ये निवडून आलेले खासदार व राज्यांमधील आमदार.

## ४.५ सरावासाठी प्रश्न

❑ **प्रश्न १ : थोडक्यात प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सार्वत्रिक प्रौढ मतदार म्हणजे काय? ते स्पष्ट करून त्याचे फायदे व तोटे स्पष्ट करा.

२. स्त्रियांना मतदानाचा अधिकार या संदर्भात निविध विचारवंतांची मते स्पष्ट करा.

३. भौगोलिक मतदार संघ म्हणजे काय?

४. प्रमाणशिर प्रतिनिधीत्वाची संकल्पना स्पष्ट करा.

५. एकल संक्रमणीय मत पध्दत म्हणजे काय?

६. हारे पध्दत स्पष्ट करा.

❑ **प्रश्न २ : टिपा लिहा.**

१. भारतीय राष्ट्रपतीची निवडणूक पध्दत.

२. विभक्त मतदारसंघ.

३. संयुक्त मतदारसंघ.

४. मर्यादित मतदान पध्दत.

५. एकत्रित मतदान पध्दत (Cumulative Vote Plan)

६. यादी पध्दत (List System).

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. *"Political Science"*, Unique Publishers, New Delhi-110024, 2010.

२. Gokhale B. K., *"Political Science"*, Himalaya Publishing House, New Delhi, 1964.

३. गोखले आर. एम., *'आधुनिक राज्यशास्त्र भाग-३'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७२.

४. भोगले शां. कृ., *'आधुनिक राज्यशास्त्र'*, किताब महल, अलहाबाद, १९८१.


❀ ❀ ❀

घटक–१

# स्त्रीवाद

## (Feminism)

घटक संरचना

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप
- १.२.२ स्त्रीवादाचा उगम आणि विकास
- १.२.३ स्त्रीवादाची वैशिष्ट्ये
- १.२.४ स्त्रीवादाचे सिध्दांत
  - १.२.४.१ उदारमतवादी स्त्रीवाद
  - १.२.४.२ मार्क्सवादी स्त्रीवाद
  - १.२.४.३ जहाल स्त्रीवाद
  - १.२.४.४ भारतीय स्त्रीवाद

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये

या घटकात आपण 'स्त्रीवाद' (Feminism) या संकल्पनेचा अभ्यास करणार आहोत. या घटकाच्या अभ्यासांती आपणास-

- स्त्रीवादाचा अर्थ, उगम आणि विकास समजून घेता येईल.
- स्त्रीवादाची वैशिष्ट्ये आणि स्त्रीवादाचे विविध मतप्रवाह (सिद्धांत) समजून घेता येतील.

  स्त्रीवादातील विविध मतप्रवाहामधील परस्पर संबंध स्पष्ट होतील.

## १.१ प्रास्ताविक

मागील (पाचव्या) सत्रात आपण शासन व्यवस्थेचा अभ्यास केला आहे. या सत्रात आपण राज्यशास्त्रातील आधुनिक संकल्पनांचा (Modern Political Concepts) अभ्यास करणार आहोत. यातील बहुतांश संकल्पनांचा विकास हा पाश्चात्त्य देशामध्ये झालेला आहे. १९व्या आणि २०व्या शतकामध्ये तसेच चालू (२१ व्या) शतकामध्ये अनेक नवनवीन राजकीय मतप्रवाह निर्माण झाले. यातून नवीन राजकीय संकल्पनांचा उगम व विकास होत गेला. यातील स्त्रीवाद, बहुसंस्कृतीवाद, पर्यावरणवाद आणि नागरी समाज या काही प्रमुख संकल्पनांचा राज्यशास्त्राच्या दृष्टीकोनातून आपण पुढील चार घटकामध्ये अभ्यास करणार आहोत.

या घटकात आपण 'स्त्रीवाद' समजावून घेणार आहोत. 'स्त्रीवाद' ही बहुआयामी संकल्पना आहे. एका विशिष्ट व्याख्येतून ती शब्दबध्द करणे कठीण काम आहे. दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर खऱ्या अर्थाने 'स्त्रीवादाला' चालना मिळाली. १९६० नंतर 'स्त्रीवादी चळवळ' आणि 'स्त्रीवादी साहित्य' अशा दोन पातळीवर स्त्रीवादाचा विकास होत गेला. स्त्रीवादाबाबतचे अनेक नवीन सिद्धांत २०व्या शतकात मांडले गेले.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप

स्त्रीवादाच्या अर्थाबाबत विचारवंतांच्या मध्ये एकमत आढळत नाही. त्यामुळे स्त्रीवाद म्हणजे-

- स्त्री केंद्रीत समाज व्यवस्था आण्यासाठी कार्यरत असलेली चळवळ होय.
- स्त्री-पुरुष समानता हे अंतिम ध्येय असे मानणारा विचार होय.

❑ सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणारी विचारसरणी.

पुरुषांपासून फारकत घेऊन स्त्रीने आपला स्वतंत्र सुभा निर्माण करणे म्हणजे स्त्रीवाद नव्हे. तर स्वत:च्या सामर्थ्याचा शोध घेऊन आपल्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून जीवन जगण्याचे स्त्रीवाद समर्थन करतो. पितृसत्ताक समाज व्यवस्थेने प्रस्थापित केलेली परंपरा मोडून स्त्रीयांचा विकासाचा मार्ग चोखाळणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद स्त्री आणि पुरुष यांच्यातील सामाजिक भेद नाकारतो. स्त्रीवाद्याच्या मते, स्त्री आणि पुरुष यांच्यात केवळ लिंग भेद (Sex Discrimination) आहे असे मानतो. लिंग भाव (Gender Discrimination) मानत नाही.

पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रीला देवता दासी मानले गेले आहे. सामाजीक संकेत आणि मूल्यांच्या नावाखाली तिला 'माणूस' म्हणून स्थान नाकारण्यात आले आहे. तिच्यातील मानवत्त्व नाकारून तिला वस्तूरूप दिले आहे. स्त्रीला गुलाम म्हणूनच वागविणे कसे योग्य आहे याचे उदात्तीकरण करण्यात आले आहे. स्त्री शोषणास अनुकूल अशी व्यवस्था समाजात निर्माण करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या लिंग भेदाच्या (Gender Discrimination) विरुध्दची कृतिशील चळवळ म्हणजे स्त्रीवाद.

वेबस्टर शब्दकोशानुसार पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना राजकीय हक्क असणे म्हणजे स्त्रीवाद होय.

स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्री हक्कांचे समर्थन नव्हे, तर स्त्रीची 'स्त्री' अशी ओळख करून देणे. स्त्रीचे कुटुंबातील स्थान, स्वत:च्या शरीरावरील हक्क आणि राजकीय, सामाजिक, शैक्षणिक इ. क्षेत्रातील समानता मिळविण्यासाठी स्त्रियांनी दिलेला संघर्ष म्हणजे 'स्त्रीवाद' होय. या विचारसरणीचा मानस स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित असणारे हे जग बदलण्याचा आहे.

## १.२.२ स्त्रीवादाचा उगम आणि विकास

स्त्री जीवनाचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, स्थीर कृषी संस्कृतीपासून पुरुषप्रधान समाज व्यवस्था अस्तित्वात येईपर्यंत स्त्रीला गौन स्थान दिलेले होते. तिचे कार्य 'चूल आणि मूल' इतके मर्यादित होते. पुरुषाच्या अधिपत्याखाली राहून तिने घर सांभाळावे त्याच्या मर्जीप्रमाणे आपले जीवन कंठावे. अशा प्रकारची धारणा रूढ होती. या अवस्थेत स्त्रीला एक उपभोग्य वस्तू म्हणून (व्यक्ती म्हणून नव्हे) पाहिले जात होते. तिचा बौध्दिक आणि मानसिक विकास होऊ दिला नाही. अशा अवस्थेतून स्त्रीला मुक्त करण्यासाठीचा जो विचार पुढे आला, त्यातूनच स्त्रीवादाचा जन्म झाला.

१९६० नंतर 'स्त्रीवाद' एक विचारसरणी म्हणून पुढे आली. अर्थात् स्त्रीवादात अभिप्रेत असणारा स्त्री-पुरुष समानतेचा विचार गेल्या ३०० वर्षात हळूहळू उत्क्रांत झाला आहे. ढोबळपणे स्त्रीवादी विचारांचा विकासाचा अभ्यास तीन टप्प्यात केला जातो.

## १. स्त्रीवादी चळवळीचा पहिला टप्पा :-

१९२० पूर्वीच्या स्त्रीवादी चळवळीला पहिल्या टप्प्यातील चळवळ म्हणून अभ्यासावे लागेल. सर्वप्रथम मेरी वुलस्टोनक्राफ्टने 'दि व्हिंडीकेशन ऑफ राईटस् ऑफ वुमेन, १७९२' (The Vindication of Rights of Women, 1792) या ग्रंथामध्ये स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार केला. ही स्त्रीवादी चळवळीची सुरुवात होती. या कालखंडातील बहुतांश स्त्रीवादी मवाळ व परंपरावादी होते. स्त्री मताधिकार, कामाचा अधिकार आणि स्त्री पुरुष समानता यांना अडथळा आणणाऱ्या कायद्यांना विरोध करण्याला या काळात भर दिला गेला. प्रामुख्याने अमेरिका, इंग्लंड, नेदरलँड, कॅनडा इ. पाश्चात्त्य देशांमध्ये ही स्त्रीवादी चळवळ मर्यादित होती.

## २. स्त्रीवादी चळवळीचा दुसरा टप्पा :-

१९२० नंतरच्या काळात जहाल स्त्रीवादाची मांडणी करण्यात आली. १९६० नंतर या चळवळीला अधिक गती मिळाली. या काळात केवळ स्त्री-पुरुष समानताच नव्हे तर स्त्रीयांचे श्रेष्ठत्त्व सुध्दा अधोरेखित करण्यात आले. गर्भपात करण्याचा अधिकार मुलांना जन्म देण्याचा अधिकार, कुटुंब व विवाह विषयक अधिकार याबाबत महिलांना स्वातंत्र्य असावे अशी मागणी करण्यात आली.

घटस्फोटाच्या कायद्यातील भेदभाव विरोधी चळवळीचा हा कालखंड होता. या काळात धर्मनिष्ठ, पितृकेंद्री आणि पुरुषधार्जिण्या कायद्यांना विरोध केला गेला. या काळात स्त्रीवादी चळवळीची व्याप्ती जगभर पसरली.

सिमॉ दि बोवुवा यांनी 'दि सेकंड सेक्स' मधून स्त्रीयांच्यावरील अन्यायाला वाचा फोडली. स्त्री अस्मिता जागृत करण्याला प्राधान्य दिले.

## ३. स्त्रीवादाचा तिसरा टप्पा :-

१९९० नंतर स्त्रीवादी चळवळीचा तिसरा टप्पा सुरू होतो. वसाहतवाद आणि साम्यवाद यांचा शेवट आणि मुक्त अर्थव्यवस्थेची सुरुवात अशा काळात स्त्रीवाद विषयक नवीन दृष्टीकोन विकसित झाला. या काळात स्त्री स्वातंत्र्य किंवा स्त्रीमुक्ती या संज्ञांचा अर्थ व्यक्तीसापेक्ष आणि स्थलसापेक्ष असावा असा विचार पुढे आला. प्रत्येक स्त्रीला तिच्या स्वातंत्र्याची व्याख्या करण्याची मुभा असावी. कारण 'स्वातंत्र्य' आणि 'समता' या संकल्पना सापेक्ष आहेत. प्रगत पाश्चात्त्य देशाप्रमाणे आशिया आणि आफ्रिका खंडातील स्त्रीयांना देखील त्या-त्या समाजातील परिस्थितीनुसार पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, वर्णभेद पिडीत स्त्रीयांच्या शोषणाविरुध्द जागृती निर्माण झाली आणि त्याच्यावरील अन्यायाला स्त्रीवादाने वाचा फोडली. त्याचप्रमाणे समलिंगी संबंधांना (स्त्री-स्त्री यांच्यातील लैंगिक संबंध) लोकमान्यता मिळावी यासाठी प्रत्यन झाले.

अशा प्रकारे स्त्रीवादाच्या चळवळीच्या पहिल्या टप्प्यात स्त्रीविरोधी कायदे व परंपरा यांच्याविरोधी चळवळी झाल्या. दुसऱ्या टप्प्यात पुरुषांप्रमाणे स्त्रीयांना सर्व नागरी व राजकीय हक्क मिळावेत यासाठी प्रयत्न झाले. तिसऱ्या टप्प्यामध्ये स्त्री स्वातंत्र्याचा व्यक्तीकेंद्रीत विचाराला महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे स्त्रीवादाचे स्वरूप बदलत गेल्याचे दिसून येते.

## १.२.३ स्त्रीवादाची वैशिष्ट्ये

स्त्री व पुरुष या दोन घटकांनी बनलेल्या मानवी समाज व्यवस्थेत या दोन्ही घटकात समानत्व नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीला गौण स्थान दिले आहे. या व्यवस्थेला स्त्रीवादाने आव्हान दिले आहे. डॉ. रचना माने यांनी या स्त्रीवादाची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत.

१. स्त्रीवाद ही कृतीशिलतेची अपेक्षा असणारी विचारसरणी आहे.

२. स्त्रीयांची, स्त्रीयांच्या हितसंबंधाचा विचार करणारी विचारप्रणाली आहे.

३. स्त्रीवादाने पुरुषप्रधान व्यवस्थेतील पुरुषी राजकारण उघड केले.

४. स्त्रीवादाने पुराण धर्मग्रंथातील स्त्रीच्या दुय्यम स्थानाला आव्हान दिले.

५. स्त्रीचे दास्यत्व किंवा दैवत्व नाकारून तिला माणूस म्हणून ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न स्त्रीवादाने केला.

६. स्त्रीवादाने ज्ञान परंपरा, साहित्य परंपरा, भाषा, शिक्षण, धर्म, कला, कायदा, आध्यात्म, नीतिव्यवस्था या घटकांचे स्त्रीच्या दृष्टिकोनातून पुनर्वाचन/पुनर्मूल्यांकन केले. प्रत्येक घटकाकडून नव्या परिप्रेक्षातून पाहिले.

७. स्त्रीवादाने सांस्कृतिक लिंगभेद (Gender Discrimination) नाकारला.

८. पुरुषप्रधान व्यवस्थेतील पुरुषकेंद्री विचारप्रक्रियेमुळे समाजरूपी वर्तुळाच्या परिघावर राहिलेल्या स्त्रीला केंद्रस्थानी आणण्यासाठी लढा दिला.

९. व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या ध्यासातून उदयास आलेल्या या विचारसरणीला मानवतावादाचे, समतावादाचे अधिष्ठान आहे.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ✻

**(अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. .................. व्यवस्थेमुळेच स्त्रीयांचे शोषण होते, यावर स्त्रीवादाने भर दिला आहे.

*(अ) हुकूमशाही* *(ब) पुरुषप्रधान* *(क) स्त्रीप्रधान.*

२. ''दि व्हिंडीकेशन ऑफ राईटस् ऑफ वुमेन'' हे स्त्रीवादाचे समर्थन करणारे पुस्तक .................. यांनी लिहिले.

*(अ) मेरी वुलस्टोन क्राफ्ट* *(ब) बेटी फ्रेडन* *(क) अँड्रीया डॉर्किन*

३. .................... या विचारसरणीने स्त्रीचे दास्यत्व किंवा दैवत्व नाकारले.

*(अ) उदारमतवादाने* *(ब) भांडवलशाहीने* *(क) स्त्रीवाद.*

४. स्त्रीवादी चळवळीचे मुख्य ...................... टप्पे केले जातात.

*(अ) एक* *(ब) दोन* *(क) तीन.*

## १.२.४ स्त्रीवादाचे सिध्दांत

स्त्रीवादाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातून स्त्रीवादविषयक विविध सिध्दांत अस्तित्वात आले आहेत. त्यापैकी कांही प्रमुख सिध्दांत म्हणजे उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, भारतीय स्त्रीवाद, सांस्कृतिक स्त्रीवाद इत्यादी.

### १.२.४.१ उदारमतवादी स्त्रीवाद

उदारमतवादी विचारसरणीचा उदय प्रथम युरोप खंडात १८ व्या शतकात झाला. प्रत्येक व्यक्तीला विचार स्वातंत्र्य हवे असे उदारमतवाद मानतो. व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीप्रतिष्ठा ही उदारमतवादाची दोन महत्त्वाची मूल्ये आहेत. ''माणूस हा विवेकशील प्राणी आहे (Man is a rational animal) या गृहितकावर उदारमतवादाचे तत्त्वज्ञान आधारित आहे. उदारमतवाद सार्वजनिक जीवनात 'व्यक्तीचे हित', 'व्यक्तीचे स्वातंत्र्य' व 'व्यक्तीची प्रतिष्ठा' यांना महत्त्वाचे स्थान देतो, त्यामुळे व्यक्तीवर समाजाला 'किंवा राज्यव्यवस्थेला' अवाजवी बंधने घालता येणार नाहीत. सार्वजनिक हितासाठी व्यक्ती स्वातंत्र्यावर काही मर्यादा असू शकतात. परंतु, खाजगी जीवनात व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावे असे उदारमतवाद मानतो.

१८व्या आणि १९व्या शतकात कांही उदारमतवादी विचारवंतांनी स्त्री-स्वातंत्र्याचा देखील पुरस्कार केला. पुरुषांप्रमाणे स्त्रीयांना देखील व्यक्तीस्वातंत्र्य असले पाहिजे असे मानणारा विचार म्हणजे उदारमतवादी स्त्रीवाद होय. स्वातंत्र्य, समता, व्यक्तीप्रतिष्ठा ही मूल्ये स्त्रीयांनादेखील लागू पडतात असे उदारमतवादी स्त्रीवाद मानतो.

समाजातील स्त्रीच्या दुय्यम स्थानाबद्दल आणि तिला नाकारण्यात आलेल्या स्वातंत्र्याच्या विरुध्द काही विचारवंतांनी आवाज उठविला. त्यापैकी काही निवडक उदारमतवादी स्त्रीवादी विचारवंत पुढीलप्रमाणे :-

मेरी वोल्स्टोनक्राफ्ट यांनी ''ए विंडिकेशन ऑफ दि राईटस् ऑफ वुमेन, १७९२'' या आपल्या ग्रंथात स्त्रीवादाची मांडणी केली आहे. पुरुष हा विचारप्रधान, विवेकी आणि धाडसी असतो; याउलट स्त्री ही भावनाप्रधान, अविवेकी आणि नाजूक असते, हा पारंपरिक विचार त्यांनी नाकारला. स्त्री देखील पुरुषांप्रमाणे विवेकी आणि विचारक्षम असून तिलादेखील पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्य आणि सर्व नागरी अधिकार मिळाले पाहिजेत. स्त्रीयांच्या गुलामगिरीविरुध्द तिने आवाज उठविला. इंग्लंडमधील रक्तविरहित क्रांतीने (१६८९) आणि फ्रेंच राज्यक्रांतीने (१७८९) देऊ केलेले हक्क आणि स्वातंत्र्य स्त्रीयांना देखील मिळाले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. शिक्षण आणि विकासाची संधी दिल्यास स्त्रीयादेखील पुरुषांप्रमाणे आपली क्षमता सिध्द करू शकतात असा त्यांचा दावा आहे.

जॉन स्टुअर्ट मिल याने ''सब्जेक्शन ऑफ वुमेन'' (१८६९) या पुस्तकाद्वारे स्त्रीयांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीचा प्रश्न ऐरणीवर आणला. कुटुंब संस्थेमध्ये स्त्रियांच्या पारंपरिक भूमिकांचे (माता-पत्नी-गृहिणी) खूपच उदात्तीकरण केले जाते. स्त्रीच्या व्यक्तीमत्त्व विकासाला आणि स्वातंत्र्याला बाधक ठरणाऱ्या विवाहसंस्था व कुटुंबसंस्था यावर त्याने भाष्य केले आहे. या संस्था स्त्री स्वातंत्र्य नाकारतात, त्यामुळे स्त्रीयांना गुलामगिरीचे जीवन जगावे लागते. स्त्रीमधील विविध क्षमतांना संधी नाकारली जाते. त्यामुळे स्त्रीयांचा विकास खुंटला आहे.

फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सिमॉ द बोवुवा यांनी ''दि सेकेंड सेक्स'' (१९४९) या ग्रंथातून स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. तिने (Sex Gender) या दोन शब्दातील अंतर स्पष्ट केले आहे. तिच्या मते, स्त्री आणि पुरुष यांच्यात केवळ जैविक लिंगभेद (Sex Discrimination) नैसर्गिक आहे. परंतु सामाजिक लिंगभेद (Gender Discrimination) समाजनिर्मित आहे. समाजातील लिंगभेद (Gender Discrimination) नष्ट करून स्त्रीला माणूस म्हणून वागणूक मिळाली पाहिजे. स्त्रीत्व केवळ जैविक नसून ते समाजात घडविले जाते असे मत बोवुवा यांनी व्यक्त केले आहे. पुरुषप्रधान समाजाने निर्माण केलेल्या मूल्यव्यवस्थेत स्त्रीला व्यक्ती म्हणून स्थानच दिलेले नाही. त्यामुळे अशा समाजाची बंधने झुगारून स्त्रीयांनी स्वातंत्र्य मिळविले पाहिजे.

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर बेटी फ्रेडन यांनी 'दि फेमिनाईन मिस्टिक' या ग्रंथातून अमेरिकेतील मध्यमवर्गीय सुखवस्तू कुटुंबातील स्त्रीयांच्या गुलामगिरीचे वर्णन केले आहे. त्यांना कशा पध्दतीने स्वातंत्र्य नाकारले गेले आणि त्यांच्या शोषणाचे चित्रण फ्रेडन यांनी केले आहे.

ब्रिटनमधील स्त्रियांच्या मतदानाच्या हक्कांकरिता आणि समान हक्क मिळावेत यासाठी एमिकी पॅकहर्स्ट यांनी १८८९ मध्ये 'सफ्रजेट' चळवळ राबविली. पुढे १९२० साली अमेरिकेत व १९२८ साली इंग्लंडमध्ये स्त्रीयांना मताधिकार मिळाला. स्त्रीवादी चळवळीचे हे मोठे यश होते.

दुसऱ्या जागतिक युध्दाच्या काळात अमेरिका आणि युरोपमध्ये स्त्रीयांना सार्वजनिक क्षेत्रात काम करण्याची मोट्या प्रमाणात संधी मिळाली. युध्दोत्तर काळात समान कामासाठी समान वेतन या तत्त्वानुसार महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न झाला. स्त्रीयांना सार्वजनिक क्षेत्रात संधी मिळाल्यामुळे तिचा आर्थिक विकास होण्यास मदत झाली. तथापि, सार्वजनिक क्षेत्रातील कांही विशिष्ट पदासाठी स्त्रीयांचा विचार केला गेला. उदा. शिक्षिका, परिचारिका, कारकून, खाजगी सचिव अशा भूमिका स्त्रीयांसाठी आणि अधिकार आणि जबाबदारीची पदे पुरुषांसाठी अशी विभागणी दिसून आली. त्यामुळे स्त्रीवादी चळवळीने स्त्रीयांना सर्व क्षेत्रात समान संधी मिळावी यासाठी आग्रही भूमिका घेतली.

थोडक्यात, उदारमतवादी स्त्रीवाद्यांनी स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व हक्क मिळावेत. यासाठीची भूमिका मांडली. संपत्ती, शिक्षण, व्यवसाय, मताधिकार इ. गोष्टीत स्त्रीयांना समान हक्क मिळाला पाहिजे, असा विचार त्यांनी मांडला. पुरुषप्रधान समाजाने निर्माण केलेल्या लैंगिक नैतिकतेच्या कल्पना किती पक्षपाती आहेत हे त्यांनी दाखवून दिले. तसेच या संकल्पना स्वातंत्र्य व समता या तत्त्वांच्या विरोधी जाणाऱ्या आहेत. हेही स्त्री चळवळीने सांगितले. एकमेकांच्या संमतीने होणारा लैंगिक व्यवहार निकोप आणि नैसर्गिक असू शकतो, अशी भूमिका उदारमतवादी स्त्रीवादाने घेतली.

### आक्षेप :–

१. सार्वजनिक जीवनातील स्त्रियांच्या हक्कांवर भर देणाऱ्या या स्त्रीवादाने खाजगी जीवनात स्त्रीयांच्यावर होणाऱ्या अन्यायाकडे दुर्लक्ष केले आहे.

२. समाजात केवळ राजकीय आणि सामाजिक समता प्रस्थापित केल्याने स्त्रीयांना आपले हक्क मिळणार नाहीत. त्यासाठी व्यापक वैचारिक प्रबोधनाची गरज आहे. याकडे उदारमतवादी स्त्रीवादाने दुर्लक्ष केले आहे.

३. पुरुषसत्ताक व्यवस्थेबरोबरच वर्ग, वर्ण, वंश याआधारे होणाऱ्या स्त्रियांच्या शोषणाची दखलही स्त्रीवादाने घेतली नाही.

### १.२.४.२ मार्क्सवादी स्त्रीवाद

उदारमतवादी स्त्रीवादाच्या मर्यादा लक्षात घेतल्या असता मार्क्सवादी स्त्रीवादाचा विचार महत्त्वाचा ठरतो. मार्क्सवादी स्त्रीवादाच्या मांडणीनुसार स्त्रीयांच्या शोषणाचे मूळ कारण समाजातील वर्ग रचना हे आहे. स्त्रीयांच्या शोषणाला पुरुषांचे वर्तन जबाबदार नसते, तर समाजातील सामाजिक व आर्थिक संरचना कारणीभूत असते असे मार्क्सवादी स्त्रीवादी मानतात.

१. समाजात आर्थिक आणि राजकीय विषमता असते. अशा समाजातील केवळ मध्यम आणि उच्च वर्गातील स्त्रीयांना स्वातंत्र्याचा उपभोग घेता येतो. आर्थिकदृष्ट्या उपेक्षित वर्गातील स्त्रीयांना नागरी स्वातंत्र्य मिळत नाही.

२. इतिहासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर स्त्रीयांचे शोषण जन्माला आले. हे शोषण कमी किंवा नष्ट करावयाचे असेल तर ज्या व्यवस्थेत शोषण केले जाते ती व्यवस्थाच नष्ट करावी लागते.

३. साम्यवादी समाजात प्रत्येक स्त्रीला रोजगार उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे स्त्रीयांचे आर्थिक परावलंबत्व नष्ट होईल. घरकाम व मुलांचे संगोपन ही कौटुंबिक कार्येही सामुदायिकरित्या पार पाडली जाणार असल्याने या पारंपरिक जबाबदारीतून स्त्रीया मुक्त होतील.

४. श्रमाच्या बाजारपेठेत स्त्रीयांचा सहभाग किती वाढतो आणि स्त्रीया वर्ग संघर्षात किती प्रमाणात सहभागी होतात, यावर स्त्रीमुक्तीचे यश अवलंबून आहे, असे मार्क्सवादी मानतात.

फुरिअर, रॉबर्ट ओवेन, विल्यम थॉम्प्सन, फ्रेडरिक एंगेल्स, ऑगस्ट वेवेल, क्लॅरा झेट्रकिन या विचारवंतांनी स्त्रीवादाचे विश्लेषण मार्क्सवादी दृष्टिकोनातून केले आहे.

फुरिअरने विवाहसंस्था कशी कालबाह्य झाली आहे, हे सांगून स्त्री-पुरुषातील मुक्त प्रेम, समलिंगवाद व बहुविवाहांचा पुरस्कार केला. स्वयंपाक, घरकाम आणि बालसंगोपन ही कामे सामूहिक स्वरूपात केली जावीत असे मत तिने मांडले.

रॉबर्ट ओवेनने 'न्यू मॉरल ऑर्डर' या ग्रंथात विवाह संस्था नष्ट करण्याचा विचार मांडला. विवाह संस्था ही दु:खाचे, सामाजिक विषमतेचे आणि दारिद्र्याचे कारण असून ती कृत्रिम संस्था आहे असे मत मांडले आहे.

एगेल्सने ''दि ओरिजीन ऑफ दि फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड स्टेट'' (१८४५) या ग्रंथात विवाह संस्थेचा उदय खाजगी मालमत्तेशी कसा जोडला आहे याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते, 'कुटुंबात पुरुष भांडवलदार तर स्त्री श्रमिक असते.' पुरुषांनी स्त्रीयांवर एकपतीत्व लादले. एकपतीत्व हा

विवाहाचा अनैसर्गिक प्रकार असून पुरुषप्रधान समाजाने तो स्त्रीयांवर लादला. संपत्ती पुरुषांनाच संक्रमित व्हावी अशा प्रकारची व्यवस्था विकसित करण्यात आली. त्यामुळे मालमत्ताधारक पुरुष आणि मालमत्ताविहीन स्त्रीया असे दोन वर्ग निर्माण झाले. या समाजात स्त्रीयांचे शोषण होते. उलटपक्षी, एगेल्सच्या मते, श्रमिक वर्गामध्ये मालमत्तेचा अभाव असल्याने स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य मिळते. या वर्गातील स्त्रीया स्वत: सार्वजनिक क्षेत्रात काम करत असल्यामुळे त्या पुरुषांवर पूर्णपणे अवलंबून नसतात. त्यामुळे या वर्गातील स्त्रीयांचे शोषण तुलनेने कमी होते.

मारियारोझा डोलाकास्टा यांनी मार्क्सवादी दृष्टीकोनातून स्त्रीवादाची मांडणी केली आहे. त्यांच्या मते, भांडवलशाही व्यवस्थेत स्त्रियांच्या कामाला अनुत्पादक समजले जाते. परंतु घरकाम हे केवळ गरजेचेच नाही तर 'उत्पादक' काम आहे. स्त्रीया घरात राहून श्रमिक दलाचे पुनरुत्पादनाचे काम करतात. त्यामुळे भांडवलशाहीला मजुरांचा तुटवडा पडत नाही. त्याचबरोबर घरकामापासून मुक्ती मिळाल्यामुळे पुरुष सार्वजनिक क्षेत्रात जास्त काम करू शकतात आणि उत्पादनवाढीस हातभार लावतात. म्हणजेच स्त्रीयांचे उत्पादन क्षेत्रातील योगदान मोठे आहे. परंतु त्याची दखल घेतली जात नाही. त्यामुळे स्त्री वर्गावर अन्याय होतो. यासाठी शासनाने अशा रितीने घरकाम करणाऱ्या महिलांना मोबदला दिला पाहिजे.

मागरिट बेनस्टनच्या मते, घरकामाच्या मोठ्या जबाबदारीतून स्त्रीची सुटका होत नाही, तोपर्यंत सार्वजनिक क्षेत्रात तिने काम करणे म्हणजे तिचे अधिक शोषण आहे. कारण, स्वयंपाक आणि मुलांचे संगोपन या कौटुंबिक जबाबदारीतून स्त्रीला मुक्त न करता तिला सार्वजनिक उद्योगात कामगार बनविणे म्हणजे तिचे शोषण आणखी तीव्र करणे होय. यासाठी मार्क्सवादी स्त्रीवाद घरकाम सामुदायिक रीतीने व्हावे यासाठी आग्रही असतात.

कौटुंबिक पातळीवर (Gender Discrimination) लिंग भेदावर आधारित असणारा भेदभाव सार्वजनिक क्षेत्रात देखील कसा आढळतो, यावर मार्क्सवाद्यांनी प्रकाश टाकला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील काही विशिष्ठ क्षेत्रातच (शिक्षिका, परिचारिका, खाजगी सचिव, स्वंपाकी) स्त्रीयांना संधी दिली जाते. याउलट अधिकाराची पदे (राजकारण, बँक, पोलीस) स्त्रीयांना देण्याचा समाजाचा कल दिसत नाही. याविरुध्द मार्क्सवादी स्त्रीवादी झगडतात.

### मर्यादा :-

१. पुरुषी वर्चस्ववादाच्या भावनेतून स्त्रीयांवर अन्याय होतो, स्त्रीयांचे शोषण होते, या मूलभूत गोष्टीकडे मार्क्सवादी दुर्लक्ष करतात. भांडवलशाहीत स्त्रीयांच्या शोषणाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न करतात.

२. भांडवलशाही नष्ट करून साम्यवादी (सोविएत युनियन) आणि समाजवादी राजवटी स्थापन झालेल्या देशांमध्ये देखील स्त्रीयांचे शोषण थांबलेले नव्हते. या देशातील स्त्रीयांना देखील दुय्यम स्वरूपाची वागणूक मिळाल्याचा इतिहास आहे. त्यामुळे भांडवलशाही नष्ट झाली की, स्त्री शोषण थांबेल हा आशावाद खरा नाही.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ❊

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या गृहीतकावर उदारमतवादाचे तत्त्वज्ञान आधारीत आहे.

२. 'दि सेकंड सेक्स' या ग्रंथाचे लेखक कोण?

३. 'स्त्रीत्व केवळ जैविक नसून ते समाजात घडविले जाते' हे विधान कोणाचे?

४. 'न्यू मॉरल ऑर्डर' या ग्रंथात विवाह संस्था नष्ट करण्याचा विचार कोणी मांडला?

५. मार्क्सवादी दृष्टीकोनातून स्त्रीवादाची मांडणी करणाऱ्या दोन विचारवंताची नावे सांगा.

## १.२.४.३ जहाल स्त्रीवाद

केट मिलेट, ख्रिस्तीनी डेल्फाय, जर्मेनी ग्रीअर, शुलमिथ फायरस्टोन यांनी जहाल स्त्रीवादाचा पुरस्कार केला आहे. जहाल स्त्रीवाद हा शब्दप्रयोग (Radical Feminism) या इंग्रजी संकल्पनेचा अनुवाद आहे. जहाल स्त्रीवाद हा सुसंघटित विचारप्रवाह नाही. स्त्री स्वातंत्र्याचे आणि स्त्री मुक्तीचे कट्टर समर्थन करणारा विचारप्रवाह म्हणजे जहाल स्त्रीवाद होय. स्त्री शोषण करणाऱ्या पुरुषी प्रवृत्ती विरुध्द आक्रमक लढा देऊन संपूर्ण समाजव्यवस्थाच बदलण्याचा आग्रह धरणारी ही विचारधारा आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शारीरिक, लैंगिक, भौतिक, ज्ञानात्मक, मानसिक इ. सर्व प्रकारच्या शोषणाला स्त्रीया बळी पडतात. अशा प्रकारच्या शोषणाला प्रतिकार करतो.

जहाल स्त्रीवाद १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात एक सशक्त दृष्टिकोन म्हणून पुढे आला. याकाळात पुरोगामी चळवळीत सहभागी होणाऱ्या स्त्रीयांना पुरोगामी विचार मानणाऱ्या पुरुषांकडून दुय्यम वागणूक मिळाली. तसेच कृष्णवर्णीय स्त्रीयांना कृष्णवर्णीय पुरुषांबरोबरच श्वेतवर्णीय स्त्रिया आणि पुरुषांच्या शोषणाला सामोरे जावे लागत होते. यातून जहाल व आक्रमक स्त्रीवादाचा जन्म झाला. सर्व पातळ्यांवर स्त्रीयांवर अन्याय होतो आणि त्याला प्रतिकार केला पाहिजे असे जहाल स्त्रीवादाचे मत आहे.

लैंगिक जुलूमाद्वारे होणारा सामाजिक जुलूम समजावून घेणे हा जहाल स्त्रीवादाचा हेतू आहे. प्रजोत्पादन व्यवस्था ही समाजातील पायाभूत संबंधांचे निर्धारण, नियंत्रण व नियमन करत असते. ही व्यवस्था पुरुष सत्तेचा आधार असते. शारीरिक भेद व आपल्या निर्मितीसाठी स्त्रीचे पुरुषावरील अवलंबित्व यात स्त्रीच्या शोषणाचे मूळ आहे. 'मातृत्वाच स्त्री जीवनाची कृतार्थता व इतिकर्तव्यता आहे' या तत्त्वज्ञानावर जहालवादी विचारवंतांनी हल्ला चढविला. उलट मातृत्वाशिवाय स्त्री जीवनाची असणारी उदात्तता, कृतार्थता आणि अर्थपूर्णत: याचे समर्थन केले. स्त्रीमुक्तीसाठी जीवशास्त्रीय क्रांतीची गरज जहाल स्त्रीवादींनी अधोरेखित केली.

केंट मिलेट यांनी 'सेक्सुअल पॉलिटिक्स' (१९७१) या ग्रंथात व्यक्त केलेल्या मतानुसार स्त्री आणि पुरुष यांच्यातील भेदाची जडणघडण समाजामध्ये होते. मुलगा आणि मुलगी यांचे खेळ, कपडे, केशरचना, आहार, कामे, जीवनशैली या सर्वांमध्ये पुष्कळ भिन्नता आहे. या माध्यमातून त्यांचे कार्यक्षेत्र भिन्न आहे असे त्यांच्या मनावर बिंबविले जाते. तसेच मुलांच्या आणि मुलींच्या लैंगिकतेत फरक आहे आणि मुलींची लैंगिकता दुय्यम स्वरूपाची आहे असेही बिंबविले जाते.

स्त्रीच्या प्रजननक्षमतेचे उदात्तीकरण करून तिच्या मातृत्वाचा पुरुषसत्ताक व्यवस्थेत गौरव केला जातो. जहाल स्त्रीवाद्याच्या मते गर्भारपण, बाळंतपण व मुलांचे संगोपन या गोष्टी स्त्रियांना बंधनात ठेवणाऱ्या आहेत. गर्भारपण आणि बाळंतपण या गोष्टींचे उदात्तीकरण करून त्या स्त्रीयांच्यावर लादल्या जातात. अनेकदा मातृत्व हे स्त्रीवर लादले जाते. आधुनिक काळात वैद्यक शास्त्रातील तंत्रज्ञानाचा वापर करून स्त्रीयांना या बंधनातून मुक्त व्हावे असा विचार जहाल स्त्रीवाद मांडतो. गर्भनियंत्रक साधने व कृत्रिम गर्भधारणा यांचे त्यांनी स्वागत केले आहे. ॲंड्रिया डॉर्किन या जहाल अमेरिकन स्त्रीवादीने असे म्हटले आहे की, ''स्त्री जन्मत नाही, स्त्री घडवली जाते, असे करताना तिच्यातील माणूसत्व संपविले जाते.'' "Women is not born, she is made. In the making, her humanity is destroyed."

जहाल स्त्रीवादी कुटुंब संस्थेला स्त्रीयांच्या शोषणाचे प्रतिक मानतात. कुटुंबात स्त्रीचे दुहेरी शोषण होते. तिच्या श्रमशक्तीचा कुटुंबात मोबदला गणला जात नाही. कुटुंबसंस्था स्त्रियांचे केवळ श्रम वापरते. स्त्रियांच्या कुटुंबातील कामांना 'उत्पादक' समजले जात नाही. याचा फायदा पुरुषांना होतो. ते सार्वजनिक क्षेत्रात आपले योगदान देतात. त्यांना त्याचा आर्थिक आणि सामाजिक (प्रतिष्ठा) लाभ मिळतो. स्त्रीयांना मात्र आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे घरकामाला मोबदला किंवा घरकामापासून मुक्ती हे जहाल स्त्रीवाद्यांनी ठासून सांगितले.

कुटुंबसंस्थेमध्ये स्त्रीयांचे लैंगिक शोषण होत असते. विवाहाच्या नावाखाली स्त्रीला आपल्या लैंगिकतेचे समर्पण करावे लागते. कुटुंबात लैंगिक हिंसाचार किंवा लैंगिक सुखापासून वंचितता या गोष्टींना सामोरे जावे लागते. त्यामुळे जहाल स्त्रीवाद विवाह, कुटुंब, मातृत्व या सर्व गोष्टींना स्त्री शोषणाच्या साधन व्यवस्था मानतात.

राज्यसंस्था देखील पुरुषप्रधान समाज व्यवस्थेचे द्योतक आहे. स्त्रीयांना जाणीवपूर्वक सत्तेपासून दूर ठेवले जाते. मताधिकार व सर्वोच्च पदांपासून स्त्रीयांना दूर ठेवण्याचा प्रयत्न होतो. राज्यसंस्था स्त्रियांना सत्तेच्या क्षेत्रापासून दूर ठेवते किंवा स्त्रीयांना सत्तेत माफक वाटा दिल्याचे दाखवून पुरुषांचे वर्चस्व कायम ठेवते.

## १.२.४.४ भारतीय स्त्रीवाद

प्राचीन काळापासून धर्म, रूढी आणि परंपरा यांच्या नावाखाली स्त्रीला भारतीय समाजात दुय्यम स्थान दिले गेले. तिला अनेक मानवी हक्क नाकारले गेले. तिच्या गुलामगिरीच्या जीवनाचे उदात्तीकरण करण्यात आले. त्यामुळे स्वातंत्र्य, समता, न्याय या गोष्टींपासून भारतीय स्त्री प्राचीन काळापासून वंचित रहावे लागले. इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये तिच्या शोषणाचे प्रमाण आणि स्वरूप बदलत राहिले. कांही भारतीय समाज सुधारकांना १९व्या शतकात ब्रिटिश सत्तेच्या अंमलामुळे स्त्रीयांवरील अन्यायाची जाणीव निर्माण झाली. १९व्या शतकापासून आजतागायत भारतामध्ये स्त्रीयांना समान हक्क मिळावेत, त्यांचे शोषण थांबावे यासाठी सामाजिक आणि राजकीय पातळीवर अनेक चळवळी झाल्या, अनेक सुधारणा कायदे अस्तित्वात आले या सर्वांचा आढावा भारतीय स्त्रीवादामध्ये घेणे आवश्यक आहे.

१९व्या शतकात भारतात इंग्रजी शिक्षण घेणारा एक नवीन वर्ग निर्माण झाला. शिक्षणामुळे भारतीयांना उदारमतवादी विचारांची ओळख झाली. राजाराम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर, लोकहितवादी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ गणेश आगरकर या समाज सुधारकांनी स्त्री शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, स्त्रीयांचे हक्क हे मुद्दे हाती घेऊन समाजात जाणीवजागृतीचे प्रयत्न सुरू केले. ही भारतातील स्त्रीवादी चळवळीची सुरुवात होती. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन, सांस्कृतिक सत्यधर्म इ. संस्थांनी स्त्री हक्कांसाठी प्रयत्न केले. या काळात सतीची प्रथा, विधवा विवाहावरील बंदी, केशवपन, द्विभार्या पध्दत या सारख्या स्त्रीयांचे शोषण करणाऱ्या परंपरांच्या विरोधात चळवळी सुरू झाल्या. याचा परिणाम म्हणून १८२९ मध्ये सती बंदीचा कायदा झाला, १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाहाचे विधेयक मंजूर झाले, आणि १८६० मध्ये समंती वयाची लोकहीतवादीनी छळ करणाऱ्या पतीपासून पत्नीला विभक्त होता आले पाहिजे आणि तिला पोटगी मिळाली पाहिजे असा विचार मांडला. मुलीचे लग्न वयोमर्यादा १२ वर्ष निश्चित करण्यात आली. महाराष्ट्रात महात्मा फुलेंनी आणि भारताच्या विविध भागात ख्रिश्चन मिशनरीनी स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले.

म. फुलेंनी स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाबाबत स्पष्ट भूमिका घेतली. त्यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी भारतीय समाजाने नैतिकचेचे वेगवेगळे मानदंड निर्माण केले आहेत. याविरुध्द म. फुलेंनी आवाज उठविला. लैंगिक स्वातंत्र्याच्या बाबतीत स्त्रीयांना कठोर बंधन असताना पुरुषांना मात्र लैंगिक स्वातंत्र्य होते. स्त्रीयांना भोगवस्तू म्हणून पाहिले जात. म. फुलेंच्या मते, ब्राह्मण आणि ब्रह्मणेतर. दोन्ही वर्गातील स्त्रीयांचे शोषण कसे होते हे स्पष्ट केले आहे. ब्राह्मण स्त्रीयांना कठोर

कौटुंबिक बंधनात रहावे लागत होते. तर बहुजन व दलित कुटुंबातील स्त्रीयांना कुटुंबातील पुरुषांच्या अत्याचाराबरोबर उच्चवर्णीय लोकांच्या अत्याचाराला बळी पडावे लागत. स्त्रीयांना न्याय मिळावा यासाठी म. फुलेंनी विधवा पुनर्विवाह, बालविवाह बंदी, सतीप्रथा बंदी, स्त्री शिक्षण, सत्यशोधक विवाह पध्दती इ. उपक्रम हाती घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांनी भारतातील स्त्री शोषणाला येथील धार्मिक आणि परंपरांची पार्श्वभूमी कारणीभूत असल्याचे स्पष्ट केले. मनुस्मृती, नारदस्मृती, पुराणे, रामायण, महाभारत इ.च्या माध्यमातून स्त्रीला आणि शूद्रांना गुलाम केले आहे. सती किंवा विधवा विवाहास बंदी यासारख्या अमानुष परंपरा स्त्री शोषणाला जबाबदार आहेत. शूद्र जातीतील स्त्रियांच्या लैंगिक शोषणाविरुध्द डॉ. आंबेडकरांनी आवाज उठविला. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीयांना मालमत्तेचा आणि घटस्फोटाचा अधिकार असावा याचे तर्कशुध्द समर्थन केले.

म. गांधींनी देखील भारतीय संदर्भात स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. म. गांधींच्या मते, स्त्रीयांनादेखील पुरुषांच्याप्रमाणे हक्क व स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. स्त्रीने मुक्त होणे म्हणजे पुरुषांचे अंधानुकरण करणे नाही. तर मुक्त होणे म्हणजे व्यक्ती म्हणून आत्मभान येणे, निर्भय आणि स्वावलंबी बनणे होय. कौटुंबिक जीवनात स्त्री आणि पुरुष यांच्यात मैत्रीचे नाते असावे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सामूहिक पध्दतीने पार पाडल्या जाव्यात असे गांधीची म्हणत. तसेच स्त्रीयांनी आर्थिक स्वावलंबनासाठी प्रयत्नशील रहावे, त्यामुळे स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळेल.

स्वातंत्र्योत्तर काळात राम मनोहर लोहिया यांनी स्त्री स्वातंत्र्यविषयक विचार मांडले आहेत. देशाच्या प्रगतीमध्ये स्त्री आणि पुरुष यांचे योगदान एकसमान आहे. स्त्रीयांना योनिसुचितेसारख्या शरीरविषयक रूढींच्या नावाखाली स्वातंत्र्य नाकारले जाते आणि त्याचे दमण केले जाते. स्त्री पुरुष यांच्यातील लैंगिक भेदभाव आणि स्त्रीयांचे शोषण नष्ट करण्याची गरज लोहिया यांनी मांडली.

२०व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातील स्त्रीवादी चळवळीला अनेक आघाड्यांवर यश प्राप्त झाले. राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवर विविध महिला संघटनांची स्थापना झाली. महिला आयोग अस्तित्त्वात आले. कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता देणारे कायदे निर्माण झाले. पंचायत राज संस्थामध्ये व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ३३% आरक्षणाची घटनात्मक तरतूद (१९९३) करण्यात आली. (आता हे प्रमाण ५०% करण्यात आले आहे.) शासनाच्या विविध खात्यांमध्ये महिलांसाठी आरक्षण देण्यात आले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे पोलीस, लष्कर, रेल्वे, वाहतूक व दळणवळण इ. पुरुषांची मक्तेदारी असणाऱ्या क्षेत्रामध्ये स्त्रीयांना संधी देण्यात आली आहे.

भारतातील स्त्रीवादी चळवळीच्या प्रमुख दोन मर्यादा आढळतात. भारतातील स्त्रीवादी चळवळीमध्ये मध्यमवर्गीय स्त्रीयांच्या प्रश्नाचाच विचार झाला. दलित, उपेक्षित स्त्रीयांच्या प्रश्नासाठी विशेष कार्य झाले नाही. ग्रामीण स्त्रीयांच्या प्रश्नाकडे देखील दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

वरील अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, स्त्रीवाद ही केवळ राजकीय विचारसरणी नाही. स्त्रीवाद एक चळवळ आहे, स्त्रीवाद, स्त्री व पुरुष यांच्यात चिरकाल टिकणारी समानता प्रस्थापित करणारा विचार आहे. स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त करून देणे व तिला मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीला विरोध करणे, हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे. धर्म, नैतिकता, मूल्ये या आधारे स्त्री-पुरुष यांच्यात केला जाणारा भेदभाव संपुष्टात आणणे.

### ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ❊

**(क) रिकाम्या जागा भरा.**

१. केट मिलेट यांनी ............... स्त्रीवादाचा पुरस्कार केला आहे.
   *(अ) मवाळ (ब) जहाल (क) साम्यवादी.*

२. जहाल स्त्रीवादी कुटुंबसंस्थेला स्त्रीयांच्या ............. प्रतिक मानतात.
   *(अ) विकासाचे (ब) शिक्षणाचे (क) शोषणाचे.*

३. ................ यांनी हिंदू कोड बीलासाठी आग्रही भूमिका घेतली.
   *(अ) म.फुले (ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (क) राजाराम मोहन रॉय.*

४. स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी भारतीय समाजात नैतिकतेचे ............. मानदंड आहेत.
   *(अ) एकसमान (ब) वेगवेगळे (क) एकरूप.*

## १.३ सारांश

स्त्रीवाद ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची बहुआयामी अशी संकल्पना आहे. 'स्त्रीवाद' म्हणजे नेमके काय? याबाबत अभ्यासकांचे एकमत आढळत नाही. तथापि, समाजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याचे ध्येय असणारी विचारसरणी आणि स्त्रीला समाजात दिली जाणारी दुय्यम वागणूक विरोधातील चळवळ म्हणजे स्त्रीवाद होय. पितृसत्ताक समान व्यवस्थेमध्ये स्त्रीयांचे होणारे मानसिक, लैंगिक, शारीरिक, आर्थिक आणि राजकीय शोषण यांच्याविरुध्द लढणारी चळवळ म्हणजे स्त्रीवाद (Feminism) होय.

मेरी कुलस्टोन क्राफ्टने 'दि व्हिंडीकेशन ऑफ राइट्स ऑफ वुमेन, १७९२' या ग्रंथाच्या माध्यमातून स्त्रीच्या शोषणाला वाचा फोडली. इंग्लंड, अमेरिका या देशात सुरू झालेला हा विचार हळूहळू जगभर पसरला. १९व्या आणि २०व्या शतकात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना हक्क व स्वातंत्र्य मिळावे यासाठी जगभर चळवळी सुरू झाल्या. १९६० नंतर 'स्त्रीवाद' एक प्रखर विचार म्हणून पुढे आला.

२०व्या शतकाचा उत्तरार्ध आणि २१व्या शतकाची सुरुवात या काळात स्त्रीवादाने शिक्षण, धर्म, भाषा, कला, कायदा, नैतिकता इ. घटकांचे स्त्रीच्या दृष्टिकोणातून पुर्नमांडणी केली. यातून स्त्रीवाद विषयक विविध मतप्रवाह निर्माण झाले.

उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, भारतीय स्त्रीवाद इ. काही प्रमुख स्त्रीवादी सिध्दांत विकसित झाले. या सर्व स्त्रीवादी विचारसरणीचे समर्थन करणाऱ्या विचारवंतांचा उद्देश एकच होता, परंतु मार्ग भिन्न होते. स्वातंत्र्य, समता, न्याय ही उदारमतवादाची तत्त्वे स्त्री आणि पुरुष या दोघांनाही लागू पडतात असे उदारमतवादी स्त्रीवाद मानतो. समाजातील आर्थिक व राजकीय विषमतेमुळे दुर्बल घटकातील स्त्रीयांचे शोषण होते असे मार्क्सवादी स्त्रीवाद मानतो. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शारीरिक किंवा लैंगिक या सर्व प्रकारच्या शोषणाला जहाल स्त्रीवाद प्रखर विरोध करतो. तसेच भारतीय समाजाच्या परिप्रेक्षातून स्त्रीवादाकडे पाहिले जाते. मागील दोन शतकापासून भारतीय स्त्रीयांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक उन्नतीसाठी अनेकांनी योगदान दिले आहे. यास भारतीय स्त्रीवाद म्हणतात.

## १.४ पारिभाषिक शब्द

- **वर्णभेद :** गोरे आणि काळे असा भेदभाव करणारी विचारसरणी.
- **बहुजन :** समाजातील मोठा समाज/वर्ग.
- **कृष्णवर्णीय :** आफ्रिका व अमेरिका खंडातील रंगाने काळे असणारे लोक.
- **भांडवलशाही :** खाजगीकरणाचे व उदारीकरणाचे धोरणाचे समर्थन करणारी विचारसरणी.
- **सफ्रजेट :** स्त्रीयांना मताधिकार मिळावा यासाठीची इंग्लंड व अमेरिकेतील चळवळ.
- **बहुआयामी :** विविध अर्थ ंसणारी संकल्पना.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ✻

**(अ)** १. (ब) पुरुषप्रधान.

२. (अ) मेरी वुलस्टोन क्राफ्ट.

३. (क) स्त्रीवाद.

४. (क) तीन.

## ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ❊

**(ब)** १. 'माणूस हा विवेकशील प्राणी आहे' या गृहितकावर स्त्रीवादाचे तत्त्वज्ञान आधारित आहे.

२. फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सिमॉ द बोवुवा यांनी दि सेकंड सेक्स (१९४९) हे पुस्तक लिहिले आहे.

३. सिमॉन दि बोवुवा.

४. रॉबर्ट ओवेन यांनी विवाह संस्था नष्ट करण्याचा विचार मांडला.

५. रॉबर्ट ओवेन, फ्रेडरिक एंगेल्स, ऑगस्ट वेबेल इ.

## ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ❊

**(क)** १. (ब) जहाल.

२. (क) शोषणाचे.

३. (ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

४. (ब) वेगवेगळे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

❒ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२. स्त्रीवादाचा उगम आणि विकास यांची चर्चा करा.

३. स्त्रीवादाचा उदारमतवादी सिध्दांत स्पष्ट करा.

४. स्त्रीवादीच्या मार्क्सवादी दृष्टिकोनाची चर्चा करा.

५. जहाल स्त्रीवादाची संकल्पना स्पष्ट करा.

६. भारतीय स्त्रीवादी चळवळीचा आढावा घ्या.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **भागवत, विद्युत** (१९९७) : 'महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने', समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

२. **माने, रचना** (२०१३) : 'स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरूप', अक्षर दालन, कोल्हापूर.

३. **जी. एल. शर्मा** (२०१५) : 'सामाजिक मुद्दे', रावत पब्लिकेशन, जयपूर.

४. **रासम, वासंती :** 'भारतातील महिला अधिकारांचे स्वरूप', नवज्योत, सप्टेंबर २०१४.

५. **Bhosale S. D.**: "Gender Discrimination, Role of Social Reforms and Feminist Movement in India, Navajyot, Dec., 2014.

६. **सुमंत, यशवंत :** 'स्त्रीमुकतीकडून मानवमुक्तीकडे', मिळून साऱ्याजणी, जाने ते जून, १९९९.

७. **नाईक, शोभा** (२००७) : 'भारतीय संदर्भातून स्त्रीवाद', लोकवाङमयगृह, मुंबई

८. **पाटील, भारती :** 'स्त्रीयांचा सत्तेतील सहभाग, सबलीकरण प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा.


❋❋❋

घटक-२

# बहुसांस्कृतिक वाद

घटक संरचना

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    २.२.१ बहुसंस्कृतीवादाचा विकास

    २.२.२ बहुसांस्कृतिक वादाची तत्त्वे

    २.२.३ बहुसांस्कृतीक राजकारणाच्या समस्या

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासांती आपणास-

- ❒ बहुसांस्कृतीकवाद स्पष्ट करता येईल.
- ❒ बहुसांस्कृतीकवादाची तत्वे सांगता येतील.
- ❒ बहुसांस्कृतीकवादाच्या समस्या स्पष्ट करता येतील.

## २.१ प्रास्ताविक

मानवी जीवनातील स्थित्यंतराचा विचार करताना त्याच्यामध्ये निर्माण झालेल्या अनेक व्यवस्थांचा

अभ्यास करावा लागेल. या व्यवस्थांमध्ये विविधता होती. कारण नैसर्गिक व आर्थिक गरजांच्याप्रमाणे मानवी जीवनात व्यवस्था बदलत गेलेल्या आपल्याला दिसतात. यामधूनच विविध संस्कृती जन्माला आल्या. अशा प्रकारच्या बहुसंस्कृतींचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. औद्योगिक क्रांतीनंतर जागतिक व्यवस्थेवर अनेक चांगले व वाईट परिणाम घडले. यामधून अनेक विचारांनी जन्म घेतला यामध्ये प्रामुख्याने भांडवलशाही, समाजवाद, लोकशाही समाजवाद, सत्तेचे केंद्रीकरण, विकेंद्रीकरण, उदारमतवाद इ. अशा प्रकारचे नवीन विचार समाजामध्ये रुजताना अस्तित्वात असणारी समाजव्यवस्था बाजूला सारून नवीन समाजरचना अस्तित्वात येते. मात्र नवीन समाजरचना जुन्या विचारांच्या आधारभूत तत्वावरच आधारित असते. अशा विचारांचा अभ्यास करताना वेगळ्या विषयामध्ये त्याचा अभ्यास केला जातो. मात्र आज या सर्वांची एकत्रित अभ्यास करण्याची गरज भासत आहे.

बहुसांस्कृतीवादाची सुरवात १९६० च्या दशकात झाली. प्रामुख्याने भांडवलशाही देशामध्ये ही चळवळ निर्माण होऊन तेथील व्यवस्थेला यांनी आव्हान दिले. प्रस्थापित व्यवस्थेला या चळवळीने आव्हान दिले, परंतु या दशकाला बहुसंस्कृतीवादाचे दशक मानले नाही.

## २.२ विषय विवेचन

## २.२.१ बहुसंस्कृतीवादाचा विकास

### १. प्रथम चरण :-

बहुसंस्कृतीवादाचा विकास तीन विभागात आपल्याला अभ्यासता येईल. १९४५ नंतर अमेरिकेमध्ये याचा विकास झपाट्याने झाला. याचवेळी जगामध्ये महासत्ता म्हणून अमेरिकेचा उदय झाला. मात्र भांडवलशाही विचारांचे प्रमुख पुरस्कर्ता देश अशी अमेरिकेची जागतिक प्रतिमा झाली. अमेरिकेचा शोध लागल्यापासून युरोपमधील प्रमुख देशातील नागरिक नशीब आजमवण्यासाठी किंवा उद्योगधंद्याच्या, कामाच्या निमित्ताने अमेरिकेमध्ये स्थायिक झाले. त्यांची संस्कृती व भाषा वेगवेगळी होती. अशी राजकीय, स्वाभाविक सांस्कृतिकदृष्ट्या विभिन्न असणाऱ्या लोकांच्यामधून एक अमेरिकन संस्कृती निर्माण झाली. या नागरिकांच्यामध्ये विकासाची, प्रगतीची अशी एक राष्ट्र-राज्य संकल्पना अस्तित्वात आली. यातून अमेरिकेमध्ये नागरिक एकत्र आले व एक देश आणि वेगळी संस्कृती निर्माण झाली.

अमेरिकन संस्कृतीमध्ये विविध देशामधून आलेल्या नागरिकांच्या अनेक उपसंस्कृती होत्या. संपूर्ण देश एक मानला तरी त्या उपसंस्कृती आपले अस्तित्व टिकवून होत्या. त्यांनी आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवले होते. ज्यावेळी या उपसंस्कृतींना आपल्या अमेरिकेमध्ये असणाऱ्या अस्तित्वाची जाणीव झाली. त्यावेळी अमेरिकेमध्ये देशविरोधी चळवळ मूळ धरू लागली. कारण त्यांना त्या समाजात

मिळणाऱ्या वागणुकीचे चटके बसत होते. वर्णद्वेषविरोधी चळवळ, कृष्णवर्गीयांच्या नागरी हक्कांसाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करू लागली. यामध्ये प्रमुख मार्टीन ल्यूथर कींग होते. यावरूनच असे म्हणता येईल की, बहुसंस्कृतीवाद आणि त्या दृष्टिकोणातून समाजामध्ये होणारे राजकारण देशातील प्रस्थापित सांस्कृतिक वादाला विरोध म्हणून निर्माण झालेला प्रतिवाद होता. एका संस्कृतीतील विचारधारेमुळे राष्ट्र अस्तित्वात आले. म्हणजेच राष्ट्र निर्माण होण्यासाठी ती विचारधारा प्रमुख होती. राष्ट्र निर्माण झाल्यानंतर त्या विचारांचे काटेकोर पालन झाले. त्याला विरोध म्हणून काही कालावधीनंतर बहुसंस्कृतीवादाचा जन्म झाला. अमेरिकेमध्ये वर्णविद्वेषातून बहुसंस्कृतीवादाचा जन्म झाला. बहुसंस्कृतीवादाच्या प्रभावामध्ये प्रथम चरणामध्ये मार्टीन ल्यूथर कींग यांचा प्रभाव दिसतो. अर्थातच त्यांनी यासाठी संघर्ष व्यवस्थेच्या विरुध्द शांततामय चळवळीचा मार्ग स्विकारला. यामधूनच त्यांनी कृष्णवर्णियांसाठी नागरी हक्काची मागणी अधिक प्रभावी बनविली. त्यामधून त्यांची राजकीय, सामाजिक वाटचाल सुरू झाली.

## २. द्वितीय चरण :-

अमेरिकेमध्ये मार्टीन ल्यूथर कींग यांनी वर्णविद्वेषाविरुध्द जी चळवळ निर्माण केली ती शांततामय मार्गाचा वापर करून चालू केली होती. त्यानंतर या चळवळीचे रूपांतर जहालवादी चळवळीमध्ये झाले. या चळवळीमध्ये शांततामय मार्गाचा अवलंब कमी होऊन ब्लॅक पँथर या संघटनेचा उदय अमेरिकेसारख्या बहुसंस्कृती असणाऱ्या देशामध्ये निर्माण झाला. यामध्ये प्रामुख्याने आफ्रीकन व मुस्लीम तरुणांचा सहभाग होता. म्हणजेच ब्लॅक पँथर या संघटनेत कृष्णवर्णियांबरोबरच मुस्लीम जाणीवा जागृत झालेल्या तरुणांचा सहभाग देखील होता. अशा प्रकारे अमेरिकन संस्कृतीला वेगवेगळ्या सांस्कृतीक विचारांनी प्रेरित झालेल्या इतर संघटनांनी विरोध करण्यास सुरवात केली. मात्र या चळवळींना अमेरिकन संस्कृतीविरुध्द बहुसंस्कृतीनी केलेला विरोध असे या काळात तेथील विचारवंतांनी मानले नाही. कारण त्यांच्या मते, राष्ट्रनिर्मितीची संस्कृती हा एक घटक असून वर्णवंशविरोधी चळवळी, ब्लॅक पँथरसारख्या चळवळी स्वत:चे अस्तित्व जाणवून देण्यासाठी निर्माण झाल्या आहेत. याचा बहुसांस्कृतिक चळवळीशी फारसा संबंध नाही. वास्तविक पाहता ही चळवळ म्हणजे अमेरिकेच्या राष्ट्रीयत्वाच्या विचारामध्ये दबलेला विचार होता. जरी याला फारशी किंमत दिली गेली नाही तरी जगाच्या दृष्टीने एक संस्कृतीच्या विरुध्द बहुसंस्कृतीवादाच्या चळवळीची ती सुरवात होती.

१९७० च्या दशकामध्ये विकसित देशामध्ये अनेक वांशिक, सांस्कृतिक व राष्ट्रवादाच्या आधारावर चळवळी निर्माण झाल्या. अनेक देशामध्ये याचा प्रभाव जाणवला. यालाच बहुसांस्कृतिक राष्ट्रवाद असे म्हणतात. उदा. कॅनडामध्ये क्युबेक प्रांतात फ्रेंच भाषिकांनी स्वत:च्या फ्रेंच राष्ट्रवादाचे समर्थन केले व कॅनडाकडून स्वायतत्तेची मागणी केली. कारण कॅनडा सरकारकडून त्यांचे हितसंबंध जपले जात नाहीत असे त्यांना वाटत होते. कॅनडासारखेच इंग्लंडमध्ये स्कॉटीश व वेल्समध्ये राष्ट्रवादाच्या चळवळीने जोर धरला होता. स्पेनमध्ये कॅटालानिया व बस्क प्रांतामध्ये विभक्त चळवळी याच जोरावर निर्माण झाल्या.

फ्रान्समध्ये स्कॉटिश राष्ट्रवादी चळवळ, बेल्जियममध्ये क्लॅन्डर्सची चळवळ, ऑस्ट्रेलियामध्ये आदिवासी (मूळनिवासी), न्यूझीलंडमध्ये माओनिस्ट नावाची चळवळ जी आहे त्या याच बहुसांस्कृतिक वादातून निर्माण झालेल्या चळवळी आहेत.

थोडक्यात, १९७० नंतर जगामध्ये विकसित राष्ट्रांमध्ये वांशिक राष्ट्रवाद, वांशिक सांस्कृतिक ओळख या राजकीयदृष्ट्या स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत होत्या, त्यामुळेच १९९० नंतर जो वांशिक, सांस्कृतिक राष्ट्रवादाचा जो उदय झाला, त्याचे मूळ कारण बहुसांस्कृतिक वाद असल्याचे दिसते.

## ३. तृतीय चरण :–

### (अ) युरोपातील बहुसंस्कृतीवाद :–

साधारणपणे १९९० नंतर बहुसांस्कृतिक वादाचा तिसरा टप्पा सुरू झाला. दुसऱ्या महायुद्धामध्ये दोस्त राष्ट्रे जिंकली असली तरी त्यांची अर्थव्यवस्था रसातळाला गेली होती. त्यामधून सावरण्यासाठी त्यांना अमेरिकेने हातभार लावला, त्यामधूनच नव्या स्वरूपाचे औद्योगिक वातावरण युरोपात जन्माला आले. यासाठी लागणारे मनुष्यबळ तिसऱ्या जगातील देशांकडून उपलब्ध करण्यात येऊ लागले. त्यामुळे विकसनशील देशांकडून खूप मोठ्या प्रमाणात युरोपकडे लोकांचे स्थलांतर सुरू झाले, त्याच्याबरोबर त्यांच्या संस्कृतीचे देखील स्थलांतर होत होते. १९९० ते २००० या काळात त्यांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले. त्यांचे युरोपमध्ये संस्कृतीप्रमाणे एकत्रीकरण होऊ लागले, यामुळेच राजकीय जागृती निर्माण झाली व ते प्रतिनिधीत्वासाठी आणि हक्कांसाठी संघर्ष करू लागले. याचा परिणाम एका सांस्कृतिक आधारावर निर्माण झालेल्या देशांच्यावर झाल्यामुळे या देशांनी स्थलांतरितांच्यावर कायदे कडक बनविले. कारण तिसऱ्या जगातील देशामधून लोक कामानिमित्त युरोपकडे स्थलांतरित होतात, त्यानंतर त्याठिकाणी स्थिरावून स्वत:ची ओळख निर्माण करतात व स्वत:ची संस्कृती जपतात. यावरून असे लक्षात येते की, १९९० नंतर स्थलांतरित कामगारांच्या रूपाने एका संस्कृतीने अस्तित्वात असलेल्या राष्ट्राला स्थलांतरित कामगारांच्या संस्कृतीने बहुसंस्कृती वाद वाढीस लागला.

थोडक्यात, तिसऱ्या जगातील राष्ट्राकडून विकसीत राष्ट्रांच्याकडे कामगारांचे स्थलांतर होऊन युरोपमध्ये वेगवेगळ्या सांस्कृतिक ओळखी निर्माण झाल्या, असे गट राजकीयदृष्ट्या जागृत असल्यामुळे युरोपमध्ये बहुसांस्कृतिकवाद सुरू झाला.

### (ब) औद्योगिक भांडवलशाही बहुसांस्कृतिक वाद :–

१९९० नंतर भांडवलशाहीच्या विकासास जोम चढला, कारण साम्यवादी सोविएत रशिया नष्ट

झाला, याचा परिणाम उद्योगधंद्यावर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात तेजी आली. त्यासाठी कामगारांची गरज भासू लागली. कामगारांना प्रोत्साहन देण्यासाठी भांडवलदारांनी त्यांना बोनस, कायम नोकरी, घरे, आरोग्य केंद्रे, मुलांसाठी शाळा या सुविधा उपलब्ध करून दिल्या. या सुविधा केवळ सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दिल्या नाहीत तर त्यांना कामगारांची गरज होती. या औद्योगिक भांडवलशाहीच्या नंतरच्या खंडात म्हणजेच उत्तर औद्योगिक भांडवलशाहीत तंत्रज्ञानात प्रगती झाली. परिणामी, कामगारांचे महत्त्व कमी झाले. कामगार बेकार बनले. त्यामुळे बेकार झालेले कामगार पुन्हा कामाच्या शोधात स्थलांतरित झाले. यावेळी ते वेगवेगळ्या खंडात गेले. ज्या ठिकाणी ते स्थीर होतील त्याठिकाणी पुन्हा सांस्कृतिक प्रश्न निर्माण होऊन बहुसांस्कृतीकवादाचा प्रभाव निर्माण झाला आहे.

### (क) साम्यवादी देशाचा अस्त व बहुसांस्कृतीकवाद :–

साम्यवादी तत्त्वज्ञानावर आधारीत देश १९९० नंतर आपले अस्तित्व टिकवू शकले नाहीत. त्यामुळे या देशातील वांशिक व धार्मिक गटांना आपले अस्तित्व दाखविण्याची संधी मिळाली. यामध्ये रशिया, युगोस्लाव्हिया, झेकोस्लाव्हिकीया या देशांचा समावेश होता. यामुळे त्यांच्या राष्ट्र या संकल्पनेला धोका निर्माण झाला. कारण प्रत्येक गटाने आपली सांस्कृतीक ओळख जपत बहुसांस्कृतीक वादाकडे वाटचाल सुरू केली. यामुळे अनेक लोकांना देश सोडावा लागला. यामुळे निर्वासीतांचा प्रश्न निर्माण झाला, जे राष्ट्र कोसळले त्या ठिकाणी हा प्रश्न निर्माण झाला. निर्वासित सर्व जगभर पसरत गेले. ज्या ठिकाणी योग्य जागा मिळेल त्या ठिकाणी स्थिरावले. यामधून अशा प्रकारे बहुसांस्कृतिक वाद वाढीस लागला.

### (ड) भारत व बहुसांस्कृतीक वाद :–

भारतासारख्या देशाचा बहुसांस्कृतीक वादाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास भारतीय समाजात विविध प्रकारची विविधता आढळते. अनेक संस्कृतीचा प्रभाव असणारे गट याठिकाणी आढळतात. परंतु भारतीय राज्यघटनेने भारतातील बहुसांस्कृतीक राज्ये म्हणून घोषित करतील किंवा स्वतंत्र अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न करून त्या दृष्टिकोणातून कायदे करतील, त्यापेक्षा कितीतरी व्यापक दृष्टिकोन ठेवून १९५० च्या दशकामध्ये घटनाकारांनी राज्यघटना निर्माण केली होती. त्यामुळे इतक्या विविधतेने नटलेला, विविध संस्कृतीने निर्माण झालेल्या भारतासारख्या देशात बहुसांस्कृतीकवाद ही समस्या म्हणून समोर उभी राहिली नाही.

## २.२.२ बहुसांस्कृतिक वादाची तत्त्वे

### १. वसाहतवादी विचार :–

फ्रॅन्स फॅनन, महात्मा गांधी, एडवर्ड सईद या विचारवंतानी उत्तर वसाहतवादी विचारांचा पुरस्कार

केला. पाश्चात्य देशांनी विशिष्ट विचारांच्या आधारे त्यांनी तिसऱ्या जगावर राज्य केले. साम्राज्यवादी हुकूमत प्रस्थापित केली. त्यामुळे तिसऱ्या जगातील समाजाचे शोषण झाले. म. गांधीच्या रूपाने सर्वप्रथम या साम्राज्यवादी प्रवृत्तीला तडा गेला. त्यांनी अहिंसेच्या मार्गाने साम्राज्यवादी सत्तेला आव्हान दिले. साम्राज्यवादी विचारांनी तिसऱ्या जगातील समाजावर ते मागास असल्याचे बिंबवले. ख्रिश्चन धर्माच्या माध्यमातून सभ्यता शिकविण्यासाठी, मानवाची सेवा करणारा धर्म अशी ओळख पटविण्यात ते यशस्वी झाले. इतर धर्मापेक्षा आपला धर्म श्रेष्ठ आहे. आपल्या धर्मामध्ये कर्मकांडाना महत्व नाही. आपण जगामध्ये जगण्यासाठी आलो असून मिळवायचे आहे ते स्वर्गात आहे ते या जगापासून दूर आहे. अशाप्रकारे ते तिसऱ्या जगातील समाजाची मानसिकता तयार करत असत. उलट वसाहतवादी राष्ट्रवादाचा प्रसार करताना भारतीय संस्कृती अध्यात्मवादी असून पाश्चात्य संस्कृती भौतिकवादी आहे. आपला अभिजनवर्ग ते लगेच स्विकारतो. पाश्चात्य देशात मात्र असे न करता चिकित्सा केल्याशिवाय कोणतीही गोष्ट स्विकारत नाहीत. हा वसाहत वादातील भाग साम्राज्यवादापेक्षा वेगळा आहे. कारण साम्राज्यवादामध्ये केवळ राजकीय सत्ता हे ध्येय असते. याउलट वसाहतवादामध्ये मानवाच्या मनाचा कब्जा करून मानवाची वेगळी मानसिकता तयार केलेली असते.

फ्रॅन्स फॅनन यांच्या मते, वसाहतवादी विचारसरणीने आपली पकड घट्ट करत असताना रक्तपात न करता रक्त न दिसणारी हिंसा केली. याचे परिणाम समाजात भयानक झाले. यासाठी त्यांनी वसाहतवादाला हिंसेच्या मार्गाने विरोध करावा असे सांगितले. गांधी व फॅनन याच्यामध्ये हा महत्त्वपूर्ण फरक आहे. कारण त्यांच्यामते, स्वत:मध्ये दबलेले अस्तित्व आपण जोपर्यंत खुलेपणाने मांडत नाही तोपर्यंत सर्व नष्ट होऊन जाईल. यासाठी त्यांना सांस्कृतीक श्रेष्ठता मान्य नाही.

एडवर्ड सईद यांनी पौर्वात्य वादामध्ये जे समजले, जे दिसले, जे कळले ते त्यांनी अंतिम सत्य म्हणून सांतिगले. पण ते अविचाराने मान्य केले. यालाच वसाहतिक मानसिकता म्हणता येईल. याची चिकीत्सा न केल्यामुळे याचे सत्यात रूपांतर होते. म्हणजेच ज्यावेळी आपण महासत्ता बनण्याचा विचार करतो, त्यावेळी गुणवत्तेचा विचार न करता आपण एखाद्या वसाहतीक विचारांचे अनुकरण करतो. असे न करता वसाहतवादाची बांधणी करत असताना स्वत:चे अस्तित्व स्वत: शोधणे गरजेचे आहे.

वरील विचारवंतांच्या विचारातून असे समजते की, उत्तर वसाहतवाद युरोपीय केंद्रीकरणाच्या विरोधात संघर्ष करतोय. यामुळे युरोपीय सांस्कृतीक आक्रमणाला विरोध होऊन बहुसांस्कृतीकवादाला योग्य वातावरण निर्माण होते. यामधून भिन्न सांस्कृतीक वादाला योग्य वातावरण निर्माण होते. यामधून भिन्न सांस्कृतीक गट तयार होऊन ते आपले सांस्कृतीक अस्तित्व टिकवितो. यावरून एक स्पष्ट होते की, युरोपीय विचारांना बाजूला सारून तिसऱ्या जगातील बहुकेंद्रीत संस्कृती आधारित समाजाची निर्मिती झाली.

## २.  मानवाची ओळख :-

मानवाची ओळख हे बहुसांस्कृतीक वादाचे महत्वाचे तत्व आहे. मानव आपल्या संस्कृतीची ओळख जपतो. त्याच्या अहंपणामधून अस्मिता निर्माण होते. बहुसांस्कृतीक वाद्यांच्यामते, राजकारणात मानव दोन स्वरूपात वावरत असतो. यामध्ये त्याची व्यक्तीगत ओळख असते. त्याचबरोबर दुसरी समाजातील ओळख असते. ही सामाजीक ओळख मानवाला संस्कृती देत असते. त्यामुळेच मानव संस्कृतीप्रमाणे वर्तन करतो व संस्कृतीवर प्रेम करत असतो. हीच त्याची सांस्कृतीक ओळख असते. त्यामुळेच मानव व सामाजिकता यांना जोडणारी संस्कृती असते, असे बहुसांस्कृतीकवादाचे मत आहे.

उदारमतवादी विचारसरणीच्या मते, व्यक्ती निर्गुण व निराकार आहे. मात्र बहुसांस्कृतीक विचारवंताच्या मते, मानवाच्या सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक ओळखी असतात. मानवाची समाजातील ओळख अशाच प्रकारची असते. सामाजिक रूपातून मानवाची संस्कृती जाणवते. यातून त्याची सांस्कृतिक ओळख तयार होते. यामधून स्वत:च्या धर्माचा, संस्कृतीचा मानव भेटला तर नातेसंबंध तयार होऊन मानवामध्ये बंधुभाव तयार होतो. यामुळेच बहुसांस्कृतिक वादयांच्या मते, व्यक्तीला जन्मत: प्राप्त होणाऱ्या हक्काबरोबर सांस्कृतिक हक्क दिले पाहिजेत. यामुळे राजकीय क्षेत्रात बहुसंस्कृतीमुळे बदल होतील. आतापर्यंत भौतिक, आर्थिक प्रश्नासाठी लढणारे घटक सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रासाठी एकत्र येतात. राजकारणामध्ये हे प्रकर्षाने जाणवते. यामुळेच राजकीय पक्षांनी देखील धार्मिक व सांस्कृतिक प्रश्नाकडे जास्त लक्ष दिले जाऊ लागले. राजकारणामध्ये प्रत्येक गट आपली संस्कृती व ओळख प्रकर्षाने मांडतात.

## ३.  अल्पसंख्याकांचे अस्तित्व :-

वास्तविक बहुसंख्याकांमध्ये अल्पसंख्यांकाचा आवाज, भाषा, दाबण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु आपण कोणत्याही अनोळखी वातावरणात गेल्यास आपणास असुरक्षित वाटू लागते. त्या काळात आपण अल्पसंख्यांक असतो. यावरून आपल्याला समाजात कायमस्वरूपी अल्पसंख्यांक असणाऱ्या घटकाची मानसिकता लक्षात येते. म्हणून बहुसंस्कृतीवाद अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे समर्थन करतात. किलीमी कॅकच्या मते, समाजाने अल्पसंख्यांकाचा स्वंशासनाचा हक्क मान्य केला आहे. भारतामध्ये अशाच प्रकारे काश्मीरमध्ये अल्पसंख्यांकांचना हक्क दिला आहे. यामधून बहुसांस्कृतीवादाची लक्षणे दिसतात. भारतात धर्मनिरपेक्षतेचे तत्व घटना निर्मितीच्या अगोदरपासून अंमलात आणले. कॅनडा, ऑस्ट्रेलिया या देशात १९९० नंतर अंमलात आणले. स्वंशासनाचे आविष्कार वेगवेगळे असू शकतात. ज्याप्रमाणे संघराज्याच्या चौकटीत सांस्कृतीक समूहाना अधिकार दिले आहेत. उदा. मुस्लीम धर्मामध्ये शिया व सुन्नी असे वेगवेगळ्या प्रकारे आपले अस्तित्व दाखवितात.

युरोपीय देशांना हा फुटीरतावाद वाटतो. यामुळे राष्ट्रवादाला आव्हान दिले जाते. यासाठी

किलमीकॅकच्या मते, अल्पसंख्यांकांना संघराज्याच्या चौकटीत सत्तेची विभागणी करून स्वायत्तता द्यावी, त्यांना स्वतंत्र भूमी उपलब्ध करून द्यावी. परंतु बहुसांस्कृतिक व अल्पसंख्यांकाच्या बाबतीत ते घातक आहे. याचबरोबर किलमी कॅकच्या मते, अल्पसंख्यांकांना सांस्कृतिक विविधता मान्य करून त्यांचे रीतीरिवाज, भाषा, शिक्षण याबाबतचे हक्क मान्य करावेत. भारताने घटनेच्या २८ व २९ कलमामध्ये अल्पसंख्याकांचे हक्क मान्य केले आहेत. यावरून भारतामध्ये बहुसांस्कृतिक वाद मान्य केला आहे. परंतु यामधून धार्मिक मूलतत्ववाद व निधर्मी विचारसरणी यामध्ये वाद निर्माण होतो. परंतु यामधून देखील मूलतत्त्वामध्ये असणारी सांस्कृतिक विविधता बहुसांस्कृतीक वादाने मान्य केली आहे.

### ४. सांस्कृतीक विविधता :-

आभिजात उदारमतवादाच्या मते, मानव वेगवेगळ्या प्रवृत्तीचा असतो. त्यांच्यात मतभिन्नता असते. मात्र बहुसांस्कृतीक वादाच्या मते, प्रश्न केवळ सहिष्णुता जोपासण्याचा नाही तर त्यांना मनापासून मान्यता मिळते का हे महत्त्वाचे आहे. अल्पसंख्याकाना दिली जाणारी मोकळीक उपकाराच्या भावनेतून नसावी. त्यांचे अस्तित्व मान्य करावे व ते जोपासावे. याचबरोबर वेगवेगळ्या संस्कृतीची जपणूक करण्याची सहिष्णुता बाळगावी. त्यांना हक्क दिले जावेत. असे मत बहुसांस्कृतिकवादाचे पुरस्कर्ते चार्लस् टेलर यांचे मत आहे. विविधतेमुळे एकात्मतेला बाधा येत नाही तर ते जास्त घट्ट होते. यामुळेच विविधतेतून एकता हे बहुसांस्कृतीक वादाचे तत्त्व आहे. सांस्कृतीक समूहांना राजकीय ओळख देताना त्यांना राजकीय हक्क द्यावेत. यामुळेच अल्पसंख्याकांना हक्क देण्याचा विचार केला जाईल.

## २.२.३ बहुसांस्कृतिक राजकारणाच्या समस्या

### १. आर्थिक व सामाजिक समस्या :-

एक संस्कृती राष्ट्रामध्ये अनेक समूह कार्यरत होते, त्यांच्या संस्कृतीमध्ये विविधता होती. त्यामुळेच त्या व्यवस्थेमध्ये समाजातील या वेगवेगळ्या समुहाचे आर्थिक व सामाजिक शोषण होत होते. समाजातील असे शोषित गट एकत्रित येऊन स्वत:चे अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न त्या व्यवस्थेमध्ये करू लागले व यामधून या विविध संस्कृती मानणाऱ्या या विविध संस्कृती मानणाऱ्या गटांमुळे बहुसांस्कृतीक वादाचा जन्म झाला. उदा. कृष्णवर्णियांना असे वाटू लागले की, त्यांच्यावर गोऱ्या लोकांचे वर्चस्व आहे. ते आपले शोषण करत आहेत. अमेरिकन स्वातंत्र्य संघर्षामध्ये कृष्णवर्णियांचा सहभाग होता, मात्र अशा ठिकाणी त्यांचे अधिकार दडपले जातात. हा अमेरिकेमध्ये गोरे व कृष्णवर्णियांच्यामध्ये संघर्षाचा मुद्दा बनला. कृष्णवर्णियांनी प्रस्थापित व्यवस्थेशी विद्रोह करून सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षमता बदल संघर्ष पुकारला व स्वत:च्या संस्कृतीची संकल्पना पुढे आणली म्हणजेच हा संघर्ष सामाजिक व आर्थिक हितसंबंधांविरुध्द होता.

## २. वांशिक दमणाची समस्या :-

अमेरिकेसारख्या एकसंस्कृती राष्ट्रामध्ये विविध सांस्कृतिक गट सामाजिक व आर्थिक अन्यायाविरुध्द संघर्ष करत होते. त्याचबरोबर वांशिक हिंसा, दहशत, दमण यांच्या विरोधात देखील त्याचा लढा सुरू होता. वांशिक दमणाविरुध्द लढून ते दमण व दहशतीमधून मुक्त होण्यासाठी मुक्ती मिळविण्यासाठी राजकारण करत होते. अमेरिकेत सुरू झालेल्या चळवळीचे लोण सगळ्या जगभर पसरले. तिसऱ्या जगामध्ये याचे अस्तित्व जास्त जाणवते. अमेरिकेमध्ये १९७० च्या दशकात दलित पँथरचा उदय झाला, त्याप्रमाणे भारतातदेखील दलितांची मते स्वतंत्र आहेत, आपले स्वतंत्र अस्तित्व दाखविण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेवर दबाव आणण्यासाठी, समाजातील परावलंबित्व संपविण्यासाठी दलित पँथरची स्थापना केली. ही चळवळ मुक्तीसाठीची होती. त्यामुळेच १९७० च्या दशकातील उठाव, विद्रोही व मुक्तीदायी राजकारणाचे प्रेरक अमेरिकेतील वर्णद्वेषाविरोधी सुरू झालेली चळवळ होती.

## ३. भांडवलशाहीच्या राजकारणाची समस्या :-

१९९० नंतर केवळ विद्रोही शक्तीच्या आधारावर बहुसांस्कृतीक वाद आधारलेला नव्हता. या बहुसांस्कृतीक वादामध्ये वित्तीय भांडवलशाही राजकारण करताना दिसते. सामाजिक व राजकीय संस्कृतीचे समर्थन या भांडवलशाही कडून करून हा भांडवलदार वर्ग सांस्कृतीक गुंतवणूक करून स्वत:चे सांस्कृतीक भांडवल निर्माण करत आहे. प्रामुख्याने हे तिसऱ्या जगातील देशात जाणवते. कारण या ठिकाणी सांस्कृतीक विविधता आहे. अशा सांस्कृतीक गटांना एकत्रित आणण्यासाठी वित्तीय भांडवलदारांकडून सांस्कृतीक व वांशिक महोत्सव साजरे केले जातात. हे वांशिक समूह अशा भांडवलदारांच्या आधारे आपले अस्तित्व टिकवून ठेवतात. यामधून विविध सांस्कृतीक गट दिसून येतात. बहुसांस्कृतीक वादामध्ये त्यांचे अस्तित्व जाणवते. त्यामुळेच १९७० व १९९० या सालामध्ये बहुसांस्कृतीक राजकारणामध्ये गुणात्मक फरक आहे.

### ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न ❊

१. बहुसांस्कृतीक वादाची सुरवात ............. देशात झाली.

२. बहुसांस्कृतीक वादाची सुरवात ............. दशकात झाली.

३. युरोपमधील बहुसांस्कृतीक वादाची सुरवात .............. स्थलांतराने झाली.

४. १९९० नंतर बहुसांस्कृतीक वाद ................ च्या पाडावाने जास्त जाणवू लागला.

५. ................ या तत्वाने राष्ट्रीय एकात्मतेसाठी बहुसांस्कृतीक वादाचा उपयोग होतो.

## २.३ सारांश

मानवी जीवनातील स्थित्यंतराचा विचार करताना अनेक संस्कृतीच्या मिश्रणातून तयार झालेले मानवी जीवन त्यांच्यामध्ये चालत आलेल्या प्रथा, याबरोबरच मानवाने एका संस्कृतीमधून दुसऱ्या संस्कृतीमध्ये वाटचाल करताना मागील संस्कृतीमधील प्रथा, परंपरा, रूढी जतन करत स्थलांतरित झाल्यानंतरसुद्धा त्यांचे केलेले प्रामाणिक जतन, यामुळे वेगवेगळ्या संस्कृती एकत्रित येऊन मानवी जीवन प्रगती करताना आपले जुने अस्तित्व टिकवून एका नवीन संस्कृतीला जन्म देताना दिसतात. जगात विविध ठिकाणी अशा प्रकारच्या संस्कृती एकत्रित नांदताना आपल्याला दिसतात.

प्रामुख्याने १९४५ नंतर अमेरिकेमध्ये बहुसांस्कृतिक वादाचा झपाट्याने विकास झाला. अनेक विविध संस्कृती एकत्रित येऊन अमेरिका एक देश निर्माण झाला. काळे व गोरे अशा प्रकारच्या वर्णविश्लेषणातून अमेरिकेमध्ये बहुसंस्कृतीवादाचा जन्म झाला.

१९७० नंतर जगामध्ये विकसित राष्ट्रात वांशिक राष्ट्रवादाचा उदय झाला. त्यांनी राजकीयदृष्ट्या आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले, याची सुरुवात बहुसांस्कृतिक वादामध्ये आढळते.

१९९० नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अविकसित व विकसनशील राष्ट्रांकडून खूप मोठ्या प्रमाणात युरोपमध्ये कामासाठी लोकांचे स्थलांतर होऊ लागले. यामुळेच अशा लोकांच्याकडून आपल्या संस्कृतीचे जतन होऊन युरोपातील बहुतेक राष्ट्रांमध्ये बहुसांस्कृतिक वाद जोपासला जाऊ लागला. बहुसांस्कृतिकवादाचा प्रभाव भांडवलशाही देशाच्यामध्ये कामगारांच्या स्थलांतरामुळे व अस्थिर राजवटींच्या परिणामामुळे जास्त झाला. साम्यवादी व्यवस्थेच्या नष्ट होण्यानंतर निर्माण झालेल्या रशिया व इतर देशात बहुसांस्कृतिकवाद जोमाने फोफावला व त्यामुळे त्यांच्या राष्ट्रीयत्वाला धोका पोहचला. भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेमध्ये विविध धर्म व संस्कृतीच्या अस्तित्वाला मान्यता दिल्यामुळे बहुसांस्कृतिक वादाचा फारचा धोका उत्पन्न झाला नाही.

बहुसांस्कृतिक वादाच्या राजकारणामध्ये अलीकडे विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. ज्या संस्कृतीमध्ये आर्थिक संपत्तीची केंद्रे एकत्रित झाली होती त्या ठिकाणी इतर संस्कृतीच्या लोकांचे शोषण होऊन शोषित व शोषक आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करू लागले. विविध देशांमध्ये वांशिक गट आपले अस्तित्व टिकविण्यासाठी एकत्रित येऊन आपली संस्कृती टिकवून ठेवत. भांडवलशाही व्यवस्थेत देखील प्रत्येक गटाचे किंवा संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्याचा भांडवलदारांकडून प्रयत्न केला जातो. यामुळे बहुसांस्कृतिक वादाचे अस्तित्व जास्त प्रखरपणे जाणवू लागले.

## २.४ पारिभाषिक शब्द

- **भांडवलशाही देश :** खाजगी संपत्तीच्या मालकीचे समर्थन करणारे देश.

- **राष्ट्र–राज्य संकल्पना :** १९४५ नंतर साम्राज्यवादी व वसाहतवाद नष्ट झाला व नवीन देश अस्तित्वात आला.
- **वर्णद्वेष विरोधी चळवळ :** काळे–गोरे असा भेद करून काळ्या वर्णाच्या लोकांचे शोषण केले जात होते त्या विरोधातील चळवळ.
- **ब्लॅक पँथर संघटना :** अमेरिकेत गोऱ्या लोकांच्या विरोधात आफ्रिकन व मुस्लिम तरुणांनी निर्माण केलेली संघटना.

## २.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. अमेरिका.

२. १९६०.

३. कामगारांच्या.

४. सोविएत रशिया.

५. विविधतेतून एकता.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

१. बहुसांस्कृतीक वादाच्या विकासाचे टप्पे सांगा.

२. बहुसांस्कृतीक राजकारणाच्या समस्या सांगा.

३. बहुसांस्कृतीक वादाची तत्त्वे सांगा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **Bhargava R., Bagchi A. K., Sudarshan R.**, *"Multiculturalism, Liberalism and Democracy"*, Oxford University Press, New Delhi.

❋❋❋

घटक–३

# पर्यावरणवाद

## (Environmentalism)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ पर्यावरणवादाच्या उदयाची कारणे
- ३.२.२ पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये
- ३.२.३ पर्यावरण संरक्षण आणि जागतिक प्रश्न
- ३.२.४ जागतिक तापमानवाढ (Global Warming)

३.३ सारांश

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये

१. विद्यार्थ्यांना पर्यावरण, पर्यावरणशास्त्र, पर्यावरणवाद यासारख्या संकल्पनांची ओळख करून देणे.

२. पर्यावरणवादाच्या उदयाच्या कारणांचा अभ्यास करणे.

३. पर्यावरणवादाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

४. पर्यावरण संरक्षणासाठी करण्यात येणाऱ्या जागतिक प्रयत्नांची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.

५. जागतिक तापमान वाढ- कारणे, परिणाम व उपाययोजना यांची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे.

६. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणसंरक्षणासंबंधीची जाणीव जागृती निर्माण करणे.

## ३.१ प्रास्ताविक

मानवी हस्तक्षेपामुळे आज पृथ्वीवरील पर्यावरणीय समतोल ढासळत चालला आहे. त्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत की, ज्यामुळे पृथ्वीवर नैसर्गिक साधन संपत्ती, मानवी समाज यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पर्यावरण समस्या वैश्वीक स्वरूपाच्या आहेत. वाढती लोकसंख्या, मोठ्या प्रमाणात वाढलेले शहरीकरण, औद्योगिकीकरण, बेसुमार जंगलतोड, वाढती वाहनांची संख्या, चंगळवादी जीवन पध्दती आणि पर्यावरण संरक्षणवषियक दृष्टिकोनाचा अभाव या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून पर्यावरणीय समस्या दिवसेंदिवस उग्र होत आहेत. त्याच्यापासूनचे धोके वाढत आहेत. म्हणून आपण सर्वांनी पर्यावरण, निसर्गातील साधनसंपत्ती, निसर्ग आणि मानव यातील संबंध समजावून घेतले आहेत.

प्रस्तुत घटकामध्ये पर्यावरणवादाच्या उदयाची कारणे, वैशिष्ट्ये, पर्यावरण संरक्षणविषयक जागतिक प्रयत्न आणि जागतिक तापमानवाढ-स्वरूप, परिणाम व उपाय याची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व माहितीचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करून निसर्गाचे, पर्यावरणाचे, पर्यायाने अखिल मानव जातीचे संरक्षण यासाठी वैश्विक, सामूहिक व मानवतावादी दृष्टीने प्रयत्न करावेत. आपल्यासहीत समाजात पर्यावरण संरक्षणविषयक जागृती करावी ही एक छोटीसी अपेक्षा.

**प्रमुख पर्यावरणीय समस्या**

१. जागतिक तापमान वाढ

२. अवर्षण

३. भूकंप

४. साथीचे रोग

५. आम्ल पर्जन्य

६. दुर्मीळ वनस्पतींचा ऱ्हास

७. समुद्र पातळीत वाढ

## ३.२ विषय विवेचन

### ❒ पर्यावरणवाद (Environmentalism)

मानव हा निसर्गातील सर्व सजीवामधील बुध्दिमान प्राणी आहे. त्याने आपल्या बुध्दीच्या जोरांवर आपला विकास इतरांच्या तुलनेत अधिक केला आहे. कुठेतरी कड्याकपारी, झाडाच्या डोलीत, गुहेमध्ये राहणारा, भूक लागल्यानंतर कांहीतरी खाणारा आणि मिळेल तिथे विसावा घेणारा निसर्ग अवस्थेमधील मानव आणि आजचा मानव यांची तुलना करता मानवाच्या प्रगतीची झेप लक्षात येते. बौध्दीक-प्रगल्भतेच्या जोरांवर प्रगतीचे अनेक शिखरे त्यांने सर केली आहेत. जैवतंत्रज्ञान, नॅनो तंत्रज्ञान, संगणकीय तंत्रज्ञान, अणुऊर्जा इत्यादीच्या आधारे मानवाने प्रचंड प्रगती साधली आहे. पण मानवाच्या या प्रगतीच्या प्रवासात मानव आणि निसर्ग यांची मैत्री जोपर्यंत राहिली तोपर्यंत मानवाला आपल्या प्रगतीचा लाभ घेता आला. पुढे मानवाने आपल्या विकासामध्ये तो जसजसा निसर्गापासून दूर गेला तस-तसे त्याच्या विकासामध्ये अनेक अडथळे निर्माण झाले. मानवाने आपल्या विकासामध्ये आपली जीवनपध्दती सुधारली, ती सुखकारक बनली, पण ज्या निसर्गाच्या सोबतीने हे मिळविले, त्या निसर्गाची योग्य ती काळजी न घेतल्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले.

मानवी विकासाला आड येणाऱ्या समस्या, अडचणींची चिकित्सा करणे, त्या जाणून घेणे, त्या कमी करण्यासाठी उपाययोजना करतो की, ज्यामुळे मानवी जीवन अधिक-अधिक सुखी संपन्न होईल. मानवाचा शाश्वत विकास आणि निसर्गाची जपणूक यामध्ये समतोल राहील यासाठी एक नवीन अभ्यासविषय पुढे आला आणि त्याचे नांव आहे पर्यावरणवाद.

गेल्या ५०-६० वर्षापासून एक नवीन विषय म्हणून पर्यावरणवाद पुढे आला आहे. मानवाने आपल्या विकासामध्ये निसर्गाची काळजी न घेतल्यामुळे, निसर्ग साधनांच्या केलेल्या प्रचंड लुटीमुळे मानवी जीवनावर विघातक परिणाम करणारे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून १९७२ मध्ये स्टॉकहोम परिषदेला महत्त्व द्यावे लागेल. कारण प्रथमच त्या परिषदेमध्ये ''वर्तमान मानवी जीवन आणि मानवाच्या भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित राहायचे असेल तर मानवी विकासाबरोबर निसर्गाची काळजी घेतली पाहिजे'' असा विचार मांडला गेला आणि तिथून पुढे पर्यावरणवादाचा अभ्यास सुरु झाला.

पर्यावरणवादाच्या अभ्यासामध्ये पुढील संकल्पना महत्त्वाच्या आहेत.

### १. पर्यावरण (Environment)

ही संज्ञा फ्रेंच भाषेतील Environ या शब्दापासून प्रचलित झाली असून तिचा अर्थ To Suround म्हणजेच सभोवताली असणे किंवा सभोवतालची परिस्थिती असा आहे. या सभोवतालच्या परिस्थितीमध्ये

अनेक सजीव-निर्जीव घटकांचे अस्तित्व पाहावयास मिळते. म्हणून या सभोवतालच्या परिस्थितीत निसर्गनिर्मित व मानवनिर्मित घटकांचे मिळून पर्यावरण बनते. ही पर्यावरणीय मांडणी पृथ्वीवर सर्वत्र सारखी नाही. ती कालसापेक्ष, स्थलसापेक्ष आणि जीवसापेक्ष आहे. पृथ्वीवरील पर्यावरण संज्ञेत सूर्यप्रकाश, पाणी, हवा, जीवसृष्टी, जंगल, नद्या यांची मांडणी सर्वत्र सारखी नाही. म्हणून संपूर्ण पृथ्वी हे देखील एक पर्यावरण आहे. पृथ्वीवरील ही पर्यावरणीय मांडणी गतिशील, सर्वसमावेशक आहे. पर्यावरणाच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :-

*१. ''जैविक व अजैविक घटक यांच्यातील परस्पर क्रियांचा अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र होय.''* – ***डॅनियल चिरास.***

*२. ''पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनावर पर्यावरणीय घटकांचा होणारा परिणाम, प्रभावांचा अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र. यामध्ये पर्यावरणीय प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना याचाही अभ्यास केला जातो.''* – ***जॉन टर्क.***

*३. ''विविध प्रकारची जीवसृष्टी आणि मानवी समूह व समाज ज्या परिसरात राहतात व विकसि तहोतात त्या परिसरातील त्या सर्व घटकांच्या मांडणीला पर्यावरण असे म्हणतात.''* – ***मराठी विश्वकोष.***

*४. ''सजीवांनी अनुभवलेल्या भौतिक रासायनिक व जैविक परिस्थितीची गोळाबेरीज म्हणजे पर्यावरण.''* – ***जैविस्मिय.***

*५. ''व्यक्ती जीव अथवा समूह यांचे अस्तित्व व विकास यांच्यावर परिणाम करणारी बाह्यस्थिती, घटक किंवा वस्तु म्हणजे पर्यावरण.''* – ***फंक व वॅगनन्स.***

## ❑ पर्यावरणशास्त्र :-

पर्यावरणशास्त्रात निसर्ग आणि मानव यांच्या संबंधाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास केला जातो. सर्वांगीण समतोलीत विकास हा पर्यावरणशास्त्राचा आत्मा मानला जातो. निसर्गाची जपणूक आणि मानवी कल्याण हा पर्यावरणशास्त्राचा मुख्य अभ्यासविषय आहे. मानवाने आपल्या विकासाच्या वाटचालीत निसर्गाविषयी बेदरकारपणा, निष्काळजीपणा, नैसर्गिक साधनसंपत्तीची विकासाच्या नावाखाली लयलूट केली. निसर्गाची स्वत:ची अशी एक निर्मिती आहे, त्या निर्मितीमध्ये एक शिस्त असते. निसर्गाला स्वत:ची अशी एक भाषा असते, पण मानवाने ते लक्षात न घेतल्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले. त्याचा मानवी जीवनावर विपरित परिणाम झाला.

निसर्गनिर्मित पर्यावरण मानवी विकासाला पूरक व उपयुक्त असते हा रचनात्मक विचार पर्यावरणशास्त्रात व्यक्त होतो. निसर्गाची स्वत:ची एक निर्मिती व शिस्त असते. त्यामध्ये मानवी हस्तक्षेप करू नका हे पर्यावरणशास्त्र सांगते.

परिवर्तन विकास- आणि बदल हे शांतताप्रीय, नि:स्वार्थी व कल्याणकारी भावनेतून व्हावेत, म्हणून पर्यावरण संवर्धन- संवर्धनातून विकास आणि परत विकासातून पर्यावरणीय संरक्षण हे पर्यावरणशास्त्राचे अभ्यास विषय ठरावेत.

## ❑ पर्यावरणवाद :-

पर्यावरण व मानव यांचा जवळचा संबंध आहे. हे संबंध परस्परांना पूरक व उपयुक्त आहेत. मानवी जीवन विकसीत होत असताना त्याचा परिणाम जसा पर्यावरणावर होतो. तसा पर्यावरणातील बदलाचा परिणाम मानवी जीवनावर होतो. पर्यावरण आणि मानव यांचा हा संबंधाचा प्रवास अडचणीचा ठरत आहे. या संबंधात पर्यावरण श्रेष्ठ की मानव श्रेष्ठ यासाठी मानवाने सतत प्रयत्न केलेले आहेत, पण अलीकडच्या काळात मानवाचे बुध्दीकौशल्य, स्वार्थ, लोभ, मोह यातून पर्यावरणीय मांडणीचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग केला आहे. त्यातून अनेक पर्यावरणवादी प्रश्न निर्माण होऊन त्याचे मानवी जीवनावर परिणाम होताना दिसतात.

वास्तविक पाहता पर्यावरण आणि मानव यामध्ये, पर्यावरणाची निर्मिती आधी नंतर मानवाची त्यामुळे 'जो प्रथम त्याला अग्रक्रम' (First Come First) या उक्तीनुसार प्रथम पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन आणि नंतर मानवी विकास आणि विकासाचे संवर्धन पण मानवाने हा नियम न लक्षात घेतल्यामुळे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून या ठिकाणी आधी पर्यावरणाला अग्रक्रम दिला गेला असला तरी ते सर्व मानवी विकासाला उपयुक्त व पूरक आहे. हे लक्षात घेऊन पर्यावरणानंतर निर्माण झालेल्या मानवाने अधिक जबाबदारीने पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे. आज मानवाने साधलेला विकास शाश्वत राहून भविष्यकालीन मानवी पिढ्यासाठी पूरक उपलब्धी हे मानवाने ध्येय ठेवले पाहिजे.

आपण जर जबाबदारीने वागलो नाही तर अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण होतील. उदा. आज आपण नद्यांना पवित्र मानतो. पण त्यांची वेळीच काळजी घेतली नाही तर त्या मोठी प्रदूषित गटारी होतील. मोठ्या धरणांची काळजी नाही घेतली तर ती निरुपयोगी ठरतील. आजचा पांढराशुभ्र दिसणारा ताजमहाल पुढे तसाच राहील याची शाश्वती देता येणार नाही.

थोडक्यात, निसर्ग आणि माणूस, आधुनिक काळात निर्माण झालेले पर्यावरणीय प्रश्न, त्यांचे मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम आणि या सर्वात शेवटी त्या सर्वांवरील उपाययोजना की, ज्यामुळे मानवी विकासाची शाश्वती आणि पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन यासाठी पर्यावरणवादाची मांडणी.

## ❑ पर्यावरणाचे स्वरूप :-

निसर्गात निर्माण झालेले पर्यावरण आणि मानव यांचा परस्पर संबंधावर आधारित पर्यावरणवादाचे स्वरूप पाहावयास मिळते. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. निसर्ग आणि मानव यामध्ये निसर्गाची निर्मिती मानवाआधी झाली आहे. त्यामुळे पर्यावरणवादामध्ये निसर्गकेंद्री मांडणी पाहावयास मिळेत. निसर्गाच्या अस्तित्त्वावर मानवी अस्तित्त्व अवलंबून असल्यामुळे निसर्गाला अग्रक्रम दिला आहे.

२. पर्यावरण आणि मानवी संस्कृती यांचा जवळचा संबंध आहे. मानव व पर्यावरण यांच्या सबंधात आज जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याचबरोबर मानवी संस्कृतीच्या अस्तित्त्वाचाही प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून पर्यावरण संरक्षण व मानवी संस्कृतीचा शाश्वत विकास हे पर्यावरणवादाचे मुख्य अभ्यास विषय आहेत.

३. पर्यावरणवाद हा सुधारणावादी दृष्टिकोन आहे. मानवाने विकासाच्या प्रवासात जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण केले आहेत. त्या प्रश्नांची सोडवणूक करून मानवी विकासाचे सातत्य आणि पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन यामध्ये सुधारणा घडवून आणणे हा पर्यावरणवादाचा मुख्य उद्देश आहे.

४. पर्यावरणवाद हा आंतरविद्याशाखीय विषय आहे. कारण पर्यावरणाची व्याप्ती प्रचंड आहे. त्यामुळे पर्यावरणीय प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी निरनिराळ्या विद्याशाखांमधील संदर्भीय माहितीचा आधार घ्यावा लागतो. सर्व सामाजिक शास्त्रे, शुध्द शास्त्रे, भूशास्त्रे ज्ञानशाखांची गुंफण पर्यावरणवादामध्ये पाहावयास मिळते.

५. भांडवलशाहीला विरोध- औद्योगिक क्रांतीनंतर मानवाने जो विकास साधला आहे, त्या विकासातून पुढे भांडवलशाहीचा उदय झाला आहे. यामध्ये आर्थिक समृध्दी, विकासाच्या नावाखाली भांडवलशाही राष्ट्रात जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. त्यामध्ये पर्यावरणीय साधनसंपत्तीची लूट केली जात आहे. त्यातून अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. उदा. जल-वायू-ध्वनी-मृदा प्रदूषण. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हासास कारणीभूत ठरणाऱ्या भांडवलशाही पर्यावरणवादाचा विरोध आहे.

६. मानवी संस्कृतीचा अभ्यास- निसर्ग आणि मानव यांचा फार जवळचा संबंध आहे. निसर्गातील पर्यावरणीय साधनांचा, परिस्थितीचा आधार घेत मानवी संस्कृती विकसित झाली आहे. पण अलीकडच्या काळात विकासाच्या नावाखाली मानवाने पर्यावरणीय साधनांची प्रचंड लूट केल्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून मानवी संस्कृतीच्या विकासातील सातत्य आणि पर्यावरणाचे संरक्षण व जपणूक हा विचार पर्यावरणवादामध्ये महत्त्वाचा आहे.

७. जनजागृतीची गरज - आतापर्यंत विज्ञानाच्या आधारे मानवाने मोठी प्रगती केली आहे. पण त्या क्रांतीच्या वाटचालीत निसर्गाची काळजी न घेतल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या

म्हणून पर्यावरणीय समस्यांचे आकलन करून त्या सोडविण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. म्हणून दि. १८ डिसेंबर, २००३ मध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण शिक्षण हा विषय शालेय व महाविद्यालयीन स्तरावर अनिवार्य करावा असा निर्णय दिला आहे, आणि त्याची अंमलबजावणी आता सुरू आहे.

## ३.२.१ (अ) पर्यावरणवादाच्या उदयाची कारणे

पर्यावरणवाद हा आधुनिक काळातील एक महत्वाचा अभ्यासविषयक असला तरी त्याचा नेमका उदय व विकास कसा झाला हे पाहायचे असेल तर या विषयाच्या अनुषंगाने विविध संकल्पना, विविध वाद, विविध शास्त्रज्ञांचे दृष्टिकोन यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. मानव व निसर्ग यांच्या संबंधातील मांडणीमध्ये मानवी विकास हा पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे काय? आणि मानवी विकासात केवळ मानवी प्रयत्नच महत्त्वाचे आहेत? या दोन प्रश्नांच्या उत्तर शोधण्याच्या प्रयत्नामधून पर्यावरणवादाचा उदय झाला असावा.

मानव आणि निसर्ग यांच्यातील संबंधामध्ये निसर्गाची निर्मिती प्रथम झाली असून निसर्गरचनेतच मानवाची निर्मिती-विकास आणि वाढ शक्य आहे. या निसर्गवादी विचारातून पर्यावरणवादाचा उदय झाला आहे. निसर्गवाद यापुढे जावून म्हणतो- मानवी इच्छा व स्फूर्तीसुध्दा निसर्गावर अवलंबून आहे. ही विचारसरणी प्रामुख्याने १९व्या शतकाच्या सुरुवातीला मांडली गेली.

पर्यावरणवाद हा आधुनिक विचार असला तरी त्या प्रकारचा दृष्टिकोन अगदी प्राचीन काळातसुद्धा मांडलेला दिसून येतो. इ.स.पूर्व ५व्या शतकात हेपोक्रॅटस् या ग्रीक विचारवंताने, ''मानवी जीवन पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे'' असे स्पष्ट केले आहे. त्यानंतर ॲरिस्टॉटल या ग्रीक विचारवंताने त्या काळात नाईल नदीच्या इजिप्तवरील परिणामांची शास्त्रीय चिकित्सा केली होती.

१९व्या शतकात पर्यावरणवादाला एक विशिष्ट अशी ओळख दिली ती जर्मन शास्त्रज्ञ रॅट्झेल याने. त्याच्या मते, पृथ्वीच्या पृष्ठभागावरील निसर्गरचनेचा मानवी विकासावर परिणाम होतो. जशी प्राकृतिक रचना तसे मानवी जीवन विकसीत होते. त्याच्या मते, पृथ्वीवरील निसर्ग आणि मानव यांचा जवळचा संबंध असला तरी मानव हा उत्क्रांतीचा अंतिम अविष्कार आहे. थोडक्यात, निसर्गाच्या मदतीने विकसित झालेले मानवी जीवन निसर्गाद्वारेच नियंत्रित होते. त्यामुळे मानवाने निसर्गाशी मैत्री केली पाहिजे.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात जीवशास्त्राचा विकास आणि डार्वीनच्या सिध्दांताला मिळालेली शास्त्रीय मान्यता हा सुध्दा पर्यावरणवादाचा एक महत्वाचा टप्पा मानला जातो. याच काळात पर्यावरणवादास विज्ञाननिष्ठता लाभली. पुढे Ecology ह्या नवीन शास्त्राचा उदय झाला, त्यामध्ये पर्यावरणवादी मांडणी करण्यात आली.

''मानव हा त्याच्या प्रत्येक कृतीच्या बाबतीत मुक्त नसून तो पूर्णपणे नैसर्गिक व आर्थिक नियमांचा गुलाम आहे,'' म्हणजेच मानव कृतीशील नसून आकृतीशील आहे.''

इंग्लंडमध्ये बकल या शास्त्रज्ञाने ''इंग्लंडमधील नागरीकरणाचा इतिहास'' आणि ''इंग्लंडमधील सांस्कृतिक इतिहास'' या ग्रंथामध्ये पर्यावरणवादाची मांडणी केली आहे. त्याच्या मते, मानवाच्या प्रत्येक क्रिया त्याच्या इच्छेनुसार होतात, पण मानवी इच्छा निसर्गनियमाने नियंत्रित होतात. प्रत्येक मानवी घटना निसर्गामुळे बदलणारे मानवी मत आणि मानसिक क्रियेमुळे बदलला जाणारा निसर्ग यांच्या दृढसंबंधाचे द्योतक आहे.

२०व्या शतकाच्या सुरुवातीला पर्यावरणवादाच्या मांडणीत मौलिक भर घातली ती एडमंड + डेमॉजिन्सने. त्याने मानवी स्थलांतराच्या मुद्यावर आधारित निसर्ग आणि मानव यांच्या संबंधाची चर्चा केली आहे. मानवी जीवन आणि पर्यावरणीय घटक यांची घनिष्ठता स्पष्ट केली आहे.

पर्यावरणवादी विचारसरणीच्या विकासातील शेवटचा टप्पा एलन सेंपल चा **'भौगोलिक पर्यावरणाचे परिणाम'** हा ग्रंथ होय. त्यामध्ये तिने मानव आणि पर्यावरण यांच्या संबंधात पर्यावरण श्रेष्ठ असून मानव तिची निर्मिती आहे. मानवाला मिळालेली बुद्धी कार्यक्षमता आणि कार्य करण्यासाठी आवश्यक असणारी स्फूर्ती ही नैसर्गिक घटकावर अवलंबून आहे.

ग्रिफिथ टेलर या निसर्गवाद्याने निसर्ग आणि मानव यांच्या संबंधाचा 'थांबा आणि पुढे जा' या नियमाच्या आधारे सुवर्णमध्य काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या मते, निसर्गाने घालून दिलेल्या चौकटीत मानवाला मुक्तपणे विकास करता येतो.

भारतात पर्यावरणाचा अभ्यास फार पूर्वीपासून होत आला आहे. रामायण, महाभारतात वन्य जीवांची काळजी घेण्याविषयी मते व्यक्त करण्यात आली आहेत.

अलीकडच्या काळात छ. शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रातून 'पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्व' अधोरेखीत केलेले पहावयास मिळते. त्याचवेळी संत तुकारामानी आपल्या अभंगामधून वृक्षांचे, वन्य जीवांचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट केले आहे.

## ३.२.२ (ब) पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये

पृथ्वीवरील निसर्ग, पर्यावरणीय मांडणी आणि मानवी समाज यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. यामध्ये परस्परांचे अस्तित्त्व परस्परांना पूरक व विकसासाठी उपयुक्त ठरले आहे. निसर्गातील पर्यावरणीय मांडणीत मानव विकसित होवू शकला, त्याचवेळी मानवी विकासामुळे निसर्गाचे संरक्षण व संवर्धन होऊ शकते. पण पुढील काळात मानवाची स्वार्थी प्रवृत्ती, नैसर्गिक साधनांची करण्यात आलेली लूट,

निसर्गाकडे केलेले दुर्लक्ष यामुळे निसर्गाच्या ऱ्हासास सुरुवात झाली, त्याचा विपरीत परिणाम पृथ्वीवरील पर्यावरणावर होऊन अनेक समस्या निर्माण झाल्या. उदा. सर्वच क्षेत्रातील प्रदूषण, दुष्काळ, भूकंप, महापूर इत्यादी.

म्हणून निसर्गाचे पर्यायाने पृथ्वीवरील पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन आणि मानवाचा शाश्वत विकास यासाठी अभ्यास व उपाययोजना सुचविणे या गरजेतून पर्यावरणाचा अभ्यास सुरू झाला. त्यातून पर्यावरणवाद (Environmentalism) हा विषय पुढे आला. या विषयांचे स्वरूप आणि अभ्यासविषय लक्षात घेता पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

## १. निसर्गाची श्रेष्ठता :-

पर्यावरणवादामध्ये निसर्ग आणि मानव यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो. मानवाने आपला विकास करत असताना पर्यावरणाकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले. माणूस हा बुध्दिवान प्राणी असल्यामुळे तो निसर्गापेक्षा स्वत:ला श्रेष्ठ मानतो. पण हे खरे नाही. कारण निसर्गाशिवाय मानवाची प्रगती शक्य नाही. या पृथ्वीवर निसर्ग आणि माणूस यामध्ये निसर्ग अगोदर निर्माण झाला नंतर माणूस. त्यामुळे निसर्गाचे श्रेष्ठत्त्व मान्य करून मानवाने आपला विकास करावा, त्यामध्ये पर्यावरणाने संरक्षण व संवर्धन करावे. हे पर्यावरणवादात मान्य केले जाते.

## २. निसर्गाबरोबर मैत्री :-

पृथ्वीवरील निसर्ग व मानव यांचे अस्तित्त्व परस्परांना पूरक व उपयुक्त ठरले आहे. इथे निसर्गाची श्रेष्ठता मान्य करण्यात आली असली तरी निसर्गाबरोबर मैत्री करूनच मानवाला आपला शाश्वत विकास करता येणे शक्य आहे. निसर्ग व मानव यामध्ये स्पर्धेपेक्षा सहकार्याचे परस्परविषयी संरक्षणाचे संबंध आवश्यक आहेत. म्हणून माणसाने निसर्गाबरोबर मैत्रीच केली पाहिजे.

## ३. निसर्ग मानवाचा शिक्षक :-

पृथ्वीवरील निसर्गामध्ये त्याची स्वत:ची अशी एक मांडणी आहे. परिवर्तन आणि त्यामध्ये सातत्य हा निसर्गाचा महत्त्वाचा गुण. त्याचा लाभ मानवाला आपल्या विकासासाठी करता आला. आतापर्यंत मानवाने आपल्या विकासात अनेक गोष्टी निसर्गाकडून शिकल्या आहेत. म्हणूनच निसर्ग हा माणसाचा शिक्षक मार्गदर्शक आहे. उदा. निसर्गात पक्षी हवेत उडतात ते पाहून आपल्याला ही हवेत संचार करता येईल काय? या प्रश्नाचे उत्तर शोधत माणसाने विमानाचा शोध लावला. माणसाने आतापर्यंत लावलेले सर्व शोध निसर्गाच्या मार्गदर्शनाखाली लावले आहेत. म्हणून निसर्ग मानवाचा शिक्षक, मार्गदर्शक आहे. मानवी विकासाबरोबर निसर्गरूपी शिक्षकाचीसुध्दा काळजी घेतली पाहिजे.

## ४. सर्व सजिवांचा विचार :-

पर्यावरणवादामध्ये मानवी विकास व निसर्ग संरक्षण असा मर्यादित अभ्यास केला जात नाही. पर्यावरणवादात पर्यावरणाचे संरक्षण, मानवी विकास आणि निसर्गातील सर्व सजीवसृष्टींच्या संरक्षणाचा विचार केला जातो. जसे जंगलाचे संरक्षण, पशुपक्ष्यांचे संरक्षण, समुद्रातील सागरी जीवसृष्टींचे संरक्षण. त्यामुळे पर्यावरणवादाची व्यापकता लक्षात येते. 'आपण जगा, इतरांना जगू द्या.'

## ५. पर्यावरणीय प्रश्न आणि मानवी विकासाचा अभ्यास :-

पर्यावरणवाद हा प्रामुख्याने पर्यावरणीय प्रश्न आणि मानवी विकास याचा अभ्यास करतो. पण त्यामध्ये परिपूर्णता लाभण्यासाठी इतर विद्याशाखातील सिध्दांत, मार्गदर्शन, तत्त्वे यांचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे पर्यावरणवादात सर्व सामाजिक, सांस्कृतिक, नैसर्गिक घटकांचा अभ्यास केला जातो. म्हणून पर्यावरणवाद हा आंतरविद्याशास्त्रीय आहे.

## ६. पर्यावरणवाद हा सुधारणावादी विचार आहे :-

आज मानवी हस्तक्षेपामुळे जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. ते सोडविण्यासाठी निसर्ग आणि मानव यांच्या संबंधातील सुधारणा करून पर्यावरणाचे संरक्षण व मानवी विकास हा पर्यावरणवादाचा मुख्य विचार आहे. मानवी हस्तक्षेप कमी करून निसर्गाचे संरक्षण हा सुधारणावादी दृष्टिकोन पर्यावरणवादात आहे.

## ७. औद्योगिकीकरणामुळे प्रदूषणात वाढ :-

पर्यावरणावादामध्ये निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करून मानवाचा शाश्वत विकास व्हावा यासाठी अवाजवी औद्योगिकीकरणाला विरोध केला जातो. मानवी विकासात औद्योगिकीकरणाला जरूर महत्त्व आहे. पण ज्या औद्योगिकीकरणामुळे ध्वनी, वायू, जल प्रदूषणाचा समस्या निर्माण होतील त्याला मात्र पर्यावरणवाद विरोध करते.

## ८. पर्यावरणवादाचे वैश्विक रूप :-

मानवी हस्तक्षेपामुळे आज जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. त्या प्रश्नांची व्यापकता सर्व जगभर पसरली आहे. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जगभरचा विश्वसमुदायाची मदत आवश्यक आहे. सर्व विश्वसमुदायाने प्रामाणिक प्रयत्न व प्रतिसाद देवून पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन केले तरच पृथ्वीवरील पर्यावरण वाचेल आणि माणूसही. अशी ही पर्यावरणवादाची वैश्वीक धारणा आहे.

### ९. पर्यावरणवाद व लोकमत जागृती :-

आज मानवी हस्तक्षेपामुळे जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहे. पृथ्वीवरील पर्यावरण धोक्यात आले आहे. त्या सर्वांचा शास्त्रीय, समाजशास्त्रीय अभ्यास करून निसर्गप्रेमाचे, पर्यावरणाचे शिक्षण देणे आणि त्यातून पर्यावरणीय समस्यांची सोडवणूक होईल अशी पर्यावरणवादाची मांडणी आहे.

## ३.२.३ (क) पर्यावरण संरक्षण आणि जागतिक प्रश्न

मानवाच्या पर्यावरणातील अतिरेकी हस्तक्षेपामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. आतापर्यंत मानवाचा विकास निसर्गातील उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारे झाला असला तरी या विकास प्रक्रियेत मानवाने निसर्गाची शिस्त, नियमितता, काळजी न घेतल्यामुळे दुष्काळ, भूमिपात, वनस्पतींचा ऱ्हास, प्रदूषण, ओझोनक्षय इ. मानवनिर्मित आपत्ती निर्माण झाल्या या आपत्ती आज मानवाच्या अस्तित्त्वावर प्रश्नचिन्ह उभे करत आहे. म्हणून मानवाला या निसर्गात राहावयाचे असेल तर ते निसर्गाबरोबर, निसर्गाशी मैत्री करत. जर निसर्गाचा नाश कराल तर तुमचाही नाश होईल, हा संदेश नेहमी निसर्ग देत असतो.

आज मानवाच्या स्वार्थी प्रवृत्तीमुळे जे कांही पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. ते प्रश्न कोणत्या तरी एका समाजाचे, प्रदेशाचे, राष्ट्राचे नसून ते जगाचे आहेत. पूर्वी हे प्रश्न मर्यादित राहिल्यामुळे त्याचा परिणाम तेवढ्या भागापुरता सिमीत असे, पण दिवसेंदिवस हे सर्व पर्यावरणीय प्रश्न सर्व जगभर व्यापून राहीले. म्हणून पर्यावरणातील समस्या ही सर्व विश्वसमुदायासमोरील समस्या आहे, त्यामुळे त्यासाठी सर्व विश्व समुदायाने एकत्रीत, परस्पर सहकार्याने प्रयत्न केले पाहिजे. पर्यावरणाकडे बघण्याचा मानवाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे.

### ❑ पर्यावरण जनजागृती :-

आज मानवी हस्तक्षेपामुळे जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत, ते प्रश्न सोडविण्यासाठी सर्वत्र पर्यावरणविषयी जनजागृती केली पाहिजे. भौतिक विकासाबरोबर पर्यावरण जागृती झाली पाहिजे. आपण राहत असलेल्या सभोवतालच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आज संगणकीय क्रांतीमुळे 'सर्व जग एक खेडे' (Global Village) बनले आहे. त्यामुळे पर्यावरण जागृती तशी सोपी झाली आहे. पण स्वार्थी प्रवृत्तीचा त्याग करून जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. समाजातील सर्व संस्था, समाजघटक, शासनसंस्था, नागरिक या सर्वांचा त्यामध्ये प्रामाणिक सहभाग राहिला पाहिजे.

आज महाराष्ट्रातील 'पश्चिमघाट आंदोलन', 'नर्मदा बचाव आंदोलन', 'जंगलसंरक्षणासाठीचे आंदोलन', 'पाणी आडवा, पाणी वाचवा', 'मूर्ती दान द्या', 'नद्यांमध्ये रक्षाविसर्जन करू नका' अशा

विश्व कार्यक्रमातून प्रयत्न सुरू आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी, संवर्धनासाठी, जनतेत पर्यावरणाविषयीची जागृती काही दिन साजरे केले पाहिजेत.

उदा. २ फेब्रुवारी - जागतिक पाणस्थळ दिन.
२८ फेब्रुवारी - जागतिक विज्ञान दिन.
२१ मार्च - जागतिक वन दिन.
२३ मार्च - जागतिक हवामान दिन.
२२ एप्रिल - वसुंधरा दिन.
५ जून - जागतिक पर्यावरण दिन.
१६ सप्टेंबर - ओझोन बचाव दिन.
४ ऑक्टोबर - प्राणी कल्याण दिन.
२९ डिसेंबर - आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन.

## ❑ भारतातील काही महत्त्वाच्या पर्यावरणविषयक चळवळी :-

अलीकडच्या काळातील पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी करण्यात आलेल्या चळवळी पुढीलप्रमाणे :-

### १. १९७३ चे चिपको आंदोलन :-

हिमालयातील गढवाल, कुमाऊ यासारख्या डोंगरी भागातील आदिवासींनी त्या भागातील बेकायदा वृक्षतोड थांबविण्यासाठी आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्त्व सुंदरलाल बहुगुणा यांनी केले.

### २. नर्मदा बचाव आंदोलन :-

नर्मदा नदीवर बांधण्यात आलेल्या सरदार सरोवरामुळे धरणमागील पाणलोट क्षेत्रामध्ये जी गावे विस्थापित झाली. धरण बांधणीमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय प्रश्न त्या सर्वांच्या सोडवणूकीसाठी मेधा पाटकर यांनी हे आंदोलन केले.

### ३. पश्चिम घाट बचाओ आंदोलन :-

महाराष्ट्रामध्ये पसरलेल्या सह्याद्रीच्या पर्वतरागांच्या घाटमाथ्यावर मोठ्या प्रमाणात जैवविविधता पहावयास मिळते, पण विशेषत: खाणउद्योगामुळे ही जैवविविधता धोक्यात आली आहे. तिच्या संवर्धनासाठी काय करता येईल. हे सांगण्यासाठी माधव गाडगीळ समितीचा अहवाल महत्त्वाचा आहे. पर्यावरण व जैवविविधता यांच्या संरक्षणासाठी ही चळवळ सुरू करण्यात आली.

## ४. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) :-

१८८३ मध्ये मुंबई येथे ही संस्था स्थापन करण्यात आली असून वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी जनजागृती, संशोधन व निसर्गशिक्षण इ. कार्य या संस्थेमार्फत केले जाते.

## ❑ पर्यावरण संरक्षणासाठी भारतातील महत्त्वाचे कायदे :-

आज एकविसाव्या शतकात जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत, त्याविषयी भारतात पूर्वीपासून जागृती असलेली पहावयास मिळते. सम्राट अशोक, छ. शिवाजी महाराज यासारख्या शासनकर्त्यांनी त्या काळात पर्यावरणाची काळजी घेण्याविषयी कायदे केले होते. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगामधून वृक्षांचे, वन्यजीवांचे महत्त्व सांगितले आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतात पर्यावरण संरक्षणासाठी कायदे करण्यात आले. त्यांची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

## १. भारतीय राज्यघटना :-

भारत हा एक महत्त्वाचा देश आहे, ज्याच्या राज्यघटनेत पर्यावरण संरक्षण व संवर्धनाविषयीच्या तरतूदी आहेत. राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६-५१ मध्ये राज्यांच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करण्यात आली आहेत. त्यामध्ये कलम ४८(अ) मध्ये म्हटले आहे. ''प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन केले पाहिजे. पर्यावरणाची गुणवत्ता वाढविली पाहिजे.''

### ❁ मूलभूत कर्तव्ये :-

भारतीय राज्यघटनेत भारतीय नागरिकांच्यासाठी मुलभूत कर्तव्यांची यादी दिली आहे. (कलम ५१-क) त्यामध्ये कलम ५१एए(ग) मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. ''नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन हे प्रत्येक भारतीय नागरिकांचे कर्तव्य आहे. इथली जंगलसंपत्ती, वन्यजीवसृष्टी, नद्या, तळी, सरोवरे, पशुपक्षी यांचे संरक्षण करणे त्यांच्याविषयी दयाभाव दाखविणे, प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. त्याचवेळी त्याला पूरक व पोषक उपाययोजना व सुधारणा राज्यशास्त्राच्या पातळीवरून कराव्यात असे सुचविण्यात आले आहे.

भारतीय घटनाकर्त्यांनी राज्यघटनेत भारतीय नागरिक व राज्यकर्ते यासाठी पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जे मार्गदर्शन व सूचना केल्या आहेत. त्या लक्षात घेता पुढील काळात काही महत्त्वाचे कायदे करण्यात आले.

(१) १९७२ चा वन्यजीव संरक्षण कायदा. (२) १९७४ चा जल (प्रतिबंध व प्रदूषण) कायदा,
(३) १९८० चा वनसंवर्धन कायदा, (४) १९८१ चा हवा प्रदूषण नियंत्रण कायदा,
(५) १९८६ चा पर्यावरण संरक्षण कायदा.

## ❑ पर्यावरण संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न :-

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही जागतिक समुदायाची गरज आहे. कारण आज सर्व पर्यावरणीय समस्यांचे स्वरूप जागतिक बनले आहे. म्हणून त्यासाठी जशी स्थानिय-राष्ट्रीय प्रयत्नाची गरज आहे, तशी जागतिक पातळीवरून प्रयत्न व जनजागृतीची गरज आहे. त्यादृष्टीने पर्यावरण संरक्षणासाठी जागतिक पातळीवरून करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आडावा थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

### १. अंटार्क्टिका संरक्षण करार (१९५९)

१९५९ मध्ये अंटार्क्टिका खंडावरील पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने राष्ट्राराष्ट्रामध्ये एक बहुपक्षीय करार करण्यात आला त्यानुसार- (१) या खंडाचा वापर केवळ शास्त्रीय संशोधनासाठी करावा. (२) अणुपरीक्षण किंवा लष्करी कवायती यासाठी या खंडाचा वापर करू नये. (३) हा खंड कायमस्वरूपी बर्फाच्छादित असून तिथे कायमस्वरूपी मानवी वस्ती नसल्यामुळे त्याची मालकी कोण्या एका राष्ट्राकडे नाही. पण पर्यावरणीय समतोलासाठी या खंडाचे जागतिक महत्त्व आहे. म्हणून त्याचे संरक्षण करणे सर्व राष्ट्रांची जबाबदारी आहे.

### २. स्टॉकहोम पर्यावरण परिषद (१९७२)

१९७२ मध्ये पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्न करण्याच्या उद्देशाने स्टॉकहोम येथे आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविण्यात आली. त्यामध्ये पुढील गोष्टी निश्चित करण्यात आल्या.

१. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही वैश्विक गरज आहे.
२. त्यासाठी जागतिक पातळीवरून सर्व राष्ट्रांनी सामूहिक प्रयत्न केले पाहिजेत.
३. त्यासाठी सामूहिक प्रयत्नासाठी २६ कलमी जाहीरनामा तयार करण्यात आला.
४. पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जागतिक लोकमत निर्माण करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि संपर्क माध्यमांचा प्रभावी वापर केला पाहिजे.

वरील सर्व उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ५४ सदस्यांचे एक कार्यकारी मंडळ निर्माण करण्यात आले. जगभर पर्यावरणसंबंधी जागृती व्हावी, त्यासाठी कृती कार्यक्रम करता यावेत यासाठी **'५ जून जागतिक पर्यावरण दिन'** म्हणून निश्चित करण्यात आला.

### ३. नैरोबी पर्यावरण परिषद (१९८२)

स्टॉकहोम परिषदेमध्ये ठरविण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा यासाठी ही परिषद बोलाविण्यात आली होती. त्यामुळे पुढील बाबींवर चर्चा करण्यात आली.

१. मानवाच्या आर्थिक विकासामुळे झालेले पर्यावरणीय प्रदूषण.

२. आर्थिक विकास व पर्यावरण संरक्षण हे परस्परांशी संबंधित असल्यामुळे त्यामध्ये समतोल दृष्टिकोन स्विकारला पाहिजे.

## ४. मॉंट्रेल ठराव (१९८७)

१९८७ मध्ये जगातील बावीस राष्ट्रांनी हा ठराव केला. औद्योगिक क्षेत्रातील मोठमोठ्या कारखान्यामधून उत्सर्जित होणाऱ्या घातक वायुमुळे वातावरणातील ओझोन थरावर विपरीत परिणाम कसा होत आहे याची चर्चा प्रामुख्याने या ठरावामध्ये करण्यात आली आहे. त्यानंतर ओझोन थराच्या संरक्षणासाठी घातक वायू उत्सर्जनावर निर्बंध घालण्यात यावेत असे ठरविण्यात आले.

## ५. आम्ल पर्जन्यविषयीची करार (१९८८)

जगभर वायूप्रदूषणामुळे 'आम्ल पर्जन्य' ही समस्या निर्माण झाली आहे. त्या समस्येवर चर्चा करून उपाययोजना सुचविण्यासाठी २४ युरोपीयन देशांनी १९८८ मध्ये एक करार केला त्यामध्ये -

अ) नायट्रोजन ऑक्साईडच्या उत्सर्जनात ५०% घट करणे.

ब) वायू व जलप्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करणे हे ठरविण्यात आले.

## ६. रिओ वसुंधरा परिषद (१९९२)

संयुक्त राष्ट्रसंघटना (युनो) च्या पुढाकाराने ब्राझीलची राजधानी रिओ द जानिरो येथे १९९२ साली 'वसुंधरा परिषद' बोलाविण्यात आली. त्यामध्ये १०० देश सहभागी झाले. त्यामध्ये मानवाच्या चिरकालीन विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. त्यामध्ये-

१. आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण साधणे.

२. पर्यावरण व मानवाधिकार यांचा संबंध घनिष्ठ बनविणे.

३. आर्थिक विकासामधून निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्यांवर उपाययोजना करणे ठरविण्यात आले.

## ७. क्योटो करार (१९९७)

जपानमधील क्योटो शहरात १९९७ मध्ये ही परिषद बोलाविण्यात आली. यामध्ये ''जागतिक तापमान वाढ'' (Global Warming) या विषयाच्या अनुषंगाने चर्चा हा मुख्य उद्देश होता. या परिषदेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. पृथ्वीवरील वाढत्या तापमानाची समस्या.

२. तापमान वाढीवर परिणाम करणारे घटक, प्रामुख्याने हरितगृहे.

'जागतिक तापमान वाढ' या महत्त्वाच्या जागतिक पर्यावरण समस्येवर चर्चा व उपाययोजना यासाठी ही परिषद बोलाविण्यात आली होती. पण या कराराला अमेरिका वा अन्य विकसीत राष्ट्रांनी योग्य तो प्रतिसाद न दिल्यामुळे या कराराची अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे जागतिक तापमान वाढीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे.

## ३.२.४ जागतिक तापमानवाढ (Global Warming)

मानवी हस्तक्षेपामुळे आज जे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामध्ये 'जागतिक तापमान वाढ' ही एक मोठी समस्या सर्व जगासमोर निर्माण झाली आहे. या समस्येमुळे पृथ्वीवरील जीवसृष्टी किंबहुना मानवी अस्तित्त्व धोक्यात आले आहे. आज ही समस्या वैश्विक समस्या बनली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी सर्व जगभराच्या राष्ट्रांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी जागतिक लोकमत तयार केले पाहिजे. वेळीच या समस्येचे गांभीर्य लक्षात घेतले नाही तर त्याचे फार मोठे भयावह परिणाम पृथ्वीवरील पर्यावरण आणि मानवी अस्तित्त्वावर होतील.

जागतिक तापमान वाढ ही समस्या समजावून घेण्यासाठी पृथ्वीवरील निसर्गरचना, पर्यावरणीय मांडणी, वातावरणीय मांडणी इ. भूगोलाच्या अभ्यासविषयाचा आधार घ्यावा लागेल.

### ❑ ओझोनचे कार्य व ओझोन क्षयाचे परिणाम :-

पृथ्वीवरील वातावरणात जे हवेचे थर आहेत, त्यामध्ये जमिनीपासून साधारण ४० कि.मी. उंचीवर स्थितांवर या थरात ओझोन वायू ($O_3$) सापडतो. पृथ्वीवरील ऑक्सीजन व सूर्याकडून पृथ्वीवर येणारी अतिनिल किरणे यांच्या संयोगातून हा वायू तयार होतो.

सर्व पृथ्वीवर या वायूचा थर जमिनीपासून ४० कि.मी. उंचीवर व्यापून राहिला आहे. हा ओझोन थर म्हणजे पृथ्वीवरील जीवसृष्टीला लाभलेली एक संरक्षण यंत्रणा आहे. या ओझोन थरामुळे सूर्याकडून पृथ्वीवर येणाऱ्या अतिनिल व विघातक किरणांचे शोषण होते. किरणांच्याबरोबर येणारी तीव्र उष्णाता शोषली जाते आणि पृथ्वीवरील जीवसृष्टीला जेवढी आवश्यक उष्णता हवी तेवढीच पृथ्वीवर सोडली जाते. हा वायू फिक्या निळ्या रंगाचा असून तो वजनाने हलका आहे. सकाळी या वायूचा थर कांहीसा खाली येतो. त्याचा परिणाम म्हणून सकाळी वातावरण आल्हाददायक, हवा शुध्द असते. वातावरणातील ओझोनचे प्रमाण कमी-जास्त होत असते. ओझोनचे ऑक्सीजनमध्ये रूपांतर झाले की, ओझोन कमी होतो तर ऑक्सीजनपासून ओझोन निर्मिती झाली की ओझोनचे प्रमाण वाढते.

## ❐ ओझोन क्षयाची कारणे :-

पृथ्वीवरील जीवसृष्टीला वरदान ठरलेला ओझोन थर दिवसेंदिवस विरळ होत आहे. ओझोन थराला छिद्रे पडू लागली आहेत. या ओझोन क्षयाची कारणे थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. वाढते औद्योगिकीकरण :-

औद्योगिक क्रांतीनंतर जगभर मोठ्या प्रमाणात कारखानदारी वाढली. त्यामधून मानवी विकासाला जरूर हातभार लागला असला तरी कारखानदारीमधून अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले. आज पृथ्वीवर वायू प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली. कारखान्यामधून प्रामुख्याने नायट्रोजन आणि क्लोरीन वायू हवेत सोडले जातात की, जे ओझोन थराचे मारक आहेत. या दोन वायूंच्या हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे ओझोन थर कमी-कमी होत चालला आहे.

### २. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात येणारी रासायनिक खते व किटकनाशके :-

आधुनिक काळात प्रगत शेतीच्या नावाखाली, शेतीमधून अधिकाधिक उत्पन्न मिळविण्याच्या हव्यासापोटी शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर केला जातो. पिक संवर्धनासाठी अनेक प्रकारची किटकनाशकांची फवारणी केली जाते. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून माती प्रदूषण-जल प्रदूषण-वायू प्रदूषण होय. रासायनिक खते व किटकनाशके यांच्या रासायनिक विघटनामधून मोठ्या प्रमाणात नायट्रोजन व ऑक्साईड द्रव्ये वातावरणात मिसळतात, ज्याचा विपरित परिणाम ओझोन थरावर होतो.

### ३. हवाई वाहतूक :-

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आज सर्वत्र हवाई वाहतूक वाढलेली दिसून येते. विमाने हवेतून ज्या ऊंचीवरून प्रवास करतात आणि वातावरणात जो धूर सोडतात, त्याचा विपरित परिणाम ओझोन थरावर होतो.

### ४. क्लोरोफ्युरोकार्बन (CFC) चा वापर :-

आज सर्वत्र संगणकीय वस्तू वापरातून काही समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषत: सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक भागांची स्वच्छता करण्यासाठी क्लोरोफ्युरोकार्बन (CFC) चा वापर होतो, याचे विघटन होत नाही, त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम ओझोन थरावर झाला आहे.

## ❐ ओझोन क्षयाचे परिणाम :-

वरील गोष्टींमुळे ओझोन थर दिवसेंदिवस विरळ होत आहे. जर आपण त्याची दक्षता घेतली

नाहीतर पृथ्वीवरील पर्यावरण, निसर्गसृष्टी, सर्व सजीवसृष्टी धोक्यात येईल. ओझोन क्षयाचे परिणाम पुढीलप्रमाणे :-

१. जर दिवसेंदिवस ओझोन थर असाच विरळ होत गेला तर सूर्यापासून पृथ्वीकडे अतिनिल किरणासोबत येणाऱ्या प्रचंड उष्णतेचे शोषण करण्याची क्षमता कमी होईल. त्यामुळे पृथ्वीवरील तापमानामध्ये वाढ होईल.

२. पृथ्वीवरील वाढत्या तापमानामुळे ध्रुवीय क्षेत्रातील बर्फ वितळण्याची प्रक्रिया वाढेल.

३. पृथ्वीवरील तापमानवृध्दीमुळे पर्जन्यमानावर विपरीत परिणाम होतील. विशेषत: मोसमी हवामानाच्या प्रदेशात पर्जन्यमानामध्ये मोठ्या प्रमाणात चढउतार होतील.

४. औद्योगिककरणातून होणारे वायूप्रदूषण आणि वाढते तापमान याचा परिणाम म्हणून आम्ल पर्जन्य, काळे पर्जन्य पाहावयास मिळेल. त्यातून दृष्टिदोष, श्वसनाचे रोग वाढतील. रक्ताभिसरणावर विपरीत परिणाम होईल.

५. पृथ्वीवरील सागरजलाची पातळी वाढेल, त्यामुळे सागरी किनाऱ्यावरील मानवी वस्त्या धोक्यात येतील. सागरी किनारे, बंदरे, शहरे, यांच्यावर याचा विपरीत परिणाम होतील. मासेमारी धोक्यात येईल.

६. कृषिक्षेत्रावर तापमानवाढीचे परिणाम होतील. अन्नधान्य व भाजीपाला यांचे उत्पादन कमी होऊन अन्नटंचाईची समस्या निर्माण होईल.

७. पृथ्वीवरील वाढत्या तापमानामुळे सजीवसृष्टीच्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल. कारण पृथ्वीवरील नैसर्गिक मांडणीत सजीव सृष्टी आणि एक विशिष्ट पातळीपर्यंतचे तापमान यांचा जवळचा संबंध आहे. पण ओझोन क्षयामुळे तापमान वाढेल आणि पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीला धोका निर्माण होईल.

८. दुष्काळ, वाळवंटी प्रदेशांची वाढ होईल.

## ❐ ओझोन थराचे महत्त्व :-

पृथ्वीवरील वातावरणातील ओझोन थराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपण कडक सूर्यप्रकाशात डोक्यावर गॉगल घातल्यानंतर जो अनुभव येतो, तोच अनुभव ओझोन यामुळे पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीला येत असतो. सूर्यापासून पृथ्वीकडे अतिनिल किरणासोबत येणाऱ्या प्रचंड उष्णतेचे शोषण करून हवी तेवढीच उष्णता पृथ्वीवर पाठवून सर्व सजीवसृष्टीचे संरक्षण करणारा सर्वात मोठा गॉगल

म्हणजे ओझोन थर होय. पण या ओझोन थरात जरा जरी बदल झाला तर त्याचे विपरीत परिणाम पृथ्वीवरील सजीवसृष्टीवर होतात. म्हणून या ओझोनरूपी गॉगलचे संरक्षण केले पाहिजे.

(**टीप :** ओझोन वायूचे मोजमाप डॉबसन एकक (DU) मध्ये केले जाते.)

## ❒ ओझोन क्षय थांबविण्याविषयीच्या उपाययोजना :-

मानवाने आपल्या बौध्दिक क्षमतेच्या जोरावर प्रचंड प्रगती केली आहे. पण ज्या निसर्गाच्या साथीने ही प्रगती साधली, त्या निसर्गाची योग्य ती काळजी न घेतल्यामुळे नैसर्गिक साधनांचा दुरुपयोग केल्यामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, त्यापैकी 'जागतिक तापमान वाढ' ही एक वैश्विक समस्या. ही समस्या सर्व जगभर व्यापून राहिल्यामुळे त्यासाठी सर्वच विश्वसमुदायाने एकत्रितपणे सामुदायिक प्रयत्न केले पाहिजेत. ते थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. औद्योगिक क्षेत्रातील मोठमोठ्या कारखान्यामधून सोडण्यात येणाऱ्या घातक वायू प्रदूषकावर बंधन घालणे.

२. कृषी क्षेत्रातील रासायनिक खतांचा, किटकनाशकांचा वापर कमी करणे, नैसर्गिक शेतीचे महत्त्व लक्षात घेऊन रासायनिक शेतीकडून सेंद्रीय शेतीकडे वाटचाल केली पाहिजे.

३. आपल्या दैनंदिन जीवनात गरजेपुरता प्रवास, गरजेपुरता वाहनांचा वापर, वैयक्तिक जीवनपध्दतीत बदल ही मानसिकता विकसीत केली पाहिजे.

४. आज आयटी क्षेत्रात रोज नवनवीन शोध लागतात. त्या शोधावर आधारित नवनवीन साधनांची निर्मिती केली जाते. पण इथे या क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या साधनामुळे विघटीत न होणारा घनकचरा ही नव्यानेच एक समस्या निर्माण झाली आहे. म्हणून आयटी क्षेत्रात गरजेपुरतीच साधने वापरली पाहिजेत.

५. आणि सर्वात शेवटी या पृथ्वीवर निसर्ग आणि माणूस यांची मैत्री वाढविली पाहिजे. निसर्गाचे संरक्षण व संवर्धन आणि मानवाचा विकास या पायावर ही मैत्री वाढली पाहिजे. त्यादृष्टीने निसर्ग संरक्षणविषयीचे दृष्टिकोन विकसित केले पाहिजेत. मानवाचा विकास हा निसर्गाचा ऱ्हास करून होत नसून निसर्गाचे संरक्षण व मैत्री यातून होतो आणि तोच टिकतो हे लक्षात घेतले पाहिजे.

६. पर्यावरण शिक्षणाची अनिवार्यता आणि लोकशिक्षणातून पर्यावरणाविषयीची जागृतीमधूनसुध्दा सकारात्मक प्रयत्न करता येतील.

## ❐ जागतिक पातळीवरून ओझोनचे संरक्षण :-

### १. मॉट्रेल ठराव (१९८७)

१९८७ मध्ये जगातील बावीस राष्ट्रांनी ठराव करून प्रथमच जागतिक तापमान वाढीविषयी चिंता व्यक्त करण्यात आली, त्यावर चर्चा करण्यात आली त्यानंतर १९९८ पर्यंत ओझोन थरावर घातक परिणाम करणारे औद्योगिक वायू उत्सर्जन ५०% कमी करण्याविषयीचा निर्णय घेण्यात आला.

### २. लंडन परिषद (१९८९)

या आंतरराष्ट्रीय परिषदेत जागतिक तापमान वाढीवर चर्चा करण्यात येऊन यामध्ये ओझोन संरक्षणासाठी (CFS) चा वापर कमीतकमी करण्यावर आणि त्याच्या वापरावर बंदी घालण्याचे ठरविण्यात आले.

### ३. युनो (UNO)

संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत पर्यावरण वैश्विक जनजागृतीसाठी ओझोन संरक्षणाचे महत्त्व सर्वांना कळावे यासाठी '१६ सप्टेंबर' जागतिक ओझोन दिवस निश्चित करण्यात आला आहे.

### ४. क्योटो करार (१९९७)

१९९७ मध्ये जपानमधील क्योटो शहरात ही परिषद घेण्यात आली. 'पृथ्वीवरील तापमान वाढ आणि त्यावरील उपाययोजना' हे या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट होते. यामध्ये वरील विषयाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा झाली. त्यामध्ये ग्रीन हाऊस गॅसेसचे प्रमाण कमी करण्याविषयीचा महत्त्वपूणृ निर्णय घेण्यात आला. सन २००५ मध्ये या कराराला जगातील १४१ देशांनी मान्यता दिली आहे. पण जागतिक महासत्ता म्हणून जागतिक राजकारण नियंत्रण करणारी अमेरिकेने मात्र या कराराला मान्यता दिलेली नाही.

## ❐ पर्यावरण समस्येतील राजकारण :-

आज जगभर सर्वत्र एकसमान विकास झालेला नाही, त्यामुळे विकसीत आणि विकसनशील राष्ट्रे असे दोन महत्त्वाचे गट जागतिक पातळीवर पाहावयास मिळतात. दुसऱ्या महायुध्दाच्या अंतापर्यंत जगभर अनेक साम्राज्यवादी देश राज्य करीत होते, त्या साम्राज्यवादी देशानी साम्राज्याअंतर्गत वसाहतीमधून नैसर्गिक साधने व मानवी संसाधन याचा मोठ्या प्रमाणात वापर करून आपली प्रगती साधली. त्यामध्ये गरीब देशातील पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात लूट केली. त्या देशात पुढे काही पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले.

दुसरे महायुद्धाचा एक ठळक परिणाम म्हणजे राजकीय साम्राज्यवाद संपला, पण रशिया व अमेरिका या दोन महासत्तांच्या नेतृत्त्वाने वैचारिक साम्राज्यवाद सुरू झाला. इथे साम्राज्यवादांचे स्वरूप बदलले, पण निसर्गाची लूट पुढे सुरू राहिली. कालांतराने रशियन महासत्तेचे पतन झाल्यानंतर आज एकमेव महासत्ता म्हणून अमेरिका नेतृत्त्व करते. वास्तविक जगाचे नेतृत्व करताना अमेरिकेने पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठीसुध्दा नेतृत्त्व करायला पाहिजे होते. पण आज पर्यावरणाचे राजकारण केले जात आहे. विकसित देश आजही 'जागतिक तापमान वाढीस' मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत, पण ही समस्या सोडविण्यासाठी पाहिजे तेवढे लक्ष देत नाहीत. निसर्गाच्या साधनसंपत्तीचे सर्वात मोठे लाभार्थी विकसित देश पण पर्यावरण समस्यांचा फटका, जबाबदारी विकसनशील देश. असे विचित्र पर्यावरणीय राजकारण पाहावयास मिळते.


म्हणून सर्वच राष्ट्रांनी 'जागतिक तापमानवाढ' या समस्येचे गांभीर्य ओळखले पाहिजे. नि:स्वार्थी, निकोप भावनेतून ही समस्या सोडविण्यासाठी सामुहिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. 'चिरस्थायी विकास आणि भविष्यकालीन पिढ्यांची काळजी' या मानवतावादी भूमिकेतून सर्वांनी आपली पृथ्वी, पृथ्वीवरील निसर्ग, पर्यावरण आणि शेवटी माणूस वाचविणे गरजेचे आहे. म्हणून शेवटी असे म्हणता येईल, ''पृथ्वी वाचली तर मानव वाचेल'' म्हणून आपण सर्वांनी पृथ्वी वाचवू या (SAVE THE ERTH).

जागतिक तापमान वाढीचा परिणाम दर्शविणारा खालील तक्ता पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल.

**तक्ता क्र. १ समुद्र पातळीतील १ मीटर वाढीमुळे अंदाजे होणारे परिणाम**

| देश | समस्याग्रत लोक | | जमीन | |
|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या दशलक्ष | एकूण % | कि. मी. | एकूण % |
| चीन | ७२ | ७ | ३५,००० | --- |
| बांगला देश | ७१ | ६० | २५,००० | १७.५ |
| जपान | १५ | १५ | २,३०० | ०.६ |
| नेदरलँड | १० | ६७ | २,१६५ | ५.९ |
| भारत | ७.१ | १ | ५,८०० | ०.४ |
| इजिप्त | ४.७ | ९ | ५,८०० | १.० |
| नायजेरिया | ३.२ | ४ | १८,६०० | २.० |

❒ **ओझोन क्षय : परिणाम आणि वातावरणातील बदल :-**




## ३.३ सारांश

'पर्यावरणीय संरक्षण' ही एक वैश्विक समस्या आहे. आज विज्ञानामुळे जग जवळ आले आहे. आज जगातील कोणताही देश स्वयंपूर्ण नाही. त्याला जगातील इतर देशांची मदत घ्यावी लागते. आज राष्ट्रा-राष्ट्रात जगाचे नेतृत्त्व करण्यासाठी जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. आज प्रत्येक देश आपला जास्तीत जास्त विकास करू पाहात आहे. त्यातून विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनांची प्रचंड लूट केली जात आहे. त्यातून पर्यावरणाचा समतोल बिघडून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या समस्यांचे वैश्विक परिणाम दिसू लागले आहेत. जसे जागतिक तापमान वाढ. विकासाच्या नावाखाली राष्ट्रा-राष्ट्रांत तीव्र स्पर्धा होत आहे. त्यातून विकसनशील व विकसीत राष्ट्रगट निर्माण झाले आहेत. 'पर्यावरण संरक्षण' ही आज सर्वांची गरज आहे. पण जागतिक पातळीवर विकसित राष्ट्रे, प्रामुख्याने अमेरिका पर्यावरण संरक्षणास अपेक्षित प्रतिसाद देत नाही. जगातील बडी राष्ट्रे पर्यावरणाचे राजकारण करतात.

आज पृथ्वीवरील पर्यावरणीय समस्यांची सोडवणूक करून निसर्ग पर्यायाने मानवी समाज वाचवायचा असेल तर राष्ट्रा-राष्ट्रांनी वैयक्तिक प्रतिष्ठा बाजूला ठेवून, मानवतावादी दृष्टिकोनातून, प्रामाणिकपणे आपला सहभाग दिला तरच हे सर्व प्रश्न संपतील, आणि आपली पृथ्वी वाचेल. म्हणून,

**"SAVE THE ERTH"** यासाठी,

***सर्वांचा सहभाग! सर्वांचे प्रयत्न!! सर्वांना लाभ!!!***

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. निसर्ग हा मानवाचा मित्र आहे.

२. निसर्गातील साधन संपत्ती मानवी विकासातील मुख्य स्रोत आहे.

३. 'पर्यावरण' मानवी विकासाला पूरक व पोषक आहे.

४. नैसर्गिक साधन सामग्रीची बेसुमार लूट करून मानवाने केलेला विकास हा विकास नसून विनाश आहे.

५. पर्यावरणवाद व मानवी संस्कृती यांचा घनिष्ठ संबंध.

६. वाढती लोकसंख्या-वाढते शहरीकरण-वाढते औद्योगिकीकरण अनेक पर्यावरणीय जन्म देते.

७. वातावरणातील ओझोन वायूचा थर पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी एक प्रभावी सुरक्षा कवच. निसर्गातील मोठा गॉगल.

८. 'पर्यावरण संरक्षण' - वैश्विक समस्या.

९. पर्यावरण संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रसंघटना (UNO) सहीत जगभरातील सर्व देश प्रयत्न करतात.

१०. 'पर्यावरण शिक्षण' आधुनिक काळात सर्वांसाठी अनिवार्य व आवश्यक अभ्यास विषय आहे.

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. पर्यावरणाची व्याख्या व स्वरूप सांगून महत्त्व स्पष्ट करा.

२. मानव आणि निसर्ग यांच्या संबंधाची सविस्तर चर्चा करा.

३. पर्यावरणातील मुख्य समस्या व त्यावरील उपाययोजना.

४. पर्यावरणवादाची मुख्य वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करा.

५. जागतिक पातळीवरून करण्यात आलेले पर्यावरण संरक्षणासाठीचे प्रयत्न.

६. 'जागतिक तापमान वाढ' एक वैश्विक समस्या चर्चा करा.

७. 'पर्यावरण शिक्षणाची अनिवार्यता' सविस्तर मांडणी करा.

**(ब) टिपा लिहा.**

१. पर्यावरणवाद.

२. मानव आणि निसर्ग.

३. पयावरणीय समस्या.

४. औद्योगिकीकरणाचे परिणाम.

५. जागतिक तापमान वृध्दीचे परिणाम.

६. पर्यावरण संरक्षणासाठीच्या चळवळी.

७. शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षण.

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **भागवत, विद्युत** (१९९७) : 'महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने', समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

२. **माने, रचना** (२०१३) : 'स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरूप', अक्षर दालन, कोल्हापूर.

३. **जी. एल. शर्मा** (२०१५) : 'सामाजिक मुद्दे', रावत पब्लिकेशन, जयपूर.

४. **रासम, वासंती :** 'भारतातील महिला अधिकारांचे स्वरूप', नवज्योत, सप्टेंबर २०१४.

५. **सुमंत, यशवंत :** 'स्त्रीमुकतीकडून मानवमुक्तीकडे', मिळून साऱ्याजणी, जाने ते जून, १९९९.

६. **नाईक, शोभा** (२००७) : 'भारतीय संदर्भातून स्त्रीवाद', लोकवाङमयगृह, मुंबई

७. **पाटील, भारती :** 'स्त्रीयांचा सत्तेतील सहभाग, सबलीकरण प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा.

८. **बाचल वि. मा.** : *'राजकीय सिद्धांत'.*

९. **भोळे भा. ल.** : *'राजकीय सिद्धांत विश्लेषण'.*

१०. **डोळे ना. य. :** *'राजकीय विचारांचा इतिहास'.*

११. **नवलगुंदकर श. ना. :** *'पाश्चात्त्य राजकीय विचारवंत'.*

१२. **Bhandari D. R.** *"History of European Political Philosophy".*

१३. **Bhargava R., Bagchi A. K., Sudarshan R.**, *"Multiculturalism, Liberalism and Democracy"*, Oxford University Press, New Delhi.

१४. **Bhosale S. D.**: "Gender Discrimination, Role of Social Reforms and Feminist Movement in India, Navajyot, Dec., 2014.

❋❋❋

घटक–४

# नागरी समाज

## (Civil Society)

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ नागरी समाजाचा अर्थ व विकास

४.२.१.१ नागरी समाज – उदारमतवाद

४.२.१.२ नागरी समाज – राजकीय आर्थिक व्यवस्था

४.२.१.३ नागरी समाज – राजकीय आर्थिकता

४.२.२ नागरी समाज – जॉन लॉक

४.२.३ नागरी समाज – हेगेल

४.२.४ नागरी समाज – मार्क्स

४.२.५ नागरी समाज – ॲटोनिओ ग्रामसी

४.२.६ उत्तर वसाहतवाद व नागरी समाज

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

१. नागरी समाज संकल्पना स्पष्ट करणे.

२. नागरी समाज व राजकीय समाज फरक स्पष्ट करणे.

३. नागरी समाजाबद्दल तत्त्वज्ञांचे विचार व विवेचन.

## ४.१ प्रास्ताविक

अलीकडील काही दशकांपासून नागरी समाज ही संकल्पना रूढ झालेली आहे. यापूर्वी राज्य व नागरी समाज या दोहोंचा अर्थ एकच मानला जात असे. मात्र अलीकडील काळात यामध्ये असणारा फरक स्पष्टपणे जाणवत आहे. नागरी समाज म्हणजे समाजातील अशा व्यक्तींचा समूह की, जो नागरिकांच्या कल्याणासाठी तसेच समाजाच्या कल्याणासाठी कार्यरत असतो. वास्तविक ही संघटना गैरसरकारी असते. ती कार्य करत असताना संघटना व संस्थांच्याद्वारे नागरिकांच्या इच्छांचे व हितसंबंधाचे संरक्षण करीत असते. अशा संघटना व संस्था समाजात स्वतंत्र असतात, त्या सरकारच्या कोणत्याही बंधनात नसतात. आधुनिक काळात नागरी समाजाची उपयुक्तता लोकशाही समाज निर्माण करण्यासाठीसुद्धा झालेली आहे, कारण लोकशाहीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींसाठी त्यांचा सातत्याने संघर्ष दिसून येतो. उदा. भाषण स्वातंत्र्यासाठी संघर्ष, न्यायालयीन स्वातंत्र्यासाठी संघर्ष इ. युरोपमध्ये तर नागरी समाजाचा व्यवस्थेविरुध्द असणारा संघर्ष म्हणजे नागरी मूल्यांच्यासाठी सुरू असलेला संघर्ष मानला जातो. कारण नागरिकांना समाजात जगत असताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये सरकारच्या ध्येय धोरणांचा देखील हात असतो, अशावेळी संघर्ष करत असताना संघर्ष करणारे नागरी समाजाचे नेते व कार्यकर्ते समाजात असणाऱ्या चांगल्या मूल्यांसाठी संघर्ष करीत असतात. लोकशाही व्यवस्थेमध्ये १९९१ नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मुक्त अर्थव्यवस्थेचे महत्त्व वाढले. समाजवादी व्यवस्थेच्या बंदिस्त विळख्यातून मुक्त झालेला समाज स्वातंत्र्याची फळे मुक्तपणे चाखू लागला, परंतु भांडवलशाही राष्ट्रांनी याच काळात आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या जोरावर व मुक्त व्यापाराच्या कल्पनेतून जगासमोर नवी आव्हाने उभी केली. गतिमान अर्थव्यवस्थेबरोबर विकासाची स्वप्ने दाखविण्यात आली, परंतु त्यामुळे नागरिकांचे हक्क डावलण्यात येऊ लागले. यामध्ये शेतजमिनी ताब्यात घेणे, सरकारी मालमत्ता कमी किंमतीमध्ये खरेदी करणे, नागरिकांच्या मूलभूत सोयींकडे दुर्लक्ष होणे, शिक्षण, आरोग्य, दळणवळण यासारख्या मूलभूत सोयी सर्वसामान्य लोकांना परवडण्याच्या पलीकडे जाऊ लागल्या. हे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्या व राष्ट्रीय कंपन्यांच्या प्रचंड भांडवल गुंतवणुकीला दिलेल्या प्राधान्यामुळे घडून आले. सरकारी गुंतवणुकीचे प्रमाण कमी होऊन खाजगी गुंतवणूकीला प्राधान्य दिल्यामुळे खाजगी क्षेत्रामध्ये नागरिकांच्या सोयीपेक्षा नफा मिळविण्याकडे जास्त लक्ष देण्यात येऊ लागले. परिणामी, नागरिकांचे हक्क डावलले जाऊ लागले, याला विरोध करण्यासाठीच गैर सरकारी संघटना स्थापल्या जाऊन समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले जाऊ लागले, यांनाच पुढे नागरी समाज म्हणून ओळखले जाऊ लागले.

वास्तविक, भांडवलशाही व्यवस्था व समाजवादी व्यवस्था यांच्यातून निर्माण झालेल्या शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर भांडवलशाही व्यवस्था जोराने फोफावली. प्रगती व विकासाबरोबर दुष्परिणामदेखील जाणवू लागले. विविध देशातील मध्यमवर्गीय जनतेला याचे चटके जास्त बसू लागले, त्यांना विरोध करण्यासाठी नागरी समाज संघटना निर्माण झाल्या. सर्वसामान्य जनतेचे हक्क, नैतिक मूल्ये, सार्वजनिक मालमत्ता, नैसर्गिक साधनसंपत्ती, स्वातंत्र्य, न्याय या गोष्टींच्या संरक्षणासाठी गेल्या दोन ते तीन दशकांमध्ये नागरी समाज संघटनांनी लढा उभारला. या नागरी समाज संघटनामध्ये शैक्षणिक, प्रसारमाध्यमे, खाजगी क्षेत्रातील संस्था, विद्यार्थी, तरुण यांचा प्रामुख्याने समावेश होतो. यामुळेच नागरी समाजाचे योगदान, त्यांचे संबंध, त्यांची ध्येय धोरणे, त्यांना होणारा रसद पुरवठा या सर्वांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ नागरी समाजाचा अर्थ व विकास

नागरी समाज ही संकल्पना नागरी (Civil) व समाज (Society) या दोन शब्दापासून बनलेली आहे. नागरी हा शब्द देशातील नागरी सेवा, देशातील नागरिक, सभ्य, सुसंस्कृत व्यक्ती यांच्यासाठी वापरतात. तसेच समाज (Society) हा शब्द अनेक व्यक्तीचा समूह, संघटित व्यक्तींचा समूह, मूल्यांसाठी एकत्रित आलेला समुदाय यांच्यासाठी वापरला जातो. ॲरिस्टॉटलच्या 'पॉलिटिक्स' या ग्रंथात 'नागरी समाजासाठी' (Koinonia Politike) ही संज्ञा वापरली आहे. यामध्ये लोकसमूदायापासून नगर राज्य (Polis) निर्मिती होवून यामध्ये नागरिकांच्याकडून नियमांचे व नैतिकतेचे पालन केले जात असे. या ठिकाणी राहणारे नागरिक समान कायद्याने नियंत्रित केले जातात. ज्यावेळी नागरी समुदायाने कायद्याचे नियंत्रण मान्य केले, त्याचवेळी नागरी समाजाच्या अस्तित्त्वावर बंधने आली, म्हणजेच मानव हा 'राजकीय प्राणी' बनला. रोमन विचारवंत सिसेरो, मध्ययुगीन काळातील समाजसुधारणावादी विचारवंत विल्यम मोअरबेक (William Morebeke) आणि बिनार्दो ब्रुनेई यांच्या मते, नागरिकांचे कायदे व राज्याची सत्ता यांच्यामध्ये वेगळेपणा दिसू लागला. त्यातूनच सरंजामदार व जमीनदार, राज्य वापरत असलेल्या अधिकारांना विरोध करू लागले. अलीकडच्या काळात वेवलेव्ह हॉवेल यांच्या मते, पूर्व युरोपमध्ये नागरी संघटना राज्य सरकारकडून प्रभावित करणाऱ्या साम्यवादी सरकारना विरोध करू लागल्या.

वास्तविक अठराव्या शतकामध्ये अज्ञानाचा अंध:कार दूर होत असताना आधुनिक विचारांच्या सुरवातीस नागरी समाजाच्या संकल्पनेचा उदय झाला. यापेक्षा अगोदरदेखील विचारांच्या इतिहासात पाहिले असता मानवी समुदायात एकमेकांत संघर्ष उत्पन्न होऊ नयेत म्हणून मानवाच्या राजकीय संघटना निर्माण झाल्या. प्राचीन काळात याचा 'चांगला समुदाय' असाच उल्लेख आढळतो. **सॉक्रेटिस**च्या मते, समाजातील नागरिकांच्यामध्ये असणारा संघर्ष लोकांनी एकत्रित येऊन आपली मते भाषणाद्वारे प्रकट करून

(dialetic) सोडवावित. त्यातून समाजासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी स्पष्ट होतील असे सांगितले. यावरूनच स्पष्ट होते की, नागरी समाजातील प्रश्न संभाषणाने सोडविल्याने नगरराज्यामधील नागरिकांच्यात असणारी सभ्यता दिसून येईल. **प्लेटो**च्या मते, आदर्श राज्य म्हणजे चांगला नागरी समाज होय. यामध्ये नागरिक समाजाच्या भल्यासाठी, स्वातंत्र्यासाठी, धाडस, आधुनिकता व न्याय यावर विश्वास ठेवत. अशा नागरी समाजाचे संरक्षण करण्याची जबाबदारी 'तत्त्वज्ञानी राजाची' होती. **ॲरिस्टॉटल**च्या मते, नगरराज्य नागरिकांच्या संघटनांची संघटना होती. यामध्ये नागरिकांच्यावर राज्य करण्यासाठी नागरीकच मदत करत असत. त्यांची (Koinonia Politike) ही संकल्पना म्हणजे 'राजकीय समुदायाची' संकल्पना होती.

रोमन विचारवंत सिसेरो यांच्या मते, 'आदर्श समाज' नागरिकांच्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याबाबत खात्री देत असे. त्यावेळचे तत्त्वज्ञानी राज्य व समाज यामध्ये भेद मानत नसत. त्याकाळात राज्य नागरिकांचे व समुदायाचे प्रतिनिधीत्व करत आणि सभ्यतेला आदर्श नागरिकांची गरज असे. त्यांच्यामते, मानवाकडून एकत्रित येऊन समाजाला आकार दिला जात असे. समाजात शांतता निर्मितीसाठी नागरिक एकत्र येत असत. यावरून प्राचीन राजकीय विचारवंतांच्याकडून नागरी समाजाच्या अस्तित्त्वाला मान्यता दिली. मध्ययुगामध्ये या व्यवस्थेत खूपच बदल घडून आले. सरंजामशाही पद्धतीच्या विकासामुळे आदर्श नागरी समाजाची संकल्पना राज्यव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहातून बाजूला पडली. राज्यव्यवस्थेत निर्माण होणारे प्रश्न संभाषणाद्वारे सोडविण्यापेक्षा मुद्यावर भर दिला जाऊ लागला. ही व्यवस्था प्रबोधन काळापर्यंत तशीच राहिली.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर वेस्टफालियाच्या तहाने जगामध्ये अनेक सार्वभौम राष्ट्रांचा जन्म झाला. ही राष्ट्रे विशिष्ट भूप्रदेशात सार्वभौम होती. ज्या राज्यांमध्ये राजेशाही होती त्यांनी सरंजामशाही नष्ट करून सैन्याचे एकत्रीकरण केले. त्याला राष्ट्रीय सैन्य असे नाव देऊन व्यावसायिक नोकरशाही निर्माण केली. करवसुलीसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली. यामुळेच संपूर्ण राज्यव्यवस्थेवर त्यांचे प्रत्यक्ष नियंत्रण आले. सरकारच्या होणाऱ्या खर्चाचे नियमन करण्यासाठी राज्याची अर्थव्यवस्थाच राजांनी आपल्या ताब्यात घेतली. यामुळेच संपूर्ण युरोपभर १८व्या शतकाच्या मध्यापर्यंत सर्व सत्ता राजांच्या ताब्यात गेली व सर्वंकष वादाचा जन्म झाला. संपूर्ण सत्ता राजांच्या हाती एकवटलेली सर्वंकर्ष व्यवस्था प्रबोधन काळ सुरू होईपर्यंत म्हणजेच अज्ञानाचा अंध:कार दूर होईपर्यंत टिकून राहिली. यानंतर प्रबोधन, मानवतावाद आणि वैज्ञानिक क्रांती यांचा परिणाम या व्यवस्थेवर होऊन वंशपरंपरागत राजसत्ता, त्यांनी निर्माण केलेली शासन व्यवस्था, मूलभूत हक्कांच्या वाटपामध्ये असलेली विषमता याबाबत विचारवंतानी सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये प्रश्न निर्माण केले. यामुळेच सर्वंकर्षवादी व्यवस्थेमधून बाहेर पडून सर्वसामान्य जनतेच्या हक्कांचे राज्य निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू झाली. या काळात आधुनिक विचारसरणीच्या विचारवंतांना दैवी शक्तीच्या आधारे निर्माण झालेली राज्य व्यवस्था चुकीची वाटू लागली, त्यांनी राजसत्ता व धर्मसत्ता यांच्या एकत्रीकरणाला विरोध करण्यास चालू केले. कारण त्यांच्या मते, मानवाच्या विकासामध्ये वरील व्यवस्था प्रमुख अडचण होती. याला हळूहळू जनतेचा पाठिंबा मिळू

लागला. यामुळे राजसत्ता व धर्मसत्ता ही जनमताच्या विरोधात असल्याचे दिसू लागले. यातूनच मानवाला जास्तीत जास्त हक्क मिळावेत, यासाठी राजसत्तेबरोबर संघर्ष सुरू झाला. नागरिकांच्यामध्ये आपल्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण झाली. यातूनच नागरिकांच्या संघटना निर्माण होऊ लागल्या, यालाच नागरी समाजाची सुरवात असे मानता येईल. प्रबोधनाच्या काळात अज्ञानाचा अंध:कार दूर होत असताना नागरिकांना आवश्यक असणारी राज्य व्यवस्था निर्माण करण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले. त्याचे पडसाद आपल्याला दमनशाहीच्या विरोधात संघर्ष करणाऱ्या २१व्या शतकातील नागरी समाजात दिसून येतो. नागरी समाजाच्या व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. **जेफ्री अलेक्झांडर** यांच्या मते, ''नागरी समाज म्हणजे राज्याव्यतिरिक्त इतर संस्थांना एकत्र आणणारे किंवा करणारे संयुक्त, सर्वसमावेशक छत्र होय.''

२. **जॉर्ज हागिंस/हागिन्स** यांच्या मते, ''नागरी/सुसंस्कृत समाज हा संघटित समाज असून त्यावर राज्य शासन करते.''

३. **नीरज गोपाल जायल** यांच्या मते, ''नागरी समाजामध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्थांचा समावेश होतो व त्यावर राज्यांचे नियंत्रण नसते.''

४. **लैरी डायमंड** यांच्या मते, ''नागरी समाज एक संघटित सामाजिक जीवन दर्शवितो, ज्यात ऐच्छिकता, स्वजनहीत, समर्पित व कायदेशीर व्यवस्था व सहभागिता या मूल्यांचा प्रभाव असतो.''

नागरी समाजामध्ये विविधता असून ऐच्छिक प्रयत्न, सहनशीलता सर्वांचा आदर करून सर्वांना पटेल अशा प्रकारचा निर्णय घेतला जातो. यामध्ये वेगवेगळ्या संघटनांचा समावेश होतो. उदा. युवक संघटना, शेतकरी संघटना, कामगार संघटना, महिला संघटना, राजकीय पक्ष, सामाजिक सुधारणेसाठी प्रयत्न करणाऱ्या संस्था इ. समावेश असतो. यांच्या कार्याचा विचार करता सरकारवर दबाव आणून आपल्या मागण्या मान्य करून घेणे अशी यांची कार्यपध्दती असल्याचे आढळते. त्यांच्यासमोर लोकशाही व्यवस्था मजबूत करून सामाजिक हित साधण्याचे उद्दिष्ट असते. यामधूनच त्यांच्याकडून मानवी हक्कांचे संरक्षण केले जाते.

## ४.२.१.१ नागरी समाज – उदारमतवाद

नागरी समाजामध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्याला महत्त्व असते. राज्यघटनेने दिलेली स्वातंत्र्य त्याचे पालन करत असताना व्यक्तीसमोर राज्यसंस्थेकडून अनेक आव्हाने निर्माण केली जातात. त्यामुळे त्या आव्हानांना तोंड देत व्यक्तीकडून आपल्या स्वातंत्र्याची जपणूक करत असते. राजेशाही, हुकूमशाही या व्यवस्थेत व्यक्तीला नागरी समाजाद्वारे संघर्ष करावा लागला, तसाच संघर्ष लोकशाही व्यवस्थेतदेखील करावा लागत आहे. वास्तविक लोकशाही व शासनव्यवस्थेच्या प्रकाराबरोबरच सामाजिक व आर्थिक

व्यवस्थेचा भाग आहे. शासन व्यवस्थेद्वारे त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जातो. आधुनिक काळात उदारमतवादामध्ये व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व दिले आहे. व्यक्ती केंद्र बिंदू मानून राज्यव्यवस्थेच्या कार्याची व्याप्ती किती असावी हे निश्चित केले जाते. म्हणजेच राज्यव्यवस्थेने कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यापुरतेच मर्यादित कार्य करावे. व्यक्तीच्या जीवनामध्ये राज्यव्यवस्थेचा हस्तक्षेप कमी असावा. नागरी समाजाच्या दृष्टिकोनातून राज्यव्यवस्थेची ही भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कारण नागरी समाज समाजातील घटकांच्यासाठी कार्य करीत असताना राज्यव्यवस्थेच्या हस्तक्षेपाला सातत्याने सामोरे जावे लागते. व्यक्तिविकास व व्यक्तीस्वातंत्र्य यांना मारक ठरणाऱ्या गोष्टी नष्ट करण्यासाठी उदारमतवादी चळवळ निर्माण झाली. त्याचप्रमाणे नागरी समाजाचे वैशिष्ट्य देखील व्यक्तीविकास व व्यक्तीस्वातंत्र्य असल्याचे आपल्या दिसून येते.

समाजाच्या गरजेनुसार काळाप्रमाणे उदारमतवादी विचारप्रणालीमध्ये बदल होत गेले. विविध विचारवंतानी यासाठी योगदान दिले. त्यातून व्यक्तीवाद, उपयुक्ततावाद, सेंद्रीय सिद्धांत, निरंकुश अर्थव्यवस्थेचा सिद्धांत (लेसेफेअर तत्त्वज्ञान), उदारमतवादी लोकशाही सिद्धांत, फेबियन समाजवाद असे उदारमतवादाचे विविध दृष्टिकोन निर्माण झाले. ज्याप्रमाणे नागरी समाजामध्ये व्यक्तीचे हक्क व स्वातंत्र्य जपण्यासाठी जागरूकता निर्माण केली जाते. त्याप्रमाणे उदारमतवादी सिद्धांताच्या विविध दृष्टिकोनामध्ये व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीमत्त्वाचा विकास ही मध्यवर्ती संकल्पना मानून नैतिक मूल्य गृहीत धरले आहे. समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी लोकशाही व्यवस्था व स्वातंत्र्यासाठी उदारमतवाद अशी व्यवस्था निर्माण झाली. यामधूनच आधुनिक काळात उदारमतवादी लोकशाही व्यवस्था निर्माण झाली आहे. जी नागरी समाजाच्या अस्तित्त्वासाठी आणि विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

वास्तविक धर्मसुधारणेची चळवळ, पुनुरुज्जीवनाची (प्रबोधनाची) चळवळ यामधून उदारमतवादी विचारवंतानी व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. म्हणजेच व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीची प्रतिष्ठा यांना विरोध करणाऱ्या व्यवस्थेच्या विरुध्द प्रतिकाराच्या भावनेतून उदारमतवादाचा उदय झाला. प्राचीन काळापासून राज्यकर्त्यांची हुकूमशाही, सरंजामशाही आणि धर्मसंस्था यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य अडचणीत आले होते, त्याला विरोध करण्यासाठी उदारमतवादाची निर्मिती झाली. समाजजीवनात व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीची प्रतिष्ठा यांचे संरक्षण करून संवर्धन करण्यासाठी उदारमतवादामध्ये प्रयत्न केले गेले.

उदारमतवादाच्या संकल्पनेत नागरी समाजाचा विचार केल्यास नागरी समाजामध्ये व्यक्तीच्या इच्छा व हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी गैरसरकारी संघटना अस्तित्त्वात आलेल्या असतात. नागरी समाजामध्ये या संघटनांच्याद्वारे व्यक्तीचे वैयक्तिक जीवन, कौटुंबिक समस्या यांचे संरक्षण सरकारी संघटनापासून केले जाते. या संघटना सरकारी व्यवस्थांपासून पूर्णपणे स्वतंत्र असतात. ज्याप्रमाणे उदारमतवादी व्यवस्थेत व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीची प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी प्रयत्न केला जातो, त्याप्रमाणे या गैरसरकारी संघटना व्यक्तीचे हक्क व स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द लोकशाही मार्गाने संघर्ष करीत असतात. या संघटनांना राजकीय व्यवस्था किंवा सरकार कोणत्याही मार्गाने नियंत्रित

करू शकत नाही, यावरूनच नागरी समाज व उदारमतवादी संकल्पना एकमेकांना पूरक असल्याचे दिसते, कारण दोन्ही ठिकाणी व्यक्ती केंद्रीभूत मानून व्यक्तीचे हक्क व व्यक्तीची प्रतिष्ठा सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न दिसून येतो.

नागरी समाजामध्ये व्यक्तीचे स्वातंत्र्य, हक्क, प्रतिष्ठा हे सर्व सुरक्षित ठेवण्यासाठी विविध संघटना कार्य करीत असतात. या संघटनांच्याद्वारे आपल्याला नागरी समाजाचे अस्तित्त्व जाणवते. त्यांच्याद्वारे सरकारच्या निरंकुशतेवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. त्या संघटना खालीलप्रमाणे गैरसरकारी संघटना (N.G.O.), ना नफा ना तोटा तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या संघटना (N.P.O.'s), किंवा नागरी समाज संघटना (C.S.O.'s) याशिवाय खाजगी कार्य करणाऱ्या संघटना (P.V.O.'s) अशा प्रकारच्या संघटना उदारमतवादामध्ये नमूद केलेले नागरिकांचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा टिकविण्याचे कार्य करताना दिसून येतात.

### ❐ नागरी समाज व उदारमतवादाची तत्त्वे –

ज्याप्रमाणे उदारमतवादामध्ये व्यक्तीस्वातंत्र्याला प्राधान्य देऊन व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी व्यक्तीला हक्क अधिकार प्रदान केले आहेत, त्याचप्रमाणे नागरी समाजदेखील व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या हक्कांच्यासाठी प्रस्थापित राज्यव्यवस्थेशी संघर्ष करताना दिसतो. उदारमतवादामध्ये राज्याला व्यक्तीच्या विकासासाठीचे साधन मानले आहे. अशा राज्याकडून व्यक्तीला केंद्रस्थानी मानून नागरिकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी नागरी समाजात अलीकडे गैर सरकारी संघटना सरकारवर दबाव आणताना दिसतात. उदारमतवाद व्यक्तीच्या विचारशीलतेवर विश्वास ठेवतो म्हणजेच व्यक्ती विचार करू शकते. व्यक्तीचे विचार स्वातंत्र्य व कृती स्वातंत्र्य उपभोगत असताना स्वत:च्या विचार करण्याच्या व्यक्तीद्वारे योग्य अयोग्यतेचा विचार करते. नागरी समाजामध्ये व्यक्तींच्या संघटना काम करत असताना एखाद्या घटनेचा समाजावर कितपत परिणाम होईल तो चांगला असेल की वाईट असेल या सर्वांचा विचार करून निर्णय घेतात. व्यक्तीच्या जीवनात राज्याचा किमान हस्तक्षेप असावा. केवळ व्यक्तीला उच्चार, विचार आणि संघटन स्वातंत्र्य दिले आहे. त्यासाठी व्यक्तीचे अंतर्गत व बाह्य शत्रूपासून संरक्षण करणे हे राज्याचे कार्य असते. नागरी समाजात व्यक्तीच्या विचार, उच्चार, संघटन स्वातंत्र्याचा वापर करून गैरसंघटना स्थापन करत असतात व त्यांच्याद्वारे व्यक्तींना समाजात वावरत असताना विचार व उच्चार स्वातंत्र्याची जाणीव करून देऊन यावर कुणाचे अतिक्रमण होणार नाही, यासाठी सातत्याने दक्ष असतात. अतिक्रमण झाल्यास राज्याचे लक्ष त्याकडे वेधून घेतात.

उदारमतवादी व्यवस्थेत मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केला आहे. राज्याने व्यक्तीच्या आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप न करता व्यक्तीला खुल्यापणाने उद्योगधंदे, व्यापार करू द्यावा. नागरी समाजाने मुक्त अर्थव्यवस्थेला विरोध केलेला नाही. मात्र अलीकडील काळात काही बहुराष्ट्रीय कंपन्याच्याकडून सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर होणारे अतिक्रमण त्यांना मान्य नाही, त्यासाठी सातत्याने

पर्यावरणाची होणारी हानी, प्रदूषण आर्थिक शोषण यासाठी संघर्षाची भूमिका नागरी समाज संघटना घेताना आपल्याला दिसून येतात. नागरी समाज व उदारमतवादी संघटना, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे अंमलात आणण्यासाठी लोकशाही व्यक्तीचा पुरस्कार करतात. त्याचबरोबर व्यक्ती धर्मसंस्थापासून अलिप्त ठेवून धर्मनिरपेक्षता व मानवतावाद यांचा पुरस्कार करून व्यक्तीचे जीवन धार्मिक संस्था व संघटना यापासून अलिप्त असावे असे मानले जाते.

नागरी समाज व उदारमतवाद यांचा फार जवळचा संबंध दिसून येतो. काही विचारवंतांनी १७व्या शतकापासून व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी व हक्कांसाठी मांडलेले विचार आजही नागरी समाजासाठी पूरक आहेत, त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्याचा इतिहास पाहणे जरूरीचे आहे. प्रस्थापित राजेशाही व्यवस्थेला विरोध करून व्यक्तीना अधिकार मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य इंग्लंडमधून सुरू झाले. इंग्लंडमधील १६८८ ची राज्यक्रांती व १६८९ मध्ये पास झालेले बिल ऑफ राईटस् यामधून व्यक्तीला केंद्रस्थानी मानून व्यक्तीचा विकास म्हणजे समाजाचा विकास व समाजाचा विकास म्हणजे राज्याचा विकास मानणारी उदारमतवादी व्यवस्था अस्तित्वात आली. जॉन लॉकच्या सामाजिक कराराच्या विचारांचा प्रभाव याच्यावर पडल्यामुळे घटनात्मक मार्गाने या व्यवस्थेत व्यक्तीस्वातंत्र्याचे संरक्षण करण्यात आले. त्यामुळेच आधुनिक काळात उदारमतवादाचा निर्माता जॉन लॉक ठरला त्याने व्यक्तीचा नैतिक विकास झाला पाहिजे, त्यासाठी राज्याचा वापर केवळ व्यक्तीविकासाचे साधन म्हणून केले पाहिजे असे स्पष्ट केले. लॉकच्या या उपयोगितावादाच्या विचारांचा प्रभाव बेन्थॅम व मिल यांच्यावर पडला. लॉकने मांडलेले व्यक्तीवाद, उपयुक्ततावाद आणि व्यक्तीचे हक्क त्यांचे रक्षण या सर्वांचा विचार करता आजच्या नागरी समाजाच्या चळवळीसाठी हे विचार आजही पूरक असल्याचे दिसते.

## ४.२.१.२ नागरी समाज – राजकीय व आर्थिक व्यवस्था

**जेरेमी बेन्थॅम** यांनी राज्य म्हणजे व्यक्तीचा गट असून त्याचा उपयोग व्यक्तीचे सुख मिळविण्यासाठी केला जावा. शासनसंस्था जोपर्यंत व्यक्तीला जास्तीत जास्त सुखी ठेवण्याचा प्रयत्न करते तोपर्यंत तिच्या आज्ञा  सर्वसामान्य लोकांच्याकडून पाळल्या जातात. नागरी समाजाच्या दृष्टीने बेन्थॅम यांच्या विचाराचा विचार केल्यास नागरी समाज देखील व्यक्तीच्या जीवनात राज्यव्यवस्थेचा हस्तक्षेप कमीतकमी व्हावा या दृष्टिकोनातून प्रयत्न करतो. ज्यावेळी राज्यव्यवस्था व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण करत नाही, त्यावेळी नागरी समाज त्या राज्यव्यवस्थेशी संघर्ष करण्यासाठी सिद्ध होतो.

**जे. एस्. मिल** यांच्या मते, व्यक्ती सार्वभौम असते. ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या स्वतंत्र असते. त्यामुळेच राज्याने व्यक्तीच्या विकासासाठी व स्वत:च्या हितासाठी व्यक्तीला स्वातंत्र्य बहाल करावे. समाजाने व राज्याने त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये. याचबरोबर व्यक्तीने देखील स्वत:चा विचार न करता स्वत:चे हीत साधत असताना समाजाचे हीत देखील साधावे, याच स्वरूपाच्या विचारसरणीचा पाया नागरी समाजाच्या अस्तित्त्वामध्ये दिसतो. नागरी समाज आपल्या मागण्या सरकारकडे

मांडत असताना त्यामध्ये मागण्याचे स्वरूप वैयक्तिक नसून संपूर्ण समाजाच्या हिताकडे राज्यव्यवस्थेचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करीत असते. नागरी समाजाच्या चळवळीने साध्य झालेल्या गोष्टींचा विचार करता मिलने मान्य केल्याप्रमाणे व्यक्तीच्या वैयक्तिक हक्काबरोबरच समाजाच्या हक्कांचा विचार नागरी समाजाच्या मागण्यामध्ये प्रामुख्याने आढळतो.

**ॲडॅम स्मिथ** यांनी व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी मुक्त व्यापार व व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. यामुळे आर्थिक क्षेत्रात राज्याचा हस्तक्षेप कमी करून खाजगी उद्योगधंद्याना प्रोत्साहन दिले. यामुळे उत्पादनात वाढ होऊन स्पर्धा वाढत जाते व कार्यक्षमता वाढते. राज्याने केवळ विश्वासघात, फसवणूक यापासून व्यक्तीचे संरक्षण करावे. वास्तविक या विचाराप्रमाणे युरोपमध्ये व्यवस्था अस्तित्त्वात आली. मात्र त्यामुळे सामान्य व दुर्बल लोकांना याचा फटका बसला. कारण या व्यवस्थेमुळे केवळ भांडवलदारांचा फायदा झाला व ग्राहकांचे व कामगारांचे शोषण झाले म्हणजेच उदारमतवादी व्यवस्थेचे मूळ तत्त्वज्ञान व्यक्तीच्या हितामध्ये समाजाचे हित सामावलेले असावे त्याला धक्का पोहोचला कारण उद्योगपतींच्याकडून तयार झालेल्या व्यवस्थेत केवळ भांडवलदारांच्या नफ्याचा विचार केला जात असे. परिणामी, पर्यावरण, आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, कामगारांचे शोषण, व्यक्तीचे हक्क याबाबत अनेक प्रश्न आजच्या व्यवस्थेत निर्माण झाले. नागरी समाज संघटना याच प्रश्नावर प्रामुख्याने आजच्या राजकीय व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करताना आपल्याला दिसतात. सुरवातीच्या काळात हा संघर्ष युरोपमध्ये असलेला जाणवले. ज्या ठिकाणी औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेला संघर्ष भांडवलदार व कामगार या वर्गामध्ये तर त्यानंतर हाच संघर्ष संपूर्ण जगभर निर्माण झालेला आपल्याला दिसतो.

व्यक्तीच्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा विचार सातत्याने उदारमतवादी विचारसरणीत केलेला दिसतो. ज्यामुळे आजच्या लोकशाही व्यवस्थेत मानवाला लिखित स्वरूपात काही अधिकार व हक्क प्राप्त झाले आहेत. आधुनिक काळातील विचारवंताचा याबाबतीत विचार करताना खालील विचारवंतांचा आपल्याला प्रामुख्याने विचार करावा लागतो.

**टी. एच. ग्रीन** यांनी राज्याची निर्मिती मानवी इच्छेतून झाली, त्यामुळे राज्याने मानवाचा संपूर्ण नैतिक विकास साधावा असे सांगितले. यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याची निर्मिती करून मानवांच्या हक्कांची जपणूक करावी, कारण यामुळेच सामुदायिक हित व कल्याण साधले जाते. यासाठीच राज्यसंस्थेची निर्मिती झाली. राज्याने व्यक्तींच्या अधिकारांचे संरक्षण करावे. ते करत असताना समाजाच्या हिताचे भान ठेवावे. राज्यशासन ज्यावेळी आपल्या सत्तेचा गैरफायदा घेऊन अन्याय करू लागते, त्यावेळी जनतेला अशा अन्यायी राजसत्तेला प्रतिकार करण्याची सवलत असावी. अर्थातच या प्रतिकारामुळे समाजातील कीती व्यक्तींचे हित साधले जाई, यावर त्या प्रतिकाराला समाजातून किती प्रतिसाद मिळेल हे ठरते. नागरी समाजाच्या चळवळीत ग्रीन यांचे विचार आपल्याला प्रामुख्याने आढळतात. आजच्या नागरी संघटना समाजाचे व्यापक हित लक्षात घेऊन संघर्ष करीत असतात. त्यामुळेच अशा गैरराजकीय संघटनांना प्रत्येक

देशाच्या राजकारण्यामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. समाजाचे व्यापक हित डोळ्यासमोर न ठेवता केवळ विरोधासाठी म्हणून जर या संघटनांनी विरोध करण्याचे ठरविले, तर मात्र राज्यात अराजकता माजण्याचा धोका असतो.

**आर. एम. मॅकआयव्हर** यांच्या मते, समाजातील विविध प्रकारच्या संघटना समाजात कार्यरत असतात. या संघटनांच्याद्वारे समाजातील विविध प्रकारची कार्ये पार पाडली जातात. राज्य ही अशा प्रकारची एक संघटना असून समाजातील कायदा व सुव्यवस्था, दुर्बलांचे संरक्षण, समाजाचे संरक्षण व संवर्धन करणे ही कार्ये राज्य पार पाडते. म्हणजेच राज्य समाजसेवेचे कार्य पार पाडत असते. मॅकआयव्हर याचबरोबर राज्यसंस्थेबरोबरच समाजातील अनेक संस्थांचे अस्तित्त्व मान्य करतात, कारण केवळ राज्यसंस्थेद्वारे समाजाच्या सर्व गरजा भागविल्या जाऊ शकत नाहीत. कारण लोकमत, नैतिकता, धर्म, लोकरूढी यासारख्या अनेक गोष्टी समाजातील इतर संस्थांच्याकडून पार पाडल्या जातात. यावरूनच आधुनिक काळातील समाजामध्ये होणाऱ्या अन्यायाविरुध्द राज्यसंस्थेचे लक्ष वेधून घेण्यासाठी नागरी समाज संघटनासारख्या संघटना आज आपल्याला दिसतात. उदारमतवादी विचारवंताच्या मूळ विचारसरणीमध्ये नागरी समाजाच्या अस्तित्त्वाचे बीज आपल्याला जाणवते.

**ग्रामसी** यांच्या मते, राज्यसंस्थेत कार्य करणारे शासक अनेक चांगल्यावाईट मार्गांचा वापर करून स्वत:च्या हातामध्ये अधिकार टिकविण्याचा प्रयत्न करीत असतात. यातून सत्ता उपभोगणाऱ्या अल्प गटाचा जन्म होतो. त्यातून आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर भल्याबुऱ्या मार्गांचा वापर करत हे लोक सत्ता उपभोगत असतात. लोकशाही व्यवस्थेत अशा प्रकारचा गट निर्माण होणे, यामुळे सामान्य नागरिकांच्या अधिकार व हक्क यांच्यावर अतिक्रमण होऊ शकते. यामुळेच आजच्या नागरी संघटनेच्या संघर्षाकडे पाहिले असता राज्यात अस्तित्वात असलेला भांडवलशाही वर्ग व राजकर्त्यांचा वर्ग यांच्या विरोधात सर्वसामान्य नागरिकांचे हक्क व अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी सातत्याने संघर्ष करताना दिसतात. आधुनिक लोकशाहीमध्ये निर्माण झालेले दोष नष्ट करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांच्या गैरराजकीय संघटना आजच्या राज्यकर्त्यांना धोरणांचा फेरविचार करावयास लावतात.

**ग्रॅहम वालास** यांच्या मते, आजच्या लोकशाही व्यवस्थेत निर्माणझालेले दोष वालास यांनी मान्य केलेले आहेत. राज्यकर्त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करून मानवाच्या भावनेला देखील किंमत दिली पाहिजे. यासाठी त्यांनी आत्मनियंत्रणाचा मार्ग सुचविला आहे. म्हणजेच व्यक्तीने स्वत:वर नियंत्रण ठेवावे, त्याच्यावर इतर कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही. प्रत्येक व्यक्तीने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. देशातील प्रत्येक नागरिकाला लोकशाहीच्या तत्त्वांचे कार्य करण्याच्या पध्दतीचे ज्ञान असावे, त्यासाठी नागरिकांना मुलभूत पद्धतीचे ज्ञान द्यावे. तसेच लोकप्रतिनिधींनी लोकांच्या भावनांशी खेळू नये. वालास या विचारांच्या विरोधात आज प्रामुख्याने तिसऱ्या जगातील देशामध्ये राजकीय व्यवस्था दिसते. पुढारलेल्या विकसित देशांमध्येदेखील राज्यकर्त्यांनी लोकांच्या भावनेशी खेळ मांडलेला आहे. परिणामी, अशा व्यवस्थेवर नियंत्रण मिळविण्यासाठीच नागरी समाज

संघटना उदयाला आल्या. नागरिकांना नैतिकतेचे राजकीय शिक्षण देऊन त्यांना त्याच्या अधिकाराची व कर्तव्याची जाणीव करून देण्याचे कार्य नागरी समाज संघटनेकडून केले जाते.

## ४.२.१.३ नागरी समाज – राजकीय आर्थिकता

राजकीय आर्थिकता हा शब्द सामान्यपणे १९व्या शतकाच्या उत्तरार्धात वापरण्यात येऊ लागला. राष्ट्रराज्य व्यवस्थेच्या निर्मितीनंतर देशाच्या आर्थिक स्वावलंबनाला खूपच महत्त्व प्राप्त झाले. त्यामधून उत्पादन व्यापार, कायदेशीर संबंध, प्रथा, शासनव्यवस्था तसेच राष्ट्रीय उत्पन्न व संपत्ती यांचे देशातील वाटप यांचा विचार होऊ लागला, त्यामधूनच नैतिक तत्त्वज्ञानाचा पाया असलेली राजकीय आर्थिकता ही संकल्पना जन्मास आली. १८९० मध्ये आल्फ्रेड मार्शल यांनी राजकीय आर्थिकता या शब्दाचा प्रथम वापर केला. आज मात्र शिकागो स्कूल व व्हर्जीनिया स्कूलमध्ये व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या आर्थिक सूचना शासनाला केल्या जातात, त्यामधून लोकहिताचे आर्थिक नियोजन ठरविताना शासनव्यवस्थेला सोईचे होते. आर्थिक नियोजन करत असताना समाजातील विविध राजकीय शक्ती त्याला प्रभावीत करत असतात. यावरूनच शासनाकडून घेतल्या जाणाऱ्या लोकप्रिय आर्थिक निर्णयामुळे मतदानाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो. अशाप्रकारे राजकीय व्यवस्थेमध्ये घेतले जाणारे आर्थिक निर्णय शासन व्यवस्थेची निर्मिती किंवा शासन व्यवस्था स्थिर करण्यास मदत करते. तसेच समाजामध्ये व्यक्तीची उत्पादन क्षमता व वापर करण्याची क्षमता शासनव्यवस्थेकडून ठरविली जाते. मुख्यत: ही आर्थिक स्वरूपाची असते, त्यामुळे राजकीय अस्थिरतेचे अस्तित्व आपल्याला सातत्याने जाणवते.

नागरी समाजाचा प्रामुख्याने विचार करताना सामाजिक संबंधाचा विचार करणे गरजेचे ठरते. वस्तूंचे उत्पादन, वितरण, विनिमय आणि वापर याची समाजामध्ये कशी व्यवस्था आहे याचा अभ्यास राजकीय आर्थिकतेमध्ये केला जातो. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये प्रामुख्याने कोणतीही शासनव्यवस्था यावरच अवलंबून असते. कारण भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये सरकारचे आर्थिक नियोजन हाच व्यवस्थेचा खरा पाया असतो. लोकप्रतिनिधी खाजगी मालमत्ता, खाजगी कारखानदारी, त्याची उत्पादकता, खर्च व नफा यामध्ये ताळमेळ घालून आपल्या राजकीय सत्तेला सुस्थिरपणा कसा आणता येईल यासाठी प्रयत्न करत असतात. संपत्तीचा मुख्य प्रवाह म्हणजे व्यापार आणि साधनांची देवाण-घेवाण असते. शासनव्यवस्था आपल्या आर्थिक नियोजनाद्वारे त्याला संरक्षण व्यवस्था प्रदान करत असते. मध्यमवर्गीय लोक प्रतिनिधींना निवडून देऊन त्या शासनव्यवस्थेमध्ये आपले आर्थिक हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करत असते. मार्क्सवादी विचारवंताच्या मते, कामगार क्रांतीद्वारे निर्माण झालेली साम्यवादी व्यवस्था आर्थिक समतेवर आधारलेली असते, त्यामुळे हे राजकीय स्थित्यंतर राजकीय आर्थिकतेचा भाग आहे. कामगाराच्या मूल्याचा सिद्धांताला विरोध करत भांडवलशाही व्यवस्थेने कामगार, भांडवल व जमीन या तीन गोष्टींना मूल्य मानले.

भांडवलशाहीचे रूपांतर साम्राज्यवादात झाल्यानंतर अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यातूनच मध्यमवर्गीयाच्या आर्थिक स्थितीमध्ये खोलवर परिणाम झाले. त्याचा जगभरातील राजकीय आर्थिकतेवर परिणाम झाला. भांडवलशाही विचारवंताच्या मते, यामुळे जगात अर्थव्यवस्थेला स्थिरता आली हे स्पष्टपणे दिसते. यामधूनच मुक्त आर्थिक स्पर्धा कमी झाली व राज्याची एकाधिकारशाही आर्थिक धोरणे ठरविण्यामध्ये सुरू झाली. या मोकळ्या स्पर्धेत उत्पादनाच्या शक्ती टिकू शकल्या नाहीत. म्हणूनच नियंत्रित भांडवलशाही सुरू झाली, याला अर्थातच राजकीय व्यवस्थेने नियंत्रित केले. हा एक नवीन प्रवाह जागतिक व्यवस्थेत निर्माण झाला.

यानंतर राजकीय आर्थिकता खूप मोठ्या संघर्षामध्ये रूपांतरित झाली. यामधून आर्थिकतेला आधार मानून जगामध्ये दोन व्यवस्था निर्माण झाल्या. त्यामध्ये समाजवादी अर्थव्यवस्था व भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण झाल्या. या व्यवस्था निर्माण झाल्यानंतर संपूर्ण जगातील नागरी समाज वेगवेगळ्या विभागात विभागला गेला. आर्थिक व्यवस्थेच्या निकषावर नागरी समाजाची विभागणी झाली. मात्र भारतासारख्या काही देशांनी भांडवलशाही व समाजवादी अशा दोन्ही व्यवस्थांची संकल्पना आपल्या देशात अंमलात आणली, त्यामुळे मिश्र अर्थव्यवस्था असणारी भारतात राजकीय आर्थिकता निर्माण झाली. अर्थातच ही दोन्ही प्रारुपे नागरी समाजाच्या विकासासाठी अंमलात आणली गेली. समाजवादी विचारसरणीच्या देशामधून वैज्ञानिक व तंत्रज्ञान विषयक क्रांती घडून आली. तसेच मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उभे केले. अशाच प्रकारचा विकास भांडवलशाही देशामधून झाला. परंतु यामधून काही प्रमाणात साम्राज्यवादी शोषण करणाऱ्या प्रवृत्ती निर्माण झाल्या. मात्र त्याला विरोध समाजवादी धोरणाने केल्यामुळे नागरी समाजाचे होणारे आर्थिक शोषण बंद करण्यात काही प्रमाणात यश आले. मात्र भांडवलशाही देशामधून मूलगामी राजकीय आर्थिकता निर्माण झाली. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये राजकीय आर्थिकता महत्त्वाची ठरते. कारण भारतामध्ये व्यापार, गरजा, वस्तूंची उत्पादकता यामध्ये आपल्याला वैविध्य असल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक विभागाच्या गरजा विविध आहेत. अशामधून नागरी समाज आपल्याला आवश्यक असणारे सरकार निवडणूकीच्या माध्यमातून सत्तेवर आणण्याचा प्रयत्न करतो. म्हणून राजकीय शासनव्यवस्था या देशातील पायाभूत असणाऱ्या नागरिकांना मूलभूत गरजा कशा उपलब्ध करून देता येतील, याकडे प्रामुख्याने लक्ष देतो. यावरूनच भारतामधील राजकीय आर्थिकता स्पष्ट होते.

राजकीय आर्थिकता उत्पादनातील संबंध स्पष्ट करते. त्यामध्ये उत्पादनातील शक्ती, नागरी समाजातील प्रस्थापित व्यवस्था स्पष्ट करते. म्हणजेच त्या व्यवस्थेमध्ये असणारे कारखाने, खाजगी मालमत्ता यांचे वितरण कशा स्वरूपात झालेले आहे. यामध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचे प्रश्न, उत्पादनामध्ये असणारे संबंध, जागतिक कामगाराचे वितरण, जगातील देशामध्ये असणारे आर्थिक व राजकीय संबंध, दोन देशामध्ये चाललेली आर्थिक स्पर्धा, जागतिक आर्थिक सहकार्याचे संबंध, वेगवेगळ्या शासकीय व्यवस्था असणाऱ्या देशामध्ये असणारे आर्थिक संबंध, या देशामध्ये असणाऱ्या आर्थिक संबंधांचे

भवितव्य, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये असणाऱ्या आर्थिक संबंधांची व आर्थिक कायद्यांची अंमलबजावणी, विविध देशामध्ये निर्माण होणाऱ्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक तेथील राजकीय अर्थव्यवस्थेकडून कशा प्रकारे केली जाते. या सर्वांचा अभ्यास राजकीय आर्थिकतेमध्ये केला जातो.

नागरी समाजातील नागरिकांचे संबंध उत्पादनाशी जवळचे असतात. कारण त्यांच्या मागणीवरून समाजात उत्पादनाद्वारे पुरवठा केला जातो. राजकीय आर्थिकतेद्वारे समाजातील नागरिकांना श्रीमंत व गरीब यांच्यातील संघर्ष समजून येतो. त्यामुळे राजकीय आर्थिकता हे समाजातील आदर्श शास्त्र आहे.

आधुनिक जागतिक व्यवस्थेमध्ये, अनेक राष्ट्रांची निर्मिती झाली. विचार, तत्त्वज्ञान, धर्म, भाषा या तत्त्वावर आधारित जरी राष्ट्रांची निर्मिती झाली असली तरी त्या देशांमधील शासनकर्त्यांना निर्णय घेताना त्या देशातील आर्थिक स्थिती नियंत्रीत करत असते. आधुनिक काळात विविध देश एकेमकांशी मैत्री करून संबंध प्रस्थापित करत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने देशासाठी आवश्यक असणाऱ्या गरजांची पूर्तता इतर देशांशी संबंध ठेवताना शासक करताना दिसतात. अनेक नैसर्गिक आपत्ती त्यातून त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर येणारा ताण यामधून त्यांच्याकडून घेतले जाणारे निर्णय यामुळे राजकीय व्यवस्थेतील निर्णय आर्थिक परिस्थितीतून नियंत्रीत केले जातात. शासनाच्या नियंत्रीत केल्या जाणाऱ्या निर्णयामधूनच राजकीय आर्थिकता स्पष्ट होते. त्याचप्रमाणे देशाची अर्थव्यवस्था सदृढ राहण्यासाठी शासकाकडून व्यापार, उद्योगधंदे, वस्तूंवरील नियंत्रण या सर्वांसाठी काळजीपूर्वक निर्णय घेतले जातात. यामध्ये राजकीय शासनव्यवस्थेचे अनन्यसाधारण महत्त्व असते. कारण सरकारला यामधून विविध करांचे उत्पादन मिळत असते. देशातील जनतेच्या गरजा भागविल्या जातात. अनेक आर्थिक संस्थांची निर्मिती करून त्यासाठी शासनव्यवस्था सर्व प्रकारची मदत करत असते. सरकारकडून घेतले जाणाऱ्या या आर्थिक निर्णयांना किंवा सरकारच्या निर्णय प्रक्रियेला प्रभावित करणारी आर्थिक परिस्थिती यालाच राजकीय आर्थिकता असे म्हणतात.

## ४.२.२ नागरी समाज – जॉन लॉक

आजच्या नागरी समाजाच्या भूमिकेमध्ये विचार करत असताना नागरी समाजाला मिळणारी स्वातंत्र्य, अधिकार याचा उगम आपल्याला इंग्लंडच्या लोकशाहीच्या निर्मितीच्या सुरवातीस दिसतो. प्रस्थापित अन्यायी व जुलमी राजसत्तेच्या विरोधात संघटित झालेले नागरिक व त्यांनी भूतकाळात निर्माण झालेल्या अडचणी दूर करून भविष्यकाळात कशा स्वरूपाची राज्यव्यवस्था असावी हे स्पष्ट केले. अशा नागरिकांना दिशा दाखविण्याचे कार्य काही राज्यशास्त्रज्ञांनी केले, त्यापैकी जॉन लॉक हे महत्त्वाचे विचारवंत होते. त्यांनी १६८८ ची वैभवशाली राज्यक्रांती स्वत: अनुभवल्यामुळे लोकशाही व्यवस्थेमध्ये झालेली स्थित्यंतरे त्यांनी बारकाईने पाहिली होती. या सर्व बाबींमधून त्यांची स्वत:ची, वैयक्तिक मते तयार झाली. सुरवातीस इंग्लंडमध्ये झालेल्या सनदशीर क्रांतीचे त्यांनी प्रभावी समर्थन केले.

लॉकने 'नागरी सत्तेचे दोन करार' या ग्रंथामध्ये नियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केला. अर्थातच या राजेशाहीवर लोकप्रतिनिधींचे नियंत्रण त्यांनी मान्य केले. राजाने राज्यकारभार करत असताना लोकमतानुसार करावा. ज्यावेळी राजा जनतेच्या अधिकारांच्या विरोधात काम करेल त्यावेळी या राजाला पदच्युत करण्याचा अधिकार जनतेला असेल, म्हणजेच त्या काळापासून आजपर्यंत अन्यायी व्यवस्थेच्या विरुध्द जनतेला संघटित होऊन विरोध करण्याचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आले होते. आजच्या नागरी समाजाची भूमिका देखील प्रस्थापित राजकीय व्यवस्था योग्य प्रकारे नागरिकांच्यासाठी कायदे करत नसतील अशा चुकीच्या कायद्याविरोधात गैर राजकीय संघटना आवाज उठविताना दिसतात.

लॉकच्या मते, नवनिर्मित राज्यसंस्था समाजाच्या व्यापक हिताचा विचार करून कार्य करीत असते. यामध्ये अंतिम सत्ता कायदेमंडळाकडे असते. अशा सत्तेची अंमलबजावणी करत असताना कार्यकारी मंडळ, कायदेमंडळास जबाबदार राहून कार्य करते. त्यांनी निर्माण केलेले कायदे समाजाच्या इच्छेप्रमाणे असल्यामुळे आपोआपच समाजाकडून त्याचे पालन होते. अशा समाजाभिमुख कायदेमंडळाचा कारभार आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाईल किंवा यामध्ये लोकमताचा आदर होणार नाही अशावेळी सर्वसामान्य नागरिक अशा व्यवस्थेला विरोध करतील. कार्यकारी मंडळाने कार्य करताना गरीब–श्रीमंत यांच्यासाठी समान काम केले पाहिजे. यामध्ये कोणताही भेद न करता समाजाचे हित पाहिले पाहिजे. लोकांच्या संमत्तीशिवाय केलेल्या कायद्याचे लोकांच्याकडून पालन होत नाही. परिणामी, अशा सत्तेविरुध्द नागरी समाजाचे संघटन होते.

लॉकच्या मते, निसर्गावस्थेतून मानव नागरी समाजात प्रवेश करतो तो केवळ आपल्या संपत्तीचे संरक्षण व्हावे व तिचा उपभोग स्वत:ला व्यवस्थितपणे घेता यावा यासाठी त्यामुळे अशी शांततापूर्ण व्यवस्था समाजात सातत्याने रहावी यासाठी कायदे मंडळ व कार्यकारी मंडळाने कार्यरत रहावे. कायदे मंडळाच्या या सत्तेचे हस्तांतरण होताना नागरी समाजाच्या हक्कांचा विचार व्हावा अन्यथा अशी व्यवस्था हुकूमशाही व्यक्तीच्या हाती गेल्यास व्यक्तीच्या व नागरी समाजाच्या हक्कांवर गदा येते. अशा स्थितीत राज्यव्यवस्थेला नागरिकांच्या वैयक्तिक जीवनात ढवळाढवळ करण्याचा अधिकार नसावेत. केवळ समाजाचे कल्याण करण्याइतपत त्यांना अधिकार असावेत. नागरिकांना निर्धन करणे, गुलाम बनविणे, त्यांच्या जिवितास धोका निर्माण करणे यामुळे नागरिकांचा प्रस्थापित राज्यसंस्थेवरचा विश्वास उडतो.

नागरी समाजाची निर्मिती होत असताना नागरिकांना आपल्या मालमत्तेचे संरक्षण व्हावे ही अपेक्षा असते. राजसत्तेने कायद्याने मालमत्ता व्यक्तीकडून काढून घ्यावी हे लॉकला मान्य नाही. राज्य चालविण्यासाठी पैसा लागतो व आपणास मिळणाऱ्या संरक्षणाच्या मोबदल्यात ते चालविण्यासाठी नागरिकांनी त्या संरक्षित मालमत्तेचा काही भाग राज्यसंस्थेकडे द्यावा हे लॉकला मान्य आहे. कारण यामुळेच राज्यसंस्थेला नागरी समाजाचे अधिकार सुरक्षित ठेवणे सोपे जाते. याचबरोबर नागरी समाजाने

कायदे करण्यासाठी सत्ता कायदे मंडळाला दिलेली असून ही सत्ता इतर कोणत्याही व्यक्तीच्या हाती सुपूर्त करता येणार नाही. त्यामुळे कायदा करणारी व्यक्ती त्या सत्तेचा दुरुपयोग करून स्वत:च्या कायद्यासाठी कायदे करील व नागरी समाजाचे कल्याण होऊ शकणार नाही. थोडक्यात, लॉकच्या मते, नागरी समाज सत्तानिर्मितीचा प्रमुख स्रोत असून समाजाच्या कल्याणासाठी त्याचा वापर व्हावा असे सांगितले आहे. मात्र राजकीय सत्तेकडून नागरी समाजाच्या अधिकारावर अतिक्रमण झाल्यास नागरी समाज वा शासन व्यवस्थेच्याविरुध्द क्रांती करू शकतो व त्याद्वारे नागरी समाज दुसरी कायदे करणारी व्यवस्था निर्माण करू शकतो. त्याच्याद्वारे नागरी समाजाचे अस्तित्त्व टिकून राहते. नागरी समाज परत कधीही निसर्गावस्थेकडे जात नाही. राज्यव्यवस्था राज्य चालविण्यास अपयशी ठरली तरी त्यामुळे नागरी समाजाचे काही प्रमाणात नुकसान होते. मात्र नागरी समाज अशी कायदेमंडळाची स्थिती बदलून नवीन कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यासारखी व्यवस्था निर्माण करू शकतात व त्यामधून अन्यायी कायदे दूर करून सुसंघटित नागरी समाजाचे स्वप्न साकार होते.

आजच्या व्यवस्थेत नागरी समाजाकडून लॉकने सांगितलेल्या व्यवस्थेप्रमाणेच कार्यरत असताना दिसते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळाकडून केले जाणारे कायदे जनतेच्या फायद्यासाठी असतील तर जनता त्याचे पालन करते, परंतु तेच कायदे मूठभर लोकांच्या फायद्यासाठी असतील व त्याचा त्रास नागरी समाजातील बहुसंख्यांकांना होत असेल तर नागरिक रस्त्यावर उतरून अशा कायद्याचा विरोध करतात, यासाठी गैर राजकीय संघटना प्रामुख्याने पुढे असतात. लोकशाही व्यवस्थेमध्ये अशा नागरिकांच्या संघटनांच्याकडून आलेल्या मागणीचा प्रामुख्याने विचार होतो, कारण त्या नागरी समाजाचे प्रतिनिधीत्व करत असतात. त्याच्या सनदशीर मार्गाने सुरू असलेला विरोध राज्यव्यवस्था लक्षात घेऊन लोकमागणीप्रमाणे कायद्यात बदल किंवा संपूर्ण कायदा बदल करतात. ज्या राज्यव्यवस्थेत मात्र लोकशाही व्यवस्था नाही त्याठिकाणी अशानागरी समाजाच्या संघटनांना काम करताना त्रास होतो, कारण नागरी समाजाच्या मागणीसाठी सुरू असलेला राज्यव्यवस्थेशी संघर्ष रक्तपाताचे कारण ठरतो. परिणामी, शासनव्यवस्थेकडून दमनशाही, दडपशाही याचा वापर नागरी समाजव्यवस्थेविरुध्द झाल्याचे दिसून येते.

## ४.२.३ नागरी समाज– हेगेल (१७७०–१८३४)

इसवी सन १७७० मध्ये जर्मनीतील स्टुटगार्ड या ठिकाणी हेगेल यांचा जन्म झाला. त्यांनी सुरवातीस तत्त्वज्ञान व अभिजात साहित्याचा अभ्यास केला, त्यानंतर त्यांनी राज्यशास्त्र व अर्थशास्त्राचा अभ्यास केला. १८१६ मध्ये त्यांनी हायडेलबर्ग व पुढे बर्लीन विद्यापीठात तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून काम केले. यावेळी त्यांनी 'कॉन्स्टिट्युशन ऑफ जर्मनी, फिलॉसॉफी ऑफ हिस्ट्री, फिलॉसॉफी ऑफ राईट, लॉजीक इन्सायक्लोपिडीया ऑफ फिलॉसॉफिकल सायन्सेस, फेनॉमेनॉलॉजी ऑफ स्पिरीट अशा स्वरूपाची ग्रंथसंपदा निर्माण केली.

हेगेल यांच्या तत्त्वज्ञानावर प्लेटो, ॲरिस्टॉटल, व्हिको, माँटेस्क्यू, कांट व फित्से या विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. हेगेलच्या विचारांचा गाभा म्हणजे 'विकासाची संकल्पना' होय. विकास होत असताना तो विचाराचा होत असतो. तो विरोध विकास पध्दतीने होतो. हेगेलने आपल्या विचारामध्ये राष्ट्रराज्यव्यवस्थेवर भर दिला आहे. याउलट कांटने आपल्या विचारामध्ये आंतरराष्ट्रीय चिरशांतीवर भर दिला आहे. हेगेलने राष्ट्राच्या अस्तित्त्वावर व विकासावर जास्त भर दिल्याचे आपल्याला दिसून येईल. नागरी समाजाच्या दृष्टिकोनातून विचार करत असताना आजच्या व्यवस्थेमध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्यांना व इच्छेला जास्त महत्त्व दिले आहे. मात्र हेगेल यांनी व्यक्तीच्या इच्छेपेक्षासुध्दा राष्ट्रराज्याला जास्त महत्त्व दिले आहे. त्यांनी हे विचार मांडत असताना विरोध विकासाच्या तत्त्वज्ञानाचा स्विकार केला आहे. त्याच्या मते, समाज मानवी कल्याणासाठी अस्तित्वात येतो. पण प्रत्येक परिस्थितीमध्ये समाजात काही वाईट प्रवृत्ती जन्म घेतात. ती सातत्याने वाढत असतात. ती पूर्णपणे विकसित झाले की, प्रस्थापित समाज व्यवस्था व त्या वाईट प्रवृत्ती यामध्ये संघर्ष निर्माण होते व त्यातून नवसमाजाची निर्मिती होते व वाईट प्रवृत्ती बाजूला केल्या जातात. हा नवसमाज जुन्या समाजापेक्षा अधिक प्रगत, अधिक विकसित असतो. या सर्व प्रक्रियेला गती असते. त्या खंडातील चैतन्यामधून ती प्राप्त हाते. निर्जीव वस्तू म्हणजे कार्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या वस्तूमध्ये ते प्राप्त हाते. त्यानंतर ते सजीवांच्या मध्ये येते. मानवाच्या विचाराला चालना यामुळेच प्राप्त होते. यामध्ये मानवी मनामध्ये स्वातंत्र्य, जाणिवा, देशाचा इतिहास, धर्म, कला, तत्त्वज्ञान, मानवी संघटना, कायदे यांचा समावेश होतो. या सर्वांमधून मानवी मनामध्ये चैतन्याचा व विचारशक्तीचा विकास होऊन त्याचे प्रत्यक्ष रूप म्हणून राज्याचा आविष्कार होतो. अशाप्रकारे हेगेल यांच्या मते, मानवी मनातून राज्याचा आविष्कार होतो.

या सर्वांचा विचार करता हेगेलने मात्र राजेशाहीचा पुरस्कार केला. त्याने व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्त्व मान्य केले नाही. वास्तविक लोकशाहीमध्ये राज्यसंस्था हे साधन मानले जाते व लोकांचे हित हे साध्य मानले जाते. मात्र हेगेलने राज्यसंस्था हे साध्य असल्याचे सांगितले. व्यक्तीने राज्य बलशाली बनवावे, कारण राज्याची सत्ता सर्वश्रेष्ठ व निरंकुश असते. मानवाने राज्य निर्माण केले असले तरी राज्य नैसर्गिक असून मानवी इतिहासामध्ये अपरिहार्य घटना आहे. यामुळेच हेगेलने व्यक्तीच्या स्वातंत्र्यापेक्षा व्यक्तीच्या जीवनावर राज्याचा पूर्ण अधिकार असल्याचे मानले. आधुनिक काळात हा विचार नकोसा वाटत असला तरी हेगेलने या विचाराचे समर्थनच केले आहे. हेगेलने मानवाच्या विकासाचा अभ्यास 'द्वंद्वात्मक विकासाच्या' पद्धतीने केला आहे. त्याच्या मते, कोणत्याही वस्तूतील वस्तुस्थिती त्या वस्तूच्या प्रतिकूल किंवा उलट वस्तूशी तुलना करून समजते. उदा. समाजात वाईट व्यक्ती असतात म्हणून चांगल्या व्यक्तीची किंमत असते. तो सुरवातीच्या गोष्टीस वाद मानतो, तर दुसरीला प्रतिवाद मानतो. प्रगतीसाठी विरोध होत असतो. वादाला प्रतिवाद निर्माण होतो. त्यातून सुसंवाद निर्माण होतो.

मानवाच्या जीवनात कुटुंब अवस्था ही सुरवातीस येते. त्यानंतर आर्थिक जीवन ही दुसरी अवस्था व राजकीय जीवन ही तिसरी अवस्था असते. यावरून हेगेलने राज्य हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मानले. राज्याचे आदेश म्हणजे परमेश्वराचे आदेश मानून व्यक्तीने त्याचे पालन केले पाहिजे. त्यामध्ये व्यक्तीचे हित असते. व्यक्तीने त्या कायद्याचे स्वत:हून पालन केले पाहिजे. कायद्याने पालन करण्याची सक्ती करू नये. हेगेलच्या मते, राज्य ही निर्जिव वस्तू नसून त्यामध्ये आत्मा असतो. नागरिकांच्यामध्ये असणारी एकतेची जाणवी म्हणजे राज्याचा आत्मा असतो. राज्यामध्ये नागरिकांचे स्वतंत्र अस्तित्व नसते ते राज्याच्या जीवनाशी एकरूप झालेले असते. कारण व्यक्तीच्या भावना, इच्छा, आकांक्षा राज्यामध्येच असतात. त्यामुळे राज्याच्या आज्ञा म्हणजे व्यक्तीच्या इच्छा असतात. यामुळे व्यक्तीला स्वतंत्रपणे व्यक्ती स्वातंत्र्याची गरज नसते. व्यक्ती जितक्या प्रमाणात राज्याशी समरूप होईल, तितक्या प्रमाणात व्यक्तीचा विकास होईल, यामध्ये व्यक्तीच्या वैयक्तिक इच्छेपेक्षा राज्याच्या आशेला जास्त महत्त्व हेगेलने दिले आहे. त्यामुळे व्यक्तीला राज्याला विरोध करण्याचा अधिकारसुध्दा हेगेलला मान्य नाही. यामुळे हेगेलने व्यक्तीस्वातंत्र्याची संकल्पना अमान्य केली आहे.

हेगेलच्या मते, कुटुंबाच्या ऐक्यातून नागरी समाजाची निर्मिती होते. मानवी कुटुंबामध्ये नैतिकता असते. अशी अनेक कुटुंबे एकत्रित येतात. त्यामध्ये एकात्मता निर्माण होते. व्यक्तीला केवळ कुटुंबासाठी अर्थप्राप्ती करून किंवा कुटुंबाचा प्रमुख म्हणून समाधान प्राप्त होत नाही. त्यासाठी व्यक्ती समूहामध्ये राहणे पसंत करतो. समाजात अशा समूहाची संख्या वाढते व त्यातून नागरी समाजाची निर्मिती होते. अशा नागरी समाजातील नागरिकांच्या गरजा पूर्ण होण्यासाठी आर्थिक संरचना निर्माण होऊन कायद्याची निर्मिती केली जाते. अशा कायद्याची अंमलबजावणी केल्यामुळे नागरी समाजात आर्थिक स्थैर्य प्राप्त होते.

हेगेलने राज्य व नागरी समाजामध्ये फरक केलेला आहे, त्याने नागरी समाजाच्या तीन अवस्था सांगितल्या आहेत. (१) न्यायप्रशासन (२) पोलीस (३) अन्य संस्था. त्यांच्या मते, नागरी समाजाचे अस्तित्व राज्यावर अवलंबून असते, कारण राज्याशिवाय नागरी समाज टिकू शकत नाही. राज्यसंस्थेमध्ये पोलीस व न्याय या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात, कारण राज्याशिवाय न्याय, पोलीस व इतर संस्थांना अर्थ उरत नाही. नागरी समाजात व्यक्तीचा स्वतंत्र समूह असतो. व्यक्ती राज्यासाठी कार्य करते. नागरी समाजात वावरताना इतर घटकांच्या सहाय्याने आपले ध्येय व्यक्ती साध्य करते. व्यक्तीच्या असणाऱ्या गरजांमुळे व्यक्ती समाजात एकमेकांशी जुळलेली असते. यामधूनच समाजात व्यापार व उद्योगाचे कार्य केले जाते. नागरी समाज म्हणजे समाजाला व्यक्तीचा समूह मानले जाते. ते राज्याचे स्वरूप असते. गरजेप्रमाणे प्रत्येक व्यक्ती एकमेकाला बांधलेली असते. राज्यामध्ये व्यक्तीचे व्यक्तीगत अस्तित्व लोप पावून व्यक्ती केवळ राज्यासाठी कार्य करते. यामध्ये व्यक्तीच्या स्वार्थाची भावना नसते. संपूर्ण समाजाच्या कल्याणसाठी कार्य करीत असते. यावरूनच राज्य व नागरी समाजाचा संबंध एकेमकांशी काही वेळेला विरोधाचा तर काही वेळेला परस्परावर अवलंबून असतो.

## ❒ राज्य व नागरी समाज यांतील संबंध :-

सेवाईनच्या मते, 'हेगेलचे राज्य म्हणजे अशी उपयोगी संस्था नव्हे की, जी सार्वजनिक सेवा कायद्याची अंमलबजावणी, पोलीस, औद्योगिक व आर्थिक हितसंबंध यामध्ये सामंजस्य निर्माण करेल. राज्य गरजेनुसार मार्गदर्शन करून नियंत्रण करेल. नागरी समाज नैतिकता व योग्य निरीक्षणासाठी राज्यावर अवलंबून असते. तसेच नैतिकतेच्या अंमलबजावणीच्या समाधानासाठी राज्य नागरी समाजावर अवलंबून असते. राज्य व नागरी समाज अशाप्रकारे एकमेकावर अवलंबून असले तरी त्याच्यामध्ये भिन्नता आहे. राज्य हे साधन नसून साध्य आहे. हेगेलने राज्य हे साध्य मानले तरी नागरी समाजाला देखील त्याने महत्त्व दिले आहे. मात्र राज्य श्रेष्ठ असून नागरी समाज कनिष्ठ मानला आहे. सांस्कृतीक कार्यासाठी राज्य समाजावर अवलंबून असते. त्यांच्या मते, संपूर्ण समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य राज्य करत असते. राज्याविना समाज दिशाहीन असतो. व्यक्तीच्यामुळे केवळ राज्याची निर्मिती होत नाही तर व्यक्ती वेगवेगळ्या संस्थांचा सदस्य असतो त्यामुळे त्याला राज्याचे नागरिकत्व प्राप्त होते.

प्रा. स्टेस यांच्या मते, नागरी समाजात व्यक्ती स्वत:चे हित पहात असते तर राज्याचे ध्येय व हित उच्च असतात. व्यक्ती त्यासाठीच कार्यरत असते. अशा प्रकारे त्यांनी राज्य व नागरी समाज यातील अंतर स्पष्ट केले. हेगेलने स्पष्ट केले आहे की, नागरी समाजाला पूर्णत्व व यश केवळ राज्यातच प्राप्त होते, कारण राज्य ब्रम्हाचे विकसीत स्वरूप आहे. नागरी समाजाने जनसंस्थेद्वारे राज्याचे प्रतिनिधीत्व न करता समाजातील महत्वाची क्षेत्रे व व्यावसायिक संघटना यांचे प्रतिनिधीत्व करावे, कारण नागरी समाज राज्यातच विलीन होतो व विधीमंडळाद्वारे नागरी समाजातील वेगवेगळ्या संस्था एकत्र येतात.

## ❒ हेगेलच्या नागरी समाजाबाबतच्या विचारावर टीका :-

**मॅकगव्हर्न** यांच्या मते, हेगेलने राज्याला साध्य मानून व्यक्तीला साधन मानले. प्रत्यक्षात मात्र व्यक्तीच्या विकासासाठी व कल्याणासाठी राज्य साधन मानून वापरले जाते.

**हॉबहाऊस** यांच्या मते, आदर्शवादी राज्याला एक महान नर प्राणी, एक आत्मा, एक अभिव्यक्ती सत्ता मानतात. ज्यामध्ये व्यक्तीची हक्क, कर्तव्ये, सुख-दु:खे ही सर्वच पराधीत तत्त्वे बनतात.

हेगेलची राज्यविषयक कल्पना व्यक्ती स्वातंत्र्याला मारक ठरते. त्याच्या सर्वकष राज्याच्या कल्पनेतून फॅसीझम व नाझीझमसारखे तत्वज्ञान जन्माला आले. जगामध्ये प्रत्येक राज्य सर्वंकष व सर्व शक्तीमान मानले तर परस्पर सहकार्याची भावना नष्ट होऊन अशांतता पसरेल. हेगेलने राष्ट्रासंबंधीच्या इतर बाबींकडे दुर्लक्ष करून सर्वंकष राज्य संस्था व राष्ट्राची परंपरा यावर भर दिला. परिणामी राज्यामध्ये व्यक्ती स्वातंत्र्याचा अभाव निर्माण झाला.

## ४.२.४ नागरी समाज- कार्ल मार्क्स (१८१८-१८८३)

कार्ल मार्क्सचा जन्म ५ एप्रिल १८१८ रोजी प्रशिया (जर्मनी) मध्ये एका ज्यू कुटुंबात झाला. त्याच्या वडीलांनी १८२४ मध्ये ख्रिश्चन धर्म स्विकारला. मार्क्स वृत्तीने स्वतंत्र, आग्रही व बुद्धीनिष्ठ असून त्याच्याकडे दुर्दम्य आत्मविश्वास होता. त्यांनी बर्लीन विद्यापीठातत तत्वज्ञान, इतिहास व साहित्य याचा अभ्यास केला. यानंतर त्याचा बायबलवर टिका करणाऱ्या विद्यार्थ्यांशी, फ्रेंच समाजवाद्यांशी व जर्मनीतील गुप्त संघाशी संबंध आला. १८४४ मध्ये त्यांची ओळख एंगल्स यांच्याशी झाली. त्यांनी कुटुंबसंस्थेवर फॉयरबॉकच्या तत्वज्ञानावर व साम्यवादावर देखील टिका केली. मार्क्सने स्वित्झर्लंड,.फ्रान्स, बेल्जियम व शेवटी इंग्लंड असे देशाटन केले. आयुष्याची शेवटची ३४ वर्षे इंग्लंडमध्ये त्यांनी घालविली. १८६७ मध्ये त्यांनी 'दास कॅपीटल' या ग्रंथाचे प्रकाशन केले, त्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागाचे अनुक्रमे १८९३ व १८९४ साली प्रकाशन झाले, परंतु तत्पूर्वीच त्यांचे १८८३ साली निधन झाले.

कार्ल मार्क्सने वर्गसंघर्षाचा इतिहास मांडत असताना नागरी समाज व त्या समाजाचे शोषण करण्याची भांडवलशाही वृत्ती यांच्यामधील संघर्ष मांडला आहे. समाजात भांडवलदाराकडून शोषण होताना कामगारांचे वस्तूचे उत्पादन करताना खूप मोठा सहभाग असतो. कामगारांच्या श्रमामुळेच वस्तूला किंमत प्राप्त होते. वस्तूचे मूल्य म्हणजे समाजातील स्थिर स्वरूपाचे रूपांतर असते. याला मार्क्सचा श्रममूल्य सिद्धांत असे म्हणतात. यावरूनच मार्क्सने पुढे अतिरिक्त मूल्य सिद्धांत मांडला. वस्तू निर्माण करताना कामगाराचे श्रम खर्च होते, त्यामुळे वस्तूला किंमत प्राप्त होते. त्याच्या मते, ते मूल्य कामगाराना मिळाले पाहिजे, पण प्रत्यक्षात त्यापैकी खूपच कमी मूल्य कामगाराच्या वाट्यास येते. वस्तूची किंमत वसूल झाल्यावर त्यातील महत्त्वाचा वाटा भांडवलदाराकडे जातो. त्यामुळे कष्ट करणाऱ्या कामगाराचे हाल होते. कामगाराच्या श्रमामुळे निर्माण झालेले मूल्य व त्याला मिळणारा अत्यंत अल्प वाटा यामधील फरकास मार्क्सने 'अतिरिक्त मूल्य' असे म्हटले आहे. भांडवलदार कामगारांचे शोषण करून जास्तीत जास्त अतिरिक्त मूल्य मिळविण्याचा प्रयत्न करतो. यामुळे समाजामध्ये बहुसंख्य असणाऱ्या कामगारांची स्थिती दिवसेंदिवस हलाखीची बनत जाते. यामधूनच समाजामध्ये संघर्ष निर्माण होत जातो.

अतिरिक्त मूल्याच्या अतिरेकाने समाजात संघर्ष निर्माण होतो. समाजातील हे संघर्ष गटागटामध्ये निर्माण होतात. हे गट धार्मिक किंवा वांशिक नसतात तर हे गट आर्थिक उत्पन्नाच्या प्रक्रियेत निर्माण झालेले असतात. औद्योगिक क्रांतीनंतर कामगाराच्या शोषणाने कामगार वर्ग भांडवलदारांकडून भरडला जाऊ लागला. त्यामुळे भांडवलदार व कामगार वर्ग यांच्यातील दरी रुंदावतच चालली. हीच वर्णव्यवस्था पुढे समाजाच्या परिवर्तनाचे साधन बनली. औद्योगिक समाजात असलेल्या वेगवेगळ्या वर्णापैकी कामगार वर्गच जास्त संघटीत व आक्रमक होता. समाजातील मध्यमवर्ग, छोटे धंदेवाले, दुकानदार, कुशन कारागीर, शेतकरी असे वर्ग निर्माण होतात. उच्च अधिकारी, कायदेपंडित, डॉक्टर, पत्रकार, शिक्षक हे

भांडवलदार वर्गात मोडतात. यापेक्षा कारकून, शिपाई, घरगुती नोकर, धंदा बसलेले कारागीर, बेकार, शिक्षित इ. कामगार वर्गात मिसळतात.

कार्ल मार्क्सच्या मते, वर्गसंघर्षाचे स्वरूप कामगार क्रांतीमध्ये रूपांतरीत होते. या क्रांतीतून प्रस्थापित असणारी राज्यव्यवस्था नष्ट केली जाते. कारण या राज्यसंस्थेआधारे कामगारांचे भांडवलदारांकडून शोषण केले जाते. कामगारांच्याकडून सशस्त्र क्रांती केली जाते. त्यामधून समाजवादी व्यवस्था निर्माण केली जाते. यावरून राज्य व नागरी समाजाचा मूळ आधार वर्गामध्ये असतो. नागरी समाजामध्ये वर्ग असतात व त्यांच्यामध्ये संघर्ष असतो. राज्य संस्थाच या वर्गाचे संरक्षण करीत असते. भांडवलदार राज्यसंस्थेच्या आधारेच कामगारांचे शोषण करीत असतात, कारण समाजातील भांडवलदार व सबल लोकांनी राज्यसंस्थेची निर्मिती केलेली असते, त्या राज्यसंस्थेचा उद्देश भांडवलदारांकडे असणाऱ्या संपत्तीचे रक्षण करणे इतका असतो. कारण भांडवलदार व कामगार यांचे हितसंबंध वेगवेगळे असतात. राज्य संस्था एकाचवेळी या दोहोंचे हितसंबंध साध्य करू शकत नाही. नागरी समाजामध्ये देखील अशा प्रकारचे परस्परविरोधी हितसंबंध असणारी व्यवस्था असते. मार्क्सच्या मते, राज्य भांडवलदारांचे प्रतिक असून राज्याचे कायदे कामगारवर्गाला कधीच न्याय देऊ शकत नाहीत.

अशा व्यवस्थेच्या विरोधात कामगार क्रांती घडून येते. कामगारांच्या संघटना निर्माण होऊन जनजागृती केली जाते व क्रांतीद्वारे समाजाचा संपूर्ण चेहरा-मोहरा बदलून टाकला जातो. या समाजव्यवस्थेमध्ये भांडवलशाही व्यवस्था नष्ट होवून कामगारांच्या आधिराज्याचा उदय होईल. नवीन समाजरचनेमध्ये भांडवलदारांच्या रूपातील शोषक नाहीसे झाल्यामुळे शोषण देखील नाहीसे होईल व नव्या प्रकारचा समाज अस्तित्वात येईल. असा समाज संपूर्ण जगासाठी असेल यामध्ये उत्पादन साधनांचा मोठ्या प्रमाणात विकास होईल. तंत्रज्ञानात खूप मोठी प्रगती झाल्यामुळे कामगारांचे कामाचे तास कमी होतील व जाचक काम असणार नाही. या नव्या साम्यवादी समाजात व्यक्ती विकासावर भर दिला जाईल. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आवडीनुसार, कुवतीनुसार, कौशल्यानुसार काम करता येईल. या समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुष समानता असेल. स्वतंत्र कुटुंबसंस्था व स्वयंनिर्णयावर आधारित असेल. पुरुषी वर्चस्वाला पूर्णपणे नष्ट करून गुलामगिरीला विरोध केला जाईल. अशा वर्गरहीत समाजव्यवस्थेची निर्मिती करण्याचे समर्थन मार्क्सने केले आहे. या समाजात भांडवलदार व कामगार असे वर्ग असणार नाहीत. सर्वांना त्यांना आवडणाऱ्या कामाचे वाटप केल्यामुळे उत्पादनात प्रचंड वाढ होईल. त्यातून मिळणारा नफा समान पध्दतीने वाटला जाईल. अशा समाजात व्यक्तीकडून कायदे पालन स्वत:हून केले जाईल. राज्यसंस्थेसारखी दमण करणारी यंत्रणा वर्गरहीत समाजरचनेमुळे नष्ट होऊन जाईल. त्यांची जागा लोकांच्या संघटना किंवा प्रशासकीय संघटना घेतील.

## ४.२.५ नागरी समाज - अ‍ॅटोनिओ ग्रामसी

वास्तविक कार्ल मार्क्स व लेनिन नंतर महत्वाचा साम्यवादी तत्वज्ञ म्हणून ग्रामसी ओळखले

जातात. १९७० च्या दशकात ग्रामसीच्या विचारांचा जगभर विचार होऊ लागला. याच कालावधीमध्ये 'युरोकम्युनिझम'चा उदय झाला. ग्रामसी यांचा जन्म १८९१ साली इटलीत झाला. त्यांचे लेखन इटालियन भाषेत आहे. त्याच्या विचारावर इटलीमध्ये प्रस्थापित व्यवस्थेत सर्वसामान्याचे होणारे शोषण व त्यांची हलाखीची परिस्थिती याचा प्रभाव पडला. कारण या काळात युरोपमध्ये इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया या प्रबळ महासत्ता होत्या. ग्रामसी यांच्यावर इटालियन विचारवंत मॅकआयव्हली यांचा प्रभाव पडला. तसेच लेनिन, रोजा, लेक्झेंबर्ग, ट्रॉटस्की, बुखारीन यांच्या विचारांचा देखील प्रभाव ग्रामसी यांच्यावर पडला.

प्रस्थापित व्यवस्थेच्या विरुध्द म्हणजेच फॅसिस्ट विचारसरणीच्या विरोधात ग्रामसी यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांना बराच काळ तुरुंगवास भोगावा लागला. ते स्वतः कामगारांच्या चळवळीत सहभागी असल्यामुळे त्याच्या विचारात वास्तविकता आली आहे. व्यक्तीबाबत विचार करताना ग्रामसी यांच्या मते, समाजातील सर्व व्यक्ती त्याच्या-त्याच्या क्षेत्रात काम करताना बुध्दीचा वापर करतात, त्यामुळे त्या बुद्धिजीवी असतात. अशी परिस्थिती राजकीय व सामाजिक क्षेत्रात दिसत नाही, कारण या क्षेत्रात सर्वच बुद्धीजीवी नसतात.

ग्रामसींनी या बुध्दीजीवी वर्गाची त्याच्या कामाच्या प्रकारावरून विभागणी केली. यामध्ये - (१) **पारंपारीक बुद्धीजीवी :** साहित्यिक व वैज्ञानिक असतात. (२) **जैविक बुध्दीजीवी :** यामध्ये समाजातील वैचारिक घटकांचा समावेश होता. यावरून ग्रामसींच्या मते, समाजातील भांडवलदार व कामगार यांच्या वर्ग संघर्षात मध्यस्थाचे कार्य बुध्दीजीवी वर्गाकडून केले जाते. याच्याकडूनच समाजासाठी, मार्गदर्शक, तत्वज्ञ व मित्र अशा विविध भूमिकेत कार्य सुरू असते. हे करत असताना व्यक्ती राजकीय पक्षाचा वापर करते. परंतु राजकीय पक्षातील सर्वच व्यक्ती बुध्दीजीवी नसतात. समाजातील तणाव बुध्दीजीवी वर्गामुळे कमी होतो. कारण समाजात वावरत असताना बुध्दीजीवी अत्यंत जाणीवपूर्वक वागत असतात. थोडक्यात, समाजातील वर्ग संघर्षात मध्यस्थाचे कार्य बुध्दीजीवी वर्गाकडून पार पाडले जाते.

ग्रामसी नागरी समाजाला राजनितीक समाज असे देखील समजतात. पाश्चात्य देशातील राजसत्तेविषयी आपले मत व्यक्त करताना 'ती एक अशी खोल दरी असून त्यामध्ये टोकदार वस्तू उभ्या आहेत' असे म्हणतात. तसेच राजसत्ता ही राजनितीक समाज व नागरी समाज यांच्यात संतुलन साधते. नागरी समाज व राज्य, या एकच कल्पना आहेत. प्रत्येक समाजात त्या व्यवस्थेचा 'आर्थिक मानव' असून त्या समाजाचा तो एक भाग असतो. जसे प्राचीन भारतीय समाजातील नागरिकाच्या गरजा कमी असत. परिणामी, ते अल्पसंतुष्ट होते. त्यामुळेच त्या काळातील समाजात 'समाधानी मानव' दिसून येतो. ग्रामसी नागरी समाजातील नागरिकाचे स्थान स्पष्ट करताना नागरिक आर्थिक संरचना व बलशाली राजसत्ता याच्यामध्ये असून राजसत्ता नागरिकांना आर्थिक व्यवस्थेप्रमाणे बदलते. यामध्ये आर्थिक व्यवस्थेमधील नागरिकांनी राजसत्तेवर स्वतःचे वर्चस्व निर्माण करावे मात्र नागरी समाज राजसत्तेच्या मार्गदर्शनाने व

त्यांच्या आदेशाप्रमाणे अर्थव्यवस्थेत सामील होतील. तसे न झाल्यास राजसत्ता आपल्या शक्तीचा वापर करून नागरिकांना तसे करण्यास भाग पाडतात. यामुळेच ग्रामसीच्या मते, राजसत्ता बदनाम होते. यामध्ये बदल घडवून आणावयाचा झाल्यास समाजातील बुध्दीवंतानी व श्रमिकांनी सहकार्य करून बौध्दीक व सांस्कृतिक क्षेत्रात अधिसत्ता स्थापन करावी. म्हणजेच ग्रामसींनी समाजातील बदल अभिजनांपेक्षा सर्वसामान्य व्यक्तीकडून होतात असे मानले. यासाठी कारखान्याच्या व्यवस्थापकांनी कारखान्याविषयी, उत्पादनाविषयी व कामगारांच्या समाजातील स्थानाविषयी जागरूक असायला हवे. कामगारांनी वेगवेगळी कौशल्य प्राप्त केल्यानंतर नवशासन व नवसमाज निर्माण होईल, यासाठी त्यांनी हेगिमोनी किंवा धुरीणत्वाची संकल्पना मांडली. यामध्ये बुध्दीवंतानी सामाजिक व संख्यात्मक मूल्यांना प्राधान्य द्यावे, म्हणजेच केवळ कामगार व शेतकऱ्यांची एकजूट करून चालणार नाही तर त्यांचे हित साधले जाऊन राजकारणात तत्वज्ञान व संस्कृती यांना महत्त्व द्यावे हे धुरीणत्वाच्या संकल्पनेत मध्यवर्ती विचार होता. ग्रामसींनी समाजाचे दोन भाग केले.

१. **राजकीय :** यामध्ये सैन्य, पोलीस, नोकरशाही, कामगार संघटना यांचा समावेश होतो.

२. **नागरी :** यामध्ये शाळा, कुटुंब सांस्कृतीक मंडळे ज्याच्याकडून दडपशाही केली जात नाही यांचा समावेश होतो.

यावरून संस्कृती आदेश देत नाही. तिच्यावर संस्था, व्यक्ती यांचा सर्वसंमतीने प्रभाव पडतो. अशी संस्कृती केवळ नागरी समाजात आढळते. म्हणूनच ज्या समाजात एकाधिकारशाही असणाऱ्या राजकीय संस्थापेक्षा सर्व संमतीच्या सांस्कृतीक संस्था प्रभावी असतात, त्याठिकाणी 'सांस्कृतिक अधिसत्ता' (Hegemony) अस्तित्वात असते. यासाठीच शासक वर्गाने निर्माण केलेल्या सक्तीच्या संस्था आणि समाजातील सर्वमान्य सांस्कृतिक संस्था यांचा समतोल निर्माण करून राज्य चालविले पाहिजे. म्हणजेच राजकीय सत्तेमध्ये वर्चस्व निती, धर्म, शिक्षण, कला यामधून समाजातील काही घटकांच्याकडून केले जाते. राजसत्ता व सांस्कृतिक व्यवस्था यामधील समतोल नष्ट झाल्यास आणिबाणीची परिस्थिती निर्माण होते. समाजातील निती, धर्म, शिक्षण, कला यामधून निर्माण झालेली समाजाच्या जीवनामध्ये मूल्य असतात. म्हणूनच सत्ता केवळ राजकीय किंवा लष्करी पातळीवरच आपले अस्तित्व टिकवू शकत नाही, तर सांस्कृतीक जीवनही त्याचा अविभाज्य भाग असतो.

समाजातील शासक वर्ग कठोरपणे गुलामगिरी लादतो व त्याच्याद्वारे आपली शासन व्यवस्था स्थिर करतो. यामध्ये वर्चस्व समाविष्ठ असते. मात्र वर्चस्व केवळ आदेश न देता किंवा नागरिकांना त्याची कठोरपणे अंमलबजावणी करावयास न लावता समाजातील सर्व घटकांच्या संमत्तीने त्यांना आदेशाचे पालन करावयास लावले जाते. यामध्ये 'धुरीणत्व' असते. आजच्या काळात शासनव्यवस्थेत अशाच प्रकारे शासनव्यवस्था समाजातील घटकांच्या मनावर शासनाचे म्हणणे बिंबवत असतात. यामुळे कधी-कधी समाजातील वरिष्ठाचे कनिष्ठ वर्ग धुरीणत्व स्विकारतो. मंदीरे, मठ, विद्यापीठे यामधून वरिष्ठ

वर्ग आपले आदेश समाजासाठी देत असतो. त्यामुळे सामाजिक संस्था, पुराणे, मिथके, कला, साहित्य यामधून वरीष्ठ वर्ग सांस्कृतीक मूल्ये कनिष्ठ वर्गामध्ये रुजवित असतो. यामधूनच राजकीय समाज व नागरी समाज यांच्यात समतोल साधला जातो. म्हणजेच एखाद्या देशातील शासनव्यवस्था केवळ राज्यघटनेतील नियमाप्रमाणे चालत नसून त्यासाठी समाजातील त्या कायद्याच्यासाठी असणारी संमती देखील महत्वाची ठरते.

समाजातील वेळोवेळी होणाऱ्या स्थित्यंतरामध्ये धुरीणत्वाची संकल्पना देखील बदलत असल्याचे मत ग्रामसींनी व्यक्त केले आहे. समाजातील बदलत्या परिस्थितीप्रमाणे समाजात नवे आर्थिक, राजकीय व सामाजिक हितसंबंध निर्माण होऊन प्रस्थापित संस्कृतीच्या विरुध्द प्रतिसंस्कृती निर्माण होते. उदा. मध्ययुगीन व्यवस्थेत धर्माचा प्रभाव होता, यावेळी समाजामध्ये 'श्रध्दा' या तत्वाचा प्रभाव होता, याचे रूपांतर आजच्या भांडवलशाही व्यवस्थेत व्यक्तीवादामध्ये रूपांतरीत होते. हुकूमशाहीतील आज्ञापालन लोकशाहीमध्ये कर्तव्यपालनामध्ये रूपांतरित होते. धर्मसत्तेमध्ये असणाऱ्या अंधश्रध्दांना आव्हान दिले जाऊन वैज्ञानिक संस्कृती निर्माण केली जाते. म्हणजेच अस्तित्वात असणाऱ्या सामाजिक व्यवस्थांना पर्यायी व्यवस्था तयार होतात, यालाच 'प्रतिधुरीणत्व' म्हणतात.

## ४.२.६ उत्तर वसाहतवाद व नागरी समाज

वास्तविक १९४५ नंतरच्या नागरी समाजासमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. पाश्चात्य देशाच्या प्रभावाखालून रशिया व आफ्रिका खंडामधून अनेक देश स्वतंत्र झाले. स्वातंत्र्याअगोदर या देशातील नागरी समाजा समोर परकीय जोखंडातून मुक्त होणे असा उद्देश होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर म्हणजेच उत्तर वसाहतवादाच्या काळात त्या समाजा समोर सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्न उभे होते. त्यांच्याबरोबर संघर्ष करताना नागरी समाजामध्ये अनेक संघटना निर्माण झाल्या. अशा समाजावर वसाहतवादाचा प्रभाव होता. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक प्रभाव जाणवतो, यामध्ये लॅटिन अमेरिका, कॅनडा, आशियन देश व आफ्रिकन देश यांचा समावेश होतो.

उत्तर वसाहतवादाचा काळ म्हणजे सांस्कृतिक व आर्थिक विचारांचा स्वतंत्र झालेल्या देशांमधील प्रभाव होता. दारिद्र्य व आर्थिक विकासातून निर्माण झालेला नवश्रीमंत वर्ग यांच्यामधील संघर्ष याला विरोध करण्यासाठी कामगारांच्या संघटना, उद्योगपतींच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी असलेल्या त्यांच्या संघटना, त्यातून निर्माण झालेला दबावगट व राजकीय पक्ष यांचे परस्पर संबंध यातून या देशाच्या समाजामध्ये अनेक बदल घडून आलेले दिसतात. वसाहतवादी देश निघून गेल्यानंतर देखील वसाहतवादी विचारांचा वर्ग या देशातील नागरी समाजावर राज्य करू लागला. त्यामुळे उत्तर वसाहतवादाच्या काळात समाजाचे शोषण करणारी आधुनिक यंत्रणा निर्माण झाली. यामध्ये समाविष्ट असणारे घटक याच समाजातील उद्योगपती, जमीनदार, राज्यकर्ते असले तरी त्यांची वृत्ती वसाहतवादाच्या काळातील शोषण

करणारी व हुकूमत गाजवणारी अशा प्रकारची होती, यामुळेच ज्या महान उद्देशाने वसाहतवादापासून व शोषणयुक्त व्यवस्थेपासून मुक्तता मिळविण्यासाठी समाजातील लोकांनी स्वातंत्र्य लढा उभारून स्वातंत्र्य मिळविले होते. त्यांचे अंतिम ध्येय उत्तर वसाहतवादाच्या काळात पूर्ण करता आले नाही.

आशिया व आफ्रिका तसेच लॅटिन अमेरिकेमध्ये खूप मोठ्या प्रमाणात एक पक्षीय हुकूमशाही तसेच लष्करी व धार्मिक हुकूमशहांची निर्मिती झाली. त्यामुळे युरोपीय देशांच्या गुलामगिरीतून मुक्तता झालेल्या देशामध्ये उत्तर वसाहतवादाच्या काळात स्वकीयांच्या गुलामगिरीत अडकण्याची वेळ आली. नागरिकांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. सरकारची ध्येय धोरणे सर्वसामान्यांच्या विरोधात गेल्यामुळे उत्तर वसाहतवादाच्या काळात नागरिकांना व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करावा लागतो. बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांचे हितसंबंधी सरकारच्या व्यवस्थेमध्ये असल्यामुळे धोरण निर्धारणाच्या प्रक्रियेवर नफा मिळविणाऱ्या कंपन्यांचा प्रभाव पडतो. त्यातून सर्वसामान्य नागरी समाजातील घटकांचे शोषण सुरू होते. आधुनिक काळातील या व्यवस्थेमुळे उत्तर वसाहतवादाच्या प्रभावाचा परिणाम नागरी समाजावर स्पष्ट दिसतो. यातील बऱ्याच देशात नागरी समाज संकल्पना वेगळ्या अर्थाने निर्माण झाल्या. कारण या देशाच्यामध्ये निर्माण झालेल्या हुकूमशाही व्यवस्थांमुळे राजकीय व सामाजिक वर्चस्व निर्माण करून सर्वसामान्य लोकांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले. त्यांनी केलेल्या राजकीय व सामाजिक शोषणामुळे सामान्य जनतेत असंतोष निर्माण झाला. त्यातून आपल्या हक्कासाठी नागरी संघटना निर्माण होऊन हुकूमशाही व्यवस्थेविरुध्द संघर्ष करू लागल्या. याचा परिणाम तिथल्या लोकशाही निर्मितीच्या प्रक्रियेवर होऊन अस्थिरता निर्माण झाली. त्यामुळेच आर्थिक अव्यवस्था निर्माण झाली व आर्थिक विकासाला खिळ बसली. परिणामी, लोकशाही मूल्ये व व्यवस्था अडचणीत आली.

आजच्या जगाचा विचार करता बिगर राजकीय संघटना समाजातील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी समर्थपणे पुढे आलेल्या दिसतात. समाजातील अल्पसंख्यांकाचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य, भ्रष्टाचार, पर्यावरण, मानवाधिकार, दहशतवाद, स्त्री-पुरुष भेद यांसारख्या अनेक समस्या सोडविण्यासाठी या संघटना प्रयत्न करतात. यासाठी वेगवेगळ्या राजकीय पक्षांची मदत घेऊन सरकारवर दबाव आणणे, न्यायालयीन मार्गाचा वापर करणे, प्रसारमाध्यमाद्वारे प्रश्नांना वाचा फोडणे यासारखे कार्य या संघटनांकडून केले जाते. नव-आर्थिक धोरणांचा स्विकार केल्यानंतर जागतिक व्यापारी संघटना, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांचे समर्थन प्राप्त करून नागरी संघटना समाजात जागरूकता निर्माण करताना दिसतात. अशा संघटनांनी एकत्रित येऊन 'वर्ल्ड सोशल फोरम' यासारखी जागतिक संघटना निर्माण केली आहे.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न ❊

### ❑ योग्य पर्याय निवडा.

१. ................ शतकामध्ये नागरी समाजाच्या संकल्पनेचा उदय झाला.

*(अ) १७ व्या* *(ब) १८ व्या* *(क) १९ व्या* *(ड) २० व्या.*

२. नागरी समाजामध्ये व्यक्तीचे ................ जपण्यासाठी जागरूकता निर्माण केली जाते.

*(अ) महत्त्व (ब) स्वातंत्र्य (क) जाणिवा (ड) प्रतिष्ठा.*

३. आधुनिक काळात सरकारच्या निरंकुशतेवर अंकुश ठेवण्याचे कार्य ................ द्वारे ठेवले जाते.

*(अ) पोलीस (क) नागरी संघटना*

*(ब) सैन्य (ड) सांस्कृतिक संघटना.*

४. राज्यांची निर्मिती मानवी इच्छेतून झाले असे ................ यांनी मान्य केले.

*(अ) बेन्थॅम (क) जे. एस्. मिल*

*(ब) ॲडॅम स्मिथ (ड) टि. एच. ग्रीन.*

५. 'नागरी सत्तेचे दोन करार' हा ग्रंथ ................ यांनी लिहिला.

*(अ) जॉन लॉक (ब) हेगेल (क) प्लेटो (ड) ॲरिस्टॉटल.*

## ४.३ सारांश

थोडक्यात, नागरी समाज ही संकल्पना विचार करता सुरवातीला नागरी समाजातील घटक केवळ लोकसमुदाय म्हणून वावरत होते. परंतु राज्याच्या निर्मितीनंतर नागरिकांच्याकडून नियमांचे व नैतिकतेचे पालन केले जाऊ लागले. नागरिकांना कायद्याद्वारे नियंत्रित केले जाऊ लागले व नागरिकांचा समाज हा राजकीय समाज बनला. सुरवातीस यांच्या नागरी संघटना निर्माण झाल्या व साम्यवादी सरकारला विरोध करू लागल्या. अशाप्रकारे अठराव्या शतकाच्या सुरवातीस नागरी समाजाच्या संकल्पनेचा उदय झाला. उदारमतवादाच्या संकल्पनेचा विचार करता नागरी समाजात व्यक्तीच्या इच्छा व हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी गैर सरकारी संघटना निर्माण झाल्या. या संघटना व्यक्तीचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी लोकशाही मार्गाने लढत असत. याबाबत जेरेमी बेथॅम, जे. एस्. मीन, फॅडॅम स्मिथ, टि.एच.ग्रीन, मॅकआयव्हर, ग्रामसी व ग्रॅहम वालास यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

हेगेल यांनी राज्य व नागरी समाजामध्ये भेद करून नागरी सामाजाच्या तीन अवस्था सांगितल्या आहेत. त्यांच्या मते, न्याय, पोलीस यांना राज्याशिवाय अर्थ प्राप्त होत नाही. कार्ल मार्क्स यांच्या मते, राज्य व नागरी समाजाच्या मूळ आधार वर्गामध्ये असतो. नागरी समाजामध्ये वर्ग असतात व त्यांच्यात संघर्ष असतो. राज्यसंस्था कामगारांचे शोषण भांडवलदारांच्यामार्फत करत असते. कारण भांडवलदार व कामगार यांचे हितसंबंध वेगवेगळे असतात. अशा परिस्थितीत नागरी समाजाचे प्रतिक म्हणून कामगार क्रांती घडवून आणतात. ग्रामसी यांच्या मते, नागरी समाजाला राजनितीक समाज असे म्हणतात. राजसत्ता

ही राजनितीक समाज व नागरी समाज यांच्यात संतुलन साधत असते. नागरी समाज व राज्य या एकच कल्पना आहेत. प्रत्येक समाजात त्या व्यवस्थेचा 'आर्थिक मानव' असून त्या समाजाचा तो एक भाग असतो, असे प्राचीन भारतीय समाजातील नागरिकांच्या गरजा कमी असत. परिणामी, ते अल्पसंतुष्ट होते. त्यामुळेच त्या काळातील समाजात 'समाधानी मानव' दिसून येतो.

वसाहतवादाच्या काळानंतर उत्तर वसाहतवादाच्या काळात राज्यसंस्था शोषणाचे साधन बनल्या. लॅटिन अमेरिकेमधील देशांमध्ये हुकूमशाही व्यवस्था निर्माण झाल्या त्याविरोधात समाजात नागरी संघटना निर्माण झाल्या, त्या संघटना बिगर राजकीय देखील असू शकतात. त्या व्यवस्थेमध्ये या संघटना मानवी हक्क भ्रष्टाचार, अल्पसंख्याकांचे प्रश्न, शिक्षण या प्रश्नावर संघर्ष निर्माण केला जातो. अशा संघटनांचे स्वरूप जागतिक असल्याचे दिसते.

## ४.४ पारिभाषिक शब्द

- **नागरी समाज :**
- **Koinonia Politine :** नागरी समाजासाठी ॲरिस्टॉटलने ही संज्ञा वापरली.
- **तत्त्वज्ञानी राजा :** प्लेटोने आदर्श राजाला दिलेली उपमा.
- **लेसेवअर तत्त्वज्ञान :** उदारमतवादाचा दृष्टिकोन.
- **N. G. O. :** गैरसरकारी संघटना.
- **N. P. O. :** ना नफा ना तोटा तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या संघटना.
- **P. V. O. :** खाजगी संघटना.
- **लॅटिन अमेरिका :** दक्षिण अमेरिकेमध्ये असताना विविध देशांचा समूह.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. १८ व्या.

२. स्वातंत्र्य.

३. नागरी संघटना.

४. टि. एच. ग्रीन.

५. जॉन लॉक.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

❑ **थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. नागरी समाजाचा अर्थ सांगून विकास स्पष्ट करा.

२. जॉन लॉक व ग्रामसी यांचे नागरी समाजाबाबत विचार स्पष्ट करा.

३. उदारमतवादाची तत्त्वे व स्वरूप स्पष्ट करा.

४. कार्ल मार्क्स यांचे नागरी समाजाबाबतचे विचार स्पष्ट करा.

❑ **टिपा लिहा.**

१. उत्तर वसाहतवाद व नागरी समाज.

२. हेगेलचे नागरी समाजविषयी विचार.

३. नागरी समाजाचा विकास.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **बाचल वि. मा.** : *'राजकीय सिद्धांत'*.

२. **भोळे भा. ल.** : *'राजकीय सिद्‌धांत विश्लेषण'*.

३. **डोळे ना. य.** : *'राजकीय विचारांचा इतिहास'*.

४. **नवलगुंदकर श. ना.** : *'पाश्चात्त्य राजकीय विचारवंत'*.

५. **Bhandari D. R.** *"History of European Political Philosophy".*


❀❀❀